15-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

BGO/ 10:15

15-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A

BGO/ MHM/ SBT/ 10:15

<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विलास अवचट</u>

तालिका सभापती : अल्पकालीन चर्चा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज महत्त्वाच्या विषयावर अल्पकालीन चर्चा आहे. परंतु, सभागृहात संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय उपस्थित नाही. त्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी सभागृहाची बैठक 10 मिनिटाकरिता स्थगित करीत आहे.

(10.16 ते 10.26 पर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापती स्थानी :तालिका सभापती श्री.विलास अवचट)

पृशी : राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेली जीवित व वित्त हानी.

मृशी: राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेली जीवित व वित्त हानी या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दीपक सावंत, मधु चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.अशोक मोडक, श्री. अरविंद सांवत, श्रीमती कांता नलावडे, श्री.विलास अवचट, श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री अनिल परब, विनोद तावडे, कन्हैयालाल गिडवाणी, प्रकाश शेंडगे, अनंत तरे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

तालिका सभापती : अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सन्माननीय सदस्य सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

सभापती महोदय, दिनांक 26 जुलै रोजी मुंबईत आणि महाराष्ट्रात जी अतिवृष्टी झाली आणि त्यामुळे जे संकट कोसळले त्यामध्ये जीवित व अपरिमित वित्त हानी झाली. अशाच प्रकारचे संकट 1972 साली आले होते. त्यावेळी महाराष्ट्रात पाऊस झाला नाही, कोरडा दुष्काळ पडला होता. या संकटावर मात करण्यासाठी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांनी या दुष्काळाचा मुकाबला फार हिमतीने केला होता. अशाच प्रकारचे संकट 1993 मध्ये भूकंपाच्या माध्यमातून झाले होते. त्यावेळी स्वयंसेवी संस्थानी तसेच अन्य राज्यांनी आपल्याला मदत केली होती.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि अशा पध्दतीने आलेल्या संकटाचा मुकाबला केला गेला. दिनांक 26 जुलै ते 5 ऑगस्ट, 2005 या सात-आठ दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्राला अत्यंत विनाशकारी दिवस पाहावयास मिळाले. महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संपल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कसलीही कल्पना नसताना मुंबईमध्ये धो-धो पावसाला सुरुवात झाली. एकाच दिवसात 50 वर्षात सुध्दा पाऊस झाला नसेल इतका 900 मि.मी. पाऊस पडला. याबाबतची जनतेला कल्पना नव्हती. हवामान खात्याने अंदाज वर्तविले नव्हते. अशा परिस्थितीत पाऊस आला. रस्त्यावरील माणसे रस्त्यात, घरातील माणसे घरात, गाडीतील माणसे गाडीतच राहिली. त्यांना बाहेर पडण्यास सुध्दा उसंत मिळाली नाही. मुंबईतील सारे जनजीवन ठप्प झाले. दोन-दोन दिवस लोकांना गाडयातून बाहेर पडता आले नाही, काही गाडयांचे काच न उघडल्यामुळे माणसे गुदमरुन मृत्यूमुखी पडली. त्यावेळी पावसाने अतिशय रौद्ररुप धारण केले होते. आठ-आठ दिवस काही विभाग पुरामध्ये, पावसामध्ये अडकून पडले होते. मुंबईतील हे संकट आटोपते न आटोपते, तितक्यात 13 सप्टेंबर रोजी छत्तीसगडच्या भागामध्ये कमी दाबाचे पट्टे निर्माण झाले, त्यामुळे विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली हे चारही जिल्हे पावसाने वेढले गेले आणि त्या परिसरात विक्रमी पावसाची नोंद झाली. एकीकडे पाऊस पडत असताना नद्यांना महापूर आला. त्यामुळे मध्य प्रदेशातील बालाघाट परिसरातील संजय सरोवरात मोठया प्रमाणावर पाणी साचल्यामुळे त्यातील 1 लाख 80 हजार क्युबेक पाणी सोडावे लागले. त्यामुळे प्रचंड महापूर या चार जिल्हयांमध्ये आला आणि गावच्या गावे पाण्याखाली गेली. छत्तीसगड भागात कमी दाबाचे पट्टे निर्माण झाल्यामुळे एका बाजूला विदर्भात पाऊस झाला, तर दुसऱ्या बाजूला संजय सरोवरातील पाणी सोडल्याने नद्यांना महापूर आला. त्यातच आंध्र प्रदेशातील आलमट्टी धरणातील पाणी सोडले गेले नाही म्हणून, कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्हयाचा काही भाग कृष्णेच्या पाण्यामुळे वेढला गेला. सांगलीमध्ये तर यामुळे अतिशर कहर झाला. त्या भागातील लोकांना बाहेर काढण्यासाठी अक्षरश: सात-आठ दिवस होडयांचा वापर करावा लागला. पहिल्या मजल्यापर्यंतची घरे पाण्याखाली गेली होती. कधी न पाहिलेला पूर त्यावेळी आला. आम्ही ज्यावेळी त्या भागातील दौरा केला तेव्हा तेथील रहिवाशांनी, 50 वर्षात असा पूर आम्ही पाहिलेला नाही असे सांगितले. त्या भागात आलमट्टी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

धरण आणि विदर्भात संजय सरोवर एवढा मोठा प्रकार घडण्यास कारणीभूत ठरले, परिणामी राज्यावर मोठे संकट ओढवले गेले. विदर्भ आणि मराठवाडयातील काही भागांमध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली. मराठवाडयातील जायकवाडी आणि उजनी प्रकल्प ओव्हर-फ्लो झाले. पंढरपूर गावही पुरामुळे पाण्याखाली गेले होते. महाराष्ट्रात एक ते दीड महिना पुराने आणि अतिवृष्टीने ग्रासलेली परिस्थिती होती.

या पुरामुळे किती गावांना नुकसान झाले हे पुढील माहितीवरुन स्पष्ट होईल. सभापती महोदय, ढोबळमानाने कोल्हापूर जिल्हयातील 981 गावांचे, सातारा जिल्हयातल 887 गावांचे, परभणीतील 756, पुण्यातील 674, ठाण्यातील 419, सांगलीतील 329, नांदेड येथील 750 आणि गोंदिया जिल्हयातील 300 गावांचे या पुरामुळे नुकसान झालेले आहे. अकोला आणि मराठवाडयातील गावांचा जर नुकसान झालेल्या गावांमध्ये समावेश केला तर तो आकडा जवळजवळ 8 ते 10 हजारांपर्यंत जाईल.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, या पुराच्या पाण्यामुळे अनेक गावांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते.घरामध्ये पाणी आल्यामुळे घरातील सामान वाहून गेले होते. परंतु केवळ घरातील सामानच वाहून गेले होते असे नाही तर नदीच्या कडेला जी शेतजमीन होती त्या जमिनीत पुराचे पाणी घुसल्यामुळे काळी कसदार जमीन खरवडून गेली होती. शेतक-याच्या शेतीची काय स्थिती झाली होती हे मी स्वत: पाहून आलो होतो. शेतातील काळी माती वाहून गेल्यामुळे शेतीचे जे नुकसान झाले आहे त्यामुळे 10 -15 वर्षे हा शेतकरी उभा राहू शकणार नाही ही वस्तुस्थिती आहे. या पुरामुळे ग्रामीण भागातील शेतक-यांचे आणि त्यांच्या शेतीचे जे काही नुकसान झाले होते त्याबाबतीत मी आताच सांगितलेले आहे. मुंबईमध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर पूर आला होता त्याचे वर्णन मुंबईतील आणि इतर भागातील सन्माननीय सदस्य करतील.मुंबईत पूर आल्यानंतर दोन दिवसांनी मी कल्याण डोंबिवली ,अंबरनाथ या भागात गेलो होतो. कल्याण,डोबिवली,बदलापूर,अंबरनाथ या भागात तर पुराने कहरच केला होता. या पुरात अनेक माणसे दोन दिवस आणि दोन रात्र अडकली होती आणि या अडकलेल्या व्यक्तींना इतर माणसे मदत करीत होती.26 जुलै 2005 रोजी मुंबईमध्ये पूर आला होता आणि अनेक भागात पाणी साचले होते. मुबईतील मिठी नदीला पूर आला होता व त्या मुळे त्या भागातील अनेक लोकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले हाते. मिठी नदीला पूर येण्याची कारणे काय आहेत ? हे शोधण्यात आले होते.तेव्हा असे निदर्शनास आले की, या मिठी नदीच्या पात्रात अतिक्रमणे झालेली आहेत त्यामुळे नदीचे स्वरुप न राहता मिठी नदीला नाल्याचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. या नदीच्या दोन्ही बाजूंनी अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत. ही बांधकामे काही बिल्डर्सनी केलेली आहेत किंवा उद्योगधदे करणा-यांनी केलेली आहेत असे नाही तर एअर पोर्ट ॲथॉरिटीने देखील बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन त्या नदीचा प्रवाहच बदलून टाकला आहे.त्याचबरोबर काही बिल्डर्सनी मातीचा थर टाकून तेथील जमिनीवर कब्जा मिळविण्याचासुध्दा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच त्या भागातील लोकांवर पुराच्या पाण्याचे संकट अधिक वाढले होते. जवळजवळ आठ दिवस मुंबईतील माणसे पाण्यात होती.सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की. या सभागृहात मी कधीही राजकीय भाषण करीत नाही.मला तशा प्रकारची सवयही नाही.या चर्चेच्या निमित्ताने मला आपल्याला हे सांगावयाचे आहे की, मुंबईवर एवढे मोठे संकट आलेले असतांना पोलीस दलातील कर्मचारी, महसूल विभागातील

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

कर्मचारी, महानगरपालिकेतील कर्मचारी आणि इतर संबंधित खात्यातील कर्मचा-यांनी पुरामध्ये अडकलेल्या व्यक्तींना मदत करावयाची असतांना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या कर्मचा-यांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर केली होती. त्यामुळे संकटात सापडलेल्या व्यक्तींना मदत करण्यासाठी सरकारी कर्मचारी वा इतर कर्मचारी नसल्यामुळे पुराच्या पाण्यात अडकेलेल्या व्यक्ती असहाय्य स्थितीत तास आणि दिवस मोजत पाण्यातच उभ्या राहिल्या होत्या.त्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते वा खाण्यासाठी अन्न पदार्थ मिळत नव्हते. अशा वाईट स्थितीत त्यांनी दोन दिवस पाण्यात उभे राहून काढले होते .या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, पुरात अडकलेल्या व्यक्तींना मदत करण्याच्या बाबतीत प्रशासनाने वेळीच निर्णय घेतला असता तर काही प्रमाणात या संकटावर आपण मात करु शकलो असतो.परंतु तसे न घडल्यामुळे पुरात अडकलेले मुंबईमधील लोक बेवारस आणि निराधार झाले होते.मुबईतील या पूरग्रस्तांना कोणाचाही आधार मिळाला नाही. सभापती महोदय, 26 जुलै 2005 रोजी मुंबईवर जे संकट आले होते ते साधे संकट नव्हते.या संकटाकडे राज्य शासनाने ज्या पध्दतीने पहावयास पाहिजे होते त्या पध्दतीने राज्य सरकारने पाहिलेले नाही.राज्यातील प्रशासन सुस्त झाले होते.ज्यावेळी मुंबई आणि मुंबईच्या परिसराला पुराच्या पाण्याने वेढले होते त्यावेळी शासन गलितगात्र झाले होते. ज्याप्रमाणे महाभारतात अजुर्नाला युध्द भूमीवर गेल्यानंतर समोर मोठे सैन्य दिसले होते .त्या सैन्यात आपले आप्तस्वकीय आहेत हे त्याने पाहिले व तो गलितगात्र झाला होता त्याप्रमाणे मुंबईत आलेल्या महापुराच्या संकटापुढे हे सरकार गलितगात्र झाले होते. काय करावे हे सरकारला काही सुचत नव्हते.सभापती महोदय, ज्यावेळी महापूर आला होता त्यावेळी सरकारने विरोधी पक्षातील लोकांना बोलावून, त्यांना विश्वासात घेऊन व त्यांच्याबरोबर विचारविनिमय करुन काही तातडीने उपाययोजना केली असती तर काही प्रमाणात आपण या संकटावर मात करण्यामध्ये यशस्वी होऊ शकलो असतो.परंतु तसे काही घडले नाही. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये ठिक ठिकाणी जी अतिवृष्टी झाली होती त्यामुळे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. या अतिवृष्टीमुळे राज्यातील 165 तालुक्यातील 8 हजार 164 गावे बाधित झाली होती आणि 6 लाख 23 हजार 328 हेक्टर शेत जमीन वाहून गेली होती.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

आता तो शेतकरी उभा राहू शकत नाही. त्यामध्ये कापूस उत्पादक शेतकरी आहे, धान उत्पादक शेतकरी आहे, फळबागावाले, बागायतदार शेतकरी आहेत. त्यातून कोणीही शेतकरी सुटलेला नाही. जवळपास 6 ते 7 लाख हेक्टर जमीन पुरामध्ये वाहून गेली आणि त्यामध्ये सुमारे 3 लाख 64 हजार शेतकरी बाधित झाले. त्यांना आपण काय दिले ? सभापती महोदय, पुरासंबंधात दौरे आम्ही केले आणि आपल्या मंत्र्यांनी देखील केले आहेत. त्या दौऱ्यांमध्ये आपल्या मंत्र्यांनी, शासनाने शेतकऱ्यांना मदतीचे मृगजळ दाखविले. कोरडवाहू शेतकऱ्यांना हेक्टरी 15 हजार रूपये मदत देऊ म्हणून सांगितले. या मदतीच्या घोषणा खूप झाल्या. पुरामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना आम्ही या या पद्धतीने मदत देऊ म्हणून सांगण्यात आले पण प्रत्यक्षात जी.आर. काढला त्यामध्ये पुरामुळे निराश्रित झालेल्या लोकांना माणशी 1 हजार आणि कमाल मर्यादा 5 हजार रूपये पर्यंत मदत दिली गेली. म्हणजे कुटुंबामध्ये एक माणूस असेल, 2 असतील वा 5 असतील त्यांना दरडोई 1 हजार रूपये मदत दिली गेली आणि ज्या कुटुंबात 5 आणि 5 पेक्षा जास्त म्हणजे अगदी 15 माणसे असली तरी देखील त्याला कमाल म्हणजे 5 हजार रूपयेच मदत देण्यात आली. सभापती महोदय, कोकणामध्ये या अतिवृष्टी-पुराने थैमान घातले होते त्यानंतर देशाचे कृषीमंत्री श्री.शरद पवार हे त्या ठिकाणी गेले, त्यांनी तेथील माणसांना, शेतकऱ्यांना दिलासा दिला असे मोठ्या अभिमानाने सांगितले गेले. पण हा दिलासा दिला म्हणजे काय दिले ? तर 10 किलो गहू, 10 किलो तांदूळ आणि 10 लीटर डिझेल-रॉकेल दिले. आता या 10 किलो गहू-तांदूळाने आणि 10 लीटर रॉकेलने दिलासा मिळतो का ? मिळत असेल तर तुमचे सरकार धन्य आहे असेच म्हणावे लागेल. एका दौऱ्यामध्ये आम्ही गेलो असता तेथील शेतकऱ्याने आम्हाला सांगितले की, माझी शेती वाहून गेली तसेच बकऱ्या देखील वाहून गेल्या. आता अशा शेतकऱ्यांना काय मदत दिली गेली असेल ? मी एक उदाहरण देईन. आम्ही त्या शेतकऱ्याला विचारले की, तुझे जे नुकसान झाले आहे त्याचा पंचनामा झाला आहे काय ? त्याने 'होय' असे उत्तर दिले. नंतर आम्ही पटवाऱ्याला यांना काय मदत देणार म्हणून विचारले असता त्याने सांगितले की, एका बकरी मागे 100 रूपये मदत देतो. आता हा कोणत्या जमान्यातील आपला जी.आर. आहे ? तुमच्या सरकारातील एखाद्या प्रतिनिधीला सांगितले की, हे 100 रूपये घेऊन जा आणि एक किलो मटण आण, तर तेवढ्या पैशामध्ये तो एक किलो मटण देखील आणू शकत नाही अशी आज परिस्थिती आहे आणि अशा परिस्थितीमध्ये तुम्ही

..... इ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

एका बकरीची किंमत वा भरपाई म्हणून 100 रूपये देणार ? म्हणजे आपण त्या शेतकऱ्याची गंमत करीत आहात, थट्टा करीत आहात काय ? म्हणजे आपण मदत देणे तर सोडाच पण त्याच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखेच केलेले आहे. कृपया तेवढे तरी आपण करू नका. सभापती महोदय, या अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून किती मदत जाहीर झाली आहे हे आपण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, ऊस वा केळीचे उत्पादन घेणाऱ्यांना हेक्टरी 10 हजार रूपये म्हणजे एकरी 4 हजार रूपये आणि कापूस व भात घेणाऱ्यांना हेक्टरी 5 हजार म्हणजे एकरी 2 हजार रूपये आणि इतर पिकांसाठी म्हणून हेक्टरी 3 हजार रूपये, फळबागेगला हेक्टरी 10 हजार रूपये आणि कोकणामध्ये नागली व वरईची पिके घेतली जातात तेथे हेक्टरी 1हजार रूपये देण्याची घोषणा केली गेली. पण प्रत्यक्षात ती मदत दिली गेली काय ? सर्वांना दिली गेली आहे का ? त्या ठिकाणी कित्येकांच्या शेतातील माती देखील पूर्णपणे वाहून गेली आहे, खालील दगड, कातळ तेथे दिसून येतो आहे. त्यांच्याबाबतीत आपण काय केले आहे ? सभापती महोदय, अशा जमिनी कसदार करावयाच्या असतील तर त्या जमिनीमध्ये रोजगार हमी योजनेतून माती टाकण्याचे काम, गाळ बाहेरून आणून दिला गेला पाहिजे होता. पण ते करून दिले गेले नाही. त्याच्या जमिनीचे सपाटीकरण करून द्या, पण तेही झालेले नाही. ज्या शेतकऱ्यांची जमीन पूर्णपणे खरडून गेली आहे तो शेतकरी त्यामुळे पुढील 25 वर्षे उभा राहू शकत नाही, तेथे शेती करू शकत नाही अशी स्थिती आहे. पण त्या शेतकऱ्यांना तुम्ही या पद्धतीने मदत दिली आहे, आणि जी काही तुटपुंजी मदत दिली ती देखील पूर्ण झालेली नाही. झालेल्या नुकसानीचे पंचनामे देखील नीट केले गेले नाहीत. त्यामध्ये देखील प्रचंड राजकारण झाले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून याद्या दिल्या गेल्या आणि सांगितले गेले की, या यादीतील लोकांनाच मदत दिली पाहिजे. सभापती महोदय, नांदेड आणि अकोला जिल्ह्यामध्ये तर यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला. ..

(यानंतर श्री.सरफरे ..... एफ 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

अनेक जिल्हयामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे या ठिक्राणी सांगता येतील. त्याठिकाणी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करतांना तुम्ही राजकारण केले. आणि जे बाधित झालेले शेतकरी आहेत त्यांना मदत दिली गेली नाही. परंतु ज्यांचे नुकसान झालेले नाही, ज्यांच्या शेतामध्ये पाणी गेले नाही त्यांना मदत दिली गेली. आजूबाजूच्या घरामध्ये पाणी गेले, मधल्या घरामध्ये पाणी गेले नाही. परंतु मदत देतांना ज्या घरामध्ये पाणी गेले नाही त्या मधल्या घरातील लोकांना मदत दिली गेली. अशी कितीतरी प्रकरणे या ठिक्राणी सांगता येतील. सभापती महोदय, मी अंबरनाथ येथे पहाणी करण्यासाठी गेलो होतो. त्या ठिकाणी पूर आल्यानंतर तिसऱ्या, चौथ्या दिवशी मदतीचे वाटप सुरु करण्यात आले होते. त्याठिकाणी गहू, तांदूळाचा आलेला ट्रकच्या ट्रक राष्ट्रवादी कॉग्रेसच्या कार्यकर्त्यांना पळविला. आणि राष्ट्रवादी कॉग्रेसचा फलक लावून राष्ट्रवादी कॉग्रेसतर्फे मदतीचे वाटप सुरु आहे अशाप्रकारची घोषणा केली गेली. प्रत्यक्ष त्या स्थळी मी गेलो असतांना त्या ठिकाणी वाटप करणारे अधिकारी हे तहसिलदाराच्या पातळीचे होते. त्यांना विचारले की, तुम्ही हे असे कां केले? ते म्हणाले की, साहेब पहिल्यांदा चूक झाली आहे यापुढे असे करणार नाही. त्या अधिकाऱ्याने राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे लावलेले बॅनर नंतर काढून टाकले. अशाप्रकारे प्रेताच्या टाळूवरी लोणी खाण्याचे राजकारण करुन मदतीचे श्रेय लाटण्याचे प्रकार घडले आहेत. अशाप्रकारे मदतीचे राजकारण करुन त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार करण्यात आला आहे. याबाबत मंत्रिमहोदय याठिकाणी कोणते उत्तर देणार आहेत? आपण केंद्र सरकारकडे मदतीसाठी प्रस्ताव सादर केला. परंतु केंद्र सरकारने तातडीने मदत दिली नाही. तुम्ही केंद्र सरकारला 12 ते 15 हजार कोटींचे नुकसान झाल्याचे सांगितले. याबाबत माननीय पंतप्रधानांना प्रस्ताव सादर केला, माननीय राष्ट्रपतींना प्रस्ताव सादर केला. तेव्हा आपल्याला कुणाकडून किती आणि केव्हा मदत मिळाली ते सभागृहाला सांगा. त्याचप्रमाणे राज्य सरकारने किती रुपयांचे मदतीचे वाटप केले तेही सांगावे. महाराष्ट्रामध्ये हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले असतांना राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना तोकडी मदत दिली गेली. सभापती महोदय, डोंबिवली हा एक राज्यातील सधन भाग आहे. त्या परिसरामध्ये मी फिरु शकलो नाही परंतु व्यापारी पट्टयामध्ये फिरलो. त्या भागामध्ये सर्वत्र दुर्गंधी पसरली होती. नाकाला कापड लावून फिरावे लागत होते. दुकानदारांचा लाखो रुपयांचा माल कुजला, सडला त्यामुळे तो टाकून द्यावा लागला. त्यांना आपण 20 हजार रुपयांची नुकसान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

भरपाई दिली. व्यापाऱ्यांचे म्हणणे असे की, आमचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आम्हाला शासनाची मदत नको. फक्त आमचे इन्शुरन्सचे क्लेम तात्काळ आम्हाला देण्यात यावेत. त्यामधून आम्हाला मदत मिळेल. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना तुमचे इन्शुरन्सचे क्लेम 8 दिवसात केले जातील असे सांगितले. परंतु त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांना क्लेम मिळाले नाहीत. अशातऱ्हेने या पूराच्या संकटाकडे, अतिवृष्टीकडे सरकारने गांभीर्याने पाहिले नाही. अजूनही पूरग्रस्त भागातील शेतकरी ओरडत आहेत, ते उध्वस्त झाले आहेत. ते मदतीची अपेक्षा करीत आहेत. परंतु राज्य सरकारच्या माध्यमातून त्यांना पाहिजे त्या प्रमाणामध्ये मदत पोहोचली नाही. याबाबत आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. ज्या ज्या जिल्हयामध्ये पूर आला त्या जिल्हयातील शेतकरी उध्वस्त झाला. त्याची शेती खरवडून गेली, ज्या शेतकऱ्यांची घरे वाहून गेली त्यांच्या पुनर्वसनाचे काय करणार? अशाप्रकारचा प्रश्न काल विचारण्यात आला होता. त्यावेळी माननीय श्री. शिंगणे साहेबांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यामध्ये ग्रामीण भागातील सर्व घरे पुनर्वसित केली आहेत. जुलै महिन्यामध्ये पूर आल्यानंतर आता डिसेंबरमध्ये आपण घोषणा करीत आहात. त्याचे नियोजन जानेवारीमध्ये होणार आणि मदत जुलै महिन्यापर्यंत दिली जाईल. तेव्हा या सरकारची काम करण्याची गती तपासण्याची गरज आहे. जे शेतकरी पूरामध्ये, अतिवृष्टीमध्ये सापडले आहेत त्यांना अजूनपर्यंत मदत दिली गेली नाही म्हणून याठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. तुम्ही केंद्र सरकारकडे 15 हजार कोटींच्या मदतीची मागणी केली असता तुम्हाला केंद्र सरकारकडून 1 हजार कोटी रुपये देण्यात आले. त्याचे सुध्दा राज्य सरकारने वाटप केले नाही. केंद्र सरकारने दिलेल्या पैश्याचे 100 टक्के सुध्दा वाटप झालेले नाही. अशा पध्दतीने हे शासन चालले आहे तर मग कुणाकडून अपेक्षा करायची? सभापती महोदय, पूर आल्यानंतर डिझॅस्टर मॅनेजमेंटची घोषणा करण्यात आली. हे डिझॅस्टर मॅनेजमेंट कुठे आहे, ते त्यावेळी काय करीत होते? यापुढे महाराष्ट्रामध्ये जर संकट आले तर त्या संकटावर ताबडतोब मात करता येईल यासाठी त्याला कार्यान्वित केले आहे काय हे आपण याठिकाणी सांगितले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

या पुराने महाराष्ट्राला उध्वस्त केले आहे. महाराष्ट्र भूकंपातून सावरला, महाराष्ट्र 1972 मध्ये कै.वसंतराव नाईक यांच्या काळामध्ये दुष्काळी परिस्थितीतून सावरला पण सहा महिने झाले तरी या राज्यातील माणूस पूरातून सावरलेला नाही, याचे दु:ख आहे आणि याची याठिकाणी नोंद केली पाहिजे. या देशामध्ये इतर कोणत्या प्रांतामध्ये संकट आले मग यापूर्वी आंध्र प्रदेशमध्ये संकट आले होते, गुजराथमध्ये भूकंप झाला होता, अशा प्रकारे इतर राज्यांमध्ये कुठे महापूर आला, चक्रीवादळ झ ाले तर महाराष्ट्रातील मराठी माणूस सर्वात अगोदर तेथे धाऊन गेला आहे. पण याबाबतीत थोडे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. परंतु या राज्यावर जेव्हा संकट आले, मी रोज पेपर पहात होतो पण इतर कोणत्याही राज्यांनी आम्हाला मदत घोषित केली नाही याचे दु:ख होते. देशातील ज्या-ज्या प्रांतामध्ये संकट आले, तेव्हा महाराष्ट्र पहिल्यांदा धाऊन गेला होता. पण महाराष्ट्रावर संकट आले तेव्हा कोणत्याही प्रदेशाने, कोणत्याही प्रांताने मदतीचा हात पुढे केला नाही. फक्त गुजराथच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत घोषणा केली आणि भारतीय जनता पक्षाची जेथे-जेथे सरकारे आहेत, तेथील सर्व माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. माननीय श्री.लालकृष्ण अडवाणी यांनी सांगितले की, आमच्या राज्यातील मुख्यमंत्री मदत करतील आणि सर्व मुख्यमंत्र्यांनी मिळून 25 कोटी रुपयांची घोषणा केली. मात्र इतर कोणत्याही राज्यांनी, तेथील स्वयंसेवी संस्थांनी मदत केली नाही. गुजराथमध्ये भूकंप झाला तेव्हा त्याठिकाणी मदत घेऊन फक्त आपले सरकारचे गेले नाही तर या राज्यातील स्वयंसेवी संघटना, सर्व राजकीय पक्ष त्यांच्या मदतीसाठी धाऊन गेले. पण जेव्हा महाराष्ट्रावर संकट आले, तेव्हा कोणीही धाऊन आले नाही याचे दु:ख व्यक्त केले पाहिजे. अजूनही वेळ गेलेली नाही. मी मुंबईबद्दल जास्त बोलणार नाही. या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण बोलतील. पण महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जो माणूस आहे, शेतकरी आहे, त्याला उभे करणार आहात की नाही ? त्याची जमीन वाहून गेल्याने त्याच्या पोटाची भाकर नाहीशी झाली आहे, ती त्यांना मिळाली पाहिजे. यासाठी त्यांना जमीन देणार आहात की नाही ? महापूरामध्ये ज्यांची घरे गेली आहेत, त्यांचे पुनर्वसन करणार आहात की नाही? हा प्रश्न आहे. महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे एक हजार माणसे मरण पावली. परवा प्रश्नोत्तराच्या तासामध्ये यासंबंधातील एका प्रश्नाबाबत चर्चा झाली होती. त्यापैकी 900 लोकांना केंद्र शासनाने मदत केली. यासंबंधात केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला. पण बाकीच्यांना केंद्र

. . . .जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

शासनाची मदत मिळाली नाही. याबाबतीत आपण केंद्र शासनाकडे विचारणा केली की, ही मदत का मिळाली नाही ? तर असे सांगण्यात आले की, वारसदारांमध्ये वाद आहेत, त्यांनी बँकेमध्ये खाते उघडलेले नाही. कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही म्हणून त्यांना मदत मिळाली नाही. या परिस्थितीमध्ये जर शासन असे वागणार असेल की, बँकेमध्ये खाते उघडलेले नाही म्हणून केंद्र शासनाकडून मदत मिळत नाही तर हे बरोबर नाही. जे 1000 हजार मरण पावले आहेत, तो आकडा तरी पूर्ण करा. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखे करु नका. राज्यात 1042 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या हे शासनाने मान्य केले पण मदतीसाठी त्यापैकी केवळ 248 शेतकऱ्यांना फायनल करण्यात आले आणि प्रत्यक्षात 48 शेतकऱ्यांनाच मदत केलेली आहे. तसे पूरपरिस्थितीच्या बाबतीत करु नका. याबाबतीत नीट तपासून पहावे. हा नैसर्गिक कोप होता. खरे म्हणजे आपल्या शासनाचे ग्रह तपासण्याची गरज आहे. ग्रहांची शांती करण्याचीही आवश्यकता आहे. राहू आहे,केतू आहे की शनी आहे हे मला माहिती नाही पण हे तपासण्याची गरज आहे. पहिल्यांदा जेव्हा माननीय श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले आणि त्यांचा पायगुण असा लागला की, पहिल्या वर्षी राज्यातील 12 जिल्हयात दुष्काळ पडला, दुसऱ्या वर्षी 14 जिल्हयात, तिसऱ्या वर्षी 14-15 जिल्हयात दुष्काळ पडला. हे श्रीमती सोनिया गांधींनी पाहिले की, यांचा पायगुण चांगला नाही. मग त्यांनी त्यांना पायउतार केले आणि त्यांच्या जागेवर माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांना मुख्यमंत्री केले. त्यांनी दोन वर्षे कारभार केला आणि मग निवडणुका झाल्या. मग पुन्हा माननीय श्री.विलासराव देशमुख यांना मुख्यमंत्री पदावर बसविले तर महाराष्ट्रात हा जलप्रलय झाला. तेव्हा शासनाच्या ग्रहाची, कुंडलीची तपासणी करुन घ्यावयास पाहिजे. जर एखादा ग्रह कोपला असेल तर त्याची शांती करुन घ्यावयास पाहिजे. तुमच्या या ग्रहांमुळे महाराष्ट्रातील जनतेला भोगावे लागत आहे. या राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना, लोकांना मदत करण्यामध्ये हे शासन पूर्णपणे अपयशी ठरलेले आहे. या पूरामध्ये सापडलेल्या लोकांना, शेतकऱ्यांना सरकारने ताबडतोब मदत करावी अशा प्रकारची यानिमित्ताने मी मागणी करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देऊन माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश देशमुख (परभाणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोध पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराच्या संदर्भात महत्वाची चर्चा उपस्थित केलेली आहे. परभणी आणि नांदेड येथे देखील अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर मुंबईमध्ये सर्वपक्षीय बैठक झाली. तीन दिवस पूर परिस्थिती होती. त्या संदर्भात महाराष्ट्रातील तमाम जनतेला दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून मदत करण्याकरिता शासनाने तातडीने पावले उचललेली आहेत. परभणी गावामध्ये तिसऱ्या दिवशी सानुग्रह अनुदान दिले गेलेले आहे. ही मदत माणशी एक हजार रुपये देण्यात आली. त्याचबरोबर गहू, रॉकेल, तांदूळ यांचा पुरवठा करण्यात आला. रॉकेलचा पुरवठा हा चार दिवसांनी झाला. राज्यामध्ये मोठ्याप्रमाणात पहिल्यांदाच पंचनामे झालेले आहेत. हे काम 10-15 दिवस चालू होते. पूर्वी मदतीचे चेकवर दोन अंकी रक्कम रहात होती, तेव्हा तीन आकडयामध्ये पैसे मिळालेले नव्हते. परंतु आताच्या या परिस्थितीमध्ये ऐतिहासिक निर्णय ताबडतोबीने घेण्यात आला आणि सरकारने माणशी एक हजार रुपये दिलेले आहेत. जरुर त्याबाबत काही टीका झालेल्या आहेत. परंतु ताबडतोबीने त्या ठिकाणी मदत करायची होती. काही अधिकाऱ्यांनी नॉर्म्सप्रमाणे नोंद करायला पाहिजे,ती केलेली नाही. ज्याप्रमाणे मुंबईमध्ये प्रकार झाला, तसेच याही ठिकाणी झाला. काही अधिकाऱ्यांचा यामध्ये दोष असला तरी सुध्दा सर्वच अधिकारी दोषी आहेत, असे माझे मत नाही. विशेष करुन गेल्या 30 वर्षपासून परभणी शहराला पाणीपुरवठ्याची योजना दुधना नदीच्या तीरावरुन समर्थपणे चालत होती. परंतु या पुरामध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या फिल्डर प्लॅन्टमध्ये पाणी गेले, गाळ साचला, मोटर आणि पाईप लाईन गाळामध्ये जाम झाली. तेव्हापासून पाणीपुरवठा योजना सुरळीत झालेली नाही. सरकारने घोषणा केलेली आहे की, त्या ठिकाणी ती योजना आम्ही पूर्णपणे सांभाळू. पूर्वी ही योजना शासनाकडे होती, त्यानंतर ती नगरपालिकडे गेली. परंतु त्या ठिकाणी नगराध्यक्ष नसल्यामुळे ही योजना सक्षम रितीने नगरपालिका सांभाळू शकत नसल्यामुळे, शासनाला याबाबतीत विनंती करण्यात आली, ती विनंती शासनाने मान्य केली. तशाप्रकारची घोषणाही करण्यात आली. आता ही योजना चालू करण्यासाठी 3 ते 4 कोटी रुपये लागणार आहेत. परभणीमध्ये जवळपास 10-10 दिवस, 15-15 दिवस पाणी नाही. सध्या जे काही पाणी मिळते, ते रॉ वॉटर कॅनॉलमधून शहराला मिळते. म्हणून योजना पूर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने लक्ष द्यावे. या ठिकाणी पुनर्वसन मंत्री बसलेले आहेत, त्यांचे मी अभिनंदन करतो. ते परभणी जिल्हा भेटीसाठी आले असतांना त्यांनी शेतकऱ्यांना मदत करण्याच्यादृष्टीने 7 कोटी रुपये दिले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.सुरेशदादा देशमुख (पुढे सुरु...

त्यानंतर राहिलेले 36 कोटी रुपयेही जिल्ह्याला दिलेले आहेत. पुन्हा 2 कोटी रुपये कमी पडतात. रस्ते राहिलेले आहेत, त्यासाठी त्यांनी 2 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पुनर्वसन मंत्री कोल्हापूरमध्ये पुराचे पाणी असतांना देखील परभणीमध्ये आले आणि त्यांनी मदत उपलब्ध करुन दिली त्याबद्दल त्यांचे आणि शासनाचे आभार मानतो. धन्यवाद.

--

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर साहेबांनी प्रस्ताव मांडून त्यावर आपले विचार मांडले. मी डिटेल्समध्ये जाणार नाही. संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून त्यांनी येथे चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी अडचणी आणि तक्रारी मांडलेल्या आहेत.

तालिका सभापती (श्री.विलास अवचट) : या चर्चेमध्ये एकूण 13 सन्माननीय सदस्यांना भाग घ्यायचा आहे. त्यानंतर उत्तरासाठी मा. मंत्री महोदयांना जवळजवळ अर्धातास देणे आवश्यक आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केले तर बरे होईल.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या संदर्भात जे वाटप झालले आहे त्याचे नियोजन करण्याची गरज आहे. सभापती महोदय, यादृष्टीने केवळ दोन मुद्दे मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. मुंबईच्या बरोबरच नवी मुंबई वाढत आहे. त्यामुळे तिच्या बाजूबाजूला भराव टाकून तेथे नवीन वस्ती होत आहे. त्याठिकाणी जे बांधकाम होत आहे त्याचा परिणाम भरती-ओहोटीवर होतो. त्यामुळे मुंबईला लागून असलेल्या संपूर्ण 50 कि.मी. च्या परिसरामध्ये असलेले किनारे आणि गावे यांना पुढील काळात धोका संभवतो. याबाबतीत शासनाने प्लॅनिंग केले नाही. त्यांच्या ड्रेजनचे प्लॅनिंग प्रामुख्याने केले नाही तर आलेल्या पावसाचे पाणी आणि भरती-अहोटीचे पाणी कशा प्रकारे वाहून जाईल याची शास्त्रोक्तरित्या पाहणी करुन ते पाणी कशा प्रकारे जाईल, त्या पाण्याचा निचरा कसा होईल हे बघण्याचे काम झाले पाहिजे. सभापती महोदय, पूर परिस्थिती निवळल्यानंतर मी चायनामध्ये शांघायला गेलो होतो. त्या ठिकाणीही मुंबईसारखा पूर आला होता. आपण सर्वांनी त्यासंबंधीचे दृश्य टी.व्ही.वर बघितले असेल. पूर आला त्यावेळी मी बिजिंगला होतो आणि आठ दिवसांनी शांघायला गेलो. तेथे पूर येऊन गेला असे कुठेही जाणवत नव्हते. ते शहर पूर्णपणे स्वच्छ होते. तेथील ड्रेनेज सिस्टिम चांगली होती. म्हणून पूर येऊन गेल्या नंतर एक-दोन दिवसातच त्या संपूर्ण शहरात स्वच्छता दिसली. त्या ठिकाणी पुराचा मागमूसही नव्हता. शासन मुंबईचे शांघाय करायला मागत आहे. हे करीत असतांना मुंबईपासून 100 कि.मी.च्या परिसरात असणारी संपूर्ण गावे घोक्यात आहेत ही खरी वस्तुस्थिती आहे.सभापती महोदय, पनवेल शहरात पाच दिवस आम्ही जाऊ शकत नव्हतो अशा परिस्थितीत पनवेल शहर होते. तेथील टेलिफान लागत नव्हते, दळणवळणाची सोय नव्हती, त्या ठिकाणी मदत घेऊन जाण्यासाठी रस्ते नव्हते, अशी भयानक परिस्थिती पनवेल शहराची झालेली होती. या चर्चेच्या निमित्ताने शासनाने याचे कुठे तरी नियोजन केले पाहिजे अशी मागणी या निमित्ताने करतो. मदत वाटपामध्ये राजकारण झाले असे सन्माननीय विरोधी पक्ष नेते बोलले. या वाटपामध्ये भ्रष्टाचारही झालेला आहे. त्यासंबंधीचे पत्र माझ्याकडे आहे. सभापती महोदय ते पत्र मी सभागृहाच्या पटलावर ठेवायला तयार आहे. माझ्याकडे कामशेत गावाचे गावकरी पत्र घेऊन आले होते. त्याठिकाणी पाच लाख रुपये मदत आली होती त्यापैकी फक्त चार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

लाख रुपये मदत देण्यात आली आहे. 530 रुपये प्रत्येक व्यक्तिला दिले आहेत.श्री. रा. ल.पाटील,श्री. भरत शांताराम पाटील यांनी एक अर्ज दिला आहे. त्याच्यावर त्यांची सही आहे. तो अर्ज सभागृहाच्या पटलावर ठेवायला मी तयार आहे.त्यांचे पुरामुळे नुकसान झालेले आहे. पण आम्हाला पैसे कां दिले नाही हेच आम्हाला कळत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. रायगड जिल्हयात पेण तालुक्यात या वाटपात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. पेण तालुक्यात 7 कोटी 50 लाख 12 हजार रुपयापैकी फक्त 5 लाख रुपयांचे वाटप झालेले आहे. पेण तालुक्यात वाटप करतांना तहसीलदार कार्यालयामध्ये एक काऊंटर उभे केले होते. त्या काऊंटरवर प्रत्येक कुटुंबाला पाच हजार रुपये देण्याचा शासनाचा निर्णय झाला होता. प्रत्येक कुटुंबाला जास्तीत जास्त 8 माणसे असतील तर त्या कुटुंबाला पाच हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण तहसीलदार प्रत्येक कुटुंबाला केवळ तीन हजार रुपये देत होते. आणि दोन हजार रुपये स्वत:ठेवून घेत होते अशा त-हेने तहसीलदार कार्यालयाने दोन कोटी रुपये इतर कमाईने कमविले आहेत. त्यासंबंधात वर्तमानपत्रात छापून आले. मी स्वत: तक्रार केली. त्यानंतर ते पैसे त्यांनी परत दिले.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

त्याबाबत तक्रारी करण्यात आल्या, माझ्याकडे तहसीलदाराचे देखील पत्र आहे व त्यात म्हटले आहे की, चुकून आम्ही पैसे दिले आहेत. शासकीय यंत्रणेने अशा प्रकारे जे पैसे दिले होते त्यांच्यावर कारवाई करणार की नाही ? याचा खुलासा करावा. मेलेल्या मढयावरील लोणी खाणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. तसेच ही मदत वाटप करीत असतांना काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असाल त्यांनाच मदतीचे वाटप करणार, शिवसेनेतून, शेतकरी कामगार पक्षातून काँग्रेसमध्ये प्रवेश करा, राष्ट्रवादीतून काँग्रेस पक्षात प्रवेश करा, तरच ही मदत मिळणार असे सांगितले जात होते. हे दुसरे कोणी नाही तर राष्ट्रवादीचेच कार्यकर्ते आम्हाला सांगत होते. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी पालकमंत्र्यांकडे तक्रारी केल्य की, असे प्रकार सुरु आहेत. आपल्या राज्यात हे काय चालले आहे ? अशा प्रकारे लोकांनी फक्त मदत मिळण्यासाठीच प्रवेश केला व त्यानंतर ते त्यांच्या त्यांच्याच पक्षामध्ये आहेत व त्यांनी सांगितले की, आम्ही फक्त मदतीपुरताच प्रवेश केला होता. मी त्या लोकांचे पत्रही आणले आहे, ते आपल्याकडे मी देण्यास तयार आहे तसेच याबाबतची सी.डी. सुध्दा माझ्याकडे आहे. ज्या ठिकाणी 7 कोटीचे वाटप होते त्या पेण तालुक्यात हे वाटप केंव्हा झाले तर ते तीन ते चार महिन्यानंतर, गणेशोत्सवानंतर वाटप झाले आहे. म्हणून माझी मागणी अशी आहे की, यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी चौकशी करावी. एकीकडे अशा प्रकारचे वाटप होत आहे, ज्या ठिकाणी हा हाहा:कार झाला त्या महाड तालुक्यामध्ये कोंडिवडे नांवाचे गांव आहे व त्या गावातील सविता सकपाळ, वय वर्षे 24 या महिलेच्या घरातील जवळजवळ 17 व्यक्ती मरण पावल्या व ती एकटीच आपल्या माहेरी पोलादपूरला गेल्यामुळे जिवंत आहे. तिच्या घरातील सासरा, दीर, तिचा पती वगैरे 17 लोक मृत झाल्यामुळे तिला केंद्र आणि राज्यसरकारकडून एकंदर 34 लाख रुपये मिळणार म्हणून संबंधित अधिकारी व तिचे सर्व नातेवाईक हे तिच्या मागे लागले आहेत आणि तुला मिळणाऱ्या पैशातून आम्हाला किती पैसे देणार म्हणून विचारु लागले. अशा प्रकारे या महिलेला अद्याप एक रुपया देखील मिळाला नाही. तशीच घटना महाड तालुक्यातील जुही या गावची महिला श्रीमती पार्वती पातळे हिच्या बाबतीत घडली. तिला 1 लाख रुपयाचा धनादेश देण्यात आला त्यासाठी तिच्याकडून आधी 10 हजार रुपये घेण्यात आले व नंतरच तिला पैसे दिले. माझी अपेक्षा अशी आहे की या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

सर्व प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे व अशा प्रकारे जी प्रथा आहे ती थांबविली पाहिजे, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. ज्यावेळी आम्ही या गावात मदत घेऊन गेलो त्यावेळी आमचे फोटो काढण्यासाठी कॅमेरे घेऊन आमच्यासमोर आले होते त्यावेळी आम्ही कॅमेऱ्यावर हात ठेवला व फोटो काढू नका म्हणून सांगितले. माझी अशी सूचना आहे ज्यावेळी आपण मदत करतो त्यावेळी फोटो वगैरे काढण्याची जी परंपरा सुरु झालेली आहे, त्याची गरज नाही, याची माननीय मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी. पेण तालुक्यात या वाटपाबाबत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला व त्यासंदर्भात माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी देखील मंत्री महोदय श्री. रविशेट पाटील यांच्या रावळगांवचा उल्लेख केला. या गावामध्ये फक्त मंत्री महोदयांच्या कुटुंबालाच मदतीचे वाटप करण्यात आले व त्यावेळी गावातील इतर महिलांनी त्यांना घेराव घातला होता.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

सभापती महोदय, ज्यांचे नुकसान झाले त्यांना मदत मिळालीच नाही. त्यामुळे लोकांनी चिडून जाऊन त्यांना घेराव घातला व घेराव घातल्यानंतर घरटी ३५ लाख रुपये देण्यात आले. त्यामुळे माझी मागणी आहे की, या संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भात तलाठी, प्रांत, सर्कल ऑफिसर या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. अशी परिस्थिती पुन्हा उद्‌भवली गेली तर असे प्रकार पुन्हा होणार नाहीत यासाठी काळजी घेतली गेली पाहिजे. या ठिकाणी सुरेशदादा देशमुख यांनी सांगितले की, आपदग्रस्तांना माणशी एक हजार रुपये शासनाने मदत दिलेली आहे. परंतु मी सांगू इच्तो की, या राज्यात कोठेही पूर आला, भूकंप आला, अचानक संकटे आली तर त्यातील आपदग्रस्तांसाठी माणशी एक हजार रुपये तातडीने मदत करणे हे शासनाचे काम आहे. शासन जनतेवर काही मेहरबानी करीत नाही कारण अशी संकटे आली तर शासनाला मदत करावीच लागते. सभापती महोदय, रायगडमधील आदग्रस्तांना मदत करतांना जो भ्रष्टाचार झाला त्याच्या संदर्भात उच्च स्तरीय अधिका-यांमार्फत चौकशी व्हावी व जे यामध्ये दोषी आढळून येतील त्यांच्यावर कठोर कारवाई करुन रायगड मधील जनतेला शासनाने न्याय मिळवून द्यावा एवढी मागणी करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महापूर आणि त्यामुळे निर्माण झालेली महाराष्ट्रातील पूर परिस्थिती या संदर्भातील प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मुंबईमध्ये जी अतीवृष्टी झाली ती खरे म्हणजे एक चमत्कारच होय. महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी, महाकवी श्री. ग.दि. माडगुळकर यांनी म्हटले आहे की, "पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा, हा दोष ना कुणाचा ". मनुष्य किती पराधीन आहे याचे उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे मुंबईत पडलेला पाऊस आणि संपूर्ण राज्यात आलेले महापूर हा होय. 26 जुलै, 2005 रोजी दुपारी साधारणत: एक-दोन वाजता पावसाला सुरवात झाली. त्यानंतर ही संततधार 28 जुलै पर्यंत चालू होती. 28 जुलै नंतर हा पाऊस कमी व्हायला सुरुवात झाली. मुंबईतील 26 जुलैच्या पावसाची वस्तुस्थिती आम्ही स्वत: अनुभवली आहे. मुंबईत पाऊस पडणे, पाणी साचणे हे काही नवीन नाही. दिनांक 8 जून, 91 रोजी मुंबईत आणि सर्व महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडला होता. त्यावेळी आम्ही संभाजी नगरला होता. संभाजी नगरच्या विमानाच्या धावपट्टीवर आमचे विमान त्यावळी घसरले होते त्यावेळी माझ्या बरोबर माननीय निलंगेकर साहेब सुध्दा होते. त्यावेळेस विमानाने पेट घेतला नाही त्यामुळे आम्ही आज जीवंत आहोत. त्यावेळी मुंबईतील वेस्टर्न हायवेवर एक फूट पाणी साचले होते. तसेच बांद्रा(पूर्व) या ठिकाणीही मोठया प्रमाणात पाणी साचले होते. आपण आज कितीही क्रांती केली तरी आपण निसर्गाच्या पुढे जाऊ शकत नाही हेच खरे निसर्गावर मात करणे हे माणसाला कधीही शक्य नाही. निसर्गाचा दणका कसा असतो ते आपल्याला 26 जुलैच्या पावसात कळले आहे. 30 सपटेंबर 1993 ला जेव्हा लातूर येथे भूकंप झाला होता त्यावेळी हजारो माणसे मेली होती. भूकंपाच्या वेळी जी परिस्थिती उद्भवली होती तशीच परिस्थिती 26 जुलैच्या पावसात उदभवली होती. 26 जुलै रोजी जो पाऊस पडला त्याचे चित्र या ठिकाणी माननीय फुंडकर साहेबांनी उभे केलेले आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

ही वस्तुस्थिती आहे. त्या दिवशी मुंबईतील कुठलीही व्यवस्था चालू नव्हती. कलेक्टरचे कार्यालय बंद होते. पूर परिस्थितीमुळे मुख्यमंत्र्यांनी सुट्टी जाहीर केली होती. त्याचा परिणाम असा झाला की, प्रत्यक्ष शासकीय यंत्रणा अस्तित्त्वात आहे हे जाणवतच नव्हते. रस्त्यावर बसगाडया धावत नव्हत्या. कारण सगळीकडे पाणी भरले होते. आपण जी आपत्कालीन व्यवस्था जाहीर केली होती, ती कुठे होती ? संकट येते आणि जाते. पण त्या दिवशी आपद्कालीन व्यवस्थेने संकटाशी मुकाबला करणे आवश्यक होते. जातीय दंगली झाल्या तेव्हा पोलीस सुरूवातीला येत नव्हते. सगळे झाल्यानंतर येत असत. त्यानंतर मग ते परिस्थिती हाताळत असत. सावधगीरीचा उपाय आपल्याकडे नसतो. काल एक आयटम होता. पोलिसांच्या खबरी लोकांना, हेर खात्याला मदत म्हणून कोटयवधी रूपये दिले. अस्मानी संकटाबद्दल खबरी काही करू शकत नाही. पण सुलतानी संकटाबद्दल त्यांनी काही तरी करायला पाहिजे.

सभापती महोदय, त्या दिवशी मुंबईत प्रचंड पाऊस पडत होता. दुपारी तीन ते साडे तीन वाजता रस्त्यावर 3 इंच पाणी होते. पण जस जसा पाऊस वाढत गेला तसतशी रस्त्यावरील पाण्याची पातळी वाढू लागली. रात्रौ 12.00 वाजता तर 4 ते 5 फुटापर्यंत पाणी चढले. आमच्या भागातही हीच परिस्थिती होती. मी 15 किंवा 18 जूनला एम.एम.आर.डी.ए.ला पत्र लिहिले होते. पश्चिम द्रूतगतीमार्गावर उड्डाण पूल बांधण्यात आले आहे. त्यामुळे सीमेंट क्रॉंक्रीटीकरून नाला रुंद करण्याचे काम करण्यात आल्यासंबंधीचे पत्र लिहिले होते. याची पाहणी करण्यात यावी व अन्य काही सूचना मी केल्या होत्या. त्यावेळी डॉ.सुरेश जोशी हे एम.एम.आर.डी.ए.चे प्रमुख होते. त्यांनी सुध्दा माझ्या पत्राची दखल घेतली नाही आणि त्यांचे अधिकारी देखील प्रत्यक्ष घटनास्थळी आले नाहीत. त्यामुळे जे घडायचे ते घडले. पश्चिम द्रूतगती मार्गावर 4 ते 5 फूट पाणी होते. त्यामुळे एकही इमारत, झोपडी, सोसायटी अशी नव्हती की, त्यामध्ये पाणी गेले नव्हते. त्या दिवशी जगायचे कसे हे आव्हान होते. सोसायटीतून कोणालाही बाहेर पडता येत नव्हते. एवढी भयानक परिस्थिती होती. शासनाचे कौतुक करणारे एकच वर्तमानपत्र आहे. ते म्हणजे दै.लोकमत. दै.लोकमतमधील दिनांक 30 जुलै रोजीच्या अंकातील अग्रलेखातील एका वाक्याचा मी उल्लेख करू इच्छितो. "मुंबईचा ट्रफिक पोलीस जो एरवी पैसे घेण्यात पटाईत असतो, तो या दोन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

दिवसांमध्ये कुठेही दिसत नव्हता." हे वर्तमानपत्र आपल्याच पक्षातील एका सन्माननीय सदस्याचे आहे. (अडथळा) मुंबईत जी पूरपरिस्थिती निर्माण झाली होती, त्यासंबंधी मुख्यमंत्र्यांनी 29 जुलै रोजी बैठक बोलाविली होती. त्यावेळी पुनर्वसन मंत्री देखील हजर होते. त्यावेळी मी सूचना केली होती की, पूरग्रस्तांना धान्य, केरोसिन या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप शिधावाटप दुकानातून करण्यात यावे. खाजगी एजन्सीमार्फत हे काम करू नये असे सांगितले होते.

यानंतर श्री.अजित..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

प्रा.जे.सी.चांदूरकर आणि मंत्रिमहोदय श्री.सुरेश शेट्टी यांनी त्यांचे कार्यकर्ते पाहिले. त्यांना केरोसीन आणि धान्याचे वाटप केले. दुसरे मंत्री बांद्रा (पश्चिम) येथील रेशनिंगच्या ऑफीसमध्ये बसले होते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना केरोसीन - धान्य घेऊन अमूक अमूक ठिकाणी वाटा असे असे सांगत होते. त्या ऑफीसमध्ये त्यांनी मुक्काम ठेवला होता, अशी परिस्थिती होती. त्यामुळे केरोसीनचा काळाबाजार सुरु झाला. या संदर्भात आम्ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती की, केरोसीनचा टँकर कोठून आला ? त्याचे वाटप कोणी केले ? याबाबत चौकशी करावी. जे कोणी दोषी असतील त्यांना ताब्यात घ्यावे. परंतु पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यांनी ते प्रकरण दडपून टाकले. ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांनी सत्तेचा अशाप्रकारे गैरवापर करावयाचा हे बरोबर नाही. मेलेल्या माणसाच्या टाळू वरील लोणी खाण्यासारखा हा प्रकार आहे. लोक तडफडत होती. त्यांना केरोसीन न मिळाल्यामुळे त्यांच्या घरात अन्न शिजत नव्हते. त्यांच्या घरातील लहान मुले उपाशी होती. मी अनेक झोपडपट्टयांमध्ये फिरलो होतो. तेथील लोकांशी चौकशी केली होते. त्यांना विचारले होते की, तुम्हाला धान्य आणि करोसीन मिळाले काय ? बऱ्याच दुकानांतील सामान खराब झाले होते. त्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना सूचना केली होती आपण झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना मदत कराच, पण त्याचबरोबर ज्यांच्या दुकानातील सामानाची वाताहात झालेली आहे, इमारतीतील तळ मजला आणि पहिल्या मजल्यावरील राहणाऱ्या लोकांचे नुकसान झाले आहे त्यांनासुध्दा मदत करावी. परंतु मदत वाटपामध्ये सुध्दा गैरप्रकार झाले. ज्यांना मदतीची खरी गरज होती त्यांना मदत मिळाली नाही. खरे म्हणजे आपण मदत वाटप करण्यासाठी खास यंत्रणा ठेवावयास पाहिजे होती. तसेच लोकांना मदत मिळाली की नाही हे पाहण्यासाठी इन्स्पेक्शन करण्याची गरज होती. याठिकाणी ज्या लोकांचे नुकसान झाले नाही त्यांना पैशाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर कॉग्रेस पक्षातर्फे बोर्ड लावण्यात आले की, आमच्याकडून मदत करण्यात आली. हे बोर्ड मी स्वत: पाहिलेले आहेत. मी एक जबाबदार आमदार आहे. गेली 20 वर्षे मी काम करीत आहे. माझा अनुभव सांगत आहे. अशाप्रकारच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या आहेत. येथे पक्षाचा काय संबंध आहे ? पक्ष विरहितपणे काम व्हावयास पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

अशाप्रकारे काम व्हावयास लागले तर जनतेने कोणाकडे पहावयाचे ? लोकसभेच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी बोर्ड लावण्यात आले होते की, "पुराच्या वेळी आम्हाला नुकसान भरपाई मिळाली नाही म्हणून आम्ही निवडणुकीवर बहिष्कार टाकीत आहोत." अनेक प्रश्न आहेत. दु:खाची गोष्ट अशी की, शासकीय यंत्रणा नावाची गोष्ट या आपत्ती काळात कोठेही अस्तित्वात नव्हती. दिनांक 29 जुलै रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृहावर आमदारांची एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीत त्यांनी काही सूचना केल्या होत्या. पण सूचनांच्या अंमलबजावणीचे पुढे काय झाले ? मदतीचे काय झाले याची माहिती आता तुम्हालाही सांगता येणार नाही आणि माननीय मुख्यमंत्र्यांनाही सांगता येणार नाही. धान्याचे वाटप कोणी केले ? केरोसीनचे वाटप कोणी केले ? पैशाचे वाटप किती झाले ? याची कोणतीही माहिती त्यांना नसणार. कोणत्याही प्रकारचा कंट्रोल यावर नव्हता. मला कल्पना आहे की, यावर्षी जो पाऊस झाला तो भयानक झाला. 1930 मध्ये चेरापुंजी येथे एका दिवसात 870 मि.मि.पावसाची नोंद झाली होती. परंतु मुंबईत झालेल्या अतिवृष्टीमध्ये एका दिवशी 944 मि.मि.पावसाची नोंद झाली. जास्त पाऊस झाला तर पाणी भरणे स्वाभाविक आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मग अशावेळी शासनाची वाहतूक यंत्रणा कोठे होती ? रस्त्यावरील वाहने हटत नव्हती, पाणी हटत नव्हते, दुर्गंधी साफ करण्यासाठी यंत्रणा नव्हती, अशावेळी शासन यंत्रणा काय करीत होती ? दोन-तीन ठिकाणची परिस्थिती मला माहीत आहे. पाण्यामुळे ज्या गाडया रस्त्यावर अडकून पडल्या होत्या, त्या ठिकाणी पाण्याच्या दबावामुळे गाडीच्या काचा उघडल्या गेल्या नाहीत, परिणामी त्या गाडीतील माणसे गुद्मरुन मृत्यूमुखी पडली. त्यामुळे अशी आपत्ती मुंबई शहरामध्ये पुन्हा आली तर शासन भविष्यकाळात कोणत्या प्रकारच्या योजना करणार आहे ? याबाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी देणे आवश्यक आहे. ज्यांचे या पावसामध्ये नुकसान झालेले आहे ते लोक आज शासनाला शिव्या देत आहेत आणि दुसऱ्या बाजूला ज्या व्यक्तींचे नुकसान झाले नाही त्या व्यक्ती हसत-खेळत राहत आहे. परंतु महोदय, ज्यांचे जळते त्यांनाच ते कळते. आज अनेक अशी कुटुंबे आहेत की, ज्यांच्यापर्यंत शासनाची मदत पोहोचलेली नाही. काही भागात चांगली मदत मिळाली आहे हे देखील मी सांगतो आणि त्याबाबत मी जिल्हाधिकाऱ्यांना सुध्दा पत्राद्वारे कळविलेले आहे. ज्या ठिकाणी खरोखरच चांगले काम झाले आहे त्याला चांगले म्हणण्याची आमची भावना आहे. त्यामुळे ज्यांचे खरोखरच नुकसान झाले त्यांच्याकडे अद्यापही शासनाने पाहिलेले नाही, म्हणून ज्या ज्या कुटुंबाचे नुकसान झाले आहे अशा सर्व कुटुंबाना शासनाने मदत करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत, एवढीच मागणी या चर्चेच्या माध्यमातून मी करतो व वेळेअभावी माझे भाषण आटोपते घेतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, त्या चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मुख्यत: मी जी घरे उध्वस्त झाली आणि जी जनावरे मृत्यूमुखी पडली त्या विषयावर आणि पैलूंवर या चर्चेच्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष केंद्रित करु इच्छितो. पुरामुळे घरे उध्वस्त झालीत, दरडी कोसळल्यामुळे घरे उध्वस्त झालीत, अतिवृष्टीमुळे सुध्दा घरे उध्वस्त झालेली आहेत. मला या ठिकाणी सांगताना खेद होतो की, ज्यांची घरे उध्वस्त झाली त्यांना शासनाकडून जी मदत दिली गेली ती दुर्दैवाने तुटपुंजी ठरली आहे. सरकारने मुळात सर्वेक्षण उशिराने केले आहे. जे सर्वेक्षण केले आहे त्यामध्ये सर्वांनाच घेतले असे सुध्दा घडलेले नाही. काल माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी पुरामध्ये बाधित झालेल्या लोकांना अन्नधान्य दिले, पाणी पुरविले, दिवाबत्त्यांची सोय केली असे सांगितले. परंतु महोदय, त्यावेळी दिल्या गेलेल्या वस्तू किंवा गोष्टी दोन आठवडयामध्येच संपुष्टात आलेल्या आहेत. आज स्वाभाविकपणे त्या ठिकाणचे नागरिक अनेक गोष्टींपासून वंचित आहेत. तेथील सर्वसामान्य व्यक्ती आज भयभीत आहेत. जी घरे पूर रेषेच्या आत आहेत आणि कदाचित नद्यांचा प्रवाह बदलल्यामुळे आणखी काही घरांना पुराचा फटका बसू शकतो यासंदर्भात शासनाने सर्वे केला आहे काय ? कारण सहा-सात महिन्यांनी पुन्हा पावसाळयास प्रारंभ होणार आहे. काही घरे जरी उध्वस्त झाली नसली तरी आजच्या परिस्थितीत ती विनाशाच्या उंबरठयावर आहेत. त्या ठिकाणी राहणारे लोक दलित आणि आदिवासी आहेत. एका बाजूने त्यांना निसर्गाने नाडले, तर दुसऱ्या बाजूने सरकारने वंचित ठेवले आहे. त्यामुळे आपण अशा घरांची पाहणी करा. अनेक घरांना पाण्यामुळे तडे गेलेले आहेत, अजूनही जमीन ओली आहे, कौले पडलेली आहेत, ज्या ठिकाणी गवताची शाकारणी होते त्या ठिकाणची छपरे कोसळलेली आहेत. अनेक ठिकाणी जनावरे मृत्यूमुखी पडलेली आहेत, शेती उध्वस्त झालेली आहे, परिणामी तेथील मजुरी संपुष्टात आलेली आहे. त्या ठिकाणच्या आदिवासी आणि दलितांचे जिणे मुश्कील झाले आहे. त्यामुळे या सर्वांना युध्दपातळीवर मदत करण्यासाठी आपण काही प्रयत्न करणार आहात काय ?

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

डॉ.अशोक मोडक ...

डोंगरकडा कोसळल्यामुळे डोंगराच्या पायथ्याशी राहणा-या लोकांचे नुकसान होत असते तेव्हा त्याबाबीकडे माननीय मंत्रिमहोदयांनी विशेष लक्ष दिले पाहिजे.डोंगरांच्या पायथ्याशी जी घरे होती त्यापैकी ब-याच घरांना तडे गेले आहेत त्याचबरोबर डोंगर कडा कोसळल्यामुळे अनेक घरांचे नुकसान झालेले आहे त्याचे वर्णन सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मघाशी केले होते. माननीय मंत्रिमहोदयानी हे दृश्य डोळयासमोर आणले तर त्यांना असे दिसून येईल की समोर नदी वाहत आहे आणि मागे डोंगर आहे या दोन्हीच्या मध्ये त्यांची घरे असल्यामुळे त्यांचे सॅन्डवीच झालेले आहे.जोपर्यन्त या लोकांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यन्त ख-या अर्थाने या व्यक्ती खचलेल्या असतात निराश झालेल्या असतात..पुरामुळे वाहून गेलेली, दरडीमुळे ठेचली गेलेली आणि अतिवृष्टीमुळे आजारी पडून मृत झालेली जनावरे हा विषय सुध्दा माझ्या चिंतनाचा आणि चर्चेचा आहे.भारत हा कृषी प्रधान देश आहे हे मी आपल्याला सांगावयास नको .शेतकरी जनावरांचे पालन पोषण करीत असतो म्हणजे तो खर्च त्याच्या लेखी गुंतवणुकी सारखा असतो . It is an investment in cattle capital. दुदर्वाने आज प्रत्यक्षात काय घडलेले आहे.? स्थानिक परिसराचा तपशीलवार अभ्यास अजूनही झालेला नाही. तज्ज्ञ व्यक्ती आणि स्थानिक रहिवाशी यांचे सहकार्य घेऊन, सहभाग घेऊन तपशीलवार सर्व्हे करण्यात येऊन तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. या निमित्ताने मला एक वेगळा विषय आपल्यासमोर मांडावयाचा आहे. नागरिकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे तेव्हा हे पुनर्वसन इदिरा आवास योजनेच्या माध्यमातून आपण करणार आहात काय ? कोकणातील माणूस आपल्याला असे साकडे घालत आहे की,इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर पुनर्वसन न करता पुनर्वसित घरांसाठी घरठाण योजना अशी एखादी योजना डोळयासमोर ठेऊन त्या योजनेच्या प्रकाशात या लोकांचे पुनर्वसन करण्यात यावे याचा अर्थ असा आहे की,घराचे बांधकाम " इंदिरा आवास योजनेच्या " धर्तीवर न करता पुनर्वसित घरांसाठी घरठाण म्हणून किमान दोन ते अडीच गुंठे जागा पुनर्वसित गावठाणामध्ये मिळावी. यामध्ये घराच्या बांधकामाच्या क्षेत्रफळा शिवाय इतर जागा,गुरांचा वाडा (गोठा), परसबाग, पडवी,लाकूडफाटा साठवावयाची जागा इ.गरजांसाठी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन द्यावी. नुकसानग्रस्त कुटुंबाच्या मूळ घरांचा घरठाणाचा दर्जा पुनर्वसित झाल्यामुळे काढून घेण्यात येणार असला तरीही त्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनेक घरे भात शेती लगत आहेत. हे लक्षात घेऊन अशा घरांना " शेत घरे " असा दर्जा देऊन तेथील चांगल्या अवस्थेतील घरांचा गरजेपुरता वापर करण्यात यावा .

सभापती महोदया,या नंतर मला दुसरा एक मुद्दा मांडावयाचा आहे. जनावरांना चारा देण्याच्या बाबतीत योग्य ती व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. आज ब-याच भागातील चारा उद्ध्वस्त झाला आहे .आज काही भागातील जनावरांसाठी चारा मिळत नाही. त्याचबरोबर ही जनावरे जर आजारी पडली तर त्यांच्यावर उपचार करणारी यंत्रणासुध्दा आाल्याकडे पुरेशी नाही.या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.ग्रामीण भागामध्ये ही यंत्रणा कशी उभारता येईल व ती कार्यक्षम कशी होईल याकडे त्यांनी लक्ष दिले पाहिजे.पशुधन वैद्यकीय खाद्याचा निधी वाढविण्याची गरज आहे. त्याचबरोबर.आज आपल्याकडे पशु वैद्यकीय दवाखाने कमी आहेत. बक-या,गायी,म्हशी,कोंबडया इत्यादीवर वेळीच उपाय केला नाही तर संकटाच्या वेळी मदत करणारा हा जो सोर्स आहे तोच संपुष्टात येईल.

सभापती महोदया, या चर्चेच्या निमित्ताने मला आणखी एक दोन मुद्दे मांडावयाचे आहेत.या महापुरामुळे रस्ते व पूल उध्वस्त झालेले आहेत त्यामुळे मुंबईहून आम्ही दापोलीला सरळ मार्गाने जाऊ शकत नाही. त्यासाठी आम्हाला खेड मार्गाने जावे लागते. कल्याण - शीळ फाटा रस्त्याच्या बाबतीत लक्षवेधी सूचनेच्या वेळी आज चर्चा होणार आहे त्यामुळे मी आता त्याबाबतीत काही बोलत नाही. मघाशी एक उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी केला होता त्याचबरोबर मी काल सुध्दा तो उल्लेख केला होता. पेण तालुक्यात कणे नावाचे एक गाव असून त्या ठिकाणी 5 किलोमिटर्स लांबीचा एक खार बंधारा आहे त्यापैकी 2 किलोमिटर्स लांबीचा बंधारा वाहून गेलेला आहे. माननीय राज्यमंत्री श्री.रवि शेठ पाटील तेथून निवडून गेलेले आहेत. मी आणि श्री.जयंत प्र.पाटील त्यांना भेटावयास गेलो होतो तेव्हा .ते असे म्हणाले की या बाबतीत मी श्री.बाळासाहेब थोरात यांना सांगून थकलो आहे. He expressed his inability to do it. मंत्रिमहोदयांची जर अशी असमर्थता असेल तर मग सामान्य माणसाची काय अवस्था असेल. ? याबाबतीत मी मामलेदारांबरोबर पत्रव्यवहार केला होता तसेच शिष्टमंडळ घेऊन मी त्यांना भेटलो होतो परतु दुर्देवाने त्याचा काहीही उपयोग झाला नाही ठाणे् जिल्हयातील दिवा दातिवली आणि सोनारपाडा या दोन परिसरातील व्यथा आणखी मोठी आहे.18 नोव्हेंबर 2005ला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक ...

भारतीय जनता पक्षाचे शिष्ट मंडळ घेऊन मी जिल्हाधिकारी श्री.जंत्रे यांना मी भेटलो होतो तसेच त्यांच्याबरोबर आज सकाळी फोनवर बोललो होतो. तरी सुध्दा संबंधितांना मदत दिली गेली नाही. घोषणा फक्त पुढारीच करतात असे नाही तर आपल्या संगतीमुळे अधिकारीसुध्दा घोषणा करावयास लागले आहे.मला आणखी एक मुद्दा महत्वाचा वाटतो तो मला मांडावयाचा आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मोडक ....

या ठिकाणी सुकापूर, तालुका पनवेल येथील पुरग्रस्तांच्या समस्या तर भयानक आहेत. 26 जुलै रोजी जो जलप्रलय आला होता त्यामध्ये या भागातील रहिवाशांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. तरी कृपया तेथेही आपण प्राधान्य द्या. सर्वस्व गमाविलेल्या येथील लोकांना मदत करण्यामध्ये माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी आम्हाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिला. सभापती महोदया, मी आपला अधिक वेळ घेत नाही. मात्र या ठिकाणी श्री.कुमार कदम यांचा जो लेख आहे त्यातील काही वाक्ये मी येथे या संदर्भात वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले आहे की, "मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी श्री. नारायण राणे यांना गांधी टोपी चढविली, पण आता राणे यांना घातली तेवढी टोपी बस् झाली. आता कोकणी माणसाला आणखी टोपी घालू नका." सभापती महोदया, तेव्हा मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, तुम्ही जे काही कोकण विकासाचे पॅकेज दिले आहे, 300 कोटी रूपये दिले आहेत.. पण यापूर्वी 2002 मध्ये पालघर, डहाणू या भागामध्ये जी माणसे निसर्गाच्या कोपामुळे उध्वस्त झाली होती त्यांना अजूनही आपण तेव्हा जाहीर केलेली मदत पोहोचलेली नाही. तर मग त्यांनी आणि आता या लोकांनी देखील आपण जाहीर केलेल्या मदतीवर विश्वास किती व कसा ठेवावा ? तेव्हा या बाबतीत आपण तातडीने सर्वेक्षण करा आणि जे काही पॅकेज वा निधी जाहीर केलाआहे तो त्या गरजू माणसापर्यंत कसा पोहोचेल, मधल्या मध्ये त्याची गळती होणार नाही, याची दक्षता आपण घ्यावी असे आवाहन करतो आणि थांबतो. धन्यवाद.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करते की, अजून या चर्चेमध्ये 15-16 सदस्यांना बोलावयाचे आहे आणि आपल्याला माहितीच आहे की, आपल्याकडे वेळ अपुरा आहे शिवाय आपल्याला या चर्चेवरील उत्तर देखील ऐकावयाचे आहे. तेव्हा त्या उत्तरासाठी मंत्री महोदयांना किमान अर्धा तास तरी वेळ पाहिजे. तरी आपण चर्चेसाठी राहिलेला वेळ लक्षात घेऊन आपल्याला दिलेल्या वेळेचा वापर करावा. यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान या बोलतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, मी आपल्याला या संबंधात असे सुचवू इच्छितो की, चर्चेला सुरूवात होताना सकाळी जे सदस्य या ठिकाणी उपस्थित असतील त्यांनाच आपण चर्चेत भाग घेण्याची संधी द्यावी.

..... पी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, आम्ही येथे सकाळी सव्वादहा वाजल्यापासून येऊन बसलो आहोत ते कशासाठी ? दुसरे म्हणजे ही चर्चा विरोधी पक्षाकडून देण्यात आलेली असल्याने अधिक प्राधान्य आम्हाला आपण दिले पाहिजे. ..

तालिका सभापती : विरोधी पक्षाकडून चर्चा दिली गेली असली म्हणून सत्तारूढ पक्ष सदस्यांना त्यावर बोलण्याची संधी आपण नाकारू शकत नाही. दुसरे म्हणजे सकाळी कोण सदस्य सव्वादहा वाजता येथे उपस्थित झाले आहेत याची नोंद येथे नाही. त्यामुळे येथे आपणा सर्वांना जो वेळ दिलेला त्यामध्येच आपल्याला भागवावे लागेल. अन्यथा अर्धा तास शिल्लक असताना ज्या परिस्थितीमध्ये चर्चा असेल त्या परिस्थितीत ती चर्चा थांबवून मंत्र्यांना उत्तरासाठी मी बोलाविणार आहे हे आपण सर्वांनी लक्षात ठेवावे आणि आता अधिक वेळ न घालविता सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे.

(यानंतर श्रीमती फौजिया खान यांचे हिंदी भाषण श्री.देव दत्त यांचेकडे ..)

(यानंतर श्री. सरफरे .... क्यू 1 ..

(

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (नाम नियुक्त): माननीय सभापति महोदया, हमने इस विषय पर बोलने के लिए अपने नाम कल शाम को दिए थे और इसी लिए इस विषय पर बोलने के लिए हम सुबह 10 बजे से ही यहां पर उपस्थित हैं. इसलिए हमारा निवेदन है कि सिर्फ 5 मिनट में अपने क्षेत्र की सभी बातें यहां पर बोल पाना संभव नहीं है. अपनी बात बोलने के लिए हमें ज्यादा समय दिया जाये.

माननीय सभापति महोदया, इस वर्ष हमारे राज्य में जो तबाही हुई है उस तबाही का बयान शब्दों में नहीं किया जा सकता. हमारे यहां पर जान माल का इतना ज्यादा नुकसान हुआ कि उससे ऐसा लगता था जैसे कुछ दिनों के लिए जिंदगी रुक सी गयी है. इतने ज्यादा हुए नुकसान की वजह से ही यहां पर यह विषय अल्पकालीन चर्चा के माध्यम से यहां पर लाया गया है. इस विषय पर अब व्यापक चर्चा हो रही है. इसलिए मैं यहां पर सभी जगह के बारे में न बोलकर सिर्फ परभणी जिले के बारे में ही बोलना उचित समझती हूं, मैं अपनी चर्चा को यहां पर परभणी जिले तक ही सीमित रखूंगी.

सभापति महोदया अतिवृष्टि की वजह से परभणी जिले में 638 गांव अफेक्टेड हुए हैं तथा 70 गांव तो पूरी तरह से ही सब्मर्ज हो गए थे या कहिए कि वे 70 गांव पानी में पूरी तरह से डूब गए थे. जिसकी वजह से किसानों की खेती, लोगों के घर, स्कूल और अस्पताल इत्यादि चीजों का इतना ज्यादा नुकसान हुआ कि उसकी भरपाई करोड़ रुपए देकर भी नहीं की जा सकती है. करोड़ों रुपए भी उस काम के लिए कम हैं. मैं समझती हूं कि नांदेड और परभणी जिले में जो नुकसान बाढ़ की वजह से हुआ है उसको रोका जा सकता था. यानी जो लोअर दूधना प्रकल्प है उस प्रकल्प को बनाकर बाढ़ को रोका जा सकता था. वह प्रकल्प बाढ़ के इस पानी को रोक सकता था. लेकिन ऐसा लगता है कि इस लोअर दूधना प्रकल्प को बनाने के संबंध में पॉलिटिकल इच्छा शक्ति की कमी है. हमारा कहना है कि लोअर दूधना प्रकल्प यह मराठवाडा के लिए बहुत ही महत्वाकांक्षी और जरुरी प्रकल्प है अगर यह प्रकल्प बन जाता है तो मैं समझती हूं कि भविष्य में होने वाली इस तरह की तबाही को रोका जा सकता है.

माननीय सभापति महोदया, यहां पर यह बताना भी जरुरी है कि पश्चिम महाराष्ट्र की तुलना में मराठवाडा का सॉयल स्ट्रक्चर अलग है. यहां की सॉयल में पानी परकलेट नहीं ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान

होता.वहां की जो ब्लैक कॉटन सायल है उसमें पानी परकलेट नहीं होता है. यहां के जो परकलेशन टैंक हैं वे अब इवेपोरेशन टेंक बन रहे हैं. मैं यहां पर कहना चाहूंगी कि नालों का सरलीकरण भी आवश्यक है. नालों का सरलीकरण वहां पर बहुत पहले हुआ था. उन नालों में अब बहुत कीचड़ भर गयी है. उन नालों में कीचड़ भर जाने की वजह से भी वहां पर बड़ी मात्रा में तबाही हुई है.

तालिका सभापति : मैं बताना चाहूंगी कि यहां पर अभी 15 माननीय सदस्य और बोलने वाले हैं.इसलिए कृपया आप बैठ जायें तो अच्छा है. सभी माननीय सदस्यों को बोलने के लिए करीब 33 मिनट ही बाकी बचे हैं.

प्रा. फौजिया खान : माननीय सभापति महोदया, मुझे अपनी बात बोलने के लिए कम से कम 10 मिनट का समय तो और चाहिए.

तालिका सभापति : इतना समय तो आपको नहीं मिल सकता. जितना जल्द हो सके आप बोलने की कोशिश कीजिए.

प्रा. फौजिया खान : 4 -5 साल से नालों के सरलीकरण के काम पर बॅन हो गया है. उस बॅन को उठाया जाना चाहिए और नालों का सरलीकरण किया जाय. यह काम इ.जी.एस. के माध्यम से भी किया जा सकता है. परभणी में यह काम होना बहुत जरुरी है. मेरी यह भी मांग है कि परभणी जिले के 70 गांव जो पानी में डूब गए थे, उन लोगों का पुनवर्सन जल्द से जल्द किया जाये.मैं यहां पर बताना चाहूंगी कि 1987 -88 में फ्लड आयी थी तो वहां पर 38 गांव के पुनर्वसन का प्लान किया था लेकिन आज तक उस योजना पर अमल नहीं हुआ है. इस बार भी बाढ़ आने के बाद सिर्फ एक गांव के पुनर्वसन का प्रस्ताव शासन के पास आया है. मुझे कहना है कि इस काम के लिए जल्दी से जल्दी एक स्पेशल ड्राइव सरकार द्वारा चलाये जाने की जरुरत है. वहां पर क्रॉप वेस्ट हुई है, वहां पर जमीन की टॉप लेअर वाश-आउट हो गयी है. इसमें सुधार लाने के लिए इ.जी.एस.का उपयोग किया जाना चाहिए. यह काम कब करने वाले हैं, इस बारे में शासन अवश्य हमें यहां पर जानकारी देगा तथा इसके लिए बजट में क्या प्रोवीजन किया जाएगा, तथा यह काम कौन से डिपार्टमेंट के द्वारा किया जायेगा, यह काम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

एग्रीकल्चर डिपार्टमेंट के माध्यम से किया जाएगा या इरीगेशन डिपार्टमेंट के माध्यम से किया जाएगा इसकी जानकारी माननीय मंत्री महोदय हमें अवश्य देंगे, ऐसी मुझे उम्मीद है.

मानानीय सभापति महोदया, बाढ़ आने के बाद अनेक लोगों का नुकसान हुआ यह बात हम सब को मालूम है. लेकिन उसका पंचनामा नहीं किया गया. तहसीलदार के पास राइटिंग में कई बार इस बारे में कंप्लेंट दी हैं. बाढ़ की वजह से वहां पर लोग पंचानामा कराने के लिए नही जा सके. परभणी जिले में दो तलाटियों को सस्पेंड किया गया

तालिका सभापति : कृपया बैठ जाइए. अब और समय नहीं दिया जा सकता. और मानानीय सदस्य भी अभी बोलने के लिए बाकी हैं.

प्रा. फौजिया खान : सभापति महोदया, यह बात ठीक है कि और माननीय सदस्यों को भी बोलना है लेकिन समय का नियोजन शुरु से होना चाहिए. चर्चा की शुरुआत से ही समय का नियोजन न होने की वजह से हम पर अन्याय होता है. आपके कहने के अनुसार मैं अपना भाषण यही पर समाप्त करती हूं. मुझे यहां पर बहुत सारे मुद्दे रखने हैं और वे मुद्दे यहां पर समय की कमी की वजह से मैं नहीं रख पा रही हैं. यह हमारे ऊपर अन्याय है.

तालिका सभापति : यदि बहुत से सदस्य यह बात बोलेंगे कि उन पर अन्याय हो रहा है तो कहां तक ठीक है ?

प्रा. फौजिया खान : सभापति महोदया, ठीक है. आपकी बात मानते हुए मैं अपना भाषण यहीं पर समाप्त करती हूं. लेकिन समय का नियोजन शुरु से होना आवश्यक है, इतना ही मेरा कहना है. धन्यवाद.

-0-

(इसके बाद श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाषण सुरु करावे. त्यांनी आपले भाषण तीन ते चार मिनिटांमध्ये संपवावे. नाहीतर आपले सहकारी बोलू शकणार नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, वक्त्यांच्या यादीतून सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांचे नाव वगळण्यात यावे.

तालिका सभापती : ठीक आहे.

डॉ.दीपक सावंत (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी याठिकाणी फक्त मुद्दे मांडणार आहे. 26 जुलै रोजी मुंबई, कोकणसह राज्यांमध्ये इतर भागात प्रलयंकारी पाऊस झाला आणि त्यामुळे महाराष्ट्रातील जनजीवन उध्वस्त झाले. यामुळे जवळजवळ पाच हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले. मुंबईच्या बाबतीत बोलावयाचे तर मुंबईमध्ये लोक जवळजवळ 48 तास रस्त्यावर होते. या चर्चेच्या माध्यमातून मी राज्य शासनाला विचारु इच्छितो की, 2000 साली आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार केला होता. सध्याचे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री.जॉनी जोसेफ हे त्याचे अध्यक्ष होते. मंत्रालयातील सहाव्या मजल्यावर याचे केंद्र होते, ऑफीस होते. मी मेल्ट्रॉनचा चेअरमन असताना यासंबंधात घोषणा झाली होती आणि तेव्हा त्याचे कामकाजही सुरु झाले होते. पण त्याचे आता काय झाले ? मंत्रालयातील ऑफीसचे काय झाले ? कारण या पूराच्या वेळी या केंद्राचा कोणत्याही प्रकारचा मागमूस दिसला नाही. त्याचवेळी डिसओरिएंटेशन झाले. त्यावेळी फायरब्रिगेड, पोलीस यंत्रणा, मुंबई महानगरपालिकेची यंत्रणा, राज्य शासनाची यंत्रणा आणि हॉस्पिटलमधील यंत्रणा अशा पाचही प्रमुख यंत्रणा बंद पडल्या. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, हिवाळी अधिवेशनामध्ये आपत्कालीन कृती आराखडयाच्या संबंधातील बिल येणार आहे. याचे काय झाले ? या बिलामध्ये कोणकोणते मुद्दे समाविष्ट केले आहेत ? हे समजण्यासाठी आम्ही या बिलाची वाट पहात आहोत. वास्तविक याच्यामध्ये दोन भाग करावयास पाहिजेत. पहिला भाग हा पूर किंवा नैसर्गिक आपत्ती येते त्यादरम्यान करावयाची कारवाई आणि दुसरा भाग म्हणजे ही आपत्ती येऊन गेल्यानंतर करावयाची कारवाई. अशा प्रकारे दोन भाग करुन ही कामे वाटून घेतली पाहिजेत.जेव्हा पूर, भूकंप किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती येते, त्या वेळी कोणी काम करावयाचे आणि आपत्ती येऊन गेल्यानंतर कोणी काम करावयाचे अशा प्रकारच्या दोन टीममध्ये विभागणी केली पाहिजे. यासंबंधीची संपूर्ण माहिती

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

माझ्याजवळ आहे, पण वेळेअभावी मी ती येथे देऊ शकत नाही. पण आपण अशा प्रकारची यंत्रणा करणार आहात का ? याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात प्रकाश टाकावा. आज आपण क्लेम करीत आहात की, आपण सर्वत्र मदत वाटली आहे. पण सांताक्रुझ (पूर्व) येथे डवरी भागामध्ये मदत मिळाली नाही. एअरइंडिया कॉलनी जवळजवळ 48 तास पाण्यामध्ये होती. त्याबाबतीत काय झाले ? तेथील पंचनामे झाले आहेत का ? तेथील इमारतींची तपासणी झाली आहे का ? तेथील इमारतींचा पाया खचला आहे का ? याबाबतीत पाहणी केली आहे का ? तसेच तेथील किती लोकांना मदत केली आहे ? जर सगळयांना मदत केली नसेल तर अजून किती जणांना मदत करणे शिल्लक आहे ? याची माहिती द्यावी. पोलादपूर येथे मोरे ज्युनिअर कॉलेज होते. मी त्याठिकाणी माननीय श्री.मनोहर जोशीसाहेब यांच्याबरोबर गेलो होतो. ते कॉलेज पूर्णपणे वाहून गेले आणि तेथे केवळ चार बाके शिल्लक होती. तसेच मोहना गावामध्ये देखील वाईट परिस्थिती होती. आपण तेथील लोकांचे स्थलांतर करणार होतात, तेथील ब्रिज बांधणार होतात. ब्रिजचे काम रेल्वेचे असले, केंद्र शासनाचे असले तरी याबाबतीत पुढे काय झाले ? याची माहिती देण्यात यावी. मिठी नदीचा प्रश्न हा मुंबईच्या दृष्टीने जिव्हाळयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी सांगितले की, ही मिठी नदी नसून मिठी गटार आहे. याबाबतीत काय करणार आहात ? याची पुनर्रचना करणार आहात का ? याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी प्रश्न उपस्थित केला. आजही तेथे हॉटेलचे अवैध बांधकाम सुरु आहे. आपण त्याविषयी काय करणार आहात ? मिठी नदीसाठी सत्यशोधन समितीचा अहवाल मागविला होता.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढें सुरु....

माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाल कमिटी नेमली होती, त्या अहवालाचे आपण काय केले ? त्यांनी खराखुरा अहवाल दिला म्हणून त्यांना त्यामधून बाहेर काढले काय ? हा माझा चर्चेच्या माध्यमातून प्रश्न आहे. सभापती महोदय, देवाच्या दयेने मुंबईमध्ये मोठी साथ पसरली नाही. मुंबईमध्ये अनेक रुग्णालये रुग्णांनी भरुन ओसंडून वहात होती. आपल्याकडे लेप्टोस्पायरसचे किट नव्हते, डेंगूच्या संबंधातील किट नव्हते. अशाप्रकारचे किट यायला जवळजवळ 48 तास लागले. मघाशी एका सन्माननीय सदस्यांनी आमच्याकडे तीन दिवसांनी रॉकेल आल्याचे सांगितले. तीन दिवस तेथील लोकांनी काय करायचे ? तीन दिवस त्यांनी रॉकेलशिवाय रहायचे काय ? अन्नपाण्याशिवाय त्यांनी रहायचे काय ? अशाप्रकारचा प्रश्न आहे. अशाप्रकारे आरोग्य यंत्रणा आपण सुसज्ज करणार आहात काय ? हॉस्पिटलमध्ये लोकांना बेडस् नव्हते. आपण 100 कॉटस् स्पेअरमध्ये ठेवून द्यावे, असे आपण का सांगत नाही ? 100 जीवरक्षक औषधे स्पेअरमध्ये असावेत,अशाप्रकारेचे आपण नियोजन करणार आहात काय ? तिसरी आणि महत्वाची गोष्ट अशी की, मिठी नदीवर अवैध बांधकाम सुरु आहे, रासायनिक कारखाने सुरु आहेत, त्यांचे एप्ल्युएन्ट नदीमध्ये मिसळते. त्या रासायनिक कारखान्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? सभापती महोदया मी फक्त प्रश्न मांडलेले आहेत, त्याची उत्तरे मंत्रीमहोदयांकडून अपेक्षित करतो

-

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी फक्त सूचना करतो. जुलै-ऑगस्ट या दोन महिन्यामध्ये महाराष्ट्रामध्ये अभूतपूर्व अतिवृष्टी आणि महापूरामुळे हाहाकार माजविला. त्यामुळे सांगली आणि कोल्हापूर मध्ये कृष्णा, पंचगंगा, वारणा, राधानगरी वगैरे नदीच्या काठावरील गावांना त्याचा फटका बसला. मला एका गोष्टीचा उल्लेख करावा लागेल की, पुराच्यावेळी स्वयंसेवी संस्थांनी, कार्यकत्यांनी आणि ज्या भागात पूर नव्हता, अशा भगातील लोकांनी उत्स्फूर्तपणे पूरग्रस्तांना मदत केली. जनतेने एक अभूतपूर्व अशाप्रकारची एकजूट या आपत्कालिन परिस्थितीमध्ये दाखविली. जे पूरग्रस्त होते, त्यांना धोक्यातून बाहेर काढण्यासाठी गावोगावच्या तरुण कार्यकर्त्यांनी स्वत:चे प्राण धोक्यात घातले आणि अहोरात्र कष्ट घेतले. मला एका गोष्टीचा खास उल्लेख करुन सांगावे लागेल की, ज्या ज्या कार्यकर्त्यांनी पूरग्रस्तांना वाचविण्यासाठी परिश्रम घेतले, स्वत:चे जीव धोक्यात घालून काम केले, अशांचे सरकारने कौतुक करावे, त्यांना सन्मानित करावे. कोल्हापूर जिल्ह्यातील गणेशवाडी या गावामध्ये श्री. सदाशिव आंबिया नावाचा पंचायत समितीचा सदस्य आहे, तो व्यवसायाने 'आंबेकरी' आहे. त्यांनी आपल्या होडीतून गणेवाडी गावातील शेकडो लोकांचे प्राण वाचविले, त्यांनी त्यांना दुसऱ्या तिरावर नेऊन पोहोचविले. पूर परिस्थिती ओसरल्यानंतर गावकऱ्यांनी त्याला मोटर सायकल भेट म्हणून दिली. सदाशिव आंबीसारख्या गावोगावच्या तरुणांनी पुरामध्ये सापडलेल्या नागरिकांचे प्राण वाचविले, त्यांचे सरकारने कौतूक करावे, त्यांचा बहुमान करावा. किमान त्यांना मानपत्र तरी द्यावे अशी या निमित्ताने मागणी करु इच्छितो. दुसरी मागणी अशी की, ज्या ज्या गावांना पुरांनी वेढले, जी गावे नेहमीच पुराच्या धोक्याच्या पातळीवर असतात. अशा सर्व गावांना शासनाने मोटार लाँच पुरविण्याची व्यवस्था करावी. पूर आला त्यावेळी सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पुरेशा बोटी नव्हत्या. ज्या काही थोडयाफार होड्या होत्या, त्या होड्यांच्या मदतीने लोकांना बाहेर काढण्याचे काम चालू होते. मिलिटरी बोलाविण्यात आली. त्यांनी लहान लहान होड्या आणल्या होत्या. त्या होड्यामध्ये बसलेले लोक होडी कलंडल्यामुळे पाण्यात पडले. काही जणांचा प्राण जाण्याचा धोका निर्माण झालेला होता. त्यामुळे मोटार लाँचेस पूरग्रस्त गावांमध्ये ठेवण्याची शासनाने व्यवस्था करावी, हीही मागणी मी या निमित्ताने करु इच्छितो. शासनाने पुराच्या संबंधाने जी धोक्याची सूचना देण्यासंबंधी व्यवस्था करायला हवी होती, ती केलेली नव्हती. त्यामुळे तीही व्यवस्था, ज्या गावामध्ये पूर येऊ शकतो त्या गावामध्ये करण्याची गरज आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा शरद पाटील ..

पुनर्वसनाची योजना शासनाने जाहीर केलेली आहे. जी गावे पाण्याने पूर्णपणे वेढली गेलेली होती आणि नागरिकांचे जीव धोक्यात आले होते अशा सर्व गावांचे पुनर्वसन त्वरित करावे अशा प्रकारची मागणी मी करतो. धन्यवाद.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शासन यंत्रणा मुंबई चालवत नाही तर बिल्डर आणि काही मूठभर लोकांचे मुंबई शहरावर वर्चस्व आहे. मुंबई शहराचा एक आराखडा तयार करण्यात आला होता आणि त्या आराखडयामध्ये मुंबई शहरातील 74 टक्के लोक राहात असलेल्या झोपडया, गलिच्छ वस्त्या, डोंगरउतार, नाले अशा ठिकाणी ज्या झोपडपट्टया आहेत अशा ठिकाणी पावसामध्ये कुठल्या ठिक्राणी पाणी जमा होते हे निश्चित प्रकारे सांगितलेले आहेत. मुंबई शहरात पश्चिम रल्वेवर 10 ठिकाणे सेंट्रल रेल्वेवर 12 ठिकाणे अशी आहेत की, जिथे अतिवृष्ठी झाली की पूरस्थिती निर्माण होते. ती ठिकाणे लोकेट केलेली आहेत. मुंबई शहराच्या डेव्हलपमेंट प्लॅनचे कठोरपणे पालन करण्यात येणार आहे की नाही? यापुढे मुंबई शहरात जो 1.33 एफ.एस.आय. आहे तो 1. एफ.एस.आय. करणे अत्यंत महत्वाचे आहे.कारण पावसाचे पाणी पडल्या नंतर पाणी जिरायला पाण्याचा निचरा व्हायला मुंबई शहरामध्ये जागा उरलेली नाही अशा प्रकारची स्थिती आहे.काल नगरविकास राज्यमंत्री माननीय श्री. राजेश टोपे यांनी सांगितले की, आम्ही डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये बदल करतो आणि तो गरजेनुसार बदल करतो. डेव्हलपमेंट प्लॅन हा 20-20 वर्षांनी होतो. 50 वर्षानंतर लोक संख्या किती होईल हे गृहीत धरुन करण्यात येतो. पण शासनापुढे एखादा बिल्डर आला, एखादा धनिक माणूस आला आणि त्याने तुमच्यासमोर किंवा कोणा संबंधितासमोर पैशाच्या थैल्या मोकळया केल्या की, त्या ठिकाणी भूखंडाचे जे आरक्षण असते ते वगळण्यात येते. आज मुंबई शहरात श्वास घ्यायला जागा नाही. मुंबई शहरात फुट-पाथ नहीत. आज मुंबई शहरात रस्ते नाहीत. या पावसाच्या वेळेला अशी स्थिती निर्माण झाली की, पाणी झिरपायलाच जागा राहिली नाही.पाण्याचा निचरा व्हायला जागा राहिली नाही. आपत्कालीन स्थितीच्या दोन बैठकांना मी उपस्थित होतो. अधिकारी 10/10 मिनिटे बैठका घेतात. चहापाणी करतात आणि शुष्क चेह-याने किंवा विमनस्क चेह-याने निघून जातात. मुंबई शहरातील फायरब्रिगेडचे चे मी सभागृहाला उदाहरण देतो. आग लागली नाही तरी अग्नीशमन वाहन केंद्रातील सकाळ-दुपार-संध्याकाळ आग लागलेली आहे असे गृहीत धरुन दोन-दोने गाडया आपल्या भागामध्ये फेरी मारत असतात आणि काल्पनिक धोक्याची सूचना देत असतात. मला असे वाटते की, या मुंबई शहरात अतिशय कठोरपणे आपण या विकास आराखडयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.मिठी नदीच्या बाबतीत मी मागच्या सोमवारी प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे संगितले होते की, तेथे एकही बांधकाम चालू नाही. आणि चालू असेल

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

तर त्यावर कठोर कारवाई केली जाईल. त्यानंतर साकी नाक्याला मिठी नदीमध्ये एका हॉटेलचे बांधकाम चालू आहे हे पुराव्या सकट दिले होते.सभापतींनी, त्यासंबंधात निवेदन करावे असे सांगितले होते. पण शासनाने ते निवेदन करायचे टाळले. त्यानंतर काल महसूल खात्यावर बोलतांना सांगण्यात आले की, रावेर गावात 35 लाख रुपये 722 कुटुंबाना दिले गेले. उत्तरामध्ये मंत्रिमहोदयांनी जराही सांगितले नाही की त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करु.दुसरी गोष्ट अशी की, आपण मघाशी येथे संगितले की, कॉन्ग्रेसचे बोर्ड लावलेले नाहीत. श्रीमती प्रिया दत्त यांना सरकारी यंत्रणेच्या मदतीच्या सगळया गाडीवरुन फिरवले गेले. त्यांचे वर्तमानपत्रात फोटो आलेले आहेत. मालमत्ता सरकारची, रॉकेल सरकारचे, धान्य सरकारचे, मदत सरकारची आणि श्रीमती प्रिया दत्ता यांना जणू काही या गरिबांना बघून करुणेचा पान्हा फुटला होता. त्या ठिकाणी त्यांची निवडणूकपूर्व तयारी चालली होती, ही लाजीरवाणी गोष्ट नाही काय.? माननीय राज्यमंत्री श्री. बाबा सिद्दीकी यांनी ही सगळी मदत त्यांचा बोर्ड लावून वाटली. सभापती महोदया, आम्ही विशेष अधिवेशनाची मागणी केली होती. या शासनाची कातडी किती गेंडयाची आहे? त्यावेळी तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बालावले असते कारण आमच्या दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी शासनाला वचन दिले होते की,आम्ही राजकारणावर बोलणार नाही. त्यावेळी आमची थट्टा उडविली गेली की, तुम्हाला विरोधी पक्ष नेता व्हायचे आहे त्यासाठी संख्याबळ वाढवावयाचे आहे.इतके आम्ही नीच आणि नराधम नाही. मुंबई शहरात लाखो माणसे मरत होती. मुंबई शहरात सुमारे 24 लाख लोक पूरग्रस्त झालेले आहेत. या मुंबई शहरात यासंबंधीचे पंचनामे करुन 288 कोटी रुपये वाटण्यात आले आहेत. माझी स्पेसिफिक मागणी अशी आहे की, या मुंबई शहरात अधिकचे चटईक्षेत्रफळ द्यायचे बंद करा. या मुंबईत आता आणखी किती बांधकामे करायची? ही बांधकामे करणे आता बंद करा. आणि अतिशय कठोरपणे, निर्दयपणे त्या ठिकाणी जी बेकायदेशीर बांधकामे असतील ती तोडण्यात यावीत.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

मिठी नदीच्या संदर्भात सांगितले की, आम्ही त्या नदीवरील बांधकामे तोडली. परंतु माझे म्हणणे असे आहे की, ती बांधकामे तोडली नाही तर तेथील 545 उद्योग बंद केले व स्ट्रक्चर्स फक्त ठेवले आहेत. याबाबत गंभीरपणे पावले उचलली पाहिजेत आणि मुंबईत जी अतिवृष्टी झाली होती त्यात मुख्य म्हणजे अस्मानी-सुलतानी अशी दोन्ही प्रकारची संकटे होती. त्यात एक म्हणजे अस्मानी संकट होते आणि सुलतानी संकट म्हणजे राज्यकर्त्यांचे. ते संकट असे होते की, चार दिवस यंत्रणाच नव्हती. जागोजागी फोटो मात्र लावले होते की, नागरिकांचे स्वागत, नागरिकांचे कौतुक. खरी मदत स्वयंसेवी संघटनांनी केली पण फोटो मात्र निर्लज्जपणाने लावण्यात आले, त्यात शासनाची यंत्रणा कुठे होती ? म्हणून या आपात्कालीन परिस्थितीत बेकायदेशीरपणे जे पैशाचे वाटप केले आहे त्याची चौकशी होऊन कारवाई झाली पाहिजे. कारण अनेक ठिकाणी कुठल्याही प्रकारे मदत दिली गेली नाही त्याचे पूर्ण संशोधन झाले पाहिजे. ज्यांचे पंचनामे झाले परंतु मदत मिळाली नाही अशा प्रकारची प्रकरणे शोधून काढावीत व त्यांनाही मदत मिळावी. भविष्यात अशा प्रकारची आपत्ती अथवा परिस्थिती निर्माण होऊ नये याबाबत काळजीपूर्वक आखणी करुन कठोरपणे अंमलबजावणी करावी, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी फक्त दोन तीन बाबींचा उल्लेख करुन माझे भाषण पूर्ण करणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान आपल्या भाषणातून म्हणाल्या की, ही आपत्ती काही प्रमाणात मानवनिर्मित होती. ही गोष्ट खरी आहे कारण, मी कालच हा मुद्दा उपस्थित केला व थोडक्यात आजही सांगू इच्छितो की, सोलापूर येथील उजनी धरणाच्या वरच्या भागात 14 छोटी छोटी धरणे आहेत त्या धरणातील पाणी त्या भागात आणखी एक जलाशय तयार करुन त्यातून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी द्यावे असे आयोजन युतीच्या काळात केले होते. त्यावेळी त्या शेतकऱ्यांनी चांगल्या प्रकारे शेती केली. परंतु दुर्देवाने पाणी जसे वाढत गेले तसतसे अधिकाऱ्यांनी हे पाणी सोडले असते तर ही आपत्ती आली नसती म्हणून ही मानवनिर्मित आपत्ती असल्याचा मी उल्लेख केला. 28 जुलै रोजी सकाळी 10.30 वाजता पाण्याने धोक्याची पातळी ओलांडली, तत्पुर्वी अगोदरच्या दिवशी रात्री अधिकाऱ्यांची बैठक 10 वाजता झाली होती. दुसऱ्या दिवशी एकदम धरणाचे 16 दरवाजे उघडण्यात आले त्यामुळे पाण्याचा एवढा प्रचंड ओघ आला की त्या मार्गातील अनेक गांवे व शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, गांवे वाहून गेली. अद्यापही या गावातील लोकांना त्यांच्या घरांच्या व शेतीच्या नुकसानीपोटी मदत मिळाली नाही. तसेच अक्कलकोट तालुक्यातील खानापूर, अंकलगा आणि आळगी येथील दलित वस्तीची गांवे आहेत त्यांचेही मोठया प्रमाणावर नुकसान झाले, त्यांना मदत मिळाली नाही. दक्षिण सोलापूर तालुक्यातील तेलगी व खानापूर या गावांचे पुनर्वसन अद्यापही झालेले नाही. त्या गावचे रस्ते वाहून गेले तरी देखील शासनाचा निधी मिळाला नाही. मला कळत नाही की, अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर या तालुक्यांमध्ये फक्त 16-17 लाख रुपये मदत वाटप झाली परंतु माळशिरस तालुक्यात मात्र 1.75 कोटीची मदत कशी वाटण्यात आली. अशा प्रकारे मदत ज्या ज्या ठिकाणी पोहचलेली नाही त्यांना मदत देण्यात यावी. त्यानंतर मुंबईतील कुर्ला भागातील क्रांतिनगर, सहयोगनगर आणि हनुमान चाळ या भागात 12 फुट पाणी होते. त्या भागात मुख्यमंत्री स्वत: गेले असता त्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांना जनतेने अडविले. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वत: जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आदेश दिले की, ज्या ज्या लोकांचे नुकसान झालेले आहे त्यांचे एकही घर मदतीशिवाय राहता कामा नये. तरी देखील अद्याप या भागात मदत मिळाली

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

नाही असे दुर्देवाने मी सांगतो. त्याउलट टेकडयांवरील नारायणनगर, गैबनशहा दर्गा आणि अशोकनगरसारख्या भागात मात्र मदतीचे वाटप करण्यात आले. तसेच कुर्ला येथे हाऊसिंग बोर्डाच्या इमारतीमध्ये चवथ्या मजल्यावर देखील अशा मदतीचे वाटप करण्यात आले, अशी उलट परिस्थिती आहे. म्हणून माझी विनंती आहे की, दक्षिण सोलापूर भागात एकूण 1666 कुटुंबे बाधित झाली आणि तेथील तलाठी व तहसीलदार ज्यांना पैसे देतील ते मदतीसाठी पात्र, बाकीचे अपात्र अशा प्रकारे 472 बाधित कुटुंबे पात्र ठरविली आणि त्यातील 100 कुटुंबांना अद्यापही मदत मिळाली नाही. तसेच अक्कलकोटमध्ये 664 बाधित कुटुंबांपैकी 194 कुटुंबे पात्र ठरविली व त्यापैकी फक्त 100 कुटुंबांना मदत मिळाली, उर्वरित कुटुंबे अद्यापही मदतीपासून वंचित आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, त्या ठिकाणी तलाठयाला पैसे दिले नाही म्हणून त्या लोकांना शासनाची मदत मिळू शकली नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन गोरगरीब जनतेला न्याय मिळवून द्यावा. तसेच आता मुंबईमध्ये फायर ब्रिगेडकडे हवेच्या होडयांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. मुंबईमध्ये जर अशी परिस्थिती निर्माण झाली तर आपल्याला नेव्हीकडून हवेच्या होडया घ्याव्या लागतात, परंतु त्यांच्याकडून होडया मिळण्यात बराच विलंब होतो त्यामुळे यादृष्टीने शासनाने विचार करावा अशी विनंती आहे. मुंबईतील 26 जुलैच्या पावसात सर्व टेलीफोन बंद पडले होते. टेलीफोनच नव्हेतर मोबाईल सुध्दा बंद पडले होते, त्यामुळे कम्युनिकेशन बंद पडणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी या ठिकाणी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या ठिकाणी पुरग्रस्ताच्या संदर्भात चर्चा चालू आहे.या चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, श्री जयंत प्र.पाटील यांनी पूरग्रस्तांना जी मदत वाटण्यात आली, त्यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे काही कथन केलेले आहे, त्यास माझे सुध्दा समर्थन आहे. पूरग्रस्तांना मदत देण्यामध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे, त्याची आपण जरुर चौकशी करा परंतु वारणा-कृष्णेच्या पंचक्रोशितील नद्यांना देखील मोठया प्रमाणात पूर आला होता. त्यावेळेस ज्या अधिका-यांनी आणि कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस कष्ट करुन लोकांना मदत केली, त्यासंदर्भात देखील शासनाने दखल घेतली पाहिजे, नोंद घेतली पाहिजे, त्यांचा सत्कार केला पाहिजे अशी आमची इच्छा आहे. मला दुसरे असे सांगावयाचे आहे की, या अतिवृष्टीत ज्या शेतक-यांच्या ऊसाचे 50 टक्के नुकसान झालेले आहे त्यांना मदत करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु मला असे म्हणावयाचे आहे की, ज्यावेळी शेतक-यांच्या ऊसाचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले त्यावेळेस शासनाने 8-15 दिवसात यासंदर्भात सर्व्हे केला होता परंतु त्यानंतर सुध्दा शेतक-यांच्या ऊसाचे नुकसान झालेले आहे, त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, ज्या शेतक-याच्या ऊसाचे 20 टक्के नुकसान झाले असेल त्यांना सुध्दा नुकसान भरपाई देण्यात यावी. तसेच मला दुसरा एक मुद्दा मांडावायाचा आहे तो असा आहे की, या अतिवृष्टीमध्ये ज्या घरांची पडझड झाली, भिंत पडली, कोपरा पडला तर शासनाने त्यांना 360 रुपयांची मदत दिलेली आहे. त्यामुळे मला असे सांगावयाचे आहे की, जर एक दिवस कामाला गंवडी आणि बिगारी लावला तर त्याला 300 रुपये एकाच दिवसात द्यावे लागतात. 360 रुपये जी नुकसान भरपाई दिली जाते ती फार कमी आहे. ही नुकसान भरपाई कमी असल्यामुळे अनेक लोकांनी शासनाची मदत सुध्दा घेतलेली नाही त्यामुळे घरांच्या नुकसान भरपाईची रक्कम शासनाने कमीत कमी 500 रुपये व अधिक द्यावी, ही नम्र विनंती. तसेच पुनर्वसनासाठी आणि तातडीच्या पुनर्वसनासाठी पूर रेषेचे निकष शासनाने लावले आहेत. पूर रेषा हा महत्वाचा विषय आहे. जुनी पूर रेषा धरली गेल्यामुळे यंत्रणा सावध झाली नाही त्यामुळे अनेक गावांना पुराचा वेढा पडला. तसेच पूर रेषा व्यवस्थित न धरल्यामुळे लोकांचे पुनर्वसन करण्यात आले नाही. त्यामुळे पूर रेषा कोणत्या सालची धरली जाणार हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे.त्यामुळे

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे.....

शासनाने त्वरित पूर रेषा तपासून घ्यावी. मध्यंतरी आपल्याकडे जी अतिवृष्टी झाली त्यावेळी आमच्या सांगली जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात पूर आला होता. पुरामुळे सर्व रस्ते जलमय झाले होते. त्यामुळे जोपर्यंत पाणी ओसरले नाही तोपर्यंत लोकांना रस्ता नसल्यामुळे इकडे-तिकडे जाता आले नाही, संपर्क साधता आला नाही. त्यामुळे प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी होडयांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. जर पूरामुळे जिल्हयाच्या ठिकाणी जाता येत नसेल तर तालुक्यांच्या ठिकाणी आणि खेडयांच्या ठिकाणी काय परिस्थिती असेल याचा विचारच केलेला बरा. त्यामुळे या ठिकाणी रस्ते उपलब्ध करुन देण्यात यावे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच तेथे गुरा-ढोऱ्यांचे पंचनामे झालेले नाहीत. ते पुन्हा करण्यासंबंधी फेरविचार करावा. तसेच ज्यांच्या सावर्जनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी विचार करण्यात यावा अशी विनंती करून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, म.वि.प.नियम 97अन्वये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी राज्यात दिनांक 26 जुलै रोजी झालेली अतिवृष्टी यासंबंधी अल्पकालीन सूचना मांडलेली आहे. त्यावर विचार मांडण्याकरिता मी उभी आहे.

सभापती महोदया, दिनांक 26 जुलै रोजी मुंबईत नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात काळ दत्त म्हणून उभा राहिला. या दिवशी महाराष्ट्र हताश झाला होता. सर्वसमावेशक मुंबईला पाण्याने वेढले होते. दिनांक 26 जुलै रोजी दुपारी 3.30 नंतर सगळी यंत्रणा बंद पडली. वीज, पाणी, मोबाईल इत्यादी दळणवळणाच्या साधनांवर देखील मोठा परिणाम झाला. या अतिवृष्टीमुळे मनुष्य आणि वित्त हानी फार मोठया प्रमाणावर झाली. कार्यालयामध्ये दोन दिवस अडकून पडलेले कर्मचारी घरी परतल्यावर त्यांच्या संसाराचा पत्ता नव्हता अशा प्रकारचे चित्र होते. गौतम नगर, पवई येथील श्री.कांबळे कुटुंब मृत्युमुखी पडले. त्यावेळी लहान बाळाला आई पाजत होती. या घटनेतून मुल वाचलेले आहे. तसेच, पुण्यातील शनिवारवाडयाचा बुरूजसुध्दा ढासळलेला आपल्याला पहायला मिळालेला आहे. या अतिवृष्टीमध्ये दळणवळणाची यंत्रणा बंद पडली होती. जर अत्याधुनिक दळणवळण यंत्रणा आपत्कालीन परिस्थितीमध्ये बंद पडत असेल तर तिचा उपयोग काय ? यावेळी डिझास्टर मॅनेजमेंट काय करीत होते? यावर आपण कोटयवधी रुपये खर्च करतो. परदेशामध्ये डिझास्टर मॅनेजमेंट लगेच कामाला लागते. नैसर्गिक संकट येणार आहे म्हटलावर त्यांची सिस्टीम कार्यरत होते. पण आपल्याकडील डिझास्टर मॅनेजमेंटची सिस्टीम पूर्णपणे ठप्प झाली होती. मुंबईवर आलेले संकट नैसर्गिक असले तरी ते मानव निर्मित जास्तच होते असे म्हणायला पाहिजे. गटारे तुंबल्यामुळे, मिठी नदीचा नाला केल्यामुळे रस्त्यावरील पाण्याचा निचरा होऊ शकत नव्हता. यामुळे गाडया, बसगाडया अडकून पडल्या होत्या. एवढेच नव्हे तर बसच्या टपावर देखील लोक चढले होते. खाजगी गाडयांमध्ये स्वयंचलित यंत्रणा बसवलेली असल्यामुळे ती सुरू न झाल्यामुळे गाडीत पाणी शिरल्यामुळे 16 जणांचा मृत्यु झालेला आहे. शासकीय यंत्रणा ठप्प झाल्याचे एक वेगळे चित्र दिसत होते. शेकडो तरूण-तरूणी वाटेत अडकून पडलेल्या मुंबईतील लोकांना चहा-पाणी,नाश्ता देत होते. अंधेरी येथे बाप आपल्या तीन मुलांना घेऊन पाण्यातून मार्गक्रमण करीत असताना 8 वर्षाचा मुलगा हात सुटल्यामुळे वाहून गेला. अशाप्रकारे अनेक लोक वाहून गेले आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे .....

सभापती महोदया, दिनांक 26 जुलै रोजी शासकीय यंत्रणेचा तर पत्ताच नव्हता. मिठी नदीच्या पात्रावर अतिक्रमण झाल्यामुळे पाण्याचा प्रवाह समुद्राला जाऊन मिळाला नाही. पर्यायाने मुंबई जलमय झाली. तेव्हा मिठी नदीचा प्रवाह समुद्राला व्यवस्थित जाऊन मिळण्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. मुंबई, बदलापूर, कल्याण, डोंबिवली, येथे सर्वत्र पाणीच पाणी होते. महाड येथील जुई नगरातील रसाळ यांची मुलगी व भाचा यांना अद्यापी सरकारी मदत मिळालेली नाही. त्यांचे नातेवाईक या अतिवृष्टीत मृत्युमुखी पडलेले आहेत. तसेच, मुंबतील चेंबूर येथील सुभाष नगर, सहकार नगर येथील तळमजल्यावर राहणाऱ्या लोकांचे फार नुकसान झालेले आहे. त्यांच्या घराचे पंचनामे अजून झालेले नाहीत. ज्यांच्या घरांचे, झोपडयांचे नुकसान झालेले नाहीत अशांना शासकीय यंत्रणेने मदत केली आहे. असा प्रकोप महाराष्ट्राच्या राजकारणात झाला पाहिजे.

यानंतर श्री.अजित..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे.....

यावेळी मला कुसुमाग्रजांच्या "आगगाडी व जमीन" या कवितेतील ओळी आठवतात. आपण निसर्गावर कुरघोडी करु शकत नाही. जमीन आगगाडीला सांगते फार जोराने धावू नको. पण आगगाडी फार जोरात धावते ती जमिनीचे ऐकत नाही. शेवटी भूकंप होऊन अपघात होतो. असा त्या कवितेचा आशय आहे. ही संकटे कशामुळे आली ? यावर शासनाने लक्ष दिले पाहिजे. जी काही आपदकालीन व्यवस्था आहे त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. ज्यांच्या घरांचे अजून पंचनामे झालेले नसतील त्यांच्या घरांचे पंचनामे त्वरित करण्यात यावे. ज्यांच्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे. सभापती महोदया, आपण मला विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानते आणि माझे भाषण पूर्ण करते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मुंबई आणि महाराष्ट्रावर जे अतिवृष्टीचे संकट आले, त्या संकटानंतर जगामध्ये सुध्दा अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली. मला याठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, परदेशामध्ये अशाप्रकारची अतिवृष्टी झाल्यानंतर तेथे लुटालूट झाली होती. तसा प्रकार आपल्या महाराष्ट्रात झाला नाही. ही भारतीय संस्कृती आहे. परिस्थितीचे भान ठेवून लोकांनी हे सर्व सहन केले होते.

दुसरा मुद्दा म्हणजे 1993 साली महाराष्ट्रात भूकंप झाला त्यावेळी दळणवळणाची सर्व यंत्रणा उद्ध्वस्त झाली होती. लोकांचा संपर्क पूर्णपणे तुटला होता. त्यावेळी आपल्याला हॅमरेडिओ यंत्रणेचा उपयोग झाला होता. ही हॅमरेडिओ यंत्रणा असती तर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याशी संपर्क साधला असता. तेव्हा यापुढे सर्व जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये ही यंत्रणा उपलब्ध करुन दिली पाहिजे जेणेकरुन दळणवळणाचा प्रश्न उपस्थित होणार नाही.

तिसरा मुद्दा म्हणजे या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले त्याचे पंचनामे करण्याची मुदत आपण 31 डिसेंबरपर्यंत ठेवलेली आहे. आपण ही मुदत वाढवून द्यावी. ज्यांची घरे उद्ध्वस्त झाली त्यांचे आपल्याला स्थलांतर करावे लागले आहे त्यामुळे अजूनही बऱ्याच घरांचे पंचनामे व्हावयाचे आहेत. यासाठी आपण ही मुदत वाढवून द्यावी.

कोकणातील "प्रयास" या संस्थेने याबद्दलचा अहवाल सादर केलेला आहे. मी तो माननीय पुनर्वसन मंत्र्यांना सादर करते. त्या अहवालात त्यांनी नुकसानीचा आढावा घेतलेला आहे. शाळेतील मुलांची पाठ्यपुस्तके पूर्ण खराब झालेली आहे. मुलांच्या वह्या खराब झालेल्य आहेत. शाळांचे नुकसान झालेले आहे, इत्यादींचा उल्लेख त्यात केलेला आहे. याकडे माननीय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष द्यावे.

सर्वात महत्वाची बाब म्हणजे अनेक लोक या अतिवृष्टीमध्ये दगावले आहेत. त्यापैकी सांगली येथील श्री.शिंदे कुटुंबातील महिला दगावल्या आहेत त्यांच्या कुटुंबियांना मदत केली पाहिजे. कुर्ला येथील श्रीमती गंगूताई जाधव या महिलेचा चेंगराचेंगरीमध्ये मृत्यू झाला, त्यांच्या कुटुंबाने आपल्याकडे निवेदन दिलेले आहे त्याबाबत आपण विचार करावा. पुनर्वसन विभागाचे अधिकारी आम्ही दिलेल्या पत्राची कोणतीही पोच देत नाहीत तेव्हा आपण विभागाला सूचना कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

मुंबई शहराचे पालकमंत्री श्री.रामराजे नाईक - निंबाळकर या संपूर्ण कालावधीमध्ये एकदाही भेटले नाहीत. त्यांनी आमदारांची बैठक घेतली नाही. मृत्यु पावलेल्या लोकांची यादी मिळविण्यासाठी आम्हाला जिल्हाधिकाऱ्यांशी भांडावे लागले होते. आता माननीय मुख्यमंत्री महोदय मंत्रिमंडळात काही फेरफार करणार आहेत. तो त्यांचा अधिकार आहे. मला त्यांना विनंती करावयाची आहे की, आपण मुंबई शहरासाठी चांगला मंत्री द्यावा. कोणत्याही आपत्तीमध्ये महिला आणि मुलांना त्याचा जास्त फटका बसतो. मला याठिक्राणी नमूद करावयाचे आहे की, ज्याप्रमाणे सकाळ ट्रस्टने घरोघरी जाऊन धान्याचे वाटप केले. अशाप्रकारे जर वाटप झाले असते तर त्याचा फायदा लोकांना झाला असता. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदया, वेळ थोडा असल्यामुळे मी फक्त शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांवर बोलणार आहे. दिनांक 26 जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टी पावसामुळे मुंबईतील अनेक शाळांचे नुकसान झाले. शाळेच्या इमारती आणि साहित्य, पाठ्य पुस्तकांचे जवळपास 60 कोटी रुपयांचे नुकसान झाले. शाळेतील संगणक वाहून गेले. वाचनालयातील पुस्तके कपाटात पाणी गेल्यामुळे सर्व भिजून गेली. शाळेचे रेकॉर्ड, मुलांचे दाखले, फाईल्स, बेंचेस खराब झाले आहेत. काही शाळांचे नामोनिशाण राहिलेले नाही. त्यांना अग्रक्रमाने मदत करणे जरुरीचे आहे. सभापती महोदया, सरकारी कर्मचाऱ्यांना तीन महिन्यांचे अग्रीम वेतन मिळाले. परंतु त्यासाठी शिक्षकांना मात्र खेटे मारावे लागले आहेत. त्यामुळे एकाच वेळी सर्वांना आदेश निर्गमित करावे अशी माझी मागणी आहे. केरळ, तामिळनाडू या राज्यातील शाळा-कॉलेजमध्ये आपत्ती निवारण यंत्रणा शास्त्र शिकविले जाते. तसाच कोर्स आपल्याकडे सहा-सहा महिन्यांचा देण्यात यावी अशी माझी आपल्या विनंती आहे. शेवटी आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून, माझे दोन शब्द संपविते.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, मी ही सर्व परिस्थिती स्वत: पाहिल्यामुळे मी केवळ दोन-चार सूचना करणार आहे. शासनाने ही परिस्थिती उद्भवल्यानंतर तातडीने उपाययोजना करण्यासाठी सहयाद्री येथे बैठक आयोजित केल्याबद्दल मी प्रथम शासनाला धन्यवाद देतो. ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री माननीय श्री.गणेश नाईक यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि महापालिकेचे आयुक्त यांची बैठक घेतली. परंतु त्याबाबत आम्हाला कळविण्यात आले नाही. ठाणे आणि कल्याण महानगरपालिकेंतर्गत अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी लाँचची तरतूद नाही. तीन-तीन दिवस तेथील लोक पाणी साचल्यामुळे संपर्कात नव्हते. फायर ब्रिगेडची जशी आपतकालीन व्यवस्था आहे तशाच प्रकारची लाँचची सुध्दा आपतकालीन व्यवस्था करण्यात आली पाहिजे अशी माझी मागणी आहे. कल्याण परिसरातील पडवली, आटवली येथील रहिवाशांच्या घरावरुन पाणी गेले. एकाच कुटुंबातील 5 व्यक्ती त्यामुळे मृत्यूमुखी पडल्या. सन्माननीय पतंगराव कदमसाहेब मी आपणांस विनंती करतो की, आपत्कालीन परिस्थितीमध्ये लोकांना स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवावे लागले. शेकडो लोकांना वाचविण्यात आले आहे. सुरेश पाटील या पिता-पुत्रांनी तर स्वत:चा जीव धोक्यात घालून सकाळी दोन-अडीचच्या दरम्यान अनेकांना पाण्यातून बाहेर काढले. जर या 100 व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या असत्या तर शासनाला प्रत्येकी 2 लाख रुपये मदत द्यावी लागली असती. त्यामुळे आज खऱ्या अर्थाने 2 कोटी रुपये वाचलेले आहेत.

महोदय, मुंब्रा येथील अंटलांटिका इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने रस्ता बांधून जो बायपास सुरु केला आहे. तो रस्ता पूर्ण न झाल्यामुळे रस्त्यासाठी पडून असलेली माती त्याच ठिकाणी होती. पुरामध्ये ती माती वाहून घरात आली. त्यामुळे तेथील घरात रस्ता आहे की रस्त्यात घर आहे असा प्रश्न पडतो. त्यामुळे या संस्थेची आपण चौकशी करा. सात-आठ वर्षे उलटून सुध्दा अद्यापपर्यंत तो रस्ता पूर्ण झाला नाही. ज्यावेळी पूर परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी नागरिकांना पिण्यासाठी पाणी नव्हते, दूरदर्शनच्या बातम्या कळत नव्हत्या. मोबाईल, दूरध्वनी बंद असल्यामुळे दळणवळण यंत्रणा अस्तित्वात नव्हती. म्हणून आपत्कालीन व्यवस्था सुरु राहण्याच्या दृष्टिकोनातून आपण प्रयत्न केला पाहिजे. ठाणे शहराला पाणी पुरवठा करणारे आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे...

त्याचे नियंत्रण करणारे ट्रान्समिशन जळाले होते, वीज पुरवठा होत नव्हता, मोटारी जळाल्या होत्या. याकामी मदत न मिळाल्यामुळे चार-चार दिवस तेथील नागरिकांना पाणी मिळाले नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, रायगड जिल्हयातील दासगांव, जुही, रोहण आणि कोंडिवले या गावाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाकडून एक कंडिशन ठेवण्यात आली आहे. त्या जमिनीचे व्यवहार करा, नंतर आम्ही घरे बांधून देतो असे शासन सांगत आहे. तेथील नागरिकांनी मागणी केली आहे की, जे शेतकरी आहेत त्यांना 3 गुंठे जमीन द्या आणि जे बिगर शेतकरी आहेत त्यांना दोन गुंठे जमीन द्या त्यामध्ये आम्ही घर बांधून घेतो. त्यामुळे मी या ठिकाणी ज्या काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या आहेत त्याबाबत विचार करण्यात यावा अशी माझी विनंती आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून, थोडक्यात माझे विचार व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद |

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 97 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये भाग घेऊन त्यावर माझे व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, खऱ्या अर्थाने संकटावर उपाययोजना करण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा प्रस्ताव मांडलेला आहे. ज्यावेळी मुंबईमध्ये पुरामुळे भयानक परिस्थिती निर्माण झाली होती, त्यावेळी विरोधी पक्षाने 8 दिवसांच्या विशेष अधिवेशनाची मागणी केली होती. परंतु त्यावेळी आमची टिंगलटवाळी केली गेली. वास्तविक पाहता या चर्चेच्या अनुषंगाने प्रत्येक सन्माननीय सदस्याला किमान 15-20 मिनिटे तरी अवधी द्यावयास हवा होता. परंतु एक-दोन मिनिटामध्ये आपल्या भावना व्यक्त कराव्यात अशी जी अट घातली आहे त्याचा मी निषेध करतो. त्यामुळे मी पुन्हा एकदा मागणी करतो की, मुंबईमध्ये या विषयावर चर्चा करण्यासाठी 8 दिवसांचे अधिवेशन बोलवावे आणि प्रत्येक सदस्याला व्यवस्थित वेळ द्यावा जेणेकरुन सदस्य आपल्या भावना व्यक्त करुन, अशा परिस्थितीत काय उपाययोजना करु शकता येतील याबाबत सूचना करु शकतील.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ..

सभापती महोदया , मुंबई शहरामध्ये एका दिवसात 944 मि.मि.एवढा अभूतपूर्व पाऊस पडला होता त्याची पूर्व कल्पना हवामान खात्याला आली नव्हती काय ? येथून पुढच्या काळात ही कल्पना अगोदर यावी यासाठी हवामान खाते अत्याधुनिक करण्यात आले पाहिजे अशी मला या चर्चेच्या निमित्ताने मागणी करावयाची आहे.त्याचबरोबर मुंबई आणि महाराष्ट्रातील इतर भागात पूर आल्यामुळे जे पूरग्रस्त झालेले आहेत त्यांचे तातडीने पुनर्वसन करण्यात आले पाहिजे.केन्द्र सरकारकडून आपल्याला या कामासाठी अजूनही काही मदत यावयाची आहे. ही मदत केन्द्र सरकारकडे अडकून पडलेली आहे. तेव्हा ही मदत लवकरात लवकर मिळावी याकरता केन्द्र सरकारकडे एखादे शिष्ट मंडळ नेण्यात यावे आणि ही मदत त्वरित मिळविण्यात यावी या महापुरामुळे ज्या शेतक-यांच्या जनावरांचे, त्यांच्या शेतीचे वा पिकाचे नुकसान झालेले आहे त्या शेतक-यांना त्वरित मदत देण्यात यावी.सांगली जिल्हयातील अशी परिस्थिती आहे की, काही भागात अतिवृष्टी झाल्यामुळे तेथील शेत जमीन वाहून गेलेली आहे तसेच जत,कवठेमहांकाळ,आटपाडी हे दुष्काळी भाग आहेत सततच्या दुष्काळामुळे त्या भागातील तीन पिढया उद्ध्वस्त झालेल्या आहेत . सांगली जिल्हयात अनेक नेते आहेत त्यांनी या भागातील लोकांचे अश्रू पुसलेले नाहीत त्यातील एक नेते डॉ.पतंगराव कदम या ठिकाणी उपस्थित आहेत.तेव्हा सांगली जिल्हयातील ताकारी म्हैसाळ या योजना त्वरित मार्गी लावण्यात येऊन त्या भागातील लोकांचे अश्रू पुसावेत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदया, या ठिकणी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावरील चर्चेत भाग घेण्याकरता मी उभा आहे.मला सांगली जिल्हयाशी सबंधित एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांनी या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असतांना असे सागितले की, पावसाच्या पाण्यामुळे सांगली जिल्हयाला जोडणारे रस्ते त्यावेळी बंद झाले होते. त्याचबरोबर पूर पाहण्यासाठी इतर भागातील लोक तेथे मोठया प्रमाणावर येत होते.दुसरी गोष्ट अशी की त्या भागातील लोकांना 15 दिवस दूषित पाण्याचा पुरवठा केला जात होता. तेव्हा लोकांना शुध्द पाणी पुरवठा मिळेल यासाठी कायम स्वरुपाची व्यवस्था करण्यात आली पाहिजे. एका बाजूला पूर परिस्थितीमुळे तेथील लोकांना घराच्या बाहेर पडता येत नव्हते आणि दुस-या बाजूला त्यांना दूषित पाण्याचा पुरवठा केला जात होता.. या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आम्हाला फक्त दोन मिनिटेच देण्यात येत असल्यामुळे आम्हाला आमचे म्हणणे पूर्णपणे मांडता येत नाही.तेव्हा आम्हाला अधिक वेळ दिला जावा अशी आम्ही मागणी आम्ही केली होती ही पूर्वीची मागणी आमची आजही कायम आहे.दोन मिनिटांमध्ये या विषयावर म्हणणे मांडता येत नाही. या ठिकाणी अशा प्रकारे घाईने चर्चा केली जात आहे .....

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : ही चर्चा सुरु होऊन अडीच तास झालेले आहेत त्यामुळे घाई घाईने चर्चा घेतली आहे असे सन्माननीय सदस्यांना म्हणता येणार नाही.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : दोन मिनिटांमध्ये बोलण्यास सांगितले जात आहे त्यामुळे तो आमच्यावर अन्याय होत आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडता येणार नाही हे मलाही मान्य आहे. आपले नेते अर्धा तास भाषण करीत असतात त्यामुळे इतर सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरता पुरेसा वेळ मिळत नाही व त्यांच्यावर अन्याय होतो ही बाब आपण आपल्या पक्षाच्या बैठकीत सूचित करावी..

श्री.कन्हैयालाल गिडवाणी :आमच्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी आम्ही आपल्यालाच विनंती करणार. आमच्यावर जो अन्याय होत आहे तो आपण दूर करावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.बोलण्यासाठी मला पुरेसा वेळ न दिल्यामुळे मला बोलता येत नाही.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : दोन मिनिटांमध्ये विचार मांडता येणार नाही या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. आता माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (पुनर्वसन व मदत मंत्री) : सभापती महोदया, अतिवृष्टीच्या संदर्भात या ठिकाणी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्या प्रस्तावाला उत्तर देण्याकरता मी उभा आहे.

सभापती महोदया,महाराष्ट्रावर अतिवृष्टीचे अभूतपूर्व आणि भयानक असे संकट आलेले आहे . आता पर्यन्त मुंबई शहरामध्ये एका दिवसात 370 मि.मि. पेक्षा जास्त पाऊस कधीही पडला नव्हता परंतु जुलै महिन्यामध्ये एकाच दिवसात 944 मि.मि. पाऊस पडला होता.एवढया मोठया प्रमाणावर पडलेल्या अतिवृष्टीला सहन करण्या इतके मुंबई शहरातील इनफ्रास्ट्रक्चर नसल्यामुळे उपनगरामध्ये महाभयानक अशी परिस्थिती निर्माण झाली होती ही अतिवृष्टी इतकी होती की त्यामुळे . ठाणे, रायगड जिल्हयातील डोंगराच्या कडा कोसळल्या होत्या. त्याचबरोबर मराठवाडयात नांदेड परभणी या भागात सुध्दा अतिवृष्टी झाली व महापूर आले होते .

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कदम ....

विदर्भामध्ये गोंदिया, यवतमाळ, वाशिम, भंडारा या जिल्ह्यांमध्ये देखील तशीच परिस्थिती निर्माण झाली. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या भागामध्येही हीच परिस्थिती निर्माण झाली. तिचे समर्थन कोणीही करू शकणार नाही. महापालिकेची यंत्रणा, पोलीस यंत्रणा, मुंबईच्या उपनगरांमध्ये काही अंशी कमी पडली परंतु मुंबईच्या जनतेचे कौतुक केले पाहिजे. मुंबईची जनता निश्चितच धैर्यवान आहे. जनतेने या आपत्तीच्या काळामध्ये एकमेकांना मदत करण्याचा, साथ देण्याचा प्रयत्न केला, धीर देण्याचा प्रयत्न केला. आमच्या मदत व पुनर्वसन यंत्रणेचेही काम त्यावेळेस चालू झाले. हेलिकॉप्टर्स मागविली गेली, मिलिटरी यंत्रणा मागविली आणि या सर्वांमार्फत जास्तीत जास्त मदत मुंबईतील जनतेला करण्याचा प्रयत्न झाला. सभापती महोदया, 26 तारखेला राजर्षी शाहू महाराजांची जयंती होती आणि तो दिवस महाराष्ट्रात आपण 'समता दिन' म्हणून पाळत होतो. सर्व मंत्री त्या काळात आपापल्या जिल्ह्यांमध्ये गेलेले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी दुपारी 4 वाजता सगळ्या मंत्र्यांची बैठक घेऊन सूचना केल्या. त्या दोन दिवसात दिलेल्या सुटीबद्दल येथे बोलले गेले. त्याबाबत सातत्याने चर्चा होते. सभापती महोदया, त्या वेळी शाळांतील मुले आणि इतर लोकांनीही घरातून बाहेर पडू नये असे आवाहन मुद्दामहून करण्यात आले होते. या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर यांनी हा प्रश्न सविस्तर असा मांडलेला आहे. येथे उपस्थित करण्यात आलेल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न मी निश्चितपणे करणार आहे. तेव्हा मी आपल्याला असे सांगू इच्छितो की, त्या आपत्तीच्या काळामध्ये अत्यावश्यक सेवांसाठी जे कर्मचारी आहे त्यांच्यासाठी ही सुटी नव्हती. पण त्याचाही गैरफायदा काही लोकांनी घेतला. तेव्हा ही सुटी देण्यामागे हेतू एवढाच होता की, शाळा-कॉलेजातील मुलांनी, घरातील वयस्क मंडळींनी घरातून बाहेर पडू नये., इतकी भयानक परिस्थिती त्यावेळी मुंबईत निर्माण झाली होती. या सगळ्या परिस्थितीमध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी येथील जनतेचे कौतुक केले आहे. पण महाराष्ट्र शासनाने देखील त्यावेळेस कोठल्याही प्रकारे पक्ष, जात, धर्म वगैरे न पाहता, कोठलाही भेदभाव न करता अतिशय गंभीरपणे पावले उचलली आहेत. सभापती महोदया, माननीय मुख्यमंत्र्यांनी मी मदत व पुनर्वसन मंत्री असल्याने माझ्या अध्यक्षतेखाली एक कॅबिनेट सबकमिटी केली आणि रोज दुपारी 3 वाजता ही समिती बसते, त्यासाठी कोठल्याही प्रकारचा अजेंडा वा सूचना द्यावी लागत नाही, बैठकीमध्ये समिती ताबडतोब निर्णय घेते आणि

..... एए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कदम ....

गुरूवारच्या कॅबिनेटला ते निर्णय कळविले जातात व ताबडतोब त्यानुसार जी.आर. काढला जातो. नसता जी.आर. काढून होत नाही तर .. कारण सरकारचा निर्णय होऊन जी.आर. काढण्यामध्ये वेळ लागतो, मग तो दुरूस्त करण्यामध्ये वेळ जातो आणि पुढे जी.आर. काढला तरी त्याच्या अमलबजावणीस वेळ लागतो. पण या वेळेस मात्र निर्णय झाला की, त्याच व त्याच्या दुसऱ्या दिवशी जी.आर. काढून अमलबजावणीसदेखील सुरूवात केली जाते. त्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आपण अधिकार दिले. अशा प्रकारे सर्व जिल्ह्यांमध्ये अमलबजावणी परिणामकारक राबविण्याचे काम या विभागाने केले आहे. ....

श्री. मधुकर सरपोतदार : कृपया आपण कोठल्या तारखेला जी.आर. काढले आणि कोणत्या तारखेला अमलबजावणी म्हणजे मदत सुरू केली तेही सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदया, सरकारच्या प्रत्येक आदेशाची तारीख मी सांगणार आहे, अंमलबजावणीचीसुद्धा तारीख सांगू शकतो. सभापती महोदया, या संबंधी बोलत असताना माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, मला यामध्ये राजकारण आणावयाचे नाही. पण मला त्यांना माहिती द्यावयाची आहे की, या आपत्तीच्या वेळी बीजेपी प्रणित राज्यांनी या राज्याला पैसे दिले, बाकी कोणीही दिलेले नाहीत. म्हणजे देशातून फारशी मदत महाराष्ट्राला मिळालेली नाही. केवळ अंदमान-निकोबार कडून प्रत्येकी एक एक कोटी रूपयांची मदत मिळालेली आहे. बाकी राजस्थान, गुजराथ, एम.पी, झारखंड, छत्तीसगड या राज्यांनी मदत देण्याची घोषणा केली पण या क्षणा पर्यंत एकही पैसा आपल्याकडे आलेला नाही. ...

(यानंतर श्री.सरफरे .... बीबी 1 ...

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, इतर राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारकडे गावे दत्तक घेण्याच्या स्वरुपामध्ये, वस्तूंच्या स्वरुपामध्ये किंवा पैश्याच्या स्वरुपामध्ये मदत पाहिजे काय? अशी विचारणा केली होती. व तशा स्वरुपामध्ये प्रस्ताव पाठविण्यात यावा असेही त्यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे या राज्य सरकारने त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविलेला नाही. त्यामुळे कदाचित त्यांच्याकडून मदत आलेली नसेल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.आमच्या पक्षातर्फे आमचे नेते माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची नियुक्ती करण्यात आली होती. पुनर्वसन विभागाचे सचिव श्री. वत्स यांचेबरोबर त्यांनी पाच वेळा बैठक घेतली. अधिवेशनापूर्वी एक दिवस अगोदर आम्ही गावांची नावे त्यांना दिली. परंतु त्या गावांना मदत मिळाली नाही. आम्ही दोन-दोन दिवस श्री. वत्स साहेबांना भेटण्यासाठी गेलो होतो.परंतु त्यांची भेट होऊ शकली नाही. त्यामध्ये आमचा काही दोष नाही.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, श्री. वत्स हे रात्रंदिवस काम करीत होते. आपण म्हणता की, राज्य सरकारने प्रस्ताव पाठविला नाही. परंतु राज्य सरकारकडून आता प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना आपण लवकर मदत देण्यास सांगावे. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने या देशाचे पंतप्रधान माननीय श्री. मनमोहनसिंह साहेबांचे अभिनंदन केले पाहिजे. मुंबईमध्ये पूर आल्यानंतर त्यांनी हवाई पहाणी केली. आणि पहाणी केल्यानंतर पहिल्याच बैठकीमध्ये त्यांनी राज्य सरकारला 500 कोटींच्या मदतीची घोषणा केली. या महाराष्ट्र राज्याच्या इतिहासामध्ये एवढी मोठी मदत केंद्र सरकारने यापूर्वी केली नव्हती. हे पैसे आम्हाला दुसऱ्या दिवशी मिळाले. तसेच, आपत्ती निवारण निधीचे 222 कोटी मिळाले, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीचे 123 कोटी मिळाले. आणि राष्ट्रीय आपत्ती निधीमधून 500 कोटी सुरुवातीला आणि नंतर 500 कोटी मिळाले. याप्रमाणे 1242 कोटी रुपये महाराष्ट्राला मिळाले.

श्री. पांडुरंग फुंडकर : महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे किती कोटींची मागणी केली ते सांगा. मागणी केली त्याप्रमाणे आतापर्यंत किती कोटी मिळाले ते सांगा?

डॉ. पतंगराव कदम : किती पैसे मिळाले ते मी सांगणार आहे. अगोदर माझे उत्तर पूर्ण होऊ द्या. उत्तर पूर्ण झाल्यानंतर आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास मी तयार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : राज्य सरकारला दरवर्षी 500 कोटी रुपये मिळतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, राज्य सरकारला तात्पुरती मदत मिळाल्यानंतर राज्य सरकारने सर्व्हे केला. त्या सर्व्हेक्षणानंतर कायम स्वरुपामध्ये पुनर्वसन करण्यासाठी 18 हजार कोटी रुपयांची मागणी केली. केंद्र सरकारची एक समिती आहे त्या समितीमार्फत आमच्या प्रस्तावाची छानणी चालू आहे. तरीपण त्सुनामीच्या संकटाच्या धर्तीवर आपल्याला निश्चितपणे मदत मिळेल यामध्ये शंका नाही. सभापती महोदया, मुंबईतील पूरामध्ये 15 हजार शेळया-मेंढया व 1200 म्हशी पाण्यामध्ये बुडून मरण पावल्या. त्याचप्रमाणे 3 लाख 39 हजार मे.टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. त्याचप्रमाणे गॅस्ट्रो, हेपेटायटीस व लॅप्रोस्पायरसिस रोगांची लागण टाळण्यासाठी घरोघरी 23 मे.टन क्लोरीनच्या गोळयांचे वाटप करण्यात आले, त्याचप्रमाणे 800 किलो ब्लिचिंग पावडर व ब्लूनाईलचे वाटप करण्यात आले. याकरिता मुंबईमध्ये 133 पथके नेमून आम्हाला मोठया प्रमाणावर काम करावे लागले.

(यानंतर सौ. रणदिवे)0

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिठी नदीच्या बाबतीत . . . .

श्री.प्रकाश शेंडगे(खाली बसून) : शेळयामेंढयांना किती मदत केली ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी घाई करु नये. कोणाला किती मदत दिली याची टप्प्याटप्प्याने सर्व आकडेवारी मी सांगणार आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आता माननीय मंत्री महोदयांना कोणीही डिस्टर्ब करु नये.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याठिकाणी मिठी नदीबद्दल चर्चा झाली. मिठी नदीचे अस्तित्व निश्चितपणे ठेवले जाणार आहे. त्याठिकाणी 512 अनधिकृत बांधकामे होती. त्यापैकी 511 व्यापारी गाळयांवर कारवाई केली आहे. एका गाळयाच्या बाबतीत संबंधित कोर्टामध्ये गेले आहेत, यावर न्यायमूर्ती फॅक्टस् फाईंडींगच्या . . . .

श्री.अनिल परब : सभापती महोदय, मिठी नदीवरी अनधिकृत बांधकामांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार होती. पण ती आजपर्यंत ठेवण्यात आलेली नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपल्या मनातील शंका, प्रश्न लिहून ठेवावेत आणि ते शेवटी विचारावेत.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, फॅक्टस् फाईंडींगच्या संबंधात न्यायमूर्ती माधवराव चितळे कमिटी नेमलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ॲथॉरिटी तयार केलेली आहे आणि ॲक्शन पूर्ण होईल. यानंतर मुंबईमध्ये असे संकट आले तर यावेळेस लोकांना जसा त्रास झाला, तसा तो होता कामा नये यादृष्टीने पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चरची व्यवस्था केली जाईल. या देशाचे माननीय पंतप्रधान आणि माननीय राष्ट्रपती यांनी अशी सूचना केली की, असे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करा की, अशा प्रकारचे पुढे संकट आल्यानंतर . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सत्यशोधन समितीचा अहवाल आम्हाला मिळेल का?

डॉ.पतंगराव कदम : हा अहवाल मिळेल, ते काही खाजगी डॉक्युमेंट नाही. एकंदर या पूरपरिस्थितीमुळे किती नुकसान झाले ? तर 1208 व्यक्ती मृत्यू पावल्या आहेत. 34,435 जनावरे मृत्यूमुखी पडली. 3 लाख 25 हजार घरांचे अंशत: नुकसान झाले. 17 हजार घरांचे पूर्ण

. . . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

नुकसान झाले आहे. 10 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. व्यापार,व्यवसाय करणाऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे साधारणत: 3100 कोटींचे नुकसान झाले आहे. सहा लाख लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविले आहे. 1379 गावे बाधित झालेली आहेत. अशा वेळी तातडीने मदत देण्याबाबत फार महत्वाचा निर्णय घेतला. तो त्या-त्या वर्षालाच घेतला जातो. याबाबत स्टॅण्डींग ऑर्डर आहेत हे खरे नाही. शासनाने स्पेशल ऑडर्स् काढल्या. निराधार झालेल्या व्यक्तींना एक हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर म्हणाले त्याप्रमाणे पाच लोकांचा नियम फक्त मुंबईत होता, बाकी कुठेही नव्हता.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी अत्यंत जबाबदारीने विधान केले आहे की, ग्रामीण भागात पाचच्या वर व्यक्तींना मदत केलेली नाही. मी आपल्याला माहिती देऊ शकतो.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ही माहिती अपूरी आहे. अशा पध्दतीचा कोणत्याही जिल्हयामध्ये कोणी निर्णय घेतला असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करु.अशा प्रकारचे आदेश नाहीत. तसेच 10 लि.रॉकेल, 10 कि.गहू-तांदूळ ताबडतोब देण्याचा निर्णय घेतला. 65 वर्षावरील मृत व्यक्तींच्या वारसांना मदत देय नव्हती पण ते रिलॅक्स केले आहे. एका कुटुंबात 2 किंवा जास्त व्यक्ती मृत झाल्या असतील तर दोन मृत व्यक्तींच्या अनुषंगाने मदत करीत होतो, पण तेही रिलॅक्स केले. तात्पुरत्या निवारा बांधणी साठी 15 हजार रुपये प्रतिनिवारा खर्च करण्याचा निर्णय घेतला. बेपत्ता व्यक्तींच्या बाबतीत दोन महिने वाट पहावयाची आहे आणि दोन महिन्यात तपास लागला नाही तर त्यांच्या वारसांना पैसे देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सानुग्रह अनुदानावर 380 कोटी रुपये खर्च केले आहेत. अन्नधान्यावर 16 कोटी 50 लाख रुपये खर्च केले आहेत. मृतांच्या वारसांना देण्यासाठी 29 कोटी 85 लाख रुपये खर्च केलेले आहेत. औषधांसाठी आरोग्य विभागाला 13 कोटी 41 लाख रुपये दिलेले आहेत. व्हॉलेंटीअर्स् आणि वैद्यकीय प्रशिक्षण विभागासाठी 3 कोटी रुपये, शेती, पिके, फळबागा, रोपवाटिकांसाठी 451 कोटी रुपये दिले आहेत. रेव्हेन्यू आणि ॲग्रीकल्चर विभागांनी एकत्र करुन हे पैसे त्या-त्या बँकांमध्ये जमा झालेले आहेत. ज्यांचे बँकेत खाते नाही, त्यांना रोख चेक देण्याचे आदेश दिलेले आहे. शेत दुरुस्तीसाठी 25 हजाराचा निर्णय घेतलेला आहे. तात्पुरत्या निवारा दुरुस्तीसाठी 5 कोटी 33 लाख रुपये दिलेले आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत मूल / शीघ्रलेखाही नाही

असे एकूण 1225 कोटी रुपये आतापर्यन्त पुनर्वसनासाठी मदत करण्यासाठी खर्च केलेले आहेत.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : अल्पकालीन चर्चेला वेळ दिलेली होती ती संपत आलेली आहे. अजून 10 मिनिटांचा वेळ वाढवून देण्यात येत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील (बसून) : ज्या तक्रारी केलेल्या आहेत, त्याबाबत मंत्री महोदयांनी सांगावे.

डॉ.दीपक सावंत : तक्रारींना लेखी उत्तरे देणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : स्पेसिफिक तक्रार दिली तर लेखी उत्तर दिले जाईल.

डॉ.दीपक सावंत : आपत्कालीन व्यवस्थापनाच्यादृष्टीने आपण सांगावे.

डॉ.पतंगराव कदम : आपत्कालिन व्यवस्थापन आराखडयासंबंधात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुद्दा उपस्थित केला. यासंबंधाने केंद्राने जो कायदा केलेला आहे, त्या धर्तीवरच महाराष्ट्रामध्ये कायदा करण्याची कार्यवाही चालू आहे. नैसर्गिक आपत्तीचा विषय हा शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये केला जाईल. यामध्ये भारतीय हवामान खाते माहिती देण्यामध्ये अयशस्वी झाले,या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. मदत वाटप करण्यामध्ये गैरव्यवहार झाल्याच्या संबंधात सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक तक्रारी दिल्या तर त्या संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित कारवाई केली जाईल. पेण येथील तलाठी श्री.कामत आणि चार अधिकारी यांनी तेथील जनतेशी जे वर्तन केले, त्याबाबत त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये पुनर्वसनाच्या संबंधातील प्रश्न आहेत त्याबाबत स्वतंत्रपणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बैठक घेतली जाईल. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना बोलाविले जाईल.

डॉ.अशोक मोडक : पेण तालुक्यातील तहसिलदारांच्या संबंधात प्रश्न उपस्थित केलेला होता.

डॉ.पतंगराव कदम : पेण तालुक्याच्या तहसिलदारांची चौकशी केली जाईल. सभापती महोदया, एक महत्वाचा मुद्दा म्हणजे पूर रेषा कोणती धरायची हा प्रश्न होता. यावर्षी मॅक्झिमम पाऊस झालेला आहे, तेव्हा या वर्षाची पूर रेषा ही फायनल धरण्यात येईल. सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.विलास शिंदे यांनी काही गैरव्यवहार झाले परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्यांनी चांगले काम केले त्या संदर्भाने सांगितले. एवढ्या मोठया व्यवहारामध्ये भ्रष्टाचार झाला असेल..

श्री.पांडुरंग फुंडकर : यामध्ये नकली नोटाही वापरण्यात आलेल्या आहेत, त्याची चौकशी व्हावी.

डॉ.पतंगराव कदम : त्याचीही चौकशी करु. या पूर परिस्थितीमध्ये काही लोकांनी उत्तम काम केलेले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये देखील एक तलाठी, एक डी.वाय.एस.पी. प्रांत अधिकाऱ्यांनी चांगले काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांना सांगू इच्छितो की, ज्यांनी उत्तम काम केले, रात्रंदिवस काम केले, यंत्रणा सतर्क राहिली त्या व्यक्तींना चांगल्या कामाबाबत सर्टिफिकेट देण्याचे काम केलेले आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्रामधील जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांच्याबाबतीतही हे लागू केले जाईल.

श्री.विलास शिंदे : काही सेवाभावी संस्थांनी चांगले काम केलेले आहे, त्यांचाही गौरव करावा.

डॉ.पतंगराव कदम : सेवाभावी संस्थांनी चांगली मदत केलेली आहे, त्यांचाही याबाबतीत विचार केला जाईल.

श्री.विलास शिंदे : काही गावांनीही चांगली मदत केलेली, त्यांचांही समावेश करावा.

श्री.पांडुरंग फुंडकर (बसून) : शेळयांचे नुकसान झालेले आहे, त्यांना 100 रुपयेच दिलेले आहेत. ही रक्कम वाढविणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : ज्यांचे शेळ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना आपण प्रत्येकी 250 रुपये मदत दिलेली आहे.

अनेक सन्माननी सदस्य (बसून) : ही किंमत देखील कमी आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदया, या संकटामध्ये सर्वांनी मदत केली. मला मुंबईकरांचे कौतुक केले पाहिजे. ही पूर परिस्थिती होऊन देखील पुढे गोपाल काला, आणि गणेशोत्सव हे सण त्यांनी साजरे केले. जणु काही घडले नाही, अशा प्रकारे ते वागले. स्वयंसेवी संस्थांनी मदत केली, या सर्वांचे कौतुक केले पाहिजे. या विभागाचे सचिव श्री.वत्स यांनी त्यांच्या हाताखाली तुटपुंजा स्टाफ असतानाही धैर्याने या सगळयाची अंमलबजावणी केली...

यानंतर कु.थोरात....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

कलेक्टर या यंत्रणेने सुध्दा उत्तम काम केले आहे म्हणून अशा पध्दतीच्या तक्रारी किंवा घोटाळे असतील तर त्याची चौकशी केली जाईल आणि अशा अधिका-यावर कडक कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : मिठी नदीचे काय, त्या ठिकाणी जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्याबाबतीत काय ॲक्शन घेणार ?

डॉ. पतंगराव कदम : मिठी नदीच्या बाबतीत सांगितलेले आहे. तेथील बांधकामांच्या बाबतीत 100 टक्के ॲक्शन घेण्यात येईल. मिठी नदीवरील 512 पैकी 511 अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.

श्री. अरविंद सावंत : कोणती अतिक्रमणे काढण्यात आली त्याची यादी द्यावी?

डॉ. पतंगराव कदम : ती यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सभापती महोदय, या अतिशय महत्वाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन ज्या.....

श्री. अनंत तरे : दुकानांचा सर्व्हे केलेला आहे त्या दुकानांना मदत करणार काय?

डॉ पतंगराव कदम : दुकानाच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेतलेला आहे. तो जी.आर.सुध्दा काढलेला आहे.सर्व जी.आर.ची सभागृहाला माहिती हवी असल तर मी ती देतो. निराधार व्यक्तींच्या संदर्भात पहिला जी.आर. 5 ऑगस्ट,2005 ला काढलेला आहे. आपदग्रस्त भागातील बाधित लोकांना दहा किलो धान्य देण्याच्या संदर्भात दि. 31 जुलै, 2005 रोजी जी.आर. काढला. 65 वर्षे वयावरील मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना मदत देय नव्हती.

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. ज्या लोकांना पैसे मिळालेले नाहीत त्यांना त्वरित पैसे देणार काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्या लोकांना पैसे मिळालेले नाहीत त्यासंबंधात सर्व विभागाच्या कलेक्टरची दोन वेळा बैठक घेतली आहे. या क्षणापर्यंत जे जे पत्र आलेले असतील त्यांची परत चौकशी करुन त्यासंबंधीचा निर्णय घेऊ.

डॉ.. अशोक मोडक : कलेक्टरला पत्र लिहून एक महिना होऊन गेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : ज्या लोकप्रतिनिधीची पत्रे शासनाकडे आली असतील त्यांची फेर चौकशी करुन त्यासंबंधीचा निर्णय घेऊ.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, ज्या लोकांनी आपला स्वत:चा जीव धोक्यात घालून, स्वत:च्या होडया वापरुन लोकांना मदत केली त्यांचा सत्कार करण्यात येईल काय?.

डॉ. पतंगराव कदम : ज्यांनी ज्यांनी उत्तम काम केलेले आहे.त्यांचा खास सत्कार आणि सन्मान केला जाईल

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, ज्यांच्या शेळया-मेंढया या पुरात गेल्या त्यांना एका शेळीमागे फक्त 125 रुपये देण्यात येणार आहेत असे लेखी पत्र आम्हाला मिळाले आहे. त्यामध्ये काही सुधारणा करण्यात येईल काय?

डॉ. पतंगराव कदम : शेळया-मेंढयासाठी 250 रुपये देण्यात येतील असे मी मघाशीच सांगितले आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदया, पंचनाम्याची मुदत 31 डिसेंबरपर्यंत वाढविण्यात येईल काय ?

डॉ. पतगंराव कदम : ज्या ठिकाणचे पंचनामे राहिले असतील त्यांची मुदत वाढविली जाईल आणि पुन्हा पंचनामे केले जातील.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, ज्या ठिकाणी पाणी भरलेले नाही त्या ठिकाणचे खोटे पंचनामे करण्यात आले आहेत.त्यासंबंधीची तक्रार आम्ही कलेक्टरकडे दिलेली आहे.

डॉ. पतंगराव कदम : यासंदर्भात स्पेसिफिक पुराव्यानिशी माहिती दिली तर चौकशी करुन निर्णय घेऊ.

(गोंधळ)

तालिका सभापती :आपली तक्रार मंत्रिमहोदयांकडे द्यावी. त्या तक्रारीची दखल मंत्रिमहोदय घेतील.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, सिध्दीविनायक ट्रस्टकडून आम्ही मदत मागितली होती आणि सिध्दीविनायक ट्रस्टने ती देण्याचे मान्य केले होते. परंतु ती फाईल मंत्रालयाच्या ऑफिसरकडे चार महिन्या पासून पडून होती. आता काल-परवा ती रीलिज झाली आहे. . . . .

डॉ. पतंगराव कदम :त्यासंबंधीची माहिती घेऊन त्याचा निर्णय लवकर देऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 54 मिनिटांनी दुपारी 12.00 वाजेपर्यंत तहकूब झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अध्यक्षस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेसाठी रुपये 25 कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(1) * 9294 **श्री. रमेश निकोसे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते : दिनांक 19 जुलै, 2005 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 18 जुलै, 2005 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 5628 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विदर्भ विकास पॅकेज मध्ये अंतर्भूत असलेल्या अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेसाठी माहे जुलै, 2005 च्या अधिवेशनात अतिरिक्त अनुदानाची पूरवणी मागणी मंजूर झाल्यानंतर 10 कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला, हे खरे आहे काय,

(2) खरे असल्यास, उर्वरित 15 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचे काय नियोजन करण्यात आले आहे,

(3) नियोजन करण्यात आलेले नसल्यास याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. अनिल देशमुख : (1) होय.

(2) अमरावती एकात्मिक रस्ते विकास योजनेकरिता शासनाने आकस्मिकता निधीतून रु. 15.00 कोटी इतका अग्रिम दिनांक 3.12.2005 रोजी मंजूर केला आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा जो 25 कोटीचा निधी या योजनेसाठी दिलेला आहे तो संपूर्णपणे अतिरिक्त निधी आहे. मुळात या योजनेमध्ये हा निधी नव्हता. हा जादाचा निधी आहे. त्याबद्दल मंत्री महोदयांना मी धन्यवाद देतो. पण हा अतिरिक्त निधी मिळाल्यामुळे गोंधळ काहीच कमी झालेला नाही. फुटपाथपासून झाडांपर्यंत मुळात नॉन मोटरेबल स्लो ट्रॅक घेण्यात आला होता, लोकांचा त्याला विरोध होता कारण त्यामुळे अतिक्रमणे व बजबजपूरी वाढणार. लोकांचे म्हणणे होते की, ही झाडे काढून पूर्णपणे फुटपाथपासून फुटपाथपर्यंत मोटरेबल रस्ता तयार करावा. याबाबत 27 मे, 2004 रोजी या सभागृहात लक्षवेधीच्या अनुषंगाने चर्चा झाली, त्यावेळी तत्कालीन मंत्री श्री. विक्रमसिंह पाटणकर यांनी समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यावेळी ती लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचे आदेश आपण दिले होते. नंतर पुन्हा 31 मे, 2004 रोजी त्याच लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी जे उत्तर दिले ते मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्यावेळी ते म्हणाले होते की, "मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ही झाडे काढावयाची की नाहीत असे सर्व चाललेले होते त्यामुळे ती झाडे काढली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नव्हती. परंतु ती काढावीत याची परवानगी सार्वजनिक बांधकाम विभागाने नगरपालिकेकडे मागितलेली आहे. ती परवानगी आल्यानंतर लागलीच ती काढायला आमची हरकत नाही, आम्ही आदेश देऊ." झाडे काढणार म्हणजे रस्ता मोठा होणार. अतिरिक्त खर्च येणार. या राखून ठेवलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अगोदर ज्यावेळी मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती त्यावेळी हा अतिरिक्त निधीचा प्रश्न निर्माण झाला होता. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात 25 कोटी रुपये देऊ असे विदर्भ पॅकेज घोषित करतांना सांगितले होते, आणि त्यासाठी आम्ही आग्रहाने मागणी करु, असे आम्ही सांगितले. पुढे तशी मागणी केली त्याप्रमाणे जादाचे 25 कोटी रुपये मिळाले. माननीय श्री. पाटणकरांची कारकीर्द त्यापूर्वी संपली आणि आता माननीय बांधकाम मंत्री श्री. अनिल देशमुख यांच्या कारकिर्दीत ही मागणी आम्ही आग्रहाने केली त्यावेळी हे 25 कोटी रुपये उपलब्ध करण्यात आले. माननीय पालकमंत्र्यांनी त्यासाठी मेहनत केली. माननीय विक्रमसिंह पाटणकर यांनी एम.डी.ना सांगितले की, ही झाडे काढून रस्ता मोठा करण्याचे काम ताबडतोब करावे. फुटपाथ टू फुटपाथ पूर्ण मोटरेबल ट्रॅक झालेला आहे आणि या कामासाठी त्यांनी जॉइंट एम.डी. आणि एम.डी. यांना सांगितले की, हे काम ताबडतोब करा. त्याप्रमाणे ते झाले. आता मंत्री बदलले, एम.डी. बदलले, जॉइंट एम.डी. बदलले. दोनमहिन्यापुर्वी जॉइंट एम.डी. श्री. करंदीकर हे त्या गावामध्ये आले आणि सर्वांच्या समक्ष म्हणाले की, हे जादाचे काम तुम्हाला कोणी करावयास सांगितले. त्याचा परिणाम असा झाला की 52 कामांच्या वर्क ऑर्डर्स दिल्या होत्या, ती सर्व कामे कंत्राटदारांनी बंद केलेली आहेत. त्यामुळे त्या गावामध्ये असंतोष निर्माण झाला आंदोलने देखील झाली. त्यानंतर रस्ते विकास महामंडळाच्या एम.डी. नी महापौरांना सांगितले की, तूम्ही त्या ठिकाणी बैठक घेऊन कंत्राटदारांना सांगा. महापौरांनी त्यांना सांगितले की, "तूम्ही जे कबूल केले होते ते करीत नाहीत. त्यावेळी जादाचे काम कंत्राटदारांना तुम्ही करायला सांगितले. आता तुम्ही नाही म्हणता हे कसे चालेल ?" महामंडळाने महापौरांना लेखी पत्र पाठविले. त्यानंतर महापौरांनी बैठक घेतली, आणि कंत्राटदारांना ते पत्र वाचून दाखविले. हे 22 नोव्हेंबर, 2005 चे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. यांचे पत्र आहे. त्या पत्रात असे म्हटले आहे की, "कंत्राटदारांची दिवाळीपुर्वीची देयके एका आठवडयात अदा केली जातील." कारण या ठिकाणी महामंडळाच्या आदेशावरुन जी कामे करण्यात आली त्याची कंत्राटदारांची देयके बाकी आहेत.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

ता.प्र.क्र.9294..... प्रा.बी.टी.देशमुख.....

याबाबत माझा प्रश्न असा आहे की, अमरावती जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन ही वस्तुस्थिती सांगितली. कंत्राटदारांची दिवाळीपुर्वीची देयके एक आठवडयात अदा करण्याची व्यवस्था शासन करेल काय ?

श्री. अनिल देशमुख : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी विचारले की, अमरावती येथे आयआरडीपीचा हा प्रकल्प 114 कोटीचा होता. त्यापैकी 102 कोटीची कामे हाती घेतली आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .....

सभापती महोदय, पहिले जो स्लो ट्रॅक होता त्याचा आता आपण मोटरेबल ट्रॅक केलेला आहे. त्यामुळे या रस्त्याचा खर्च आता वाढणार आहे. या रस्त्याच्या कामामध्ये 45 ते 48 कोटी रुपयांनी वाढ झालेली आहे. 14 कोटी रुपयांचे काम 143 कोटी रुपयावर गेलेले आहे. त्यामुळी ही कामे इ ाले पाहिजेत अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. मधील काळात हा प्रश्न येथे उपस्थित झाला होता त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख साहेबांना मी सांगितले होते की, अमरावती आयआरडीपीसाठी जे काही पॅकेज आहे त्यामध्ये खासदार फंड,आमदार फंड, महानगर पालिका,डीपीडीसी या सर्व माध्यमातून पैसे यावयास पाहिजे होते परंतु काही डिपार्टमेंटकडून, महानगर पालिकांकडून येऊ शकले नाही त्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोतच परंतु अमरावती आयआरडीपीसाठी आपण शासनाकडून 25 कोटी रुपये मंजूर करुन घेण्यात यशस्वी झालो आहोत. मी याच सभागृहात सांगितले होते की, अमरावती आयआरडीपीसाठी शासनाकडून अतिरिक्त 25 कोटी रुपये मंजूर करुन घेण्यात येईल. त्या प्रमाणे 25 कोटी रुपये शासनाकडून मिळालेले आहेत. आता प्रश्न राहिला आहे की, 45 ते 48 कोटी रुपयांची ॲडीशनल कामे घ्यावयाची की नाही?

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ॲडीशनल कामे घेतली ती झालेली आहेत, तो प्रश्न नाही व तो प्रश्न मी विचारलेला नाही. मी जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाला उत्तरच मिळाले नाही. सभागृहात आपण आदेश दिले होते त्यामुळे ही कामे झालेली आहेत परंतु जी झालेली कामे आहेत त्या संदर्भात तुमचे जॉईंट एम.डी. आले त्यांनी मागे हात बांधून त्या लोकांना सांगितले की, "कशाला केली ही कामे, कोणी सांगितली तुम्हाला ही जादाची कामे करायला "? पेमेंट नाही म्हणून कंत्राटदारांनी ही सर्व कामे बंद केलेली आहेत. सभापती महोदय सर्व रस्त्यांवर 350 खड्डे आणि 160 चर आहेत. हे खड्डे आणि चर कोणीही बुजवावयास तयार नाही. या ठिकाणी आम्ही कंत्राटदारासाठी भांडणे हे आमचे काम नाही. पण त्यांची फसवणूक करण्याचा तुम्हाला अधिकार नाही. या ठिकाणी सर्व गाव वेठीस धरलेले आहे. यासभागृहात तात्कालीन माननीय मंत्रीमहोदय पाटणकर यांनी झाडे काढून नॉन मोटरेबल रोडचे, मोटरेबल रोडचे मोटरेबल रोड करण्याचे मान्य केले होते. त्यानंतर आता जॉईंट एम.डी. त्या ठिकाणी गेले. त्यांनी उलटे भाष्य केले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख.....

कामे झालीत परंतु त्यांचे पेमेंट तुम्ही केले नाही म्हणून कंत्राटदारांनी गाव वेठीस धरले आहे. माझे म्हणणे असे आहे की, यासंदर्भात महामंडळाने महापौरांना लेखी कळविलेले आहे. महापौर श्री. मिलींद चिमोटे यांना एमएसआरडीसी ने जे पत्र पाठविले आहे त्याच्या संदर्भात सर्वांची बैठक घ्यावी व येथील असंतोष दूर करावा. आपण 22 नोव्हेंबर, 2005 रोजी महापौरांना लेखी असे कळविले होते की, "कंत्राटदारांची दिवाळी पूर्वीची देयके एका आठवडयात अदा करण्याची व्यवस्था करण्यात येईल." हे विदर्भातील काम आहे. महाराष्ट्राच्या इतर भागात चार-चार हजार कोटी रुपयांची कामे चालू आहेत आमच्याकडे फक्त 114 कोटीचे काम चालू आहे व त्याचे हे कौतुक चालू आहे. परंतु त्यावर मी आता काही बोलत नाही. दिवाळीपूर्वीच्या कामाची देयके 8 दिवसात देणार की नाही हा माझा प्रश्न आहे.

श्री. अनलि देशमुख : सभापती महोदय, दिवाळी पूर्वीची जी देयके आहेत त्यामध्ये अधिक कामाची बीलं वगळून ती नक्की देऊ. पेसे देण्यामध्ये कोणतीही अडचण येणा ार नाही कारण आमच्याकडे 25 कोटी रुपये आलेले आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : आजची परिस्थिती अशी आहे की, या ठिकाणी जॉईंट एम.डी. ची व्हीजीट झाली त्यामुळे गावातील सारी कामे बंद पडलेली आहेत. आपण पैसे देतो म्हणून लेखी सांगितले आहे त्याप्रमाणे ही देणी आठ दिवसात दिले जातील काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, यासंदर्भात पैसे आलेले आहेत अधिक कामाची जी बिले आहेत ती आम्ही अदा करु.

प्रा. बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, नुसते अदा करु म्हणतात परंतु आठ दिवसाबद्दल ते काहीच बोलत नाही. प्रश्नाला न्याय मिळाला नाही. तुम्ही 22 नोव्हेंबर, 2005 रोजी पत्राने त्या शहराच्या महापौरांना कळविले होते. यासंदर्भात महापौरांच्या चेंबरमध्ये बैठक झाली होती. या ठिकाणी एम.डी. स्वत: गेले होते तरी आपण केवळ देऊ म्हणता हे बरोबर नाही. मी असे म्हणालो की, 22 नोव्हेंबर 2005 रोजी पत्र लिहून आपण असे कळविले होते की, आठ दिवसात पैसे देतो परंतु पैसे त्याप्रमाणे दिले गेले नाहीत. सर्व गाव वेठीला धरले गेले आहे त्यामुळे माझे म्हणणे असे आहे की, आता तरी ही देयके आठ दिवसात द्याल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 9294.....

श्री. अनिल देशमुख : अध्यक्ष महोदय, आठ दिवसात ही बिले देण्यात येतील.

श्री. जयदीश गुप्ता : सभापती महोदय. माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, 114 कोटी पैकी 102 कोटी रुपयांची कामे सुरु झालेली आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, 102 कोटी रुपयांची कामे केव्हा संपणार आहेत?

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9294.....

श्री.जगदीश गुप्ता...

सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, पूर्ण शहर उध्वस्त झाले आहे. आज अमरावतीच्या लोकांना हाडापासून दम्यापर्यंत सर्व आजार जडलेले आहेत. त्यामुळे डॉक्टरांची कमाई होत आहे. त्यामुळे आय.आर.डी.पी.साठी ही योजना लागू केली आहे का ? असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात येत आहे. 102 कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. ती केव्हा पूर्ण होणार आहेत व काम पूर्ण करण्याची मुदत किती आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, 102 कोटी रुपयांची कामे हाती घेतली आहेत. मधल्या काळात पैशाची अडचण होती म्हणून शिथिलता आली होती. आता या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्यामुळे कामे लवकरात लवकर पूर्ण केली जातील. संपूर्ण गाव उध्वस्त झाले आहे, असा उलेख येथे करण्यात आला आहे. पण त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, ज्यावेळी कोणताही प्रकल्प चालू होतो, त्यावेळी गावातील नागरिकांना त्रास होतो. मात्र अमरावती शहर नागपूर सारखे सुंदर शहर होईल याची ग्वाही मी या निमित्ताने देत आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, अमरावतीमध्ये रस्ते, पुलांची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. यासाठी शासनाने आता निधी मंजूर केला आहे. तो किती महिन्यामध्ये खर्च करणार आहात?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अमरावतीमध्ये रस्ते, पूल, फ्लायओव्हर पूल यासारखी वेगवेगळी कामे चालू आहेत. ही कामे पूर्ण करण्यासाठी पैशाची अडचण होती. ती आता दूर होत आहे. त्यामुळे सदर अपूर्ण असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील. अमरावती शहर नागपूर सारखे सुंदर करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लवकरात लवकर निधी उलपब्ध करून देण्यात येईल असे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. अमरावतीतील रस्ते गेल्या 6 महिन्यांपासून खोदून ठेवले आहेत. लोकांना जाण्या-येण्यासाठी मार्ग नाही. या अपूर्ण असलेल्या कामासंबंधी अमरावती शहरातील लोकांमध्ये असंतोष आहे. तेव्हा सदर कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम ठरविला आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, कोणतेही रस्त्याचे, पुलाचे काम हाती घेतो तेव्हा ते जो पर्यंत पूर्ण होत नाही तो पर्यंत नागरिकांना अडचण येते हे मी मान्य करतो.सुरूवातीला पैशाची अडचण होती. अमरावती महानगरपालिकेकडून पैसे येणार होते. ते आले नाही. खासदार निधीतून रक्कम मिळणार होती. ती देखील आली नाही. मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि डॉ.सुनील देशमुख यांचे अभिनंदन करतो की, त्यांनी स्थानिक विकास निधीतील पैसा या कामासाठी उपलब्ध करून दिला आहे. अन्य संस्थांनी निधी देऊ असे सांगून सुध्दा तो न दिल्यामुळे कामाची गती मंदावली होती. आता आय.आर.डी.पी.साठी 25 कोटी रुपये मंजूर झाले असून कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण ज्याप्रमाणे निधीच्या प्रश्नाला न्याय मिळवून दिलेला आहे, त्याप्रमाणे आमच्या या दुसऱ्या प्रश्नाला देखील न्याय मिळवून द्यावा. दिनांक 31.05.2004 रोजी सन्माननीय मंत्री श्री.विक्रमसिंह पाटणकर यांनी सभागृहात जे उत्तर दिले होते ते असे आहे की, "सभापती महोदय, साईनेजेस वगैरे या सगळया गोष्टी थोडयाशा उशीरा लागतात. रस्त्याची कामे पूर्ण होतात, फुटपाथची कामे पूर्ण होतात आणि डिव्हाईडरची कामे पूर्ण होतात त्यानंतर या सगळया वस्तू लागतात त्यावेळी करु."

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9294.....

प्रा.बी.टी.देशमुख.....

तेथे सिग्नलच्या यंत्रणेची व्यवस्था नाही. सिग्नल अभावी अपघात होत आहेत. उशिराने सुरु करणार म्हणजे आपण पुन्हा रस्ते खोदणार, 25 कोटीचा अतिरिक्त निधी मिळाल्यामुळे रिलीफ मिळाला आहे. त्यामुळे बाकीच्या सर्व गोष्टी तातडीने व्हायला पाहिजेत. तेव्हा माझा प्रश्न आहे की, आपण वेगवेगळ्या चौकातील सिग्नलिंगच्या कामाला केव्हा सुरुवात करणार आहात ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, रस्त्यांची कामे, चौकी, लाईटींग व सिग्नलिंगची कामे चार महिन्यांत पूर्ण करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग येथील विभागीय व्यवस्थापक यांनी केलेला गैरव्यवहार

(2) * 11206 श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभाग येथील विभागीय व्यवस्थापक श्री.स.ह.गव्हाणे यांनी गैरव्यवहार केल्याप्रकरणी माहे ऑगस्ट, 2005 रोजी वा त्यादरम्यान गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी आढळून येणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री सुरुपसिंग नाईक यांचेकरिता : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. तीन नंबरच्या उत्तरामध्ये " 57 आरोपी "असा जो उल्लेख आहे त्याऐवजी "48 आरोपी" असे कृपया वाचावे.

(1) होय.तथापी गुन्हे सप्टेंबर, 2005 मध्ये दाखल झाले आहेत.

(2) होय.

(3) सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत चौकशी होऊन प्रथमदर्शनी गुन्हा झाल्याचे आढळून आल्याने श्री.स.ह.गव्हाणे, प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे व इतर रा.प.अधिकारी व कर्मचारी असे एकूण 57 आरोपी विरुध्द संबंधीत पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल केले असून गुन्ह्यांचा तपास चालू आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान यामध्ये मोठ्या प्रमाणावर अपहार, महिलांचे लैगिंक शोषण झाल्याबाबतच्या अनेक तक्रारी श्री.गव्हाणे यांचेविरुध्द दाखल झालेल्या आहेत हे खरे आहे काय ? या संदर्भात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.खोब्रागडे यांनी वर्तमानपत्रात जी माहिती दिली ती खरी आहे काय ? यामध्ये मुंबईतील काही अधिकारी सामील आहेत काय ? असल्यास त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 11206.....

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, लैंगिक शोषण झाल्याबाबतची कोणतीही माहिती आमच्याकडे आलेली नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्याबाबत जरुर कारवाई करण्यात येईल. श्री.गव्हाणे यांचे विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये जवळ जवळ आठ केसेस दाखल केलेल्या आहेत. पाच विभागांमध्ये निरनिराळी सहा-सहा कलमे लावून गुन्हे केलेले आहेत. त्यासंदर्भात चार्जशीट सुध्दा दाखल झालेली आहे. परंतु त्यांनी कोर्टामध्ये बेल घेतलेली आहे. पुढील कार्यवाही सुरु आहे.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, श्री.खाब्रागडे यांनी वर्तमानपत्रात जी माहिती दिली त्याबाबतचे कात्रण मी माननीय मंत्रिमहोदयांकडे सादर करीत आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : ठीक आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, श्री.गव्हाणे यांनी गैरव्यवहार केला हे खरे आहे काय ? या प्रश्नाला आपण "सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत चौकशी होऊन प्रथमदर्शनी गुन्हा इ ाल्याचे आढळून आल्याने श्री.गव्हाणे व इतर एकूण 48 आरोपी विरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केले आहेत" असे दिलेले आहे. याठिक्राणी सन्माननीय सदस्य श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी अधिकची माहिती दिलेली आहे. प्रथम दर्शनी गुन्हा सिध्द झालेला आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. तेव्हा आपण अधिकारी /कर्मचाऱ्यांना निलंबित करणार आहात काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आम्ही जवळ जवळ 48 जणांविरुध्द गुन्हे दाखल केलेले आहेत. परंतु सर्वांनी बेल घेतलेली आहे. यामध्ये रिजनल मॅनेजर जो मुख्य आरोपी आहे त्याला सस्पेंड करण्यात येईल.

यानंतर श्री. बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : माननीय सभापति महोदय, यहां पर प्रश्न में बताया गया है अगस्त 2005 तथा उत्तर में सितम्बर 2005 तारीख बतायी गयी है, मुझे पूछना है कि सही क्या है और मुझे पूछना है कि यह गुनाह किस प्रकार का है, उस पर कौन सी कलम लगायी गयी हैं और इन 48 लोगों ने महिलाओं के विरुद्ध क्या गुनाह किया है.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापति महोदय, यह 6 डिवीजन में गुनाह है. कारपेट और पी.वी.सी. खरेदी के बारे में है. यह सोलापुर, सातारा, सांगली, कोल्हापुर और पुणे में हुआ है. पुणे में गाड़ी का एक्सीडेंट दिखाया है. वहां पर गलत रिकार्ड बनाकर सब कार्यवाही की है. करीब 8 प्रकरणों में श्री गव्हाणे को सस्पेंड किया है. साथ ही उनके नीचे के करीब 40 अधिकारी हैं उनको यदि हम सस्पेंड करेंगे तो उन्हे घर बैठ कर पगार देना पड़ेगा इसलिए ऐसा नहीं किया गया.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याद्वारे लैंगिक शोषण आणि अत्याचाराचे गुन्हे थांबविणे कितपत शक्य होईल याबाबत मी साशंक आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, ज्या ज्या विभागात महिला कर्मचारी काम करीत आहेत, त्या त्या ठिकाणी महिला अत्याचार प्रतिबंधात्मक कमिटया तयार करण्याबाबत 1997 सालातील आदेश आहे. माझ्या माहितीनुसार गृह विभागाने अशा कमिटया स्थापन करण्याबाबत सर्व विभागांना कळविलेले आहे. त्यामुळे खरोखरच जर अशा स्वरुपाचे गुन्हे नोंदवावयाचे असतील, महिलांचा सन्मान सुरक्षित ठेवावयाचा असेल तर महिला कर्मचाऱ्यांसाठी शासन अशा प्रकारच्या सुरक्षा समिती स्थापन करणार आहे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, तशा समित्या स्थापन करण्यात येतील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, हा गैरव्यवहारासंदर्भातील विषय आहे. माझा प्रश्न असा आहे की, श्री.गव्हाणे आणि इतर संबंधित लोकांनी कोणकोणत्या व्यवहारांमध्ये गैरव्यवहार केलेले आहेत ? त्याचे स्वरुप काय आहे ? आणि या गैरव्यवहारामुळे महामंडळास किती तोटा झालेला आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, हा गैरव्यवहार कारपेट, पी.व्ही.सी. इत्यादी वस्तूंच्या खरेदीसंदर्भातील आहे. गव्हाणे यांना खरेदी करण्याबाबतचे अधिकार नसताना सुध्दा त्यानी वस्तुंची खरेदी केलेली आहे. त्यामुळे पुणे विभागातील 12 कर्मचाऱ्यांना आम्ही निलंबित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम....

केलेले आहे. या गैरव्यवहारामुळे महामंडळास 19 लाख 11 हजार 720 रुपयांचा तोटा झालेला आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे की, सर्व कार्यालयांमध्ये महिला अत्याचार प्रतिबंधात्मक समिती स्थापन करणार आहोत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या समित्या किती कालावधीत स्थापन करणार आहात ? तसेच ज्या महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण झाले आहे त्या महिलांना शासनाने सुरक्षितता दिली आहे काय ? ज्या अधिकाऱ्यांनी लैंगिक शोषण केले आहे त्या अधिकाऱ्यांना शासन निलंबित करणार आहे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत चौकशी करावी लागेल. कारण त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती आता माझ्याकडे नसल्यामुळे त्यावर बोलता येणार नाही. तसेच त्यांनी महिलांसाठी महिला अत्याचार प्रतिबंधात्मक समितीची स्थापना केव्हा करणार आहात, असे विचारले आहे. त्या अनुषंगाने मी त्यांना सांगू इच्छितो की, या समित्या लवकरात लवकर स्थापन करु.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विरार (जि.ठाणे) पूर्व मनवेलपाडा येथे सिडको अधिकाऱ्यांवर करण्यात आलेला हल्ला

(३) * ९३८३ डॉ. अशोक मोडक , श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. रामनाथ मोते , श्रीमती कांता नलावडे : तारांकित प्रश्न क्रमांक ५६५८ ला दिनांक ११ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २५ मे,२००५ रोजी विरार मनवेलपाडा (जि.ठाणे) येथे व त्याआधी माणिकपूर व नालासोपारा (जि.ठाणे) येथे सुध्दा सिडको अधिकाऱ्यांवर दोन अनधिकृत बांधकामधारकांनी हल्ला करुन मारहाण केली होती व पोलिस ठाण्यात गुन्हे नोंदविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे,श्री आर.आर.पाटील यांच्याकरिता: (१) होय.

(२) व (३) या प्रकरणी विरार पो. ठाणे येथे दाखल असलेल्या गु.र.क्र. ११३/२००५ यामधील निष्पन्न दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात दि. ९.६.२००५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच आरोपींविरुध्द विरार पो. ठाणे चॅप्टर केस क्र. १७७/०५, फौ.प्र.सं. कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. अशाच प्रकारच्या माणिकपूर पो. ठाणे येथे दाखल असलेल्या गु.र.क्र. ३२६/०४ मध्ये निष्पन्न दोन आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द दि. १७.१२.२००४ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच नालासोपारा पो. ठाणे येथे दाखल असलेल्या गु.र.क्र.४१/२००५ मध्ये निष्पन्न झालेल्या तीन आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द दि.२१.३.२००५ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच आरोपीविरुध्द नालासोपारा पो. ठाणे चॅप्टर केस क्र. ८१/०५ फौ.प्र.सं. कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. वरील तिनही प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

डॉ.अशोक मोडक :सभापती महोदय, दिनांक ११ जुलै २००५ रोजी मी हाच प्रश्न विचारला होता त्यावेळी दिलेले उत्तर आणि आता दिलेले उत्तर यामध्ये फरक पडलेला आहे. तो माननीय मत्रिमहोदयांच्यासुध्दा लक्षात आलेला असेल.या उत्तरामध्ये पान नंबर २ व ३ मध्ये असे म्हटलेले आहे की," फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे" हे वाक्य आताच्या प्रश्नामध्ये नव्याने ॲड करण्यात आलेले आहे.न्यायालयात दोषारोपपत्र ९ जून २००५ ला दाखल करण्यात आले होते.प्रतिबंधक कारवाई जी करण्यात आली होती ती केव्हा करण्यात आली होती ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : कार्यकारी दंडाधिकारी, वसई यांनी विरार पोलीस स्टेशन चॅप्टर क्रमांक १७७/५ ,फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : ही कारवाई केव्हा केली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :आरोपी जामिनावर सुटल्यानंतर ही प्रतिबंधक कारवाई केली जाते.

डॉ.अशोक मोडक : मंत्रिमहोदयांनी एक गोष्ट समजावून घ्यावी वरच्या प्रश्नाशी माझा उपप्रश्न संबधित आहे.गुन्हा केव्हा घडला आहे ? दोषारोपपत्र केव्हा दाखल करण्यात आले होते आणि फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम १०७ केव्हा दाखल करण्यात आले आहे ? संपूर्ण ठाणे जिल्हयात अनधिकृत बांधकाम करणारे माणसे मस्तवाल झालेली आहेत त्यामुळे मी हे मुद्दे उपस्थित करीत आहे.या मस्तवाल झालेल्या लोकांना अटोक्यात आणावयाचे असेल तर लवकर कारवाई करावयास पाहिजे परंतु ती करण्याच्या बाबतीत आपल्याकडून विलंब होत आहे असे दुर्देवाने म्हणण्याची वेळ आलेली आहे.हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे.म्हणून मला प्रश्न विचारावयाचा आहे त्याचे व्यवस्थित उत्तर देण्यात यावे. अन्यथा हा हक्क भंगाचा विषय होईल. मी पुन्हा विचारतो की दोषारोप पत्र एका तारखेला दाखल करण्यात आलेले आहे आणि फौजदारी प्रक्रिया सहितेचे जे कलम आहे ते दुस-या तारखेला दाखल करण्यात आलेले आहे. ते जर त्याच तारखेला दाखल केले असते तर तसे उत्तर आपण ११ जुलै २००५ ला का दिले नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, प्रतिबंधक कारवाई दिनांक 19-7-2005 रोजी करण्यात आली होती.

डॉ.अशोक मोडक : 25 मे 2005 ला हा गुन्हा घडला होता त्यावेळी सिडकोच्या अधिका-यांवर हल्ला करण्यात आला होता.या अधिका-यांना ज्यांनी मारहाण केली होते ते सगळे अनधिकृत बांधकाम करणारे होते.स्वाभाविकपणे ज्यावेळी गुन्हा घडला होता त्यावेळी तातडीने दोषारोपपत्रे दाखल करावयास पाहिजे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 107 नुसार तातडीने प्रतिबंधक कारवाई करावयास पाहिजे होती परंतु दोषारोपपत्र 9 जून 2005 ला दाखल करण्यात आले होते आणि फोजदारी प्रक्रिया संहिता कलम 107 नुसार जुलै महिन्यात कारवाई करण्यात आली होती तेव्हा इतका विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे :सिडकोच्या जागेचा हा प्रश्न आहे आणि सिडकोच्या अधिका-यांकडून छाननी करुन माहिती येण्यास उशीर झाला होता त्यामुळे कारवाई करण्यास विलंब झाला होता त्यांच्याकडून माहिती आल्या नंतर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 107 नुसार कारवाई केली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक : फौजदारी प्रक्रिया संहिता केव्हा लावावयाची हे काही मे महिन्यात ठरलेले नव्हते जेव्हा ही सहिता तयार करण्यात आली तेव्हाच ते ठरलेले आहे.जेव्हा गुन्हा घडला होता त्यानंतर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते तेव्हा दोषारोपपत्रा बरोबर फोजदारी प्रक्रिया संहिता कलम 107 प्रमाणे कारवाई का केली नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : हे कलम लावण्यामध्ये जर कोणी जाणुनबजून विलंब केला असेल तर त्याची चौकशी करुन त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

उपसभापती : ही जी कारवाई करण्यात येत असते ती कारवाई करीत असतांना कधी कधी असे होते की पोलिसांनी गुन्हा दाखल केल्या नंतर कलमे लावली जातात. हा प्रकार काही नव्याने घडलेला आहे असे नाही. त्यामुळे हे कलम लावण्यात आले ही बाब महत्वाची आहे.कलम लावण्यात विलंब झाला आहे असे म्हणणे योग्य होणार नाही असे मला वाटते.

डॉ.अशोक मोडक : जुलै महिन्यात कलम लावण्यात आलेले आहे. त्यामुळे विलंब झाला आहे.याचे समर्थन होऊ शकत नाही .त्याचबरोबर विलंब झाला आहे हे माननीय मंत्रीमहोदय सुध्दा मान्य करीत आहेत.

श्री.सिध्दाराम म्हात्रे : 19.6.2005 ला हे कलम लावण्यात आलेले होते.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील हाजीअली ते विल्सन महाविद्यालयापर्यंत मोटारीसाठी द्रुतगती उड्डाण पूल बांधण्याबाबत

(4) * 12102 डॉ. वसंत पवार, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. जगन्नाथ शेवाळे : दिनांक 19 जुलै, 2005 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 18 जुलै, 2005 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 7730 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील हाजीअली ते विल्सन महाविद्यालयापर्यंत द्रुतगती उड्डाणपूल बांधण्यासंदर्भात आय.आय.टी. पवई या संस्थेकडून अंतिम अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(2) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(3) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. अनिल देशमुख : (1) नाही.
(2) व (3) आय.आय.टी.पवई या संस्थेतर्फे संगणकाद्वारे अपेक्षित वाहतूक वर्दळीचे पृथ्थकरण करण्याचे काम सुरु असून अंतिम अहवाल अपेक्षित आहे. तथापि, पश्चिम सागरी मार्गाच्या शक्याशक्यता अहवाल तयार करण्यासाठी मुख्य समंत्रकाची नेमणूक दि. 15/10/2005 रोजी करण्यात आली असून सदर अभ्यासाच्या व्याप्तीत प्रस्तुत उड्डाणपूलाच्या शक्याशक्यतेचा अभ्यास प्रस्तावित आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : ता.प्र.क्र. 12102.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या छापील उत्तरामध्ये मला एक छोटीशी दुरूस्ती करावयाची आहे. यातील प्रश्न 1 ला उत्तर देताना 'नाही' असे म्हटलेले आहे. त्या ऐवजी तेथे "प्रारूप अहवाल प्राप्त झालेला आहे" असे वाचावे. याप्रमाणे उत्तर दुरूस्त करून छापल्याप्रमाणे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये अनेकदा हा प्रश्न चर्चिला गेला आहे. यामध्ये शासनाची काय इच्छा आहे हे कळत नाही. परंतु मुंबईमध्ये असणाऱ्या आणि येणाऱ्या सामान्य माणसाला मुंबईत होत असलेल्या वाहतुकीच्या कोंडीमुळे अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते आहे. याच प्रकारची वाहतूक कोंडी जे.जे.हॉस्टिल आणि भेंडीबाजार या भागामध्ये होत होती त्या इकाणी आपण उड्डाण पूल केला. आता या हाजीअली ते विल्सन महाविद्यालय या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी गेली अनेक वर्षे होत असते आणि हाजीअली पासून एक उड्डाणपूल बांधण्याचे देखील ठरविले होते. पण नंतर त्याबाबत अभ्यास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्याचे ठरविले गेले. त्याप्रमाणे आपण समिती नेमली वा संस्थेला काम दिले. त्यांचेकडून आपल्याकडे जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यामध्ये येथे उड्डाणपूल असावा असेच असावे असे मला वाटते. तसे असल्यास आपण याबाबतीत इतकी उदासिनता का दाखविता ? आपल्यावर काही कोणा मोठ्या मंडळींचा दबाव आहे का ? असे अ सेल तर त्यांना आपण समुद्र किनाऱ्यावर घर घेऊन द्या आणि या ठिकाणी हा उड्डाणपूल करून या रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांची सुटका करावी.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, या उड्डाणपुला संदर्भात आयआयटी पवई या संस्थेला संगणकाद्वारे अपेक्षित वाहतूक वर्दळीचे पृथक्करण करून अहवाल देण्याचे काम दिले होते. त्यांचेकडून अजून अंतिम अहवाल यावयाचा आहे. मात्र त्यांनी जो प्रारूप अहवाल दिलेला आहे त्यामध्ये त्यांनी वरळी ते हाजीअली या रस्त्यावर जी वाहतूक आहे ती 1.2 लाख पीसीयू एवढी आहे आणि यातील 40 टक्के वाहतूक पेडर रोड वरून जाते. म्हणजे 40 हजार गाड्या तेथून दर दिवशी जातात. सभापती महोदय, सध्या वांद्रे ते वरळी हा सागरी महामार्ग आपण करण्यास घेतलेला आहे. तो 2011 मध्ये पूर्ण झाला तर पेडर रोडवरील ही वाहतूक सध्या 38 हजार वाहनांची आहे ती 23 हजार वाहनांवर येईल. पण अजून या संस्थेकडून अंतिम अहवाल आलेला नाही. तेव्हा अंतिम अहवाल आल्यानंतरच याबाबत आम्ही निर्णय घेऊ.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मुंबईमध्ये 95 टक्के जनता ही रेल्वे आणि बसेसचा वापर करते व अवघी 5 टक्के जनता गाड्यांनी प्रवास करते. तसेच या पुलासाठी जवळपास 1300 ते 1400 कोटी इतका खर्च येणार आहे तेव्हा केवळ या 5 टक्के धनदांडग्यांसाठी इतके कोटी खर्च करावयाचे व तेही केवळ दोन मिनिटांमध्ये हाजीअली पासून नरिमन पॉईंटपर्यंत गेले पाहिजे यासाठी. एकीकडे आपल्याला दुष्काळग्रस्त आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी पैसे नाहीत आणि दुसऱ्या बाजूला इतके कोटी रूपये 5 टक्के जनतेसाठी आपण खर्च करू पहाता आहात. तेव्हा माझी या निमित्ताने मागणी आहे की, हा सर्व प्रस्ताव बंद करून दुष्काळग्रस्त, पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी हा पैसा आपण खर्च करावा.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात... अडथळा..)

..... एलएल 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : हे तुमच्या पक्षाचे, बीजेपीचे मत आहे काय ? .... (अडथळा)

श्री. मधुकर चव्हाण : हे बीजेपी चे मत नाही..... ते त्यांचे वैयक्तिक मत आहे. ...

(अडथळा)

उपसभापती : आपण सर्वांनी प्रथम खाली बसावे. पीठासीन अधिकारी उभे राहिल्यानंतर प्रथेनुसार पहिली गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्यांनी खाली बसायचे असते. दुसरी गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्यांनी येथे एकमेकांवर हेत्त्वारोप करू नयेत आणि एकदम उभे राहून बोलू नये. आता मी माननीय विरोधी पक्षनेता यांना बोलण्याची संधी देत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचेकडे निर्देश करून विचारले की, हे तुमच्या पक्षाचे मत आहे काय ? त्यांना व सभागृहाला मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जे मत येथे व्यक्त केलेले आहे ते त्यांचे स्वत:चे, वैयक्तिक मत आहे, वैयक्तिक भावना आहेत आणि बीजेपीचे, आमच्या पक्षाचे या संदर्भात असे मत आहे की, हा रस्ता, हा पूल ताबडतोब झाला पाहिजे, तो कार्यान्वित झाला पाहिजे.

(यानंतर श्री. सरफरे ...एमएम 1

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहराला माहीत आहे की, ज्यांच्याबद्दल संपूर्ण भारतीयांना आदर आहे अशा कुणीतरी हा रस्ता अडविला आहे. प्रश्न असा आहे की, मुंबई हाजी अली ते विल्सन कॉलेज पर्यंत पूल बांधण्यासाठी किती खर्च येणार आहे? आणि कुणाच्या दबावाखाली ही समिती नेमून तुम्ही तुमचा निर्णय बदलत आहात?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, वांद्रे ते वरळी हा सागरी पूल बांधण्यासाठी 1300 कोटी रुपये खर्च येईल. वांद्रे ते नरीमन पॉईंट हा सागरी मार्ग बांधण्यासाठी 4000 कोटी रुपये खर्च येईल. माननीय सदस्यांनी पेडर रोडबाबत उल्लेख केला आहे. येथील संपूर्ण वहातुकीबाबत अभ्यास करण्यासाठी आय.आय.टी. पवई या संस्थेला विनंती करण्यात आली असून त्यांचा अंतिम अहवाल आल्यानंतर आपण निर्णय घेऊ. तसेच, सभागृहाला हेही सांगू इच्छितो की, आय.आय.टी., पवई यांचेकडून हा उड्डाण पूल होण्याबाबत फेव्हरेबल अहवाल आला तर या पूलाला विरोध करणारी व्यक्ती कितीही मोठी असली तरी त्या व्यक्तीच्या विरोधाची तमा न बाळगता आय.आय.टी., पवईने दिलेल्या अहवालाप्रमाणे तो पूल आम्ही बांधू. शेवटी हा पूल बांधावयाचा की नाही या संबंधी आय.आय.टी., पवईच्या तज्ज्ञ समितीने अहवाल द्यावयाचा आहे. तो अहवाल मिळाल्यानंतर त्यासंबंधी लवकरात लवकर निर्णय घेऊ. कोणत्याही परिस्थिती शासन हा निर्णय बदलणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सातारा जिल्ह्यातील वाई गावाजवळील मांढरदेवी डोंगरावरील काळूबाईच्या यात्रेत भाविकांच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालाबाबत

(५) * ९५२४ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. श्रीकांत जोशी , श्री. शांताराम करमळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७६७६ ला दिनांक ११ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी डोंगरावरील काळू बाईच्या जत्रेमध्ये झालेल्या ३५० भाविकांच्या मृत्यू प्रकरणी शासनाने गठीत केलेल्या न्यायमुर्ती कोचर समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(२) या समितीच्या अहवालात या संदर्भात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्यावर शासनाने काय कारवाई केली आहे,

(३) अशा प्रकारचे प्रसंग पुन्हा घडू नयेत यासाठी राज्यातील अन्य ठिकाणी भरणाऱ्या यात्रां संदर्भात शासनाने कोणत्या प्रकारची उपाययोजना करण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे काय, घेतला असल्यास कोणता?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी डोंगरावरील काळूबाईच्या जत्रेमध्ये झालेल्या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी नियुक्त न्या. कोचर आयोगाने जाने. २००६ मध्ये येत असलेल्या काळूबाईदेवीच्या यात्रेमध्ये घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी "उपाययोजनाचा अंतरिम अहवाल" सादर केला आहे. सदर शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले आहे. अन्य ठिकाणी भरणाऱ्या यात्रा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने शासन परिपत्रक दिनांक ७.३.२००५ अन्वये उपाययोजना करणेबाबत संबंधितांना सूचना दिल्या आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांना छापील उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** ९५२४....**

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, प्रश्न अगदी सरळ विचारला आहे की, "सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी डोंगरावरील काळू बाईच्या जत्रेमध्ये झालेल्या ३५० भाविकांच्या मृत्यू प्रकरणी शासनाने गठीत केलेल्या न्यायमुर्ती कोचर समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,"? त्याला आपण "नाही" असे उत्तर दिले आहे. पुढे दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, "या समितीच्या अहवालात या संदर्भात कोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्यावर शासनाने काय कारवाई केली आहे?", त्याला उत्तर देतांना "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. आणि तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी नियुक्त न्या. कोचर आयोगाने जाने. २००६ मध्ये येत असलेल्या काळूबाईदेवीच्या यात्रेमध्ये घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी "उपाययोजनाचा अंतरिम अहवाल" सादर केला आहे". अशाप्रकारचे उत्तर आपल्याला पहिल्या प्रश्नामध्ये देता आले असते. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, नाशिकला कुंभमेळा भरल्यानंतर त्या ठिकाणी दुर्दैवी प्रसंग घडल्यानंतर शासनाने जाहीर केले होते की, "महाराष्ट्रामध्ये अशी घटना पुन्हा घडणार नाही म्हणून यात्रेच्या ठिकाणी काळजीपूर्वक उपाय योजना केली जाईल". त्यावेळी माननीय गृहमंत्री व शासनाचे अधिकारी हजर होते. त्यासंबंधीची काळजीपूर्वक उपाय योजना न केल्यामुळे आणि वेळीच काळजी न घेतल्यामुळे हा मांढरदेवीचा अपघात झाला नाही काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मांढरदेवीला गेल्या वर्षी दुर्दैवी घटना घडली. तेथील उपाय योजनेमध्ये काही त्रुटी होत्या म्हणून ही दुर्घटना घडली. यापुढे अशी घटना घडू नये म्हणून न्यायमूर्ती कोचर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नियुक्त करण्यात आला. त्यांनी पाठविलेल्या अंतरिम अहवालामध्ये केलेल्या सूचनांप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

उपसभापती : माननीय सदस्यांना मला विनंती करावयाची आहे की, या विषयावर आपण यापूर्वी चर्चा केली असून १५ जानेवारी २००६ पूर्वी त्याठिकाणी भेट देत आहोत. आणि यापुढे अशा प्रसंगाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कोणती उपाय योजना केली आहे व त्याबाबत काय अंमलबजावणी केली आहे याची पहाणी करण्यासाठी त्या ठिकाणी जात आहोत. तेव्हा आपण या प्रश्नावर अधिक चर्चा न करता पुढील प्रश्नाला न्याय द्यावा.

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण या प्रश्नामध्ये स्वत: लक्ष घातल्याबद्दल मी आपली आभारी आहे. परंतु दुर्घटनेमध्ये जे लोक जखमी झाले आहेत व जे वाईच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते त्यांची हॉस्पिटलची बिले कुणीही भरलेली नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेथील दुकानदारांना हलविले पण त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. तसेच तेथे दुरुस्ती करणे आणि पुढच्या काळात लोकांच्या सुरक्षिततेसाठी पावले उचलली जात आहेत. हे चांगले आहे पण न्या.कोचर आयोगाने जो अंतरिम अहवाल दिलेला आहे, त्याचे स्वरुप काय आहे ? त्यानुसार इतर यात्रेच्या ठिकाणी काय सूचना दिलेल्या आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय न्यायाधीश श्री.कोचर यांनी आपल्या अंतरिम अहवालामध्ये विविध उपाययोजना सूचविल्या आहेत. 13,14 व 15 तारखेला यात्रा होणार आहे, त्यावेळी कोणकोणत्या ठिकाणी कोणकोणती काळजी घ्यावयाची आहे, ते मी सविस्तर सांगतो. महसूल खात्यातील प्रांत अधिकाऱ्यांना समन्वय अधिकारी नेमलेले आहे. आगामी यात्रेच्या निमित्ताने शासनाच्या सर्व विभागीय अधिकाऱ्यांची दि.28-10-2005 बैठक घेण्यात यावी. 13 व 15 जानेवारी रोजी होणाऱ्या यात्रेच्या तारखा ट्रस्टींनी ठरवून त्या जाहीर कराव्यात. त्याप्रमाणे ट्रस्टींनी तारखा जाहीर केल्या आहेत. अनिष्ट प्रथांवर बंदी घालणे जसे झाडावर खिळे ठोकणे, पशु हत्या वगैरे. याची मागील महिन्यापासून प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी ज्या लोकांना हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले होते, त्यांची अजून बिले दिलेली नाहीत असे सांगितले. पण याबाबतीत अजूनपर्यंत कोणीही तक्रार केलेली नाही. परंतु जर कोणाचे बिल दिले नसेल तर ते अदा करावयास लावू.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, तेथे जी दुकाने होती, तर त्या लोकांचे आयुष्य या दुकानावरच अवलंबून आहे. यात्रेच्या वेळी महिला तेथे दुकाने लावतात. पण ही दुकाने उध्वस्त झाली आहेत. त्यांना त्याची नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यांना त्याठिकाणी पुन्हा दुकान बसवावयाचे आहे आणि त्यासाठी त्या शासन दरबारी हेलपाटे घालत आहेत. तसेच त्या ठिकाणी पायऱ्या मोडल्या होत्या आणि त्यामुळे अपघात झाला होता. या पायऱ्या पुन्हा बांधण्यास सांगितले होते. पण त्या अरुंद बांधण्यात आल्या म्हणून तेथे युवकांनी आंदोलन केल्यावर आता दीड फूटाच्या पायऱ्या बांधण्यात आल्या आहेत. तसेच तेथे पाणी आणि वीज याबाबतीतही उपाय योजना केली आहे का ?

. . . .2 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9524 . . . .

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, यासंबंधात मी सविस्तर माहिती सांगतो.

उपसभापती : यामध्ये खूप वेळ जाईल. त्यामुळे ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे. मी ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .2 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई उपनगरातील गोरेगांव व दहिसर येथील बारबालांनी केलेल्या आत्महत्या

(6) * 10677 **श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दीपक सावंत , श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब** : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील मिनारामू तसेच दहिसर येथील बिल्कीश शाहू या दोन बारबालांनी दिनांक 8 सप्टेंबर,2005 रोजी अथवा त्या सुमारास आत्महत्या केल्या हे खरे आहे काय,

(2) असल्यास,उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(3) अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) होय. परंतु सदरील महिला बारबाला नसून बारमध्ये वेटर म्हणून काम करीत होत्या.

(2) व (3) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीत गोरेगांव येथील मिना रामू या महिलेस दारुचे व्यसन होते. तिच्या मृत्यूबाबत शवविच्छेदन अहवालानुसार तिला गुप्तरोग व क्षयरोग असल्याचे निदान झाले आहे. तसेच रासयनिक विश्लेषक व हिस्टोपॅथॉलॉजी जे.जे. रुग्णालय यांचे अहवालास अनुसरुन कूपर कॉरोनर मुंबई यांनी मृत्यूचे अंतिम निदान Death Due to Hanging Alcoholic Consumption (Un-naural) असे दिलेले आहे.

त्याप्रमाणे दहिसर येथील महिलेस तिच्या पतीने शारिरीक व मानसिक त्रास दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुध्द दहिसर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करुन त्याला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी जो प्रश्न विचारला आहे, त्याची अपुरी माहिती दिलेली आहे. उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, दहिसर येथील महिलेस तिच्या पतीने शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचे निष्पन्न झाले आहे.तेव्हा जर संबंधितांवर कारवाई केली असेल तर ती कोणत्या कलमाखाली केली आहे ? त्यांना अटक केली आहे का ? या केसबाबत सध्या परिस्थिती काय आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या व्यक्तीचे नाव राजशेखर शाहू असून त्याला अटक केली आहे. आत्महत्येला प्रेरणा देणे याखाली संबंधितावर 306 कलम लावलेले आहे. त्याला एकंदर 12 दिवसांची पोलीस कस्टडी मिळाली होती. दि.19-0-2005 पासून आजपर्यंत तो न्यायालयीन कस्टडीमध्येच आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"कूपर कॉरोनर

. . . .2 एन-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

मुंबई यांनी मृत्यूचे अंतिम निदान Death Due to Hanging Alcoholic Consumption (Un-natural) असे दिलेले आहे." पण हे कारण आणि आजार हे अननॅचरल आहे. म्हणून आपण याबाबतीत पुन्हा चौकशी करणार आहात का ? कारण मृत्यूचे कारण चुकीचे आहे. मृत्युचे कारण अशा प्रकारे लिहीत नाहीत. दारुच्या अति सेवनाने असा याचा अर्थ होतो. पण दारुचे अतिसेवन हे मृत्यूचे कारण नाही. तेव्हा मूत्यूचे नेमके कारण काय आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, गळफास लावून, हँगींगमुळे मृत्यू झालेला आहे. मृत्यूचे कारण तेच आहे.

यानंतर श्री.किल्लेदार .. . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10677 (पुढे चालू....

श्री.एम.पी.हिराणी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो बरोबर आहे. या ठिकाणी "Death Due to Hanging Alcoholic Consumption (Un-natural)" असे म्हटलेले आहे. एक तर हँगिंगमुळे त्याचा मृत्यू झाला असेल किंवा जास्त अल्कोहोल कन्झम्शन झाल्यामुळे मृत्यू झाला असेल. त्यामुळे हँगिंगच्या पुढे कॉमा पाहिजे. उत्तर देताना पध्दतशीर उत्तर आले पाहिजे. कशामुळे मृत्यू झाला? नेमके कारण काय आहे हे समजले पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे नेमके मृत्यूचे कारण सांगावे.

उपसभापती : यामध्ये इन-बिटवीन मिस्टेक झालेली आहे, याठिकाणी जरी नॅचरल हा शब्द दिसत असला तरी हे नॅचरली असे झालेले आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तसे दुरुस्त करुन वाचावे.

....अडथळा...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : माननीय मंत्रीमहोदयांनी त्यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे. नाही तर जसे आपण म्हणतो की "Whose father's what goes" याप्रमाणे ते होईल.

(अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे राहतात)

उपसभापती : मला वाटते आता आपण येथेच थांबावे. नाही तर आपल्याला यावर अल्पकालीन चर्चा करावी लागेल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/

मौजे भाईंदर (ता.जि.ठाणे) येथील जमिनीसाठी खोटा अर्ज करुन फसवणूक केल्याबाबत

(7) * 9536 **श्री. अनंत तरे , श्री. जगदिश गुप्ता , श्री. नितीन गडकरी , डॉ. अशोक मोडक , श्री. विनोद तावडे , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 6685 दिनांक 11 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे भाईंदर (ता.जि.ठाणे) येथील जमिनीसाठी खोटा अर्ज व दस्तऐवज तयार करुन व त्याद्वारे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून एन.ए. परवानगी मिळविल्याप्रकरणी दिनांक 2 मार्च, 2005 रोजी गुन्हा नोंदविण्यात आल्यानंतर संबंधित गुन्हेगारांचा ठाव ठिकाणा न मिळाल्याने पोलीसांनी त्या गुन्हागाराला अद्यापपर्यंत अटक केलेली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, फरारी गुन्हेगारांविरुध्द समन्स नोटीस वॉरंट, पकड वॉरंट जारी करुन गुन्हेगार न सापडल्यास त्याची मालमत्ता जप्त करण्याच्या कायदेशीर तरतुदीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त गुन्हेगाराला पकडण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे श्री. आर. आर. पाटील यांचेकरिता : (1) हे खरे नाही. यातील फिर्यादी व संबंधित अधिकारी यांचे कार्यालयाकडून याबाबत काय चौकशी करण्यात आली याबाबतची माहिती मिळविणेकरिता पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु फिर्यादी व संबंधित अधिकारी यांचेकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नव्हता. तपासी अंमलदाराने फिर्यादीने दिलेल्या पत्त्यांवर गुप्तपणे चौकशी केली असता आस्मा अपार्टमेंट, रुम नं. 301, नया नगर, मीरा रोड येथील मिळालेल्या आरोपीच्या पत्त्यांवर छापा टाकला असता तो मिळून आला नाही. दरम्यानच्या कालावधीत मा. जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीस दि. 24.11.2005 रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

(2) व (3) गुन्ह्याचा तपास चालू असून तपासात पुराव्यानुसार आरोपीस अटक करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, या संदर्भात 11 जुलैला तारांकित प्रश्न आलेला होता. उत्तर दिलेले आहे की, आरोपीला पकडण्यामध्ये टाळाटाळ करत नाही. एन.अे.परवानगी मिळविण्याप्रकरणी 9 मार्च 2005 ला गुन्हा नोंदविण्यात आला. आरोपीला अटक करण्यामध्ये तब्बल नऊ महिने होऊन गेले तरी अटक केलेली नाही. आपण फिर्यादी कशाकरिता शोधता ? त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकाऱ्यांना काय माहिती पाहिजे ? श्री.हर्षद सिध्दीकी या आरोपीला अटक करण्यामध्ये स्थानिक पोलीस स्टेशननी टाळाळाळ केलेली आहे. आता दिनांक 24-11-2005 रोजी न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. नऊ महिन्याचा कालावधी यामध्ये गेलेला आहे. त्यामुळेच त्याला जामीन मिळाला. या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी अटक करण्यामध्ये टाळाटाळ केली त्याच्यावर कारवाई करणार आहात काय ? हा अटकपूर्व जामीन रद्द करण्यासाठी हायकोर्टामध्ये अपील करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आरोपीचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याच्या संबंधात कोर्टामध्ये अर्ज केलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार (बसून): यामध्ये इतका उशीर का लावला ?

श्री.अनंत तरे :. 9 महिने यामध्ये गेलेला आहे, एवढा वेळ कशासाठी थांबला होता ?

...(अडथळा)....

अनेक सन्माननीय सदस्य : त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करा, त्याला सस्पेंड करा.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महसूल विभागाच्या प्रांताधिकाऱ्यांनी पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर आमच्याकडे ती केस आलेली आहे. त्यांच्याकडून यासंबंधातील कागदत्रे घेण्याबाबात वारंवार मागणी करण्यात येत होती. नेमके काय घडले, याची चौकशी करण्यासाठी आम्हाला पुरावा लागणार होता. त्यासाठी कागदपत्रे द्यावी अशी मागणी करत होतो. ही कागदपत्रे उशिरा आल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यामध्ये वेळ गेलेला आहे. अजूनही त्यांच्याकडून काही कागदपत्र हवी आहेत, त्याची मागणी केलेली आहे.

डॉ.अशोक मोडक : कागदपत्रे उशिरा मिळाल्याचे सांगितले. परंतु कोर्टामध्ये गुन्हा हा मार्चमध्ये नोंदविला गेला आणि अटकपूर्व जामीन त्यास नोव्हेंबरमध्ये मिळाला. मधल्या काळामध्ये आरोपी फरार झाला. त्याची मालमत्ता का जप्त केली नाही ?

यानंतर कु.थोरात....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

डॉ. अशेक मोडक..

दुसरा प्रश्न असा आहे की, मुळात अजूनही शासन उच्च न्यायालयात गेलेले नाही. निर्णय जिल्हा सत्र न्यायालयाने दिलेला आहे. उच्च न्यायालयात जाण्यात विलंब झाला आहे हे आपण मान्य कराल. जो व्यक्ती फरार झाला आहे त्याची मालमत्ता जप्त केली नाही, हेही आपण मान्य कराल. असे कोण माणूस आहे की, ज्याच्या प्रेशरखाली हे खाते वागत आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, असे कोणीही माणूस नाही की, ज्याच्या प्रेशरखाली हे पोलीस वागत आहेत. मी मघाशीच म्हटले की, त्याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर कोर्टामध्ये पुराव्यासाठी जे जे कागदपत्र लागणार आहेत ते सर्व कागदपत्र मिळायला विलंब झाला. त्या दरम्यान वेळ गेला आणि कोर्टातून जामीन घेतला. असे असतांना सुध्दा त्याचा जामीन रद्द करावा म्हणून पोलिसांनी कोर्टाला परत विनिंती केलेली आहे.

श्री. अनिल परब : सभापती महोदय, अपीलमध्ये जाण्यासाठी काही कार्यकाल असतो. एखादा अंतरिम जामीन झाल्या नंतर किती दिवसात आपण अपीलमध्ये जायला पाहिजे हे पोलिसांना माहीत नाही काय? आता पोलीस ज्यावेळेला अपीलमध्ये जातील त्यावेळेला त्यांचा अर्ज कालबाहय झ ाला म्हणून कदाचित तो फेटाळला जाण्याची शक्यता आहे. एखाद्या आरोपीला अशा पध्दतीने मोकळे सोडण्याची ही पोलीसांची पध्दत आहे. म्हणून याबाबतीत ज्या स्थानिक पोलिसांनी निष्काळजीपणा केलेला आहे, आरोपीला पळून जाण्यासाठी किंवा जामीन मिळण्यासाठी मदत केली आहे अशा अधिका-यावर शासन कारवाई करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी जी माहिती सांगितली तसा जर पोलीस अधिका-यांनी जाणून-बुजून विलंब लावला असेल,हलगर्जीपणा केला असेल तर त्याची चौकशी करण्यात येईल व चौकशीत दोषी आढळून आल्यानंतर कारवाई करण्यात येईल.

(गोंधळ)

उपसभापती :या प्रकरणातील अधिकारी आणि आरोपीचे नांव सांगा?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तपास अधिकारी, पोलीस उप निरीक्षक श्री. आर.पी. वैद्य आहेत आणि आरोपी मोहम्मद हशिश सिद्दीकी आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या सिद्दीकीला गेले नऊ महिने पकडलेले नाही.त्यांने कलेक्टरचे कागदपत्र डुप्लीकेट बनविलेले आहेत. एन.ए. ऑर्डर दिली एवढा प्रचंड मोठा गुन्हा असतांना पोलीस त्याला पकडत नाही. अशा आरोपीला आपले पोलीस स्टेशनचे अधिकारी सोडतात. तेव्हा त्या अधिका-याला आज सस्पेंड करण्याचे आदेश द्याल काय?

(उत्तर आले नाही)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, फिर्यादीने दिलेल्या पत्यावर गुप्तपणे चौकशी केली असता आस्मा अपार्टमेंट नया नगर, मीरा रोड येथील मिळालेल्या आरोपीच्या पत्यांवर छापा टाकला असता तो मिळून आला नाही असे म्हटले आहे. सभापती महोदय, मार्चमध्ये गुन्हा झाल्यानंतर हा छापा कोणत्या तारखेला टाकण्यात आला ? हा छापा जर त्यांनी तत्परतेने टाकला असेल तर खरेच ते अधिकारी कर्तव्यदक्ष आहेत असे म्हणता येतईल. त्यांनी हा छापा कोणत्या तारखेला टाकला तो छापा अगदी अलीकडे टाकला असेल तर त्या अधिका-याला ताबडतोब निलंबित केले पाहिजे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सर्व सनमाननीय सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन त्या संबंधीत अधिका-याला निलंबित करण्यात येईल व त्याची चौकशी करण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.टी.च्या चालक भरतीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत

(8) * 11277 श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , डॉ. अशोक मोडक , श्री. दिवाकर रावते , श्री. विलास अवचट , श्री. जगदिश गुप्ता : तारांकित प्रश्न क्रमांक 2633 ला दिनांक 18 मार्च, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय परिवहन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) एस.टी. बोर्डाशी विचारविनिमय किंवा उपासनी समितीच्या शिफारशीनुसार चालकांच्या संख्येचा आढावा न घेता माहे जुलै, 2004 मध्ये एस.टी. मध्ये 4236 चालकांची भरती करण्यात आली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ही भरती प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एस.टी.चे तत्कालीन मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्री, उल्हास जोशी यांनी दिनांक 30 सप्टेंबर, 2004 रोजी तसेच एस.टी.चे विद्यमान व्यवस्थापकीय संचालक यांनी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या तत्कालीन महासंचालकांना पत्र लिहून या प्रकरणी चौकशी करण्यास सांगितले होते हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय चौकशी अंती दोषी असलेल्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(5) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री.धर्मरावबाबा आत्राम श्री. सुरुपसिंग नाईक यांच्याकरिता: (1) शासनाने महामंडळातील सर्व पदाचा आढावा घेवून रिक्तपदे भरण्यास परवानगी दिली आहे.

(2) भरती प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या महासंचालकांना याप्रकरणी चौकशी करण्यास सांगण्यात आले आहे.

(3), (4) व (5) रा.प. अकोला विभागात सन 2004 मध्ये 71 चालक (कनिष्ठ) या रिक्त पदांचे नोकर भरतीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन येथे दिनांक 21.10.2005 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

रा.प.यवतमाळ विभागात सन 2004 मध्ये 103 चालक (कनिष्ठ) या रिक्त पदांचे नोकर भरतीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत पोलीस स्टेशन वडगाव (यवतमाळ शहर) येथे दिनांक 21.10.2005 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

अन्य विभागाबाबत चौकशी चालू असून संबंधित दोषी विरुध्द खातेनिहाय कारवाई चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11277

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,माझ्या एकाही प्रश्नाला सरळ उत्तर देण्यात आलेले नाही. प्रश्न एक विचारण्यात आला आहे आणि त्याला उत्तर दुसरेच दिलेले आहे.मी पहिला प्रश्न असा विचारला होता की,एस.टी.बोर्डाशी विचारविनिमय किंवा उपासनी समितीच्या शिफारशीनुसार चालकांच्या संख्येचा आढावा न घेता माहे जुलै, 2004 मध्ये एस.टी. मध्ये 4236 चालकांची भरती करण्यात आली हे खरे आहे काय,? याचे उत्तर दिलेले नाही.उपासनी समितीचा आढावा घेतला काय ? एस.टी.बोर्डाला विचारले काय? याचे उत्तर दिले आहे की, शासनाने मंडळातील सर्व पदाचा आढावा घेतला आहे. म्हणजे एस.टी.मध्ये कंडक्टरच्या जागा किती भरावयाच्या आहेत.ड्रायव्हरच्या किती जागा भरावयाच्या आहेत, कंट्रोलरच्या किती जागा भरावयाच्या आहेत.

यानंतर श्री. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारचा आढावा घेऊन ही पदे भरण्यास परवानगी दिली. मी स्पेसिफिकली असा प्रश्न विचारलेला आहे की, ही एस.टी. मधील पदे एस.टी. बोर्डाशी विचार-विनिमय करुन निर्माण केली काय, त्याचे उत्तर वेगळेच दिलेले आहे. त्या उत्तराच्या अनुषंगाने क्र. 2, 3 व 4 या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे सांगितलेले आहे की, अकाला विभागात सन 2004 मध्ये 71 चालक या रिक्त पदांच्या नोकर भरतीत झालेल्या भ्रष्टाचाराबाबत गुन्हा नोंदविलेला आहे. मुळात मी प्रश्न विचारला होता की, ही पदे कुठल्या परवानगीने भरण्यात आली आहेत, त्यासंबंधी एस.टी. महामंडळाचे सुरक्ष व दक्षता अधिकारी श्री. उल्हास जोशी यांनी दिनांक 30 सप्टेबर, 2004 रोजी तसेच एस.टी. चे विद्यमान व्यवस्थापकीय संचालक यांनी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या तत्कालीन महासंचालकांना पत्र लिहून याप्रकरणी चौकशी करण्यास सांगितले होते, हे खरे काय, त्याला उत्तरच दिलेले नाही. श्री. उल्हास जोशी यांनी या प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्याबाबतचे पत्र दिले होते काय ? याचा तरी मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. धर्मराव बाबा आत्राम : होय, तसे पत्र दिलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, आता मंत्री महोदय "होय" असे उत्तर देत आहेत. परंतु आम्ही विचारलेल्या प्रश्नाला मात्र वेगळेच उत्तर दिलेले आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत अशा प्रकारची चौकशी करुन राज्यामध्ये एस.टी. महामंडळाची जी पदे भरलेली आहेत त्यासाठी मान्यता होती काय ?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : याबाबत मी कालच उत्तर दिले होते. राज्यामध्ये या प्रकरणी संपूर्ण चौकशी केल्यानंतर विभाग नियंत्रक 28 आणि 102 अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आरोप दाखल करण्यात आले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : श्री. उल्हास जोशी यांच्या अर्जाप्रमाणे लाचलुचपत विभागामार्फत आपण चौकशी केली आहे काय? या अहवालात काय म्हटलेले आहे ? तसेच सदर चौकशीत काय निष्पन्न झालेले आहे ?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : या अहवालाची प्रत माझ्याकडे नाही, ती पटलावर ठेवतो. यामध्ये 102 अधिकारी व कर्मचारी तसेच 28 विभाग नियंत्रक असून जे जे अधिकारी निलंबित करण्यात आले आहेत त्यांच्यावर आरोप दाखल केले आहेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्र. 11277 .....

श्री. पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, हे 128 अधिकारी कोणत्या विभागातील आहेत आणि त्यांच्यावर कोणत्या कलमांन्वये गुन्हे नोंदविलेले आहेत ?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : महोदय, यामध्ये नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ, अकोला, सांगली, धुळे असे 8-9 जिल्हे आहेत. या प्रकरणाची चौकशी करुन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, 128 अधिकाऱ्यांवर गुन्हे रजिस्टर्ड केले असे सांगितले. त्यांच्यावर निलंबनाची कारवाई शासनाने केली काय, नसल्यास ती का केली नाही ?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : अकोला, यवतमाळ या विभागामध्ये जवळपास 5 गुन्हे दाखल झाले असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे, त्यापैकी श्री. राठोड ही व्यक्ती निवृत्त झालेली आहे. चालक भरतीमध्ये परभणी, लातूर, जालना, नांदेड, अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा या जिल्हयातील आकडेवारी देखील माझ्याकडे आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, या नोकर भरतीमध्ये लाखो रुपये खाल्ले हे निदर्शनास आल्यानंतर पोलीसांकडे हे प्रकरण सोपविले आणि गुन्हे दाखल केले. त्यानंतर यामध्ये दोषी असलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित न करण्याचे कारण काय ?

श्री. धर्मराव बाबा आत्राम : यापूर्वीच मी निलंबनाच्या संदर्भात माहिती दिली असून त्यांची आकडेवारी दिली आहे. या प्रकरणात जे दोषी आढळून येतील त्यांना कोणालाच सोडले जाणार नाही व त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सचिव : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "मुंबईतील सात रस्ता व विक्रोळी येथे विषारी दारु प्यायल्यामुळे अनेक व्यक्तींचा झालेला मृत्यू" या विषयावरील श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण, श्री. नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे, डॉ. दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते, श्री. विलास अवचट, श्री.अरविंद सावंत, श्री. अनंत तरे, श्री. अनिल परब, डॉ. निलम गो-हे, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, श्री. गुरुनाथ कुलकणी, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. विनायकराव मेटे, श्री. वसंतराव काळे, श्री.सुधाकर गणगणे, श्री. संजय दत्त, श्री. यशवंतराव गडाख, श्री. धनाजी साठे, श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री. सदाशिवराव पोळ, प्रा. शरद पाटील, श्री. जयंत पाटील, प्रा. फौजिया खान, श्री. विलासराव शिंदे, डॉ. वसंत पवार, श्री. वसंतराव चव्हाण, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, श्रीमती सुधा जोशी, मेजर सुधीर सावंत वि.प.स. यांच्या 18 मार्च, 2005 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 1688 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी)

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा सन 2001-2002 चा पहिला वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा सन 2001-2002 चा पहिला वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादितचा सन 1993-94 चा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादितचा सन 1993-94 चा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 2002-2003 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन 2002-2003 चा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मॅफको महामंडळाचा सन 2003-2004 चा 33 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : मॅफको महामंडळाचा सन 2003-2004 चा 33 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेडचा सन 2001-2002 चा तेवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ लिमिटेडचा सन 2001-2002 चा तेवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे 36 वा व 37 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे 36 वा व 37 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पंचायत समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.शिवाजीराव पाटील (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : पंचायती राज समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

....

अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

डॉ.एम.ए.अझिज (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

....

विधान परिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद आश्वासन समितीचा 142 वा अहवाल सभागृहाला सादर करतो.

उपसभापती : विधान परिषद आश्वासन समितीचा 142 वा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे. अहवालाच्या चक्रमुद्रित प्रती सभागृहाच्या पटलावर ठेवल्या आहेत. मुद्रित प्रती उपलब्ध झाल्यानंतर त्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे.

डॉ.दीपक सावंत (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार दिनांक 16 डिसेंबर 2005 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरूवार, दिनांक 15 डिसेंबर 2005 रोजी समितीची बैठक झाली. 150 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1. श्री.अनंत तरे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 55 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक 66 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. श्री.जयंत पाटील, वि.प.स.यांचा ठराव क्रमांक 2 - 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

उपसभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे कार्यवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे..

श्री.पांडुरंग फंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. हिंगोली जिल्हयामधील कळमनूरी नगर परिषदेचे नगराध्यक्ष यांनी नगरपालिकेच्या सभेमध्ये ठराव न करता एका चौकाचे नामकरण करण्याचा कार्यक्रम केला. आज देशाला स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झाली. त्या जागेला मान्यता नसताना, दादागिरी करून चौकाला "औरंगजेब चौक" असे असे नाव दिले. 300-350 वर्षानंतर देखील औरंगजेबची अवलाद या मातीत काम करीत आहे. या प्रकारामुळे गावात उद्रेक झाला. रास्ता रोको आंदोलन झाले. दगडफेक झाली. ज्यांनी आंदोलन केले, त्यांच्यावर केसेस दाखल झाल्या. ज्या नगराध्यक्ष व उपाध्यक्षांमुळे आंदोलन झाले त्यांच्यावर कुठल्याही प्रकारच्या केसेस दाखल झाल्या नाहीत. तेव्हा या सर्व प्रकाराची चौकशी करून ज्यांनी उद्रेक घडवून आणला आहे, त्यांच्यावर कारवाई करण्याचे निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

उपसभापती : या प्रकरणी शासनाने त्वरित निवेदन करावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एका महत्त्वाच्या प्रश्नावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक 19 जुलै 2004 रोजी एक अध्यादेश काढला. त्या अध्यादेशातील निवेदनात नमूद केलेला मजकूर शब्दश: मी या ठिकाणी वाचून दाखवतो. विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रचंड व्याप्ती व सामाजाला भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी आणि एकंदर मानव जातीच्या उन्नतीसाठी त्यांचे उपयोजन करण्याची गरज लक्षात घेता विकास विषयक कामामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाचे उपयोजन करण्यामध्ये वाढ करण्यासाठी, त्याचा प्रसार करण्यासाठी व त्याला चालना देण्यासाठी तसेच त्या क्षेत्रात अभ्यास व संशोधन करून विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती करण्यासाठी पुरेशी वित्तीय साधने आणि प्रशासकीय तसेच तांत्रिक कर्मचारी वर्ग असलेला विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात व्यापक अनुभव असणाऱ्या मान्यवर व तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेला एक स्वतंत्र व परिपूर्ण सांविधानिक आयोग, एक निगमनिहाय तात्काळ स्थापन करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

यानंतर श्री.अजित..

अशोधित प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

श्री.नितीन गडकरी.....

राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन सुरु नाही आणि उपरोक्त प्रयोजनासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कारवाई करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

शासनाने हा अध्यादेश दिनांक 19 जुलै 2004 राजी काढला. जुलै 2004 मध्येच या आयोगासाठी 3 हजार चौ.फू.जागा व कर्मचारी वर्ग इत्यादीसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. त्यानंतर विधानसभेत विधेयक आले. विधेयक मंजूर करण्यात आले. दिनांक 15 डिसेंबर 2004 रोजी नोटीफिकेशन निघाले. विज्ञान तंत्रज्ञान आयोगाचा कायदा अस्तित्वात आला. शासनाकडे आयोगासाठी 10 कोटींचे अनुदान मागण्यात आले, परंतु शासनाने फक्त एक कोटीचेच अनुदान मंजूर केले. अद्यापपावेतो या आयोगासाठी जागा नाही, कर्मचारी वर्ग नाही, वाहन नाही, कार्यालय नाही अशी बिकट स्थिती आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ वसंतराव गोवारीकर यांना स्व.राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष नेमले. परंतु त्यांना बसण्यासाठी ऑफीस नाही. वाहन नाही. जेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी हे विधेयक मांडले होते त्यावेळी मी त्यांचे अभिनंदन केले होते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ वसंतराव गोवारीकरांना त्या आयोगाचे अध्यक्ष केले पण त्यांची दखल घेतली नाही. तेव्हा सरकारने याची ताबडतोब दखल घेऊन कार्यवाही करण्यात यावी असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहात दोनच दिवसांपूर्वी सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फर हुसेन यांनी श्वानावरील लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, सर्व हॉस्पिटल्समध्ये रेबीजची इंजेक्शन्स उपलब्ध आहेत. आपण मागील दोन-तीन दिवसांपूर्वीची वर्तमानपत्रे चाळली तर त्यामध्ये एक बातमी आली होती की "मेडीकल एज्युकेशनचे डायरेक्टर श्री.वासुदेव तावडे यांनी हॉस्पिटलचा दौरा केला असता त्यांना लोकांच्या उद्रेकाला सामोरे जावे लागले". कुत्रा चावल्यानंतर द्यावी लागणारी रेबीजची इंजेक्शन मेयो हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नाहीत. म्हणून लोकांचा उद्रेक झाला होता.तेव्हा माझी मंत्रिमहोदयांना विंनंती आहे की, कुत्रे चावण्याचे थांबविणे आपल्या हाती नसले तरी निदान त्यावरील औषधे हॉस्पिटलमध्ये उपलब्ध करुन द्यावीत.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे रेबीजची इंजेक्शन उपलब्ध करुन दिली जातील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, गेल्या हिवाळी अधिवेशात पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळाच्या गट वाटप योजनेतील झालेल्या भ्रष्टाचाराबाबतची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यावर चौकशी करण्यात येऊन जे दोषी असतील त्यांचेवर कारवाई करण्याचे आश्वासन मंत्रिमहोदयांनी दिले होते. परंतु त्या संबंधिचा चौकशी अहवाल अद्याप आलेला नाही. ज्यांच्या तक्रारी आहेत त्यांना चेअरमन आणि डायरेक्टरसमोर बसवून विचारावयाचे तुमची तक्रार आहे काय ? अशाप्रकारे या चौकशीमध्ये सुध्दा गैरव्यवहार झालेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

त्याने माझ्याकडून पैसे घेतल्याचे चेअरमनसमोर सांगितल्यावरुनही त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, फौजदारी केस सुध्दा दाखल केलेली नाही. त्यामुळे जो अहवाल सादर झालेला आहे तो सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत आदेश द्यावे अशी मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदन करण्यासंदर्भात</u>

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी गेल्या आठवडयात पंचायती राज समितीच्या संदर्भात औचित्त्याचा मुद्दा उपस्थित केला होता. काल पुन्हा एकदा अँटी करप्शनच्या अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्याला पकडले आहे. मागे उपस्थित केलेल्या औचित्त्याच्या मुद्यासंदर्भात आपण शासनास निवेदन करण्याबाबत सांगितले असताना सुध्दा अद्यापपर्यंत शासनाकडून निवदन करण्यात आलेले नाही.

उपसभापती : याबाबत उद्या निवेदन करण्यास सांगतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे व इतर वि.प.स. यांनी "अकोला जिल्हा परिषदेतील व्ही.जे.एन.टी.मधील जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-3), वैद्यकीय अधिकारी वर्ग-3 यांना पदोन्नती न मिळाल्याने त्यांच्यात पसरलेले संतापाचे व संभ्रमाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 12/12/2005 रोजी श्री.अनंत भाईदास शिंदे, शिरसाड, ता.यावल, जि.जळगांव, या शिक्षकास संस्था चालकांनी केलेली बेदम मारहाण व दिलेली जीवे मारण्याची धमकी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "नॅशनल हायस्कूल, ताजबाग, नागपूर येथील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळेतील अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षकांना 1995-96 चे वेतन न्यायालयाने आदेश देऊनही न मिळाल्यामुळे निर्माण झालेली असंतोषाची परिस्थिती वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.प.स. यांनी "आसरे कातकरवाडी, ता.खालापूर, जि.रायगड येथील सौ.गीता अशोक कातकरी यांना दिनांक 27/11/2005 रोजी ग्रामीण रुग्णालय, चौक येथे वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे तिचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "नागपूर शहरातील कार्गो प्रकल्पासाठी जमिनी संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्तांना जमिनींचा मोबदला अद्याप न मिळाल्याने तसेच रोजगाराचे कोणतेही साधन न उरल्यामुळे उपासमारीची वेळ येऊन त्यांनी केलेला सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "संत तुकाराम महाराज सामाजिक सभागृह खामगाव नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

नंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "पुणे जिल्हयातील दौंड येथील दगडू सकपाळ या सावकाराकडून कर्ज घेतलेल्या कर्जदाराच्या पत्नीवर सदरहू सावकाराने केलेले बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे व इतर वि.प.स. यांनी "विजयानंद सहकारी गृहनिर्माण संस्था, धंतोली, नागपूर या संस्थेत झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्यामुळे मी सुचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु शासनाने यावर निवेदन करावे.

नियम 93 खालील सुचनांवरील निवेदने सर्व सन्माननीय सदस्यांना प्राप्त झालेली आहेत. पण आज सभागृहापुढे कामकाज भरपूर असल्यामुळे त्यावर प्रश्नोत्तरे होणार नाहीत

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. परंतु त्याबाबत या ठिकाणी काहीही सांगितलेले नाही.

उपसभापती : ठीक आहे. मी तुम्हाला उद्या संधी देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

:: **नियम 93 च्या सूचनेची निवेदने** ::

पृ.शी.: सावित्रीबाई फुले हायस्कूल, चेंबूर या संस्थेत संचालकांकडून सुरु असलेला गैरव्यवहार.

मु.शी.: सावित्रीबाई फुले हायस्कूल, चेंबूर या संस्थेत संचालकांकडून सुरु असलेल्या गैरव्यवहाराबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, अशोक मोडक यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, अशोक मोडक यांनी "सावित्रीबाई फुले हायस्कूल, चेंबूर या संस्थेत संचालकांकडून सुरु असलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, गेल्या वर्षी हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आला होता आणि आता नियम 93 अन्वये सूचनेच्या माध्यमातून पुन्हा हा विषय या ठिकाणी उपस्थित करावा लागला. परंतु त्या संस्थेच्या कारभारात आजपर्यंत काहीही फरक पडलेला नाही. शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयातील बैठकीमध्ये समझोता होऊन सर्व मान्य केले गेले, परंतु त्याबाबत कसल्याही प्रकारची अंमलबजावणी झालेली नाही. तेथील मुख्याध्यापक शाळेत येत नाही. या संस्थेच्या संचालकाविरुध्द विनयभंग, दमदाटी, मारहाण, भूखंड बळकावणे, बलात्कार अशा निरनिराळया तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. सभागृहात नियम 93 अन्वये सूचना आल्याबरोबर संबंधित कर्मचाऱ्यांना "मेमो" देण्याचे काम सुरु झाले आहे. गेल्यावर्षी त्यांना 80 टक्के अनुदान मिळाले आहे, जून महिन्यात 100 टक्के अनुदान येणार होते. अनुदान आल्यानंतर तरी आपल्यावरील संकट टळेल असे त्या कर्मचाऱ्यांना वाटले होते. परंतु अजूनही त्या संस्थेला 100 टक्के अनुदान मिळालेले नाही.

नंतर श्री.गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ..

शेवटी कंटाळून आणि त्रासून त्या व्यक्तीने तक्रार केली आणि आता त्यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली आहे. तेव्हा त्या संस्थेवर प्रशासकाची नेमणूक केली जाणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : त्या संस्थेला अनुदान देण्याची व्यवस्था निश्चित केली जाईल परंतु या संस्थेवर प्रशासक नेमण्यात यावा अशी मागणी कोणीही केलेली नाही. तरीही मी स्वत: या संस्थेच्या प्रश्नामध्ये लक्ष घालतो आणि तो प्रश्न सोडवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : डी.एड.महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्या

मु.शी : डी.एड. महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यासंबंधी श्री.रामनाथ मोते,श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक यांनी डी.एड. महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्या या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

निवेदना नतर

श्री.रामनाथ मोते :सभापती महोदय, महाराष्ट्रातील डी.एड. महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रश्नाच्या बाबतीत आम्ही सन्माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर काल सविस्तर चर्चा केली होती. त्या बाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, काल जी चर्चा झाली होती त्या चर्चेच्या अनुषंगाने ज्या मागण्या मान्य करण्यात आलेल्या आहेत त्या संदर्भात शासन एक महिन्याच्या आत निर्णय घेऊन तो निर्गमित करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदय, काल आम्ही समोपचाराने चर्चा केली असून ज्या मागण्या रास्त आहेत आणि ज्या मागण्यांच्या संदर्भात सकारात्मक भूमिका घेतलेली आहे त्याबाबतीत शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राजूरवाडी ,ता.मोर्शी, जि.अमरावती येथील शेतक-याने कर्जाला कंटाळून केलेली आत्महत्या

मु.शी.: राजूरवाडी, ता.मोर्शी, जि. अमरावती येथील शेतक-याने कर्जाला कंटाळून केलेली आत्महत्या या संबंधी सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी दिलेली लक्ष वेधी सूचना

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री): सभापती महोदय, सर्वश्री जगदीश गुप्ता,पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी राजूरवाडी, ता.मोर्शी, .जि.अमरावती येथील शेतक-याने कर्जाला कंटाळून केलेली आत्महत्या या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे

<u>निवेदन</u>

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदनानंतर -

श्री.जगदीश गुप्ता :सभापती महोदय,एका गंभीर विषयाच्या संदर्भात ही नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली होती आणि एका शेतक-याने आत्महत्या केली होती. यासंबंधी या निवेदनामध्ये माहिती देण्यात आली आहे कर्ज वसुलीच्या संदर्भात या शेतक-याला बॅन्केने दिनांक 9.12.2005 रोजी सकाळी पत्र पाठविले होते व त्यामुळे त्या शेतक-याने आत्महत्या केली होती. या व्यक्तीचे वय 45 वर्षाचे असून त्याला दोन मुले आहेत. तेव्हा या व्यक्तीच्या कुटुंबियांना शासन आर्थिक मदत देणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, 9.12.2005 रोजी या व्यक्तीला कर्ज वसुलीच्या बाबतीत नोटीस देण्यात आली होती असे सन्माननीय सदस्यांनी सागितले आहे परंतु ही बाब तपासून पहावी लागेल. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार या व्यक्तीला 2004 साली नोटीस दिली होती त्याचबरोबर या व्यक्तीला एकूण चार मुले आहेत आणि शासनाने नुकतेच आत्महत्या झालेल्या शेतक-यांच्या संदर्भात एक पॅकेज जाहीर केलेले आहे. त्यानुसार जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार आहे त्याप्रमाणे सबंधित व्यक्तीच्या वारसदारांना लवकरात लवकर मदत देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांना मुबईत भूखंड देणे

मु.शी : गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांना मुंबईत भूखंड देण्यासबंधी

सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,सागर मेघे,विनोद तावडे मधुकर चव्हाण श्रीकांत जोशी यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ.राजेन्द्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) :सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,सागर मेघे,विनोद तावडे मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी यांनी " गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांना मुंबईत भूखंड देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेले असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) VV 7
VTG/ MHM

- निवेदना नतर -

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी जी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्यातील विषय फार महत्वाचा आहे. गोवा स्वातंत्र्य लढयातील जे स्वातंत्र्य सैनिक होते त्यांना मुंबई

शहरामध्ये राहण्याकरता जागा मिळावी अशी मागणी शासनाकडे केली होती. शासनाच्या वतीने वर्सोवा येथे त्यांना भूखंड देण्यात येत आहे आणि त्याचे 15 लाख रुपये भरावेत अशा प्रकारचे पत्र दिनांक 20 जुलै 1994 ला त्यांना पाठविण्यात आले होते त्यानुसार त्यांना 15 लाख 75 हजार 950 रुपये जिल्हाधिकारी मुंबई यांच्याकडे भरले होते. परंतु अद्यापपर्यन्त त्यांना भूखंड देण्यात आलेला नाही.2002 साली कोणी तरी कोर्टात गेले होते आणि कोर्टाने निर्देश दिले की त्यांना हा भूखंड देता येणार नाही. कोर्टाच्या निर्णयानुसार आता आपल्यापुढे दोन पर्याय आहेत त्यातील एक पर्याय असा आहे की त्यांचे पैसे परत करण्यात यावेत आणि दुसरा पर्याय असा आहे की त्यांना दुसरीकडे पर्यायी जागा देण्यात यावी.त्यांना पेसे परत नको आहेत त्या ऐवजी त्यांना पर्यायी जागा दिली तर बरे होईल.माननीय मंत्रिमहोदयांना माझी अशी विनंती आहे की,गोवा स्वातंत्र्य लढयात भाग घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना मुंबईमध्ये पर्यायी जागा देण्यासंबंधी विचार करण्यात यावा तेव्हा हा विचार शासन करणार आहे काय ?

नंतर श्री. सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 अन्वये मा.महसूल राज्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनानंतर..)

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की, गोवा मुक्ती संग्रामात सहभागी असलेल्या या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना ही जागा मंजूर करण्यात आलेली होती आणि त्याप्रमाणे 7.8.1998 ला प्रत्यक्षपणे त्या जागेचा ताबा देखील त्यांना देण्यात आलेला होता. हा ताबा दिल्यानंतर ताबडतोबीने तेथे कामाला सुरूवात झाली असती तर निश्चितपणे माननीय उच्च न्यायालयाचा निकाल वेगळा झाला असता, तो आडवा आला नसता. परंतु आता उशीर झालेला असला तरी आपण आता सूचना केलेली आहे त्यानुसार यामध्ये दोन पर्याय आहेत आणि त्याची नोटीस जिल्हाधिकाऱ्यांना त्यांना दिलेली आहे. त्याची सुनावणी तेथे आहे आणि त्या दरम्यान हे सारे स्वातंत्र्य सैनिक असल्यामुळे आणि त्यांची ही संस्था असल्याने व्यक्तीश: जिल्हाधिकाऱ्यांना बोलावून यांना पर्यायी जागा उपलब्ध तेथे असेल तर ती देण्याची भूमिका निश्चितपणे माझी राहील.

****

..... डब्ल्यूडब्ल्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सांगली येथील इमॅन्युअल एज्येकेशन सोसायटी या अल्पसंख्यांक ख्रिश्चन समाजाची संस्था हडप करण्याचा होत असलेला प्रकार.

मु.शी. : सांगली येथील इमॅन्युअल एज्येकेशन सोसायटी या अल्पसंख्यांक ख्रिश्चन समाजाची संस्था हडप करण्याचा होत असलेला प्रकार याबाबत प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षक तथा विधी व न्याय राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व श्री. जयंत प्र. पाटील यांनी " सांगली येथील इमॅन्युअल एज्येकेशन सोसायटी या अल्पसंख्यांक ख्रिश्चन समाजाची संस्था हडप करण्याचा होत असलेला प्रकार " या विषयी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्या प्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

..... डब्ल्यूडब्ल्यू 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 अन्वये मा. शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनानंतर..)

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, हा विषय गंभीर असल्यामुळेच मी याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. सभापती महोदय, 50 लाख रूपयांची मालमत्ता असलेल्या संस्थेचा हा विषय आहे. एका अल्पसंख्याक समाजाची ही शिक्षण संस्था आहे आणि या संस्थेच्या नियमांमध्ये अल्पसंख्यांक असलेल्या ख्रिश्चन व्यक्तींनाच सभासद करून घेता येऊ शकते. त्यांच्या नियमात तशी तरतूद आहे. असे असतानाही त्या संस्थेमध्ये वाद निर्माण झाल्यानंतर, हायकोर्टाच्या निकालानुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी संस्थेच्या सभासदांपैकी वा हितचिंतकांपैकी कोणाचीही प्रशासक म्हणून नेमणूक न करता संस्थेशी संबंध नसलेल्या एका राजकीय व्यक्तीची, नगरसेवकाची नियुक्ती केली. याबाबत संबंधितांना सहधर्मादाय आयुक्त यांचेकडे अपील केल्यानंतर त्यांनी त्याला स्थगिती दिली. त्यानंतरसुद्ध या तथाकथित प्रशासकांनी सदर संस्थेच्या खात्यातून काही रक्कम बेकायदेशीरपणे काढण्याचा गंभीर प्रकार केला. त्याशिवाय नवीन सभासद करून घेण्यासंबंधी एका फारशा प्रसिद्ध नसलेल्या दैनिकामध्ये प्रसिद्धी देऊन अर्ज मागविले आणि त्यातून संस्थेच्या नियमाविरूद्ध जाऊन बिगर ख्रिश्चन समाजाच्या आणि शिक्षण क्षेत्राशी संबंध नसलेल्या व्यक्तींना सभासद करून घेतले. इतकेच नव्हे तर मूळ सभासदांना याची माहिती होऊ न देता संस्थेची सर्व-साधारण सभा घेऊन नव्याने केलेल्या सभासदांना मान्यता दिली आणि नंतर पुढे हायकोर्टामध्ये जाऊन असलेली स्थगिती देखील तीन महिन्यांनी उठवून घेतली. त्यानंतर पुन्हा त्यांचा सहा महिन्यांचा प्रशासक पदाचा कालावधी संपत आलेला असल्याने नव्याने अर्ज सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे दाखल केला आणि त्यांनीही चार दिवसात त्याबाबत कोणतीही चौकशी न करता तो मंजूर केला. असे गंभीर गैरप्रकार झालेले असल्यामुळे या सर्व गैर प्रकारांची उच्च स्तरीय चौकशी करून एक महिन्यामध्ये अहवाल शासनाला सादर केला जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आता ही न्यायिक बाब झालेली आहे. प्रथमदर्शनी सन्माननीय सदस्य जे या संस्थेच्या संदर्भात सांगत आहेत ते खरे आहे की, सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी ही अल्पसंख्यांक समाजाची संस्था असताना चेंज रिपोर्ट कसा मान्य केला वगैरे. आता त्यावर अपील केलेले असल्याने शासन त्यामध्ये काहीही करू शकणार नाही.

****

..... डब्ल्यूडब्ल्यू 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शंकर शेंडे या गुंडाने महिलेचा केलेला विनयभंग.

मु.शी. : शंकर शेंडे या गुंडाने महिलेचा केलेला विनयभंग.याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेल्या नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी " शंकर शेंडे या गुंडाने महिलेचा केलेला विनयभंग." या विषयी नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्या प्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

.....2डब्ल्यू 5 ...

अशुद्धीरित प्रत / अशुद्धीरित नाही

(नियम 93 अन्वये मा. गृह राज्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनानंतर..)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या निवेदनासंदर्भात वा या विषयासंबंधात माझे अगदी थोडेच प्रश्न आहेत. पण एकाच वेळी जास्त प्रश्न विचारले तर ते माननीय मंत्र्यांच्या लक्षात रहात नाहीत. त्यामुळे आता आम्हालाच या ठिकाणी प्रश्न कसे विचारायचे हा प्रश्न पडला आहे. असो.

सभापती महोदय, आपण स्वत: हे निवेदन वाचले असेल तर आपल्याला समजून येईल की, यातून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. त्यामध्ये हा जो शेंडे आहे, तो पहाटे 4 वाजता पाणी भरायला गेल्यावर तेथे त्याचा एका महिलेशी वाद झाला आहे असे म्हटले आहे. पण आमच्या माहिती प्रमाणे या इसमाचा दारूचा धंदा आहे आणि आपल्या बायकोला न पाठविता तो स्वत: त्या ठिकाणी पाणी भरण्यास गेला होता वा पाणी भरत होता हे म्हणणे पटत नाही, या म्हणण्यावर कोण विश्वास ठेवील ? निवेदनात म्हटले आहे की, एफआयआर मधील आरोपी श्री. शंकर शेंडे हा फरार होता पण नंतर म्हटले आहे की, तो हॉस्पिटलमध्ये आहे. आणि अधिक माहिती अशी दिली आहे की, या महिला त्याचेविरूद्ध तक्रार करण्यास पोलीस ठाण्यावर गेल्या असता त्यांची तक्रार न घेतल्यामुळेच हा पहाटे प्रसंग परत घडला आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .....एक्सएक्स 1 ..--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आणि म्हणून हा आरोपी फरारी आहे. या सर्व परिस्थितीमध्ये हे प्रकरण आपण सी.आय.डी. कडे चौकशीसाठी सोपवावे अशी विनंती आहे. आणि या आरोपींवर योग्य ती कारवाई करावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 11 तारखेला घटना घडली, त्यासंबंधी दोन गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामध्ये एका आरोपीला अटक केली आहे. शंकर शेंडे हा पळून गेला. त्याच्या घरी पोलीसांनी रात्री छापा घातला तेव्हा तो मिळाला नव्हता. सकाळी जेव्हा या सातपुते बाई नळावर पाणी भरीत असतांना त्याने अश्लिल वर्तन केले. त्याबद्दल लोकांनी त्याला मारहाण केली म्हणून तो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. त्याठिकाणी पोलीस बंदोबस्तासाठी ठेवण्यात आला आहे. शंकर शेंडेला हॉस्पिटलमधून सोडल्यानंतर ताबडतोब अटक केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वस्तीशाळा शिक्षकांच्या मानधनात वाढ न करणे.

मु.शी.: वस्तीशाळा शिक्षकांच्या मानधनात वाढ न करणे याबाबत श्री.रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यां-ी दिलेली नियम 93 अ-वये सूच-ा.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, श्री.रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर,डॉ. अशोक मोडक, वि.प.स यां□ "वस्तीशाळा शिक्षकांच्या मानधनात वाढ न करणे." या विषयावर □ियम 93 अ□ये जी सूच□ दिली होती, तिला अ□ुल□ू□, आप□ □देश दिल्याप्रमा□ मला □वेद□ □रावयाचे आहे. □वेद□च्या प्रती सदस्यां□ अ□दरच वितरीत □लेल्या असल्या□मी हे □वेद□सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : □वेद□सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील वस्ती शाळांवर काम करणाऱ्या शिक्षकांचा प्रश्न आहे.या संदर्भात मंत्री महोदयांबरोबर सविस्तर चर्चा झाली आहे. या निवेदनाच्या माध्यमातून दोन प्रश्न विचारतो. पहिल्या प्रश्नामध्ये दोन मुद्दे मांडतो. या वस्ती शाळा स्वयंसेवकांना आपण 23 जुलै 2005 ला 500 रुपये वाढ दिली, ती गेली 8 महिने मिळाली नाही त्यामुळे ते अत्यंत नाराज झाले. त्याकरिता त्यांनी आंदोलन केले होते, आपण विनंती केल्यानंतर त्यांनी आंदोलन रद्द केले. तेव्हा ते पैसे तातडीने देण्याची व्यवस्था करणार काय? तसेच, त्यांना डी.एड. प्रवेशासाठी 30 जून 2000 ची अट घालण्यात आली त्या अटीमध्ये ते बसत नसले तरी सुध्दा वर्षानुवर्षे हे काम करणारे शिक्षक असल्यामुळे त्यांना पत्रव्दारा प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण अट शिथिल करुन या वस्ती शाळांतील शिक्षकांना पत्रव्दारा डी.एड. प्रवेशासाठी पात्र धरणार काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, याबाबत मार्चच्या अधिवेशनापर्यंत वाट न पहाता माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांशी बोलणी करुन त्यांना कॉटिजन्सी फंडामधून पैसे देण्याचा प्रयत्न करु. माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न हा नाजुक स्वरुपाचा आहे. त्याबाबत केंद्र सरकारचे निकष ठरलेले असल्यामुळे त्यासंबंधी सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :अतिवृष्टीमुळे शेळया-मेंढयांवर संसर्गजन्य रोगांचा झालेला प्रादुर्भाव.

मु.शी. : अतिवृष्टीमुळे शेळया-मेंढयांवर संसर्गजन्य रोगांचा झालेला प्रादुर्भाव याबाबत श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. प्रकाश (अण्णा) शेंडगे, श्री. नितीन गडकरी,श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "अतिवृष्टीमुळे शेळया-मेंढयांवर संसर्गजन्य रोगांचा झालेला प्रादुर्भाव "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रामधील ज्या भागामध्ये अतिवृष्टीने थैमान घातले त्या भागातील विशेषत: सातारा, पुणे, दौंड, सांगली, अहमदनगर जिल्हयातील शेळया व मेंढयांवर जरंब, पेपी, पीपीआर, निलजिव्हा व कुचकी या रोगाचा प्रादुर्भाव झाला. त्यामध्ये हजारो मेंढया मृत्युमुखी पडल्या. या शेळया-मेंढया मरायला लागल्या तेव्हा मेंढपाळ बांधव पशुसंवर्धन अधिकाऱ्यांकडे याबाबतची लस मागण्यासाठी गेले. त्यावेळी आमच्याकडे लस नाही व आम्हाला आदेश नाहीत असे त्यांनी सांगितले. तसेच, तहसिलदारांचे पंचनामे करण्याचे आदेश नव्हते. त्यानंतर आपण वैयक्तिकरित्या शिष्टमंडळ घेऊन गेल्यानंतर त्यांनी लसीकरणाचे व पंचनामे करण्याचे आदेश काढले. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, मेंढी व शेळी मृत्युमुखी पडल्या आहेत. त्यासाठी अडीच हजार रुपये देण्याबाबत मागणी केली आहे. आपण उत्तरामध्ये प्रती शेळी 125 रुपये देण्यात येतील असे सांगितले. आणि माननीय सहकार मंत्र्यांनी 125 रुपयांचे 250 रुपये करण्यात येतील असे सांगितले. माझे असे म्हणणे आहे की, 250 रुपयांमध्ये चामडे सुध्दा विकत मिळत नाही. ही मदत आणण्यासाठी गाडी खर्च सुध्दा त्यामधून निघणार नाही. ही मदत देऊन आपण आमची थट्टा क रु नका. प्रत्येक शेळी-मेंढीमागे अडीच हजार रुपये देण्याची विनंती आपण मान्य करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे घटसर्प, पी.पी.आर. निलजिव्हा या रोगांमुळे 4038 शेळया पुणे, सांगली व अहमदनगरमध्ये मृत्युमुखी पडल्या. त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाचे स्थायी आदेश नाहीत. परंतु अतिवृष्टी व पावसामुळे शेळया-मेंढया वाहून गेले आहेत त्यामध्ये 250 रुपये प्रत्येक शेळीमागे मदत देण्याचे आदेश काढले आहेत त्याप्रमाणे आपण मदत देत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई व राज्यातील धर्मादाय रुग्णलयाच्या व्यवस्थापनाने गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत उपचार न करणे.

मु.शी. : मुंबई व राज्यातील धर्मादाय रुग्णलयाच्या व्यवस्थापनाने गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत उपचार न करणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण, व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण,पशुसंवर्धन,दुग्धविकास,मत्स्योद्योग,औकाफ, विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण व इतर यांनी मुंबई व राज्यातील धर्मादाय रुग्णलयाच्या व्यवस्थापनाने गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना मोफत उपचार न करणे".या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन सादर करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--- (यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. आपण जसलोक रुग्णालयाला केव्हा नोटीस दिली आणि त्यांनी त्याला उत्तर का दिले नाही ? मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जी समिती केलेली आहे. तर याबाबतीत समितीने अमुक इतक्या वेळेमध्ये रिपोर्ट द्यावा असे न्यायालयाने टाईमलिमिट घालून दिलेले आहे का ? या समितीचा अहवाल केव्हा येणार आहे आणि त्याबाबतीत केव्हा कार्यवाही सुरु होणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या विषयावर सदनामध्ये बरीच चर्चा झाली होती. मुंबई आणि संपूर्ण राज्यातील जी मोठमोठी हॉस्पिटल्स् आहेत. त्यांना आपण सवलतीच्या दराने जागा दिलेली आहे. पाणी पुरवठयामध्ये, वीज पुरवठयामध्ये सवलत दिलेली आहे. एफ.एस.आय.मध्ये सवलत दिली आहे. एवढया सवलती दिल्यानंतर शासनाने अशी अट घातली की, या रुग्णालयांनी 10 टक्के गरीब रुग्णांना औषधोपचार करावयास पाहिजे. ज्यावेळेला धर्मदाय आयुक्तांनी या सर्व हॉस्पिटल्स्ची पाहणी केली, तेव्हा अनेक हॉस्पिटल्स् गरीबांवर उपचार करीत नाहीत असे दिसून आले. म्हणून लिलावती, भाटिया, जसलोक या हॉस्पिटल्स्नां धर्मादाय आयुक्तांनी नोटीस दिल्या. दरम्यान उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झाली. त्यानंतर कोर्टाने अनेक वेळा सुनावणी घेतली आणि कोर्ट या मतापर्यंत आले की, त्यांनी धर्मदाय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली 12 जणांची एक कमिटी नेमली. त्यांना प्रोग्रॅम दिला आणि आता दोन गोष्टींमध्ये अडलेले आहे की, हे रुग्ण कोणी निवडावयाचे ? आमचे असे म्हणणे आहे की, शासकीय हॉस्पिटलमध्ये जे रुग्ण येतील, त्यांना आम्ही तेथे पाठवू आणि हॉस्पिटल्स्चे असे म्हणणे आहे की, आम्ही रुग्ण निवडणार. पण त्यावर आमचा विश्वास नाही. हॉस्पिटल्स्चे असे म्हणणे आहे की, ऑपरेशनसाठी जे साहित्य लागते ते रुग्णांनी आणले पाहिजे, आम्ही औषधे देऊ. आमचे असे म्हणणे आहे की, 10 टक्के गरीबांना सर्व सेवा दिली पाहिजे. तेव्हा याचा निर्णय झाल्यानंतर हॉस्पिटल्स्नां आम्ही दहा टक्के रुग्णांना मोफत औषधे देण्याच्या बाबतीत निश्चितपणे भाग पाडू.

. . . .2 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: रायगड जिल्हयाचे उरण तालुक्यातील ओ.एन. जी.सी.च्या जुन्या पाईप लाईन काढून नवीन पाईप लाईन टाकण्याची आवश्यकता.

मु.शी.: रायगड जिल्हयाचे उरण तालुक्यातील ओ.एन. जी.सी.च्या जुन्या पाईप लाईन काढून नवीन पाईप लाईन टाकण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री.जयंत प्र.पाटील,शरद पाटील व अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री.जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील व अनंत तरे यांनी "रायगड जिल्हयाचे उरण तालुक्यातील ओ.एन.जी.सी. च्या जुन्या पाईप लाईन काढून नवीन पाईप लाईन टाकण्याची आवश्यकता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ओ.एन.जी.सी.) उरण यांनी जुनी पाईप लाईन काढून टाकून नवीन पाईप लाईन टाकण्याचे नियोजन केले आहे. या कामाला मंजूरी दिलेली आहे. पण तेथील शेतकरी जमीन देण्यास तयार नाहीत. म्हणून माझा माननीय मंत्री महोदयांना एकच प्रश्न आहे की, कलेक्टरनी तेथील लोकप्रतिनिधी आणि शेतकरी यांची बैठक घेण्याच्या बाबतीत आदेश देणार आहात का ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारचे आदेश दिले जातील आणि पुढच्या आठवडयात अशी बैठक घेण्याच्या सूचना देऊ.

. . . .2 वाय-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: उल्हासनगर शहरात दि.21 नोव्हेंबर 2005 पासून
अनधिकृत बांधकामाविरुध्द सुरु असलेली निष्कासनाची

कारवाई.

मु.शी : उल्हासनगर शहरात दि.21 नोव्हेंबर 2005 पासून अनधिकृत बांधकामाविरुध्द सुरु असलेली निष्कासनाची कारवाई याबाबत सर्वश्री.गुरुमुख जगवानी,पांडुरंग फुंडकर, संजय दत्त, रामनाथ मोते,श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री.अनंत तरे, कन्हैयालाल गिडवाणी,नितीन गडकरी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुमुख जगवानी (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"उल्हासनगर शहरात दिनांक 21 नोव्हेंबर 2005 पासून अनधिकृत बांधकामाविरुध्द सुरु असलेली निष्कासनाची कारवाई, त्यामुळे हजारोंच्या संख्येने नागरिक बेघर होण्याची आलेली पाळी, बरीचशी बांधकामे उद्योगधंद्याशी निगडीत असल्याने मोठया प्रमाणावर बेकारीचे उद्‌भवणारे संकट, शहरातील कुटुंबव्यवस्था कोलमडून पडण्याच्या शक्यतेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावली मध्ये सुधारणा करुन अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी दंड आकारणी करणेबाबत महापालिकेने ठराव पारित करुन शासनाकडे मान्यतेसाठी पाठविल्यानंतरही त्यावरील निर्णयास विलंब होणे व परिणामी सामान्य जनतेवर विस्थापित होण्याचा आलेला दुर्दैवी प्रसंग, यामधून मार्ग काढण्यासाठी न्यायालयीन निर्णयाचा योग्य तो आदर राखून, शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने न्यायालयीन निर्णय व उद्‌भवणारी गंभीर परिस्थिती यामध्ये सुवर्णमध्य साधून करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्य पटलावर ठेवतो.

15-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) YY-5
APR/SBT/MHM 14:35

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) YY-6

APR/SBT/MHM 14:35

श्री गुरुमुख जगवानी : सभापति महोदय, यह कैसा इंसाफ है कि करें कोई और भरे कोई ? मैं इस लक्षवेधी के माध्यम से मंत्री महोदय का ध्यान एक गंभीर समस्या की ओर दिलाना चाहता हूं और इंसाफ की मांग करता हूं. इस देश को 1947 में आजादी मिली. आजादी मिलने के बाद सिंधी भाइयों ने महात्मा गांधी की एक आवाज पर भारत माता की गोद में शरण ली. उस वक्त

सिंधी भाइयों को उल्हासनगर में 1300 वर्ग किलोमीटर के एरिया में शरणार्थी कैंप में 10x10 की जगह दी गई. उस समय सिंधी भाइयों की संख्या 94 हजार थी. इतिहास गवाह है कि उन्होंने अपनी मेहनत से अपना मकाम खुद बनाया. जहां भी वे रहे शांति से रहे. 1960 में सिंधी भाइयों को उल्हासनगर में सनद मिली ली और इस तरह से 1960 में उल्हास नगर की स्थापना हुई. उसके बाद उल्हासनगर में रहने के लिए आने वालों की संख्या में वृध्दि होती गई. 1974 में डेवेलपमेंट प्लान किया गया. शासन की ओर से वहां की नगरपालिका को एक डेवेलपमेंट प्लान दिया गया था. इस डेवेलपमेंट प्लान के अन्तर्गत 587 हेक्टर जगह दी गइ थी. लेकिन उसके बाद आज तक कोई भी डेवेलपमेंट प्लान नहीं आया. जबकि नियमानुसार हर 10 साल बाद डेवेलपमेंट प्लान करना चाहिए था. इसलिए मैं यह जानना चाहता हूं कि इन 30 सालों में हर दस साल बाद डेवेलपमेंट प्लान क्यों नहीं बनाया गया ? एक डेवेलपमेंट प्लान की मुद्दत खत्म होने के बाद जब दूसरा डेवेलपमेंट प्लान आता है तो पहले वाला डेवेलपमेंट प्लान लेप्स हो जाता है. आज उल्हासनगर मिनी जापान के नाम से जाना जाता है. आज उल्हासनगर की जनसंख्या 8 लाख तक पहुंच गई है. बड़ी संख्या में बाहर से लोग यहां आकर बसे हैं. आज उल्हास नगर में 5,500 लघु उद्योग हैं, हजारों व्यापारिक प्रतिष्ठान हैं. उच्च न्यायालय ने उल्हासनगर के करीब 855 निर्माण कार्य को अवैध ठहराया है और निष्कासन की कार्रवाई करने का आदेश दिया है. अगर यह निष्कासन की कार्रवाई होगी तो करीब 1 लाख से ज्यादा लोग बेघर हो जाएंगे, जबकि माननीय मंत्री जी का कहना है कि 30 हजार लोग ही बेघर होंगे. करीब 2000 से 2500 करोड़ रुपये की सम्पत्ति का नुकसान होगा. इसलिए मैं इस सिलसिले में यह कहना चाहता हूं कि ये अवैध निर्माण कार्य कोई एक दिन में नहीं हुए हैं. 1984-2000 के बीच हुए हैं. उस समय क्या प्रशासन सो रहा था ? अखबारों में भी अवैध निर्माण कार्य के बारे में जानकारी दी जाती रही थी. इसके बावजूद शासन की तरफ से कोई कार्रवाई नहीं की गई. वहां के अधिकारी इन अवैध निर्माण कार्यो को

...7

श्री गुरुमुख जगवानी .....

देखते रहे और कोई कार्रवाई न करते हुए घूम कर वापस आते रहे. जिस वक्त ये अवैध निर्माण कार्य हो रहे थे, उसी वक्त अगर कार्रवाई की गई होती तो आज यह परिस्थिति पैदा नहीं होती. ये इमारतें 35 साल, 30 साल, 25 साल पहले बनाई गई हैं. जब ये इमारते अवैध है तो क्यों इन इमारतों में रहने वालों की तरफ से कर वसूल किया जाता रहा है, इन इमारतों का रजिस्ट्रेशन क्यों किया गया और इन इमारतों का कन्वॅन्स डीड कैसे किया गया ? मुंबई में अवैध झोपड़ियों के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खिलाफ कार्रवाई की जाती है तो उसके विरोध में आवाज उठायी जाती है लेकिन उल्हासनगर में जब इन पक्की इमारतों के विरुध्द निष्कासन की कार्रवाई हो रही है तो कोई आवाज नहीं उठायी गई. 1947 से लोग यहां पर रह रहे हैं. ऐसे 1 लाख लोगों को बेघर किया जा रहा है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि जैसे मुंबई में झोपड़पट्टी पुनर्वास योजना के तहत 2.5 एफएस.आय. की योजना बनाकर झोपड़पट्टी में रहने वालों लोगों को बसाया जाता है, उसी प्रकार से क्या इन लोगों के लिए भी इसी प्रकार की कोई योजना बनाकर न्याय दिया जाएगा, क्या डेवेलपमेंट कंट्रोल रुल बनाकर उन लोगों न्याय दिया जाएगा ?

. . . यानंतर श्री किल्लेदार

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे. शेवटी त्यांनी बांधकाम नियमित करण्याच्यादृष्टीने शासन कारवाई करेल काय असे विचारले. मी एवढेच सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी जी भावना व्यक्त केली ती निश्चितच अतिशय महत्वाची आहे. खरोखरच संपूर्ण उल्हासनगरमधील सामान्य लोकांमध्ये जरुर भयभीत वातावरण आहे. अनेक वर्षे त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेली आहे. त्यामध्ये निश्चित कंट्रोल नसल्यामुळे अशा प्रकारच्या अनधिकृत इमारती झालेल्या आहेत. त्यामुळे आज हायकोर्टाने एप्रिल 2005 मध्ये 855 अनधिकृत इमारती निष्कासित करण्याची कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. या इमारती निष्कासित करण्याच्या सबंधात हायकोर्ट मॉनिटरींग करीत आहे. यासाठी पोलीस कमी पडले तर डी.जीं.नी पोलीस पुरवावेत, अशा प्रकारच्या कोर्टाने सूचना केलेल्या आहेत. या सगळया बाबी लक्षात घेता, सभागृहाच्या भावना लक्षात घेता, आपण जर यामध्ये काही केले तर हायकोर्टाचा अवमान होईल अशी परिस्थिती आहे. ही परिस्थिती गंभीर आहे. या परिस्थितीचा विचार करता, सभागृहाच्या भावनांचा विचार करता, हायकोर्टाचा निकाल लक्षात घेता, हायकोर्टाच्या आदेशाचा आदर राखून, सगळया गोष्टी लक्षात घ्याव्या लागणार आहेत. कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी अलिकडच्या काळात महानगरपालिकेचा प्रस्ताव आलेला आहे. डी.सी.आर.मध्ये बदल करण्याच्या संबंधात..नगररचना कायद्याच्या संबंधात विधी व न्याय खात्याचे मत घेऊन एका महिन्यात निर्णय घेण्याचा जरुर प्रयत्न केला जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नगरविकास खाच्याच्या संबंधात ही लक्षवेधी आलेली आहे. तेथील परिस्थिती गंभीर आहे. त्या ठिकाणचे विस्थापित झालेले लोक सिंध प्रांतातून येथे आलेले आहेत. आपल्या सरकारने विशेष बाब म्हणून त्यांना उल्हासनगरमध्ये जागा दिली. त्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य झाले. सभापती महोदय, आता 47-48 वर्षानंतर त्यांच्यावर पुन्हा विस्थापित होण्याची पाळी आलेली आहे. मंत्री महोदय सांगतात की, सदरहू प्रकरण कोर्टामध्ये आहे. कोर्टाचा विशेष सन्मान राखून निर्देश द्यावे लागतात. कोर्टाच्या निर्देशाप्रमाणे पोलीस बंदोबस्त देत आहोत. यामुळे...

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फंडकर..

सभापती महोदय, लाखो लोक बेघर होणार आहेत. या ठिकाणी सात हजार बिल्डिंग आहेत, असे म्हटले आहे. पण याच्यापेक्षा तेथे जास्त बिल्डिंग्स् आहेत. लाखो लोक बेघर होणार आहेत. ही वसाहत ज्या वेळेला तेथे वसली त्यावेळेला तेथे नगर प्रशासन होते. या नगर प्रशासनाने कुठल्याही पध्दतीचा प्लॅन न करता अवैध बांधकामाला परवानगी दिल्यामुळे ही बांधकामे उभी राहिली. ही परवानगी दिली नसती, वेळीच हे रोखले असते तर ही पाळी आली नसती. पण ही परवानगी देण्यात आली. त्यानंतर त्याची चौकशी झाली. माझ्या जवळ ॲन्टी करप्शन ब्युरोचा रिपोर्ट आहे. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. त्या अहवालात असे म्हटले आहे की, "अनधिकृत इमारती बांधकामासाठी उल्हासनगर नगरपालिकेचे तत्कालीन नगराध्यक्ष गुन्हा नोंद क्रमांक 201/96, 202/96 गुन्हयातील आरोपी श्री. पप्पू ऊर्फ कलानी हे संबंधित बिल्डर यांचे कडे प्रति चौ.फू. 30 रुपये या प्रमाणे बेकायदेशीर पैसे घेऊन सदर बिल्डरला संरक्षण देत होते." ॲन्टी करप्शन ब्युरोच्या रिपोर्टमध्ये असे म्हटलेले आहे. हे आमचे म्हणणे नाही. तसेच त्यानंतर नगराध्यक्ष झालेल्या त्यांच्या पत्नी श्रीमती ज्योती कलानी या देखील अशा प्रकारे संबंधित बिल्डरकडून पैसा घेत होत्या. उल्हासनगरमध्ये अनधिकृत बांधकामे करतांना संबंधित बिल्डर नगरपालिकांकडून कोणतीही परवानगी न घेता किंवा केवळ घर दुरुस्तीसाठी परवानगी मिळण्याकरिता नगरपालिकेला अर्ज करुन त्या आधारे अनधिकृत बांधकाम करीत होत्या." सभापती महोदय, स्पष्ट म्हटलेले आहे. बिल्डरकडून लाखो रुपये घेतले गेले आणि त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे करण्यात आली. ज्याला घर नाही, जो उपाशी आहे.शेवटी काहीही करुन त्याला आपले घर व्हावेसे वाटते यापोटी त्याने ते पैसे दिले आणि आपले घर त्या ठिकाणी उभे केले. आणि आता ती घरे पाडली जात आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, उल्हासनगरमधील रहिवासी, उद्योजक विस्थापित आहे. तो सिंध प्रांतातून आलेला आहे. त्या ठिकाणी सरकारने त्यांना स्पेशल जागा दिलेली आहे. त्या जागेचे नीट प्लॅनिंग झालेले नव्हते. नगरपरिषदेचा पूर्वीचा कायदा आहे. या ठिकाणी आम्ही विचारले की, यामध्ये सुधारित नियंत्रण नियमावलीमध्ये काही दुरुस्त्या करता येतील काय? याबाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, उल्हासनगरसाठी स्पेशल, खास बाब म्हणून इतर नियमावली, इतर महापालिकासाठी जी नियमावली असेल ती बाजूला ठेवून महापालिकेने प्रस्ताव

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

केल्याप्रमाणे नियमावलीत दुरुस्ती करण्यात यावी. ज्यांच्यामुळे हे लोक बेघर होत आहेत. ज्यांच्यामुळे या निर्वासितांचे लाखो रुपये बरबाद झालेले आहेत अशा माणसावर शासन काही कारवाई करणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिक्राणी जी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्या अनधिकृत बांधकामाच्या दृष्टीने शासनाने नंदलाल समिती नेमली होती. त्या समितीने शासनाला अहवाल दिलेला आहे. त्या अहवालामध्ये ज्या शिफारशी आहेत आणि त्यामध्ये जे अधिकारीवर्ग, पदाधिकारीवर्ग दोषी धरलेले आहेत त्याबाबतीत मी मुद्दाम सभागृहाला सांगू इच्छितो की, एकूण 79 अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द कारवाई सुरु आहे. या ठिकाणी 14 अधिकारी प्रतिनियुक्तीवर होते त्यामुळे त्या त्या विभागाच्या माध्यमातून त्यांची डी.ओ. चालू आहे. 83 अधिकारी-कर्मचारी महापालिकेचे होते त्यांचीही डी.ओ. चालू आहे. या डी.ओ.चे जे रिपोर्टस् येतील त्या अनुषंगाने निश्चित प्रकारे कारवाई करण्यात येईल. या ठिक्राणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी ज्यांनी पैसे घेतले त्या नगराध्यक्षांच्या संदर्भात काय कारवाई केली अशी विचारणा केलेली आहे. त्याबाबत देखील शासन स्तरावर कारण शेवटी लोकप्रनिधीवर जर कारवाई करावयाची असेल तर शासन स्तरावर शासनाची परवानगी कायद्याप्रमाणे आवश्यक असते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कशासाठी परवानगी पाहिजे ?

(गोंधळ)

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माझे म्हणणे सदस्यांनी ऐकून घ्यावे.

यानंतर श्री. खर्चे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नोंदी

लक्षवेधी सूचना क्र. 1 ..... श्री. राजेश टोपे .....

कोणत्याही प्रकारचे हेत्वारोप न करता कृपया सन्माननीय सदस्यांनी प्रथम उत्तर ऐकून घ्यावे. यासंबधी कारवाई करण्याबाबत जी प्रोसेस आहे ती शासनामार्फत सुरुच आहे. अशी परवानगी घेतल्यानंतर जी कारवाई आवश्यक आहे ती केली जाईल.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया लक्षात घ्यावे की, यासंदर्भात योग्य ती कारवाई शासन करीत आहे, पण प्रथम त्या प्रकरणाची चौकशी पूर्ण होणे आवश्यक आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, हे शासन कुठली कारवाई करणार हे कागदपत्रांवरुन दिसूनच येते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अँटी करप्शन ब्युरोचा जो अहवाल वाचून दाखविला त्यातील निष्कर्ष मी आता वाचून दाखवितो. त्यातील प्रकरण क्र. 3 मध्ये असे म्हटले आहे की, "उल्हासनगर येथील महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा तसेच सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या भूखंडांवर हजारो अनधिकृत इमारती उभारण्यात आलेल्या आहेत. उल्हासनगर येथील महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे भूखंड बिल्डर्स आणि इतर व्यक्तींनी बोगस कन्हेयन्स डीडच्या आधारे बळकाविले आहेत. उदाहरण म्हणून द्यावयाचे झाले तर प्लॉट क्र. 705 उल्हासनगर हा भूखंड बनावट कन्हेयन्स डीडद्वारे बळकाविण्यात आलेला आहे. तसेच अनधिकृत इमारती बांधण्यासाठी नगराध्यक्ष हे प्रति चौरस फूट 30 रुपये प्रमाणे बेकाययदेशीरपणे पैसे घेऊन संबंधित बिल्डर्स यांना न्यायालयात दावा दाखल करण्याबाबत सुचवितात. त्याप्रमाणे संबंधित बिल्डर्स न्यायालयात दावा दाखल करतात. नगरपालिकेचे विधि अधिकारी व मुख्याधिकारी दावा दाखल आहे, या सबबीखाली संबंधित बिल्डर्सविरुध्द कारवाई करीत नाही. जरी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांचा निकाल नगरपालिकेच्या बाजूने झालेला असला तरी संबंधित बिल्डर्सविरुध्द नगरपालिकेतील अधिकाऱ्यांकडून कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही. तत्कालीन नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, विधि अधिकारी तसेच प्रशासक कार्यालय उल्हासनगर वसाहत येथील अधिकाऱ्यांचे संबंधित बांधकाम करणारे विकासक व प्लॉट हडप करणाऱ्या व्यक्ती यांच्याबरोबर बेकायदेशीर संगनमत आहे. अशा प्रकारे ही सर्व मिली-जुली या ठिकाणी चालू आहे. अँटी करप्शन ब्युरोने उल्हासनगर नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रामध्ये वर नमूद करण्यात आलेल्या अनियमित बाबींमध्ये सत्यता आहे असे नमूद केलेले आहे. नंदलाल समितीच्या अहवालानुसार

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

शासनाने या संदर्भात काय लक्ष घातलेले आहे, किती दिवसांपुर्वी आपल्याकडे नंदलाल समितीने अहवाल दिलेला आहे ? लोकप्रतिनिधींवर कारवाई करण्यासाठी आपल्याला कोणाची परवानगी घ्यावी लागते ? आणि अशी परवानगी लागत असेल तर मग करोडो रुपयांची माया जमविणाऱ्या अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या विरुध्द कारवाई करण्यासाठी परवानगी का देत नाहीत ? सभापती महोदय, हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. अँटी करप्शन ब्युरोच्या अहवालानुसार ज्या लोकांनी करोडो रुपये या अनधिकृत बांधकामातून कमाविले त्या सर्व भ्रष्ट अधिकाऱ्यांना शासन पाठीशी घालत आहे अशा लोकांवर कारवाई कधी करणार आहे ? नंदलाल समितीच्या अहवालानुसार तसेच अँटी करप्शन ब्युरोच्या अहवालानुसार ज्या लाखो लोकांना फसविले आहे, प्रोटेक्शन मनीच्या नांवाखाली करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे, उल्हासनगरचा सत्यानाश केला आहे, त्यांच्यावर शासन केंव्हा कारवाई करणार आहे ? तसेच याबाबत उच्च न्यायालयात केस दाखल करण्यात आली आहे. You have no right to find any way out. The matter is sub-judice. The Hon. High Court has issued the order. You have no authority to change the order. कोणत्या आधारावर आपण यामध्ये बदल करु शकता, उच्च न्यायालयाने हे फेटाळून लावले आहे म्हणून माझा प्रश्न आहे की हा पप्पू कलानी आणि त्यांचे सहकारी यांनी अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम करण्यास प्रोत्साहन दिले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

हे पाप सरकारच्या आशीर्वादाने केलेले आहे. म्हणून याचे परिमार्जन करावयाचे असेल तर उल्हासनगरच्या भागामध्ये वेगळी 400-500 हेक्टर जागा घ्या. या ठिकाणी मिलिट्रीचा कॅम्प होता त्यासाठी आपण तेथे टेनामेंट बांधल्या होत्या. पाकिस्तानमधून जे निर्वासित होवून आले होते त्यांना या ठिकाणी जागा देण्यात आल्या होत्या परंतु त्यानंतर त्यांच्या संरक्षणासाठी, आपल्या मार्गदर्शनाखाली हा सगळा अत्याचार जोरात सुरु आहे. त्यामुळे या लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता प्रचलित कायद्यात जे नियम आहेत त्याप्रमाणे यातून मार्ग निघू शकत नाही. मला फक्त हा प्रश्न पडलेला आहे की, उल्हासनगरच्या संदर्भात हायकोर्टाने जे जजमेंट दिले ते जजमेंट दिलेले आहे तसेच जजमेंट वसई, विरार, ठाणें जिल्हयाला लागले तर करोड़ो लोग उध्वस्त होतील. किती बंगले पडतील हे सांगता येत नाही. या ठिकाणचे पाप तेथील अधिका-यांनी आणि लोकप्रतिनिधींनी केले असले तरी महाराष्ट्र सरकारचे मूक समर्थन हे त्याला कारणीभूत आहे. म्हणून या पापाचे परिमार्जन करण्याकरिता नियमाचा पूर्ण उपयोग करुन याठिकाणी जी दलित, पीडित, शोषित जनता, निर्वासित आहेत त्यांच्या पुनर्वसनाकरिता एक वेगळी जागा घेवून त्या ठिकाणी किंवा अन्य कुठला मार्ग असेल, हे कायद्यामध्ये बदल करुन करता येईल असे काही शक्य होणार नाही. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी जे बोलले ते बोलण्याच्या अगोदर त्यांनी विधी विभागाचे मत घेतले होते काय ? त्यांनी हे बोलण्यापूर्वी ॲडव्होकेट जनरलचे मत घेतले होते काय ? काही तरी सारवा सारव करुन आमचे समाधान करु नका. यामध्ये मंत्री महोदयांचा काही संबंध नाही असे असतांना ते तुम्ही याची जबाबदारी का घेत आहेत ? मंत्री महोदय, अतिशय स्वच्छ आहेत हे आम्हाला माहिती आहे. त्यामुळे या फालतू भानगडीत आपण पडू नका. तुमच्या वरचे जे बॉस आहेत त्यांना हे पाहू द्या की, या संदर्भात काय करायचे? या पापामध्ये आपण कारण नसताना आपला हात घाण करण्याची आवश्यकता नाही. कायदेशिररीत्या जे सरळ उत्तर आहे ते तुमच्याकडून अपेक्षित आहे. म्हणून माझे दोन प्रश्न आहे. पुनर्वसनाची योजना कशी कराल आणि नंदलाल कमेटी आणि ॲन्टी करप्शन ब्यूरोच्या अहवालानुसार जे लोक लोकप्रतिनिधी याला जबाबदार आहेत. त्यांच्यावर आपण केव्हा कारवाई करणार आहात?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते उल्हासनगर महापालिकेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. लॉंग टर्म प्लॅनिंगच्या दृष्टिकोनातून त्यांनी जे काही सांगितले, या ठिकाणी जे अनधिकृत इमारती आहेत त्या संदर्भात लोकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाची काय योजना आहे असे त्यांनी विचारले. या ठिकाणी महानगरपालिकेने सात गावे हद्दवाढीच्या दृष्टीकोनातून शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्या ठिकाणी म्हसरुळ, वरप, कांबे ,जावसई ,आले , जालंबी ,डिसोला अशी सात गावे आहेत, या हद्दवाढीच्या प्रस्तावाला शासनाच्या वतीने तपासून मंजुरी दिली तर हद्दवाढीच्या माध्यमातून हा एक प्रश्न.....

उप सभापती : रेकॉर्डवर चुकीचे येवू नये म्हणून मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, उल्हासनगर पालिकेमध्ये हद्दवाढ करुन मागण्याबाबत महापालिकेचा ठराव झाला होता ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्याला ठाणे जिल्हा परिषदेची एनओसी पाहिजे होती. त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारची हद्दवाढ करण्यास साफ नकार दिलेला आहे. हा शेवटी ग्रामपंचायतीचा ठराव आहे. ग्रामपंचायतीमध्ये ठराव होऊन तो जिल्हा परिषदेकडे यावयास पाहिजे होता. मला या भागाची संपूर्ण माहिती आहे कारण मी या भागाचे प्रतिनिधीत्व करतो. चूकीच्या दिशेने जाऊ नये. आपल्याकडे जर याबाबत चुकीची माहिती आली असेल तर ती येथल्या येथे दुरुस्त व्हावी यासाठी मी मध्ये हस्तक्षेप करुन वस्तुस्थिती सांगितलेली आहे. त्यामुळे हद्दवाढीचा जो मुद्दा आहे तो या ठिकाणी गैरलागू आहे असे मला वाटते.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिली असे मी म्हणालो नाही. हा प्रस्ताव महानगर पालिकेकडून शासनाकडे आलेला आहे. यावर शासन विचार करणार आहे. हद्दवाढ करण्याची जी पध्दत आहे ती आपल्याला काटेकोरपणे पाळावीच लागणार आहे. त्यामुळे यामध्ये आपल्याला शॉर्टकट करण्याचे काहीही कारण नाही. हद्दवाढ करण्याच्या सर्व पध्दतीचे पालन करुन मगच हद्दवाढ करण्याच्या संदर्भात शासन निर्णय करु शकणार आहे. हद्दवाढी बरोबर त्या ठिकाणी डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्याच्या कामाच्या संदर्भात शासनाने सूचना दिलेल्या आहेत व त्यामुळे या ठिकाणी डेव्हलपमेंट प्लॅन करण्याचे काम चालू आहे. सभापती महोदय, डेव्हलपमेंट प्लॅन करण्यामध्ये थोडा उशीर झालेला आहे. परंतु आता डेव्हलपमेंट प्लॅन करण्याची कार्यवाही चालू आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

त्यामुळे डेव्हलपमेंट प्लॅन असेल, हद्दवाढ असेल, हे सर्व लॉंग टर्म आणि परमनंट उपाय असू शकतील. या सर्व कार्यपध्दती बघून आपल्याला या प्रश्नावर मार्ग काढावा लागेल. सन्माननीय श्री.गडकरी यांनी सांगितले की, हाय कोर्टामध्ये मॅटर सबज्युडीस असल्यामुळे निर्णय घेता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. मी स्पष्टपणे सांगितले आहे की, हायकोर्टामध्ये हे मॅटर सबज्युडीस आहे. त्यामुळे न्यायालयाचा आदर राखणे हे आपले कर्तव्य आहे. न्यायालयाचा अवमान होणार नाही ही गोष्ट देखील शासन निश्चितपणे तपासणार आहे. तिथली परिस्थिती लक्षात घेऊन काही सगळया बाबी तपासून, कायदेशीर बाबी करता येईल का ? हे तपासून बघून शासन कारवाई करील अशा प्रकारची सूचना मी दिलेली आहे. हायकोर्टामध्ये मॅटर सबज्युडीस आहे याची माहिती शासनाला आहे. त्याचे गांभीर्य शासनाला आहे. तसेच नंदलाल समिती व लाचलुचपत विभागाने दिलेल्या अहवालावर कोणती कारवाई करण्यात येईल असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, विभागीय चौकशी प्रलंबित असली तरी .....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला शासनानकडून उत्तर मिळत नसेल तर मला स्वत:ला हायकोर्टात पी.एल.आय.दाखल करावी लागेल. 1998 मध्ये रिपोर्ट येऊनसुध्दा काहीही कारवाई होत नाही. अवैधरित्या पैसे घ्यायचे आणि गरीबांची फसवणूक करायची आणि त्यांनाच संरक्षण द्यायचे हे काय चालले आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मला उत्तर पूर्ण करण्यासाठी आपण संरक्षण द्यावे. सभागृहाचे म्हणणे लक्षात घेऊन काम करण्यास आम्ही तयार आहोत.

श्री.नितीन गडकरी : जे दोषी असतील त्यांच्या विरूध्द एक महिन्यामध्ये कडक कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट उत्तर आपण का देत नाही ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकरणी विभागीय चौकशी चालू आहे. विभागीय चौकशीचा अहवाल आल्यानंतर दोषींविरूध्द कारवाई करण्यासंबंधीची जी काही शिफारस करण्यात आली असेल त्याप्रमाणे कारवाई केली जाईल. यात शासन पाठीमागे पाहणार नाही. ज्यांना छोटयामोठया पेनल्टी लावण्यात आल्या असतील तर त्या पेक्षा अधिक कडक शासन कसे करता येईल याबाबत देखील शासन निश्चितपणाने कारवाई करेल. या प्रकरणामध्ये ज्यांनी चुका केल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

आहेत त्यांना शासन कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घालणार नाही. लाचलुचपत विभागाच्या अहवालासंबंधी प्रश्न विचारण्यात आला. लाचलुचपत विभागाच्या अहवालावरील कारवाई ही शासनस्तरावर, गृह विभागाकडे प्रलंबित आहे. त्याबाबत लवरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. आपण संरक्षण देणार नसाल तर मला हायकोर्टामध्ये पी.एल.आय.दाखल करावे लागेल. शासनाने समाधानकारक उत्तर दिले नाही तर हायकोर्टामध्ये जाण्यासाठी मी सुध्दा मागेपुढे पाहणार नाही. तरी पण माझी आपल्याला विनंती आहे. लाचलुचपत विभागाचा अहवाल आणि नंदलाल समितीचा अहवाल येऊन 5-6 वर्ष झालेली आहेत. हे शासन पारदर्शक आहे. या अहवालावर प्रभावशील आणि गतिशील चौकशी करीत आहे. 1974 सालापासून नगरविकास विभाग विकास आराखडा तयार करीत आहे. गतिशील असणारे शासन 31 वर्षापासून विकास आराखडा तयार करीत आहेत. टाऊन प्लानिंगचे जे अधिकारी आहेत, त्यांना हुतात्मा चौकामध्ये फासावर लटकवले पाहिजे. महाराष्ट्रामधील सर्व शहरांचा यांनी सत्यानाश केला आहे. 40 वर्ष, 31 वर्ष प्लान तयार होत नाही. त्यामुळे रिझर्व्हेशनला अर्थ रहात नाही. संशयाचा फायदा म्हणून मी असे विचारू इच्छितो की, 6 वर्षापासून विभागीय चौकशी सुरू आहे. यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करून शासन कोणाला पाठीशी घालणार नाही असे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले आहे. नंदलाल कमिटी आणि लाचलुचपत विभागाचा रिपोर्ट याचा आधार घेऊन तीन महिन्यामध्ये सगळी चौकशी पूर्ण करून त्यात जे दोषी आढळतील अशा अधिकारी व लोकप्रतिनिधींवर अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली फौजदारी कारवाई शासनातर्फे करण्यात येईल का ?

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, कारवाई करण्यात येईल.

श्री.कन्हैयालाल गिडवानी : सभापती महोदय, ही लक्षवेधी अतिशय महत्वाची आहे. हे सर्व एका दिवसामध्ये झालेले नाही. आता अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, या उल्हासनगर शहरातील अनधिकृत इमारतींमध्ये जवळपास 30 हजार लोक राहत आहेत असे निवेदनात म्हटले आहे. उल्हासनगर शहराची लोकसंख्या 8 लाख आहे. त्यातील 50 टक्के सिंधी समाज आणि 50 टक्के इतर समाज आहे. ऑक्सीजनवर असलेल्या माणसासारख्री तेथील लोकांची अवस्था झालेली आहे. केव्हाही काहीही काय होईल अशी तेथे परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याठिकाणी एकूण 855 अनधिकृत बांधकामे आहेत असे निवेदनात म्हटले आहे. आता उल्हासनगर शहराचे नाव अनधिकृत उल्हासनगर ठेवायला हरकत नाही. आज तेथे लोकांचा आणि लॉ ॲन्ड ऑर्डरचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने ताबडतोब कार्यवाही करावी. आता हे प्रकरण उच्च न्यायालयात आहे, पुढे ते सुप्रीम कोर्टात सुध्दा जाऊ शकते. जो डी.पी.प्लॅन आहे तो बऱ्याच दिवसांपासूनचा आहे. हे प्रकरण रेग्युलराईज करण्यासाठी एका स्पेशल ऑफीसरची नेमणूक करणार आहात काय ? आपण पंधरा दिवसांत यासंबधी अध्यादेश काढणार आहात काय ? नाही तर, दिनांक 30 रोजी मी माझ्या सदस्यत्वाचा राजीनामा माननीय सभापतींकडे देणार आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच यासंबंधी सविस्तर माहिती सांगितली होती. हे प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्यामुळे त्यावर निर्णय घेण्याचा किंवा काही भाष्य करण्याचा अधिकार आपल्याला नाही. तरी सुध्दा त्याठिकाणची प्राप्त परिस्थिती लक्षात घेता या प्रश्नावर मार्ग काढण्याच्या दृष्टीने या सर्व कायदेशीर बाबी तपासूनच पुढील कार्यवाही करणे शक्य होणार आहे. आपल्याला टाईम बाऊंड पिरियड सांगता येणार नाही. महानगरपालिकेकडून आलेल्या डी.सी.आर.चे अमेंडमेड व तद्नुषंगिक ज्या काही बाबी असतील त्या तपासून निर्णय घ्यावा लागेल. उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याचीही काळजी घ्यावी लागणार आहे. त्यासाठी विधी व न्याय विभागाचा तसेच टाऊन प्लॅनिंगचा सल्ला घ्यावा लागणार आहे. त्यांच्या सल्ल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून याठिकाणी सांगितले पाहिजे की, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, कार्यवाही करण्याकरिता विधानमंडळाची देखील परवानगी लागते. त्यांच्या म्हणण्यातून असे ध्वनित झाले की, पप्पू कलानीवरील जी कारवाई आहे ती विधिमंडळाने परवागनी दिली नाही म्हणून अडकली असा त्याचा अर्थ निघतो. मला पूर्ण विश्वास आहे की, विधानमंडळ असे कुठल्याप्रकारे काही थांबविणार नाही. तेव्हा त्याचा रेफरन्स येणे योग्य नाही. चुकून कोणती कागदपत्रे राहिली असतील तर माझी आपल्याला विनंती आहे की, या संदर्भात अशाप्रकारचा आधार होणे आणि ज्यांनी करोडो लोकांचे नुकसान केले अशा व्यक्तींच्या कारवाई करिता विधानमंडळ कुठे तरी अडकले आहे किंवा थांबले आहे असे बाहेर येणे उचित होणार नाही. तेव्हा यासंबंधीचा खुलासा केल्यास बरे होईल. सरकारला याचा आधार घेता येणार नाही. तेव्हा विधानमंडळाकडे असे काही प्रकरण असेल तर ते निकालात काढण्यात येईल. तेव्हा आपण यात कुठेही पार्टी बनू नये. आपल्यावर कोणत्याही प्रकारचे लांच्छन येऊ नये एवढेच मला म्हणावयाचे आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली आहे त्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, हा विषय खरोखरच आमच्याकडे प्रलंबित आहे की, नाही हे तपासून बघितले जाईल. मला वाटते ते प्रलंबित असण्याचे काही कारण नाही. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती देताना तसे सांगितले असेल, परंतु त्यामध्ये विधानमंडळाला दोष देण्याचा त्यांचा काही उद्देश नव्हता असे मला वाटते.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, विधानमंडळाकडे ते प्रलंबित आहे असे मी म्हटलेलेच नाही. मी क्लिअर सांगितले आहे की, शासन स्तरावर ते प्रलंबित आहे. विधानमंडळाची परवानगी मिळालेली आहे .

श्री.नितीन गडकरी : माझी माहिती अशी आहे की, या संदर्भात शासनाने विधानमंडळाला रेफरंस केला होता आणि विधानमंडळाकडे कागदोपत्री जर काही राहिले असेल तर विधानमंडळावर यातून काहीही लांच्छन येऊ नये. विधानमंडळ हे न्यायालयासारखे इन्स्टिटयुशन आहे. त्यामुळे रेफरंस प्रलंबित असेल तर ते ताबडतोब क्लिअर करण्यात यावे.

उपसभापती : या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे शासनाने विचारलेले कोणतेही रेफरंस विधानमंडळाकडे प्रलंबित असतील तर ते निश्चितपणाने उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी निकाली काढण्यात येतील.

श्री.अनंत तरे : महोदय, हा अतिशय गंभीर असा विषय आहे. न्यायालय आणि शासन हे न्याय देण्यासाठी आहे. तब्बल 30 हजार नागरिक त्या इमारतींमध्ये राहतात. त्यांची कोणत्याही प्रकारची चूक नसताना, त्यांना बेघर व्हावे लागत आहे. परवानगी नसताना ज्यांनी बांधकाम केलेले आहे, ते सुटलेले आहेत तसेच अधिकारीही सुटलेले आहेत. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, उल्हासनगरचा डी.सी.रुल प्राप्त झालेला आहे. महिन्याभरात त्यावर निर्णय घेणार आहोत याबाबत हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे, परंतु त्यामध्ये शासनाची कोठेही बाजू नाही. 30 हजार लोकांचे पुनर्वसन करण्याचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. 30 हजार नागरिक बेघर होत आहेत हे एक त्सुनामी सारखेच आक्रमण आहे. शासनाने यासंदर्भात स्वत: कोर्टात जावे असे मला वाटते. या ठिकाणी 186 प्लॉटवर इमारती झालेल्या आहेत बाकी खाजगी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे....

आहेत, त्यातील काही रेग्युलाईज करण्यासारख्या आहेत. त्यामुळे शासनाने स्वत: सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन सर्व तपासणी केल्याशिवाय कोणत्याही प्रकारची कार्यवाही करणार नाही असे शासन ठरविणार आहे काय ? शासन हायकोर्टाचा मान राखून सुप्रीम कोर्टात जाणार आहे काय ? त्या नागरिकांनी रस्त्यावर येऊ नये म्हणून शासन काही करणार आहे की नाही ? उल्हासनगरच्या डी.सी.रुलमध्ये चेंज करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला प्राप्त झालेला आहे. उल्हासनगरच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील बदल शासनाला पाठविला आहे. तो आपल्याला प्राप्त सुध्दा झालेला आहे त्यावर शासन निर्णय घेणार आहे. त्यामुळे तो निर्णय घेईपर्यंत शासन सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन हायकोर्टाच्या निर्णयावर स्थगिती आणणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, शासन या गंभीर विषयावर स्वस्थ बसून नाही. व्यक्तीगत पातळीवर सुध्दा काही व्यक्ती कोर्टामध्ये गेलेल्या आहेत. त्यांनी शासनाला पार्टी केलेले आहे. ॲडव्होकेट जनरल प्रत्येक वेळेस शासनाच्या वतीने ॲपिअर झालेले आहे. ॲडव्होकेट जनरलने तेथे असे प्रेअर केले आहे की, आम्ही काही नवीन गोष्टी शासनाच्या वतीने सुधारणा करेपर्यंत किमान अडजॉरमेंट त्यामध्ये द्यावी. परंतु हायकोर्टाने त्यामध्ये कोठेही अशा पध्दतीने शासनाची विनंती मान्य केलेली नाही. 30 हजार लोकांच्या पुनर्वसनाविषयी मी सांगू इच्छितो की, ज्या कायदेशीर बाबी आहेत त्या तपासून, परंतु कोर्टाचा अवमान होणार नाही हे पाहून, शासनाला जी उचित कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे ती एक महिन्याच्या आत करण्यात येईल.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड :सभापती महोदय, एका अत्यंत गंभीर प्रकरणांची आज आपण येथे चर्चा करीत आहोत.आपण या संपूर्ण जिल्हयाचे प्रतिनिधित्व करीत आहात. आज उल्हासनगरमध्ये अनधिकृत बांधकामामुळे हे प्रश्न निर्माण झालेले आहेत.उद्या मिरा भाईंदर, परवा वसई किंवा त्यानंतर कल्याण डोंबिवली, नंतर ठाणे येथे हे प्रश्न निर्माण होऊ शकतील तेव्हा आपण काळाची पावले ओळखली पाहिजेत. उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामाच्या बाबतीतील हायकोर्टाचा दृष्टीकोन विचारात घेतला पाहिले. उल्हासनगरच्या बाबतीत जे काही घडत आहे त्याबाबतीत शासन काय करणार आहे ? या संबंधी मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.हे सर्व प्रकरण अतिशय गंभीर असल्यामुळे शासन स्तरावर या प्रकरणाच्या बाबतीत अतिशय गंभीरपणे विचार होण्याची गरज आहे. सभापती महोदय, या संदर्भात मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे की,आपण या प्रश्नाबाबत लवकरात लवकर एखादी बैठक बोलावून त्या बैठकीसाठी सर्व संबंधितांना बोलावून या अनधिकृत बांधकामामध्ये राहणा-या नागरिकांना कायद्याचे संरक्षण देणार आहात काय ?याबाबत विचार करावा आपण जर या पध्दतीने केले तर ते अधिक योग्य होईल असे मला वाटते.याचे कारण असे की, काही दिवसापूर्वी आपण असा कायदा केला होता की अनधिकृत बांधकामे उभी राहिली तर त्यासाठी त्या भागातीला सबंधित वॉर्ड ऑफिसर आणि सबंधित अधिका-याला सस्पेन्ड करण्यात येईल. आज पर्यन्त ठाणे महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका उल्हासनगर महानगरपालिका इत्यादी ठिकाणी अनेक अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत परंतु तेथील अधिका-यांपैकी किती अधिका-यांना आपण सस्पेन्ड केलेले आहे ? जर कोणाला सस्पेन्ड केलेले नसेल तर ते का केलेले नाही? ठाणे जिल्हयाच्या प्रश्नाच्या बाबतीत आपण एक समिती गठित करुन त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा वेगळा आहे.उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रश्नाशी त्यांच्या प्रश्नाचा काहीही सबंध नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, उल्हासनगरच्या प्रश्नाबाबत आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. ठाणे, मुंबई वा राज्याच्या अन्य भागात सुध्दा अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, उल्हासनगरच्या अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत एक प्रश्न निर्माण होतो. ज्यावेळी देशाची फाळणी झाली होती त्यावेळी हे सर्व सिंधी बांधव रिफयूजीस म्हणून त्या ठिकाणी आले होते. त्या लोकांच्या राहण्याची व्यवस्था इतर ठिकाणी कोठेही करु शकत नव्हतो म्हणून तत्कालीन सरकारने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुंलकर्णी..

या सिंधी बांधवाना उल्हासनगर येथे ज्या मिलिटरीच्या बरॅक्स होत्या त्या बरॅक्समध्ये राहण्यास सागितले होते. 1300 हेक्टर जमिनीच्या क्षेत्रापर्यन्त हे शहर मर्यादित आहे. त्यावेळी सिंधी बांधवाची असलेली लोकसंख्या आणि आता सिंधी बांधवाची नव्याने निर्माण झालेली लोकसंख्या याचे जर प्रमाण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, आता तेथील लोकसंख्या सहा ते साडे सहा लाख एवढी झालेली आहे.त्यामुळे सध्या त्या ठिकाणी ज्या बॅरॅक्स आहेत त्या पाडून त्या ठिकाणी इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्या ठिकाणी हॉरिझॉन्टल ग्रोथ व्हावयास पाहिजे होती परंतु तेथे जमीन नसल्यामुळे ती ग्रोथ न होता व्हर्टिकल.ग्रोथ झालेली आहे.आज मोठा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामाचा आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.अनधिकृत बांधकाम पाडण्याच्या कारवाईमुळे एक लाख लोकांना त्यांच्या घरातून बाहेर काढले जाणार आहे.या बाबतीत हायकोर्टाने डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. 1960 सालापासून आतापर्यन्त त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत.947 बांधकामे तोडण्याच्या बाबतीत हायकोर्टाने सांगितलेले आहे. त्या निकालाच्या विरुध्द तेथील लोक सुप्रीम कोर्टात गेलेले आहेत. With due respect to the High Court, the Supreme Court did not entertain it. याबाबतीत त्यांच्या ज्या डायरेक्शन्स आहेत त्याच राहतील परंतु शासनाने याबाबतीत लीगल ओपिनियन घेऊन आज त्या ठिकाणी जो प्रश्न निर्माण झाला आहे तो प्रश्न कशा पध्दतीने सोडविणार आहात याबाबतीत काय धोरण राहणार आहेयासबंधीची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी.

श्री.राजेश टोपे : मी त्याचे उत्तर दिलेले आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी :सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे.मला त्याबाबतीत असे विचारावयाचे आहे.....

उपसभापती : या विषयाचे गांभीर्य ओळखून मी अनेक सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी प्रश्न विचारावयाचा आग्रह धरु नये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात झालेल्या अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात मांडण्यात आलेल्या लक्षवेधी सुचनेवरील चर्चेत आतापर्यन्त सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री

3...

माननीय उपसभापती ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नितीन गडकरी, अनंत तरे, जितेन्द्र आव्हाड,कन्हैयालाल गिडवाणी आणि इतरही सन्माननीय सदस्यांनी गांभीर्याने भाग घेतला आहे. उल्हासनगर हे ठाणे जिल्हयातील महत्वाचे शहर आहे आणि या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जितेन्द्र आव्हाड यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या जिल्हयाचे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व मी विधीमंडळात करीत आहे.त्यामुळे या प्रश्नाशी मी सुध्दा संबंधित आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

या ठिकाणची सगळी चर्चा ऐकल्यानंतर, विधीमंडळामध्ये न्यायालयाचा मान आणि सन्मान राखणे हेही प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी देखील या प्रश्नावर गांभीर्याने लक्ष देऊन शासनाची बाजू प्रभावीपणे मांडलेली आहे हे मान्य करावेच लागेल. विधीमंडळामध्ये या महत्त्वपूर्ण प्रश्नावर इतकी चर्चा झाल्यानंतर कोठे तरी या समस्येची उकल व्हावी, हा प्रश्न सोडविला जावा, शासनाच्या माध्यमातून देखील या गोष्टी होणे तितकेच क्रमप्राप्त आहे. परंतु हे होताना न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होता कामा नये या मताशी आपण सगळेच सहमत व्हाल. म्हणून या सगळया चर्चेनंतर मी या आसनावरून शासनाला काही निदेश देणार आहे. या लक्षवेधी सुचनेवर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. सभागृहातील सर्व सदस्यांनी तसेच माननीय राज्यमंत्र्यांनी व्यक्त केलेले अभिप्राय मी विचारात घेतले आहेत आणि या प्रकरणी मी सांगोपांग विचार करून असे निदेश देतो की, अनधिकृत अशा 855 इमारती उभ्या राहण्यास जे बांधकाम व्यावसायिक, विकासक, अधिकारी, पदाधिकारी जबाबदार आहेत, त्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर नियमाप्रमाणे व कायद्यातील तरतुदींप्रमाणे कडक कारवाई करण्यात यावी. तसेच नंदलाल समितीने या प्रकरणी भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. या अहवालावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असेही निदेश मी देत आहे. त्याच बरोबर माननीय उच्च न्यायालयाने तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात निर्णय दिलेला आहे. न्यायालयाचे निर्णय व सर्वसामान्य जनतेचे हित यात सांगड घालणे गरजेचे आहे. न्यायालयाच्या निर्णयाचा मान राखून या संदर्भात मला असे वाटते की, स्पेशल डेव्हलपमेंट कंट्रोल नियम हे उल्हासनगर महानगरपालिकेच्या संदर्भात पूर्वोदाहरण समजण्यात येऊ नये. कारण हे शहर पाकिस्तान मधून आलेल्या निर्वासितांसाठी विशेष करून वसविण्यात आले होते आणि अशा निर्वासितांचा पुनर्वसनाचा जटील प्रश्न सोडविण्याच्यादृष्टीने त्यांना घरे व व्यापारी इमारती बांधण्याची अनुमती देण्यात आली होती. ही एक विशिष्ट परिस्थिती होती व या विशिष्ट परिस्थितीत तसा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे माझ्या मते हे नियम या शहराला काटेकोरपणे लागू करणे, हे उचित होणार नाही. अशा एका विशिष्ट परिस्थितीमध्ये या शहराची बांधणी व जडण घडण झाल्यामुळे नियोजनाचा अभाव येथे आढळून येतो व परिणामी, या शहराची वाढ नियोजनबद्ध स्वरूपात झालेली नाही. सर्व बाबी एका विशिष्ट परिस्थितीत घडल्यामुळे मला असे वाटते की, या

..... 3एच 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहरासाठी एक स्वतंत्र डेव्हलपमेंट कंट्रोल नियम तयार करण्याची आवश्यकता आहे. शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी असे निदेश मी शासनाला देत आहे. स्पेशल डेव्हलपमेंट कंट्रोल नियम तयार करण्याची प्रक्रिया चालू असल्याची वस्तुस्थिती शासनाने माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावी व दरम्यानच्या काळात न्यायालयीन कारवाईस स्थगिती देण्याबाबत देखील शासनाने न्यायालयास विनंती करावी. हे निदेश केवळ उल्हासनगर महानगरपालिकेच्या बाबतीतच आहेत.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : लोकप्रतिनिधींची देखील चौकशी होऊन कारवाई व्हायला पाहिजे. ..

उपसभापती : मी 'पदाधिकारी' असा उल्लेख माझ्या निदेशात केलेला आहे. पदाधिकारी यामध्ये लोकप्रतिनिधी देखील येतात.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नावर जी काही चर्चा येथे झाली त्या सगळ्या चर्चेच्या अनुषंगाने आपले निदेश आलेले आहेत. त्या दृष्टीकोनातून कोठल्याही परिस्थितीमध्ये हायकोर्टाच्या आदेशांचा भंग न होता ज्या ज्या गोष्टी शासनाकडून करावयाच्या असतील त्याबाबत तेथील सामाजिक परिस्थिती जी काही आहे ती लक्षात घेऊन लौकरात लौकर म्हणजे एक महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात येतील.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात ... अडथळा ..)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी माझ्या निदेशांमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे आणि माननीय राज्यमंत्र्यांनी देखील ते मान्य केलेले आहेत. मी माझ्या निदेशात स्पष्टपणे म्हटले आहे की, स्पेशल डेव्हलपमेंट कंट्रोल नियम तयार करण्याची प्रक्रिया चालू असल्याची वस्तुस्थिती शासनाने माननीय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावी व दरम्यानच्या काळात न्यायालयीन कारवाईस स्थगिती देण्याबाबत न्यायालयास विनंती करावी. आणि हे माननीय राज्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, मंत्री महोदयांना याबाबत 15 दिवसाच्या आत निर्णय घेण्यास सांगणार काय ?

उपसभापती : 15 दिवसात नाही तर तात्काळ यासंबंधी निर्णय घेण्यास मी सांगितले आहे.

**** (यानंतर श्री. सरफरे ....3आय 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

पृ. शी. : शिळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्यांचे चौपदरीकरण करणे, कल्याण शहराबाहेर जाणारा वळण रस्ता व उल्हास खाडीवर पूल बांधणे

मु. शी : शिळफाटा-कल्याण-भिवंडी रस्त्यांचे चौपदरीकरण करणे, कल्याण शहराबाहेर जाणारा वळण रस्ता व उल्हास खाडीवर पूल बांधणे यासंबंधी स□□□□य सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, डॉ. अशोक मोडक यां□ दिलेली ल□बेधी सूच□.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-ने नि-यम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि□ महत्वाच्या बाबी□डे स-मा-ा-ीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ त्याबाबत त्यां-ी नि-वेद-ा □रावे, अशी वि-ंती □रतो.

"शिळफाटा-कल्याण-भिंवडी रस्त्यांचे चौपदीकरण करणे आणि कल्याण शहराबाहेर जाणारा वळण रस्ता व उल्हास खाडीवर पूल बांधणे, याबाबत मार्च व जुलै 2005 च्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता 2005 च्या जुलै-ऑगस्ट महिन्यात निविदा मागविण्यात येऊन पावसाळा संपताक्षणीच कामाला सुरुवात करण्यात येईल असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी सभागृहात देणे, या कामाचा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ऑगस्ट 2005 च्या अंदाजपत्रकात समावेश करुन निविदा मागविण्याची कारवाई सुरु करणे, परंतु महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाला अजूनपर्यंत उद्योजक म्हणून मान्यता न दिल्यामुळे या निविदांच्या स्वीकृतीला विलंब होण्याची निर्माण झालेली शक्यता, निविदेतील कामाची व्याप्ती पहाता कल्याण शहराबाहेरून जाणारा वळण रस्ता व उल्हास खाडीवरील पुलाच्या कामाचा अंदाजपत्रकात समावेश नसल्यामुळे व सद्य:स्थितीत नुसत्या रस्त्याचे काम सुरु करुन पथकर वसुली करण्यात येत असल्यामुळे वळण रस्त्याचे काम रेंगाळण्याची निर्माण झालेली शक्यता, परिणामी भिवंडीकडून येणारी व भिवंडीकडे जाणारी सर्व अवजड वाहनांची वाहतुक कल्याण शहरातून न्यावी लागणार असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढून भविष्यात मुंब्राप्रमाणेच कल्याण शहरातून जाणारा हा रस्ता वाहतुकीस बंद होणे, कल्याण शहराबाहेरुन जाणारा वळण रस्ता व उल्हास खाडीवरील पुलाच्या कामास पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असतांनाही गेल्या 1 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाने हे प्रमाणपत्र प्राप्त न करणे, उक्त बाबी लक्षात घेता सध्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

मागविण्यात आलेल्या निविदा रद्द करुन कामाच्या व्याप्तीमध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात अथवा पूर्वी काम करीत असलेल्या मे.रुफीटलाच हे काम देऊन या कामास त्वरीत सुरुवात केल्यास 2006 च्या पावसाळयापूर्वी या रस्त्याचे बहुतांशी काम पूर्ण होऊन कल्याण वळण रस्त्याचे कामही ताबडतोब सुरु होण्याची निर्माण झालेली शक्यता, सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार शिळफाटा-कल्याण-भिवंडी मार्गाचे चौपदरीकरण, कल्याण शहराबाहेरुन जाणारा वळण रस्ता व उल्हास खाडीवरील पुलाचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, ल□वेधी सूच-ेसंबंधीच्या नि-वेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते नि-वेद-ा आपल्या अ-ुमती-े सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : नि-वेद-ा सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

नि-वेद-ा

(प्रेस : येथे सोबतचे नि-वेद-ा छापावे.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या आदेशाची आणि निदेशाची मंत्रिमहोदयांनी काय हालत केली आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे हे निवेदन आहे. मी बांधकाम विभागाचा मंत्री असतांना 1998 मध्ये हे काम चालू होते. 2005 साल संपत आले तरी या कामाला मुहूर्त सापडत नाही. एम.एस.आर.डी.सी. ला लगेच टेंडर काढा म्हणून सांगितले होते. प्रत्यक्षात त्यांचे टेंडर डिफेक्टिव्ह आहे त्यामध्ये कल्याण-भिवंडी हा राष्ट्रीय बायपास आहे आणि उल्हास खाडी वरील पूल त्यामध्ये नाही. फक्त एक्झिस्टींग रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी टेंडर काढून काम होणार नाही. माझी विनंती आहे की, हे टेंडर अपूर्ण असल्यामुळे जे ओरिजिनल टेंडर आहे त्यामध्ये उल्हास खाडी वरील पूल आणि वळण रस्ता आहे तो दुरुस्त करुन टेंडर काढणार कां? दुसरा प्रश्न असा की, यासंदर्भात कारवाई करण्यास इतका उशीर कां लागला? मागील अधिवेशनामध्ये आपण कबूल केले आहे. तेव्हा 8 ते 10 महिन्यांचा उशीर लागण्याचे कारण काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी दोन प्रश्न उपस्थित केले. यामध्ये त्यांचा दुसरा प्रश्न असा आहे की, टेंडर काढण्यासाठी उशीर कां झाला? हा प्रश्न मार्च आणि जुलै या दोन्ही अधिवेशनामध्ये आला होता त्यावेळी सांगितले होते की, या कामासाठी लवकरात लवकर टेंडर काढण्यास सुरुवात करु. आणि त्याबाबत प्रक्रिया चालू करीत असतांना माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचेबरोबर बैठक झाली. त्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली. आणि त्यांनी असा पर्याय सुचविला की, या कामाचे टेंडर काढण्यापेक्षा बाजूला मुंबई-पुणे नॅशनल हायवे-4 चे काम ज्या कॉंट्रॅक्टरमार्फत चालू आहे. त्याच्या व्हेरिएशनच्या नियमाचा उपयोग करुन जर त्यांना काम दिले तर हे काम लवकरात लवकर आपल्याला चालू करता येईल, अशापध्दतीने व्हेरिएशनच्या माध्यमातून आपल्याला काम देता येईल काय, जेणेकरुन टेंडर काढण्याच्या प्रोसिजरमुळे वेळ लागेल आणि हे महत्वाचे काम असल्यामुळे ते लवकरात लवकर चालू करता येईल. अशाप्रकारची त्यांनी सूचना केल्यानंतर त्यासंबंधीचा प्रस्ताव तयार केला व त्यासंबंधीची कारवाई करावयास लागलो. त्यावेळी असे लक्षात आले की, व्हेरिएशनच्या नियमामुळे अडचण येत असल्यामुळे त्याचा उपयोग करण्याची प्रक्रिया स्थगित केली. आणि पुन्हा टेंडर काढण्याची प्रक्रिया चालू केली. आता ऑलरेडी टेंडर निघाले आहे. ते टेंडर स्वीकारण्याची अंतिम तारीख 15.12.2005 म्हणजे आजची आहे. हे टेंडर अपूर्ण नाही. त्यामध्ये शिळाफाटा-डोंगिबली-कल्याण-भिवंडी हा रस्ता आहे. हे काम दोन टप्प्यामध्ये विभागले आहे. शिळफाटा-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

डोंबिवली-कल्याण-भिवंडी हा पहिला टप्पा आहे व कल्याण बायपास या दुसरा टप्प्याचे काम आपण हाती घेतले आहे. या दुसऱ्या टप्प्याचे काम हाती घेण्याचे कारण असे की, कल्याण बायपाससाठी आपल्याला जमीन संपादन करावी लागेल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

एन्व्हायरमेंटल क्लिअरन्स्,स्टॅटयुटरी क्लिअरन्स् घ्यावे लागतील आणि रेल्वे विभागाची परवानगी ध्यावी लागेल. त्यामुळे ब्रिजच्या कामालाही वेळ लागेल. म्हणून कल्याण-डोंबिवली-भिवंडी या संपूर्ण कामाच्या निविदा काढल्या आहेत आणि लवकरात लवकर यासंबंधातील प्रक्रिया सुरु झाल्यावर याचे काम करण्यात येईल आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये कल्याण बायपास रस्ता घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी नाटयसंमेलनाला गेलो होतो, तेव्हा मला ही साईट पहावयास मिळाली. आपण त्या जिल्हयातील आहात. टप्पा-1 मध्ये फक्त चार पदरीकरण होणार आहे आणि मग टोल सुरु होईल. मग टप्पा-2 साठी टोल कसा वसूल होईल ? तो वसूलच होणार नाही. कारण एकदा एका माणसाचा टोल सुरु झाला की, तो जोपर्यंत संपत नाही, तोपर्यंत दुसऱ्याला टोल घेता येत नाही आणि तुम्हाला एन्व्हॉयरमेंटचे क्लीअरन्स् मिळाले तरी तुम्हाला तो रेल्वेचा ओव्हरब्रिज, वळण रस्ता बांधता येणार नाही. कारण तो मग तुम्हाला तुमच्या पैशातून बांधावा लागेल. मग तुमच्या पैशातून बांधण्याकरता 70 कोटी रुपये तुमच्याकडे आहेत का ? आज तर तुमच्या बजेटमध्ये पैसे नाहीत. म्हणजे या कामाच्या बाबतीत खरी अडचण अशी आहे की, हे टेंडर निघाल्यानंतर जे लॅण्ड ॲक्वीझिन करावयास पाहिजे, ते सरकारने केले नाही. आपल्याकडे पाच-सहा कोटी रुपये नव्हते म्हणून हे काम अडकले. मग तो क्लेममध्ये गेलेला आहे आणि त्याने दहा कोटी रुपयांचे क्लेम मागितले आहेत. म्हणून हे बी.ओ.टी.मध्ये व्हावयाचे असेल तर ते एकदाच होईल, दोनदा होणार नाही. हे डिफेक्टीव्ह टेंडर आहे. याबाबतीत याचा उपयोगच होणार नाही, फक्त एक्झीस्टींग रस्ता होईल. पण त्यामुळे ट्रॅफीक जॅम होईल इतका ट्रॅफीक तेथे आहे. तेव्हा पहिली विनंती आहे की, त्यांनी याबाबतीत विचार करावा. पण त्याहीपेक्षा महत्वाचा दुसरा प्रश्न असा आहे की, तुम्ही सात वर्षे हे असेच अडकविले. आता हा माणूस हाय कोर्टामध्ये गेला आणि माझी माहिती अशी आहे की, हाय कोर्टाकडून त्याला डायरेक्शन्स् मिळाल्या आहेत. यामध्ये खरे म्हणजे तुम्ही पार्टी नाहीच. माननीय मंत्री श्री. भुजबळसाहेब, तुम्ही अजूनपर्यंत यांना उद्योजक म्हणून जाहीरच केलेले नाही. जोपर्यंत तुम्ही यांना उद्योजक म्हणून जाहीर करीत नाही, तोपर्यंत यांना टेंडर रिसीव्ह करण्याचेही अधिकार नाहीत, सगळे गैरकायदेशीर आहे. तुम्ही त्यांना उद्योजक म्हणून का जाहीर केले नाही हे मला माहिती नाही, तुमच्याकडे या साठी काय पध्दत आहे माहिती नाही. पण नियमाप्रमाणे जोपर्यंत उद्योजक म्हणून जाहीर करीत नाही, तोपर्यंत संबंधितांवर काहीही

. . . .3 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

कायदेशीर कारवाई करता येत नाही. दरम्यानच्या काळात नवीन संकट निर्माण झालेले आहे. सात वर्षे झाली काम होतच नाही. कामाचा बोऱ्या झाला. अर्धवट कामाचे टेंडर काढले. अर्धवट काम सोडून दिले. 98 पासून हा खेळ सुरु आहे आणि या ठिकाणची जनता या रस्त्याच्या कामामुळे त्रस्त आहे आणि भयंकर अडचणी सहन करीत आहे. यामध्ये दुसरी गोष्ट घडली की, त्यानी सरकारवर क्लेम टाकले. ट्रिब्युनलवर केस सुरु आहे आणि आता माझी माहिती अशी आहे की, त्यांनी हाय कोर्टात केस टाकली आहे आणि हाय कोर्टामध्ये ही केस ऑनरेबल जस्टीस रंजना देसाई आणि ऑनरेबल जस्टीस अभय ओक यांच्यासमोर चालू आहे आणि या केसच्या बाबतीत हाय कोर्टामध्ये त्यांनी विनंती केली की, मी स्वत:च हे काम आहे त्या स्थितीमध्ये पूर्ण करण्यास तयार आहे. त्यावेळेस सरकारने लॅण्ड ॲक्वीझिशन केले नव्हते म्हणून मी अडकलो. आता लॅण्ड ॲक्वीझिशनचेही पैसे लागले तर ते सरकारला द्यावयास तयार आहे. मला सरकारने त्या किंमतीत ते काम द्यावे. यावर मुंबई हाय कोर्टाने त्याला सरकारकडे म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अर्ज करण्यास सांगितले.तुम्ही त्यांच्याकडे जा, त्यांना विनंती आणि त्यांचा आदेश घ्यावा आणि त्यानंतर पुन्हा कोर्टाकडे या. त्यांनी काल तुमच्याकडे यासंबंधात अर्ज केलेला आहे. माननीय मंत्री महोदय, यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने मला माननीय मंत्री श्री.छगन भुजबळसाहेब यांना प्रश्न आहे. नाहीतरी हे एम.एस.आर.डी.सी.चे अर्धवट काम आहे. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी माझी आपल्याला विनंती आहे की, जर हाय कोर्टाने त्यांना आपल्याकडे अर्ज करण्यास सांगितले असेल आणि तुमच्या टर्म्स ॲण्ड कंडीशनप्रमाणे लॅण्ड ॲक्वीझिशन वगैरे कमीतकमी तो कॉन्ट्रॅक्टर तरी ते पूर्ण करु शकेल. कारण पहिला मार्ग तुम्हाला मान्य नाही. तुम्ही सात वर्षात टेंडर काढले नाही. काढले ते अर्धवट काढले. दहा वर्षे हाच तमाशा सुरु ठेवण्यापेक्षा तो तुमच्या कंडीशनमध्ये काम करण्यास तयार असेल तर हा ऑप्शन आपण तपासून पहाणार आहात का ? हा माननीय मंत्री श्री.छगन भुजबळसाहेब माझा तुम्हाला प्रश्न आहे. कारण वर्षभर लोटांगण वगैरे सर्वकाही झाले आहे. तेव्हा याबाबतीत तुम्ही आम्हाला काय ते सांगावे. माननीय मंत्री श्री.भुजबळसाहेबांकडून याचे उत्तर पाहिजे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी उत्तर देतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतचा मुद्दा आहे.

. . . .3जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, हा रस्ता आमच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यामुळे मी याचे उत्तर देतो.

सभापतीस्थानी - तालिका सभापती(श्री.विलास अवचट)

यानंतर श्री.किल्लेदार . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : मी केस नंबर सांगतो. मी मुद्दाम होऊन हायकोर्टामधून माहिती काढून आणलेली आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "This matter was listed on Board to-day before their Lordship Honourable Justice Ranjana Desai and Honourable Mr. Justice Abhay Oak. Mr. Shrihari Aney appeared on behalf of the Petitioner i.e. Ruffit Industry..." सभापती महोदय, माझ्याकडे केस नंबर आहे. आता मला जी लेटेस्ट माहिती मिळालेली आहे.त्यानुसार या संदर्भात हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाकडे अप्लाय केलेला आहे. एम.एस.आर.डी.सी. ही अधिकृत बॉडी नाही, ती शासनाची एजन्सी म्हणून काम करते. खरी ॲथॉरिटी ही बांधकाम खाते आहे. भुजबळ साहेब ते फक्त तुमचे कॉन्ट्रॅक्टर आहेत. ते कार्पोरेशन आहे. तुम्हाला ते गाईड करु शकत नाहीत. बांधकाम खात्याच्या मार्गदर्शनाने ते चालतात..The original work belongs to P.W.D. म्हणून त्याबाबतीमध्ये तुमचा गचाळपणा सुरु आहे. मला माफ करा. श्री.भुजबळ साहेब तुमच्यासारख्या व्यक्तींनी सात-सात वर्षे यामध्ये काही करायचे नाही तुमचे या खात्यामध्ये मन लागत नाही काय ? मला माहीत आहे की, तुमचे मन लागू नये, म्हणून अनेक गोष्टी घडतात. याचा त्रास हा लाखो लोकांना भोगावा लागतो. माझी तुम्हाला विनंती आहे की, कामामध्ये तुम्ही मन लावा. तुम्हाला पार्टी केलेले आहे. तुम्ही पी.डब्ल्यू.डी. म्हणून वर्क अलॉट केले होते. अजून तुम्ही त्याला उद्योजक म्हणून जाहीर केलेले नाही. कोर्टाच्याबाबतीमध्ये निर्णय घेत नसाल तर पुन्हा प्रकरण सब ज्युडीस होईल. 10 वर्षे ती केस चालत राहील. जनतेची सगळी ऐसी तैसी होईल. जनतेला त्रास सहन करावा लागेल. म्हणून माझा तुम्हाला पुन्हा नम्रतापूर्वक प्रश्न आहे की, या संदर्भात मुंबई हायकोर्टाने त्यांना आपल्याकडे रेफर केले असेल तर या संदर्भात कोर्टाच्या सूचनेप्रमाणे आपण त्यांच्याशी चर्चा करुन तो एक ऑप्शन आहे, तसा मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल काय ?

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी हे प्रकरण 7 वर्षापासून सुरु आहे असे सांगितले. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब हे मंत्री होते. त्यांनी हे काम दिले. त्यानंतर जो कॉन्ट्रॅक्टर आहे तो ढेपाळला. त्यांनी चार वर्षे काम केलेले नाही. मी मागच्या वर्षी आलेलो आहे. त्यानंतर लक्षवेधी आली. त्यावेळेस असे मांडण्यात आले

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गडकरी पुढे चालू...

की, पी.डब्ल्यु.डी.पेक्षा एमएसआरडीसीकडे दिले तर हे काम शीघ्र गतीने होईल. म्हणून आम्ही आमच्याकडील फाईल त्यांच्याकडे पाठविली. आता निश्चित या प्रकरणामध्ये काय झाले याची माझ्याकडे माहिती नाही. त्यांच्याकडे माहिती आहे.

श्री.नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही लक्षवेधी लागण्याच्या अगोदर मी यासंबंधीची सगळी माहिती घेऊन आलेलो आहे. याबाबतीत सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब आपल्याला प्रश्न विचारु इच्छितो की, आपल्याला कोर्टाची नोटीस मिळालेली आहे काय ? तीही माहिती नाही. तुमच्या सचिवांना ती मिळालेली आहे काय ? तीही माहिती नाही. मग तुम्हाला मी आणखी ॲडिशनल माहिती देतो, माझ्यावर विश्वास ठेवा. मी पूर्ण रेकॉर्ड घेऊन आलेलो आहे. सात वर्षे झाले हा तमाशा सुरु आहे. कल्याण डोंबिवलीची जनता, महानगरपालिकेमध्ये निवडून दिलेल्या लोकांना न विचारता मलाच सारखे विचारते की हे काम का होत नाही. तेथील नागरीक यामुळे त्रस्त आहेत. माझे म्हणणे बरोबर असेल तर डायलॉग करा, नसेल तर करु नका. रिजेक्ट करायचे असेल तर रिजेक्ट करा. तो तुमचा अधिकार आहे. माझे असे म्हणणे आहे आहे की, या बॉटलनेकमधून काही तरी मार्ग तर काढा. सगळया बाजूने गोंधळून ठेवायचे, सात वर्षे काही करायचे नाही हा कोणता न्याय आहे ? मी जबाबदारीने आपल्याला सांगतो की, तो मनुष्य पुन्हा कोर्टामध्ये जाणार आहे. त्यानंतर ते मॅटर सब ज्युडिस होणार. तो 20 कोटी रुपयाचा क्लेम मागतो आहे. त्यावर पुन्हा मॅटर कोर्टामध्ये जाणार, स्टे मिळणार त्यामध्ये पुन्हा न्यायालयात गेल्यानंतर प्रकरण अडकले. पुन्हा हे काहीच होणार नाही. पुन्हा पुढच्या अधिवेशनामध्ये आम्ही विचारु तेव्हा तुम्ही म्हणाल की, मॅटर इज सब ज्युडिस. तुम्हाला प्रश्नही विचारता येत नाही. पूल नाही रस्ता नाही, प्रोजेक्टही नाही, प्रश्नही विचारता येत नाही. माझी विनंती आहे की, तुम्ही करा असा माझा आग्रह नाही. काय करायचे काय नाही, हे सरकार म्हणून तुमचा प्रश्न आहे. पण माझा प्रश्न असा आहे की, न्यायालयाने रेफरन्स करुन तुमच्याकडे प्रकरण पाठविले असेल,ही गोष्ट सत्य असेल....

यानंतर कु.थोरात....

अशुद्धलिखित मत / प्रसिद्धीसाठी नाही

तर एक मिटिंग घ्या. तुमच्या राजवटीत आम्ही एनरॉन समुद्रात बुडवायला निघालो होतो. मग आम्ही त्याला वर काढले. आम्ही गेल्यावर तुम्ही त्याला बुडवले आता पुन्हा त्याला वर काढले. जनतेच्या हिताकरिता आपण अनेक वेळा असे निर्णय घेतो.शेवटी सरकारने जनतेच्या हिताचा निर्णय केला पाहिजे. मी एम.एस.आर.डी.सी.ला हे काम द्या असे या सभागृहात म्हटले होते आणि माझ्या म्हणण्यामुळे श्री. भुजबळ साहेबांनी एम.एस.आर.डी.सी.ला हे काम दिले हे खरे आहे. मी माझी चूक मान्य करतो. माझा असा समज होता की, श्री. भुजबळ साहेब फार स्लो आहेत . श्री. अनिल देशमुख साहेब फार गतिशील आहेत. एम.एस.आर.डी.सी.कडे गेल्या नंतर एका महिन्यात टेंडर निघेल आणि हे काम लवकर होईल असा माझ्या मनातील गैरसमज होता, तो सिध्द झाला.श्री. अनिल देशमुख साहेब मी हा प्रॉजेक्ट तुमच्या विभागाकडे पाठविला आणि तुम्ही त्याबाबतीत वर्षेभर काही केले नाही. श्री. भुजबळसाहेब यातील डिले बद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. पण मला आता तुम्हाला एवढेच विचारावयाचे आहे की, जर कोर्टाचे निर्देश असतील, डायरेक्शन्स असतील किंवा रेफरन्सेस असतील तर त्यावर आपल्याला एकदा चर्चा करावी लागणार आहे. तेव्हा आपण एकदा हेही ऑपशन तपासून पहावे. हे नाही, ते नाही. शेवटी याची पॅरेंट बॉडी भुजबळ साहेब तुमचा विभाग आहे आणि श्री. देशमुख साहेबांचा विभाग कॉन्ट्रॅक्टर आहे.ते पी.डब्ल्यू. डी. ला गाईड करु शकत नाही. तुम्ही पी.डब्ल्यू. डी. ला गाईड करु शकता. एम.एस.आर.डी.सी.ची स्थापना पी.डब्ल्यू.डी.ने केली आहे आणि त्याचा संस्थापक मी आहे. खरे म्हणजे हे दोन विभाग वेगळे करुन फार मोठी चूक केलेली आहे. दोन्ही विभागासाठी एक मंत्री पाहिजे. ठीक आहे. तुमची राजकीय अडचण होती म्हणून तुम्ही हे दोन विभाग वेगवेगळे केले. मला एवढीच विनंती करावयाची आहे की, जरा हे पत्र न्यायालयाकडून आपल्याकडे आले असेल तर न्यायालयाच्या रेफरन्सप्रमाणे हाही ऑपशन आपण एकदा तपासून बघाल काय? तुम्हाला तपासून बघायचे नसेल तर स्पष्टपणे 'नाही' म्हणून सांगा.

श्री. अनलि देशमुख : पण आता हे काम आमच्याकडे आहे.

श्री. नितीन गडकरी : श्री. देशमुखसाहेब एम.एस.आर.डी.सी.ही एजन्सी आहे.पॅरेंट बॉडी पी.डब्लू. डी. आहे.(अडथळा) सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. भुजबळसाहेब तुम्ही जोपर्यंत एम.एस.आर.डी.सी.ला उद्योजक म्हणून जाहीर करीत नाही तोपर्यंत यातून मार्ग निघणार नाही. आणि यांच्या रस्त्याच्या कामाला अजूनही कॅबिनेट सब कमिटीचे ॲप्रुव्हल लागते. अध्यक्ष

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..ृमहाराज, हे कॉन्ट्रॅक्टर आहेत. यांनी अजून काम केले नाही. वरती त्याला सिक्युटराईज करुन आम्हाला किती रुपये द्याल असे सांगतात. म्हणजे 25 कोटी रुपये हे यातून फुकट कमविणार. हे एम.एस.आर.डी.सी.च्या प्रिन्सिपलच्या विरुध्द आहे. सात वर्षात काम केलेच नाही. तरीही कमिशन खाणार. एम.एस.आर.डी.सी. याच्याकरिता नाही. हे काय आहे? श्री.भुजबळ साहेब मला लिगल मुद्यावर एवढेच म्हणायचे आहे की, तुम्ही पॅरन्ट ऑर्गनायझेन आहात. तुम्ही मुख्य डिपार्टमेंट आहात . ती एजन्सी आहे.कॉर्पोरेशन आहे. त्यांचे टेंडर इश्यू करु द्या. इश्यू केल्यावर लगेच ते फोडले जात नाही. त्यांनाही ते करु द्या. या मार्गाने होते की त्या मार्गाने होते ते बघा. पण पुन्हा तो कोर्टात गेला तर या कामाला पुन्हा स्टे लागणार. म्हणजे त्यांचेही काम थांबणार आहे. यातून हे मॅटर किचकट होणार आहे.एकदा त्याला बोलावून घ्या. कोर्टाचा रेफरन्स तुमच्याकडे आला आणि तो जर कायदेशीर असेल तर एकदा त्याच्या आधारावरही चर्चा करुन बघा.शेवटी कुठल्याही मार्गाने तुम्ही मान्य कराल त्या मार्गाने काहीही करुन हे काम झाले पाहिजे आणि कोर्टामुळे हे काम अडकू नये, अशी माझी इच्छा आहे. तेव्हा हे ऑपशन भुजबळसाहेब तुम्ही स्वीकारणार आहात काय एवढेच मला विचारावयाचे आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा प्रश्न श्री. भुजबळ साहेबांना आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, खाते माझ्याकडे आहे. हा रस्ता आमच्याकडे हस्तांतरीत झालेला आहे. त्यामुळे त्याचे उत्तर मला देऊ द्यावे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला की, एक वषापासून काहीही काम झालेले नाही. मी मघाशीच सांगितले की, आम्ही याचे टेंडर एक वर्षापूर्वी काढणार होतो. पण सन्माननीय सदस्यांनी अशी विनंती केली की व्हेरिएशन नावाचा पी.डब्ल्यू.डी.मध्ये एक नियम आहे. त्याचा फायदा घेतला तर हे काम लगेच चालू करता येईल. हे काम लवकरात लवकर करण्याची आमची इच्छा होती. आणि म्हणूनच या संदर्भात सन्माननीय गडकरी साहेबांसोबत तीन बैठका झाल्या. तसेच व्हेरिएशनचा फायदा घेऊन हे काम लवकरात लवकर करता येते काय या दृष्टीने आम्ही प्रयत्न केला पण त्यामध्ये नियमाची अडचण आली त्यामुळे व्हेरिएशनचा फायदा घेऊन हे काम चालू करता आले नाही. म्हणून आम्ही त्यानंतर टेंडर काढले. 2001 मध्ये टेंडर देण्यात आले होते.

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 2 ..... श्री. अनिल देशमुख .....

चार वर्षे या ठेकेदाराने फक्त 70 लाखाचेच काम केले म्हणून आम्ही त्याचे टेंडर रद्द केले व त्याला ब्लॅकलिस्टेड करुन पुढील कारवाई केली. त्यानंतर तो ठेकेदार हायकोर्टात गेला आणि कोर्टाकडून सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे निदेश आले असतील तर त्यासंबंधीची चर्चा करुन यातून मार्ग निघत असल्यास तसा प्रयत्न करण्यास आमची हरकत नाही. एमएसआरडीसी ला आतापर्यंत सार्वजनिक बांधकाम किंवा इन्फ्रास्ट्रक्चर समितीने उद्योजक म्हणून जाहीर केलेले नाही, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी याबाबत सांगू इच्छितो की, ऑलरेडी 31 जानेवारी 2005 च्या पत्राने आम्हाला असे निदेश दिलेले आहेत की, या प्रकल्पाचे सविस्तर सर्वेक्षण, अंदाजपत्रक तयार करुन कामाचा सुसाध्य असा अहवाल लवकरात लवकर महामंडळाने तयार करावा. म्हणजे अशा प्रकारे सार्वजनिक बांधकाम विभागाने किंवा इन्फ्रास्ट्रक्चर समितीने आम्हाला तत्वत: मान्यता दिली आहे. त्यांनी सांगितले की, या कामाचा संपूर्ण सर्वे करावा, या प्रकल्पाची फिजिबिलिटी तपासून तसा अहवाल तयार करावा व त्यानंतर इन्फ्रास्ट्रक्चर समितीसमोर मान्यतेसाठी यावे. म्हणून आम्हाला यासंदर्भात उद्योजक म्हणून जाहीर केले नसले तरी 31 जानेवारी रोजी तत्वत: तशी मान्यता दिलेली असल्यामुळे ती देखील अडचण नाही. मी अगोदरच सांगितले की, टप्पा क्र.1 आणि टप्पा क्र. 2 आम्ही वेगळे केले आहेत. कारण हे काम एकत्रित करायला गेलो तर टप्पा क्र. 1 च्या कामाला टप्पा क्र. 2 मुळे वेळ लागेल म्हणून ही दोन्ही कामे वेगळी केली. कारण टप्पा क्र. 2 च्या कामासाठी केंद्र शासनाकडून एन्व्हायर्नमेंटसंबंधीची परवानगी व इतर बरीच कागदपत्रे जमा करावी लागणार आहेत आणि या सर्व प्रोसेससाठी वेळ लागणार आहे, म्हणून टप्पा क्र. 1 हे अलग केले. टप्पा क्र. 2 च्या कामामध्ये शीळ फाटा, डोंबिवली, कल्याण भिवंडी हा संपूर्ण 21.5 किलोमीटरचा मार्ग आपण चौपदरी करणार आहोत. त्या कामाला वेळ लागणार आहे कारण कल्याण-बायपाससाठी एन्व्हायर्नमेंट क्लिअरंस घ्यावा लागेल. त्यासाठी या कामाचा एन्हायर्नमेंटल सर्व्हे पावसाळा, उन्हाळा आणि हिवाळा अशा तिन्ही सिझनचा घ्यावा लागणार आहे, त्यानंतर रिपोर्ट आल्यावर पोल्यूशन विभागाची एन.ओ.सी. आणि महाराष्ट्र कोस्टल झोनकडून देखील एनओसी यासाठी घ्यावी लागणार आहे. अशा प्रकारची कागदपत्रे जमा झाल्यानंतर त्याला केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी लागेल, म्हणून या टप्पा क्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .....

2 ला वेळ लागणार आहे. म्हणून टप्पा क्र. 1 वेगळा केला आणि त्याचे टेंडर देखील काढले, आज या टेंडरचा शेवटचा दिवस आहे. येत्या मार्च किंवा एप्रिल महिन्यात या रस्त्याचे काम आम्ही चालू करतो आणि कल्याण बायपास या चौपदरी रस्त्यासाठी लवकरच वरील सर्व परवानग्या घेण्यात येतील व ते काम सुध्दा लवकर चालू करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, मी वारंवार सांगतो की, हे सर्व बीओटीवर असल्यामुळे यावर आपल्याला एकदाच टोल वसूल करता येतो. एकदा अस्तित्वात असलेला रस्ता चौपदरी सुरु झाला तर दुसरा टोल त्यात घुसवता येत नाही म्हणून आपण काढलेले टेंडर डिफेक्टीव्ह आहे. अर्थात यासंदर्भात जे क्लेम्स या ठेकेदाराने टाकलेले आहेत ते जवळजवळ 18 ते 20 कोटीचे आहेत व ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे टाकलेले आहेत, एमएसआरडीसीकडे नाहीत म्हणून ही लायबिलिटी सार्वजनिक बांधकाम विभागावर येणार आहे, कारण बेसिकली हे काम त्याच विभागाचे आहे. माझ्याच विनंतीमुळे ते काम एमएसआरडीसीकडे आले होते, कारण मला वाटत होते की, हे काम लवकर व्हावे म्हणून. पण यात महामंडळाचा रोल फक्त एजन्सीचाच आहे. ज्या प्रमाणे लग्नात मंत्र म्हणण्यापासून जेवण तयार करण्यापर्यंतचे कंत्राट देण्यात येते. त्याप्रमाणे तुमचा रोल आहे. ओरिजिनल मुलाचे आई-बाप तूम्ही नाहीत तर केवळ बँडबाजापुरताच आपला रोल आहे. म्हणून माझी विनंती आहे की, यासंदर्भात बांधकाम विभागावर 20 कोटीचे क्लेम्स या ठेकेदाराने टाकले असून त्यावर आता लवाद तयार झाला आहे व सध्या हायकोर्टात केस गेलेली आहे. यासाठीच मी सांगतो की, हे जे टेंडर आपण काढले ते डिफेक्टीव्ह आहे पण त्या विषयात मी जाऊ इच्छित नाही. उद्योजक म्हणून आपल्याला मान्यता मिळाली नसल्यामुळे आणि तत्वत: मिळालेल्या मान्यतेमुळे हे सर्व करता येत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

श्री. नितीन गडकरी .....

याबाबतीत या परिस्थितीत ते ठेकेदार कोर्टात गेला आणि मॅटर सबज्यूडीस झाले तर पुढे काहीच काम होणार नाही. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण ही बाब एकदा तपासून बघावी. या संदर्भातील चर्चा करण्याचा अधिकार माननीय अनिल देशमुख साहेबांच्या विभागाला नाही. ठेकेदाराने देखील त्यांच्यावर क्लेम टाकलेले नाहीत. यासंदर्भातील सर्व पार्टीज सार्वजनिक बांधकाम विभागाला केलेले आहे. बांधकाम विभागाने या कामासाठी भूसंपादन केले नाही त्यामुळे त्याला काम पुढे करता आले नाही असे त्या ठेकेदाराचे ऑर्ग्युमेंट आहेत. म्हणून या सर्व विषयाशी बांधकाम विभागाचा संबंध आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय गडकरी साहेब म्हणत आहेत त्याप्रमाणे दोन्ही विभागात मतभेद नाहीत, किंवा भांडणही नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्री, सचिव हे रुल्स प्रमाणे काम करीत असतात. या विषयाचा डायरेक्ट संबंध सार्वजनिक बांधकाम विभागाशी येतो. मी एमएसआरडीसीला यामध्ये कन्सीडर करीत नाही. हे काम एमएसआरडीसी कडे चांगल्या भावनेने सोपवावे असे मी सुचविले होते पण यासाठी त्यांनी वर्षभर किती बैठका घेतल्या याबाबत मी आता काही बोलणार नाही. तुम्ही फार इफेक्टव्ह आहात , तुम्ही इफेक्टिव्ह काम करता, तुम्ही वर्षभर इतकी चांगली गती दिली की, वर्षभरात टेंडर सुध्दा निघाले नाही त्यामुळे मी आपले आभार मानतो. या बाबतीत हायकोर्टाने सरकारला रेफर करायला सांगितले आहे त्या रेफरन्स प्रमाणे बेसिकली यांचा प्रोजेक्ट अर्धाच आहे. एकदा बीओटीवर एक प्रकल्प झाला की, पुढील टप्पा त्यात येऊ शकणार नाही. त्यामुळे हे सगळे प्रोजेक्ट पूर्ण होण्याच्या दृष्टीने हायकोर्टाने रेफर केल्याच्या आधारावर आपण त्या पत्राप्रमाणे यांच्याशी चर्चा करुन त्यातून मार्ग काढणार का? तुम्हाला मार्ग काढायचा असेल तर काढा नसेल काढायचा असेल तर काढू नका परंतु हे सर्व काम पूर्ण होणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख यांचे टेंडर अर्धवट आहे त्यामुळे कोर्टाच्या रेफरन्स प्रमाणे चर्चा करुन मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार का?

श्री. अनलि देशमुख : सभापती महोदय,...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला हरकतीच्या मुद्यावर बोलायचे आहे. मी जी लक्षवेधी उपस्थित केली होती ती मुळात बांधकाम विभागाशी संबंधित आहे. याचे कारण या कामामध्ये एमएसआरडीसीचा रोल फक्त एजन्सी म्हणून आहे. यांनी परवानगी दिली तर काम करतील आणि परवानगी दिली नाही तर काम रद्द करतील. यामध्ये फायनल डिपार्टमेंट हे सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित हा विषय असल्यामुळे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागावर 20 कोटीची न्यायालयीन केस झाल्यामुळे आता 20 कोटी रुपये एमएसआरडीसी देणार आहे का? 20 कोटी रुपये हे शासनच देणार आहे. त्यामुळे हे एक ऑप्शन सार्वजनिक बांधकाम विभागाला तपासायला अडचण काय आहे?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, आमची जी दोन खाती आहेत त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद नाहीत. अशा प्रकारचे कोर्टाचे आदेश आमच्याकडे प्राप्त झाले तर अवश्य आम्ही सर्व बसून आदेशाप्रमाणे काय करता येईल आणि काय करता येणार नाही यासंदर्भात एकत्र बसून अवश्य निर्णय घेऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे काय " आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे, तुम्ही या, आम्ही या" असे सरकार चालत नसते. सरकार हे नियमाने चालत असते. "तुम्ही आणि आम्ही भाऊ भाऊ, दोघे मिळून खाऊ ". असे सरकार चालत नसते.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सार्वजनिक उपक्रम विभागाने काय कारवाई केली आहे आणि कोर्टाचे काय म्हणणे आहे हे विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग निर्णय घेईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सांगतात ते बरोबर आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची एमएसआरडीसी ही एजन्सी आहे. आपल्या शासनाने यासाठी दोन वेगवेगळी खाती केली. एमएसआरडीसीची निर्मिती सार्वजनिक बांधकाम विभागाने केली आणि मी तिचा संस्थापक आहे. शेवटी शासन म्हणून प्रतिनिधीत्व सार्वजनिक बांधकाम विभाग करतो. त्यामुळे आपल्याला कायदेशीर निर्णय घ्यावा लागेल. एमएसआरडीसीने जे टेंडर काढले आहे ते दोषयुक्त आहे. त्यांनी एकच टेंडर काढायला पाहिजे. वाटल्यास ही गोष्ट पुन्हा तपासून पहा. अन्यथा त्यात दोष शिल्लक राहतील.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, कोर्टाचा निर्णय आल्यानंतर साधकबाधक चर्चा करण्यात येईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, वसई तालुक्यातील एस.टी.बससेवा पूर्ववत सुरू करण्यासंबंधी सर्वपक्षीय लोक उपोषणाला बसले होते. यासाठी त्यांनी रास्तारोको केले होते. उपोषणाला बसलेले दोन जण अत्यवस्थ आहेत. काल जेव्हा मी मुद्दा उपस्थित केला होता, तेव्हा सन्माननीय मंत्री श्री.धर्मारावबाबा आत्राम यांनी एस.सी.बससेवा पूर्ववत सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. परंतु, अद्यापि उपोषण मागे घेण्यात आलेले नाही. वसई नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये खाजगी बससेवा सुरू करण्यास लोकांचा विरोध नाही. मात्र, वसई तालुक्यात एस.टी.बससेवा पुरविण्यात यावी अशी तेथील जनतेची मागणी आहे. शासनाने उपोषणकर्त्यांची मागणी मान्य करून त्यांना उपोषण मागे घेण्यास भाग पाडावे. तसे केले नाही तर दोन अत्यव्यस्थ अवस्थेत असलेल्यांचे जीव जातील. त्यांचे उपोषण थांबविण्यासाठी शासनाचे प्रतिनिधी गेलेले नाहीत. तेव्हा वसई नगरपरिषदेच्या बाहेर खाजगी बससेवा जाणार नाही याकडे लक्ष देऊन वसई तालुक्यासाठी एस.टी.बससेवा सुरू करावी एवढीच उपोषणकर्त्यांची मागणी आहे. तेव्हा याकडे शासनाने लक्ष देऊन उचित कारवाई करून संबंधितांना उपोषण सोडण्यास विनंती करावी.

श्री.धर्मारावबाबा आत्राम : सभापती महोदय, वसई तालुक्यातील एस.टी.बससेवा पूर्ववत करण्यासंबंधी मी काल आश्वासन दिले होते. तेथे एस.टी.बससेवा सुरू करण्यासंबंधीचे आदेश दिले असून तशा प्रकारचे पत्र देखील काढले आहे. उपोषण सोडण्याची विनंती करण्यासाठी डी.सी.पत्र घेऊन गेले होते. पण त्यांना सचिवांचे पत्र पाहिजे अशी अट घातलेली आहे.

उपसभापती : शासनाने लेखी विनंती करून देखील सचिवांचे पत्र आणा असे म्हणणे बरोबर नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, तशी माझी देखील मागणी नाही.

===

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे शहर पारिसरातील धोकादायक इमारती.
मु.शी.: ठाणे शहर परिसरातील धोकादायक इमारती यासंबंधी श्री. जितेंद्र आव्हाड, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. राजेंद्र जैन, प्रा. जोगेंद्र कवाडे, डॉ. वसंत पवार, श्री. सदाशिवराव पोळ, प्रा. फौजीया खान, श्री. जगन्नाथ शेवाळे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"ठाणे शहर परिसरातील धोकादायक इमारतींमध्ये रहात असलेले लाखो रहिवाशी, ठाणे शहरातील दोन इमारती खचल्याची जून, 2005 मध्ये घडलेली गंभीर दुर्घटना, याशिवाय शहरातील हजारो इमारती मोडकळीस आलेल्या असून या इमारतींमध्ये रहात असलेल्या रहिवाशांच्या जिवितास धोका असल्याने या सर्वच धोकादायक इमारतींची पुनर्बांधणी त्वरीत होण्याची अत्यावश्यकता, इ ोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविणे संदर्भात महापालिकेमध्ये सुरु असलेला गैरकारभार, मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होण्यासाठी इमारत दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्यास होत असलेली दिरंगाई, भाडेकरुंबरोबरच सदनिकाधारक राहत असलेल्या धोकादायक इमारतींना पुनर्बांधणीसाठी जादा चटईक्षेत्र देऊन इमारतींची पुनर्बांधणी होण्यासाठी परिसरातील नागरीक तसेच सामाजिक संस्था व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवेळी केलेली मागणी, याप्रकरणी कार्यवाही होण्यास होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी धोकादायक इमारतींमध्ये रहाणा-या लाखो रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, तसेच चिंतेचे व असूरक्षिततेचे वातावरण, जून 2005 रोजी ठाणे येथील राबोडीतील धवलगिरी व कळव्यामधील मातोश्री या इमारती खचल्याची झालेली धक्कादायक घटना, मुंबईच्या धर्तीवर ठाणे शहरातील धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणींसाठी घरदुरुस्ती मंडळाची स्थापना होण्यासाठी त्वरीत निर्णय होण्याची आवश्यकता, सन-1999 मध्ये किसननगर येथील साईराज ही इमारत पडुन अनेकांचा इ ालेला मृत्यू, भावी काळात अशा दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊन रहिवाशांच्या जिवितास निर्माण झालेला धोका लक्षात घेता याप्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे शहरातील धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी घर दुरुस्तीसाठी मंडळाची स्थापना करण्याबाबत मागील तीन अधिवेशनापूर्वी तत्कालीन मंत्रीमहोदय श्री.नवाब मलिक यांनी आश्वासन दिले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, 60 दिवसांत अहवाल सादर करुन घर दुरुस्ती मंडळ स्थापन करण्यात येईल. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या संदर्भात बी.के.अगरवाल समिती नेमली होती. या समितीचा अहवाल केव्हा प्राप्त होणार आहे ? तसेच ठाणे शहरासाठी जे घर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्यात येणार होती त्याची पूर्तता केव्हा करण्यात येईल ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, या संदर्भात श्री.बी.के.अगरवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमली होती. या समितीकडून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही. त्या समितीस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आता 15 सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे आणि लवकरात लवकर अहवाल सादर करण्यास सांगितलेले आहे. समितीकडून अहवाल प्राप्त इ ाल्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर ठेवला जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी पावसाळी अधिवेशनात तत्कालीन मंत्रीमहोदय श्री.नवाब मलिक यांनी या सभागृहात आश्वासन दिले होते की, 60 दिवसांमध्ये याप्रकरणी निर्णय घेण्यात येईल. आता 700 दिवस होऊन गेलेले आहेत. आपण एक स्पेसिफीक पिरीयड घ्यावा.....

उपसभापती : या संदर्भात मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पंधरा दिवसांमध्ये मुंबईमध्ये एक बैठक बोलवावी. एक-दोन महिन्यांच्या आत समितीला अहवाल सादर करण्यास सांगावे. घर दुरुस्ती मंडळ स्थापन करण्याचे मान्य केले होते. त्यांची स्थापना तीन महिन्यांत करावी.

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

पृ.शी.: सिल्लोड शहरात मटका व जुगाराचे अड्डे सर्रास चालू असणे.

मु.शी.: सिल्लोड शहरात मटका व जुगाराचे अड्डे सर्रास चालू असणेसंबंधी सर्वश्री अब्दुल सत्तार अब्दुल नबी, सुरेशदादा देशमुख, वसंत चव्हाण, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अब्दुल सत्तार (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

सिल्लोड शहरात मटका व जुगाराचे अड्डे सर्रास चालू असणे, सिल्लोड शहरात पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्री.जगन्नाथ कळसकर हे मनमानी करत असून त्यांच्या आशिर्वादानेच अवैध धंदे मटका, जुगार राजरोसपणे चालत असल्याचे निदर्शनास येणे, या संदर्भात असे अवैध धंदे तात्काळ बंद करण्याबाबत सर्वसामान्य नागरिकांच्यावतीने व इतर पदाधिका-यांच्यावतीने दिलेली निवेदने तसेच पोलिस निरीक्षक श्री. कळसकर यांच्या भ्रष्टाचारी व उध्दट वर्तनाबाबत निलंबित करण्याची करण्यात आलेली मागणी याबाबत कोणतीही चौकशी, न झाल्यामुळे शहरात मटका, जुगार राजरोजसपणे चालू असणे परिणामी या प्रकरणात बुलढाणा पोलिस यंत्रणेने मटका व जुगार अड्डयांवर धाडी टाकूनही यासंदर्भात दोषींवर प्रत्यक्षात कोणतीही कारवाई न केल्यामुळे नागरिकांत व जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची भूमिका.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.) ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदया, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी जे निवेदन दिलेले आहे त्यामध्ये काही तथ्य दिसत नाही. सिल्लोड शहरात मटका व जुगाराचे अवैध धंदे चालू आहेत. याबाबतीत मी माननीय उपमुख्यमंत्री यांना चार वेळा निवेदन दिले होते. त्यांनी आदेश दिल्यांनतर बुलढाणा जिल्ह्यातील पोलीस औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड मध्ये आले आणि त्यांनी या अवैध धंद्यावर घाडी टाकल्या. या धाडीमध्ये ज्यांना पडकले होते त्यांना तेथील पी.एस.आय. श्री.कळसकर यांनी चहा पाजून सोडून दिले. या संबधी जिल्हापरिषदेचे अध्यक्ष,नगरपालिकेचे अध्यक्ष तसेच सर्व सदस्यांनी तक्रार केली होती. तो अधिकारी सांगत होता कोणताही लोकप्रतिनिधी माझे काहीही करु शकत नाही. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण त्या अधिकाऱ्याला निलंबित करुन एक चौकशी समिती नेमणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सिल्लोड येथे अवैध मटका व जुगाराचे अवैध धंदे सुरु आहेत. अशाप्रकारच्या तक्रारी आमच्याकडे आल्या होत्या. त्याप्रमाणे कारवाईचे आदेश दिले होते. कारवाई करण्यासाठी आम्ही बाजुच्या जिल्ह्यातील एक पथक पाठविले होते. ते पथक तेथे आठवडाभर होते. या आठवडाभरात त्यांनी एकच केस दाखल केलेली आहे. त्याच दिवशी त्याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांचा दौरा होता, त्यामुळे सगळा पोलीस बंदोबस्त तिकडे होता. याचा फायदा त्या आरोपीनी घेतला व ते पळून गेले. ते मोबाईलवर बेटींग घेत होते असा बुलढाणा पोलिसांच्या रिपोर्टमध्ये उल्लेख आहे. जर तो अधिकारी दोषी असेल तर चौकशी समिती नेमण्यात येईल आणि चौकशीच्या निष्कर्षाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

तालिका सभापती : या प्रकारणासंदर्भात आपल्याकडे मोठया प्रमाणावर तक्रारी आलेल्या असताना आणि या ठिकाणी सन्माननीय सदस्य माहिती देत असल्यामुळे आपण या प्रकरणात कोणती ठोस कारवाई करणार आहात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदया, या प्रकरणाच्या चौकशीकरिता चौकशी समिती नियुक्त केली जाईल. प्रत्येक ठिकाणी जर निलंबित केले गेले तर कसे चालेल ? शासन दोषींवर कारवाई करण्याचे नाकारत नाही. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार समिती नियुक्त करुन चौकशी केली जाईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : महोदया, सिल्लोड शहरात मटका व जुगाराचे अड्डे मोठया प्रमाणावर सुरु असल्याबाबतची ही लक्षवेधी सूचना आहे. या धंद्यांनी त्या ठिकाणी उच्छाद माजलेला आहे. असे असताना सुध्दा पोलीस उपनिरीक्षक जगन्नाथ कळसकर त्याकडे दुर्लक्ष करतात, म्हणून मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी बुलडाणा जिल्हयाच्या पोलिसांना याबाबत तपासणीचे आदेश दिले. त्यानुसार बुलडाणा पोलिसांनी मटका व जुगार अड्डयांवर धाडी टाकल्या. आता आणखी माननीय मंत्री महोदयांना कोणता पुरावा हवा आहे ? तेव्हा या पोलीस उपनिरीक्षकांना आपण निलंबित करणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिल्यानंतर बुलडाणा पोलिसांनी सिल्लोड शहरात थांबून या धंद्यांवर लक्ष ठेवले. आठ दिवस राहिल्यानंतर त्यांना केवळ एकच केस मिळालेली आहे. आठ दिवसातून एकच केस मिळाली याचा अर्थ त्या ठिकाणी हे धंदे बंद आहेत.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभापती : माननीय मंत्री महोदय आपण कृपया सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन उत्तर द्या.

श्री.अब्दुल सत्तार नबी : महोदया, तो पोलीस उपनिरिक्षक कळसकर खुलेआम सांगतो की, माझी वरपर्यंत लाईन क्लिअर आहे. माझे कोणीही काही बिघडवू शकत नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी : महोदया, सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती ग्राहय धरली जाते. सन्माननीय सदस्य श्री.अब्दुल सत्तार नबी सांगत आहेत की, त्या ठिकाणी 13 गुन्हे दाखल झालेले आहेत. परंतु हे पोलिस उपनिरीक्षक त्याकडे दुर्लक्ष करीत आहे.तेव्हा या उपनिरीक्षकांना निलंबित करणे आवश्यक आहे.

श्री.अब्दुल सत्तार नबी : महोदया, ज्या दिवशी राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री येणार होते त्यावेळी या घटना घडलेल्या आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदया, मी पूर्वीच सांगितले आहे की, सर्व पोलीस उपमुख्यमंत्री महोदयांच्या बंदोबस्तामध्ये होते. त्यामुळे अशा गुन्हयाचा एखादा प्रकार घडला असेल.

श्री.अब्दुल सत्तार नबी : महोदया, हा पी.एस.आय. मटक्याच्या दुकानात येत असूनही त्यांच्या विरुध्द काही कारवाई न करता त्यांना पाठीशी घालण्याचे काम होत आहे.

तालिका सभापती : माननीय मंत्रिमहोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घ्या आणि ठोस काय कारवाई करणार ते सांगा.

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदया, रेकॉर्डवर 2004-2005 या वर्षातील गुन्हे नोंदविलेले आहेत. त्यामुळे आता त्या पोलीस उपनिरीक्षकाला पाठिशी घालण्याचे कारण नाही. या कळसकरची चौकशी तो कामावर असताना योग्यप्रकारे होऊ शकणार नाही. पोलीस स्टेशनमध्ये असताना पोलीस अधिकाऱ्याची चौकशी होणे शक्य नाही. कारण जे चौकशी करतात ते त्याच्याच भाऊबंदकीतील असतात. त्यामुळे प्रथम त्याला निलंबित करा व नंतर चौकशी करा.

नंतर श्री.गायकवाड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुरेश देशमुख..

.हा अधिकारी असे सांगत असतो की, माझ्याविरुध्द कोणीही कारवाई करणार नाही.माझे हात फार वरपर्यन्त पोहोचलेले आहेत.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, या अधिका-याचे हात कोठेही पोहोचलेले नाहीत. सन्माननीय सदस्यांच्या माहिती करता मी सांगू इच्छितो की, शासन अशा प्रकारे कोणत्याला अधिका-याला पाठीशी घालणार नाही. पोलीस दल हे शिस्तीचे आहे व एखाद्याचा हात कोठे पोहोचलेला असला तरी त्याला पाठीशी घातले जाणार नाही.या अधिका-याची नियमाप्रमाणे चौकशी करण्यात येईल आणि नंतर कारवाई करण्यात येईल.

श्री.अब्दुल सत्तार :माननीय मंत्रीमहोदय असे म्हणाले की पोलीस दल हे शिस्तीचे आहे तेव्हा शिस्तीप्रमाणे त्या अधिका-याच्या विरुध्द कारवाई केली जात नाही तोपर्यन्त आपले पोलीस दल हे खरोखर शिस्तीचे आहे की नाही हे कसे समजेल ? तो अधिकारी गावामध्ये चौकात उभे राहून असे सांगत असतो की, माझी वरपर्यन्त लाईन क्लिअर आहे. आमच्या जिल्हयातील सर्व वर्तमानपत्रामध्ये तशा प्रकारे छापून आलेले आहे असे असतांनासुध्दा माननीय मंत्रीमहोदय ती गोष्ट मानत नाही हे बरोबर नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सबंधित अधिका-यांची इतरत्र बदली करण्यात येऊन त्यांची चौकशी करण्यात येईल.

श्री.अब्दुल सत्तार : सभागृहामध्ये एखाद्या सन्माननीय सदस्यांनी विषय मांडल्यानंतर ते जर माननीय मंत्रीमहोदय मानत नसेल तर ते बरोबर नाही या अधिका-याला पाठीशी घालण्याचे कारण काय आहे ? प्रथम त्या अधिका-याला निलंबित करण्यात यावे आणि नंतर त्याची चौकशी करण्यात यावी.

(उत्तर दिले नाही)

श्री.पांडुरंग फुंडकर : श्री.कळसकर नावाच्या अधिका-याच्या संदर्भात या सभागृहातील सन्माननीय सदस्य या ठिकाणी सांगत आहेत. एका अधिका-याच्या कार्यक्षेत्राच्या हद्दीमध्ये दुस-या जिल्हयातील पोलीस अधिकारी येऊन धाडी घालत आहेत व तेथील गुन्हे पकडत आहेत या पेक्षा दुसरी कोणती लाच्छंनास्पद गोष्ट असू शकते.? याचा अर्थ असा आहे की या अवैध धंद्याना हा अधिकारी पाठीशी घालत होता.सभागृहातील सन्माननीय सदस्यांना तो अधिकारी असा म्हणाला की

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडक..

माझी वरपर्यन्त लाईन आहे माझे कोणीही वाकडे करु शकत नाही तेव्हा या अधिका-याला पाठीशी घालण्याचे कारण काय आहे त्याला सस्पेन्ड करुन चौकशी करण्यात यावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : हा अधिकारी त्या पोलीस स्टेशनचा इनचार्ज नाही. तो तेथील दुय्यम अधिकारी आहे.त्याची लवकरात लवकर चौकशी करण्यात येऊन जर तो दोषी आढळून आला त त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल..

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छिते की, या अधिका-याच्या बाबतीत सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत सन्माननीय सदस्य पुराव्यानिशी सांगत असतांनासुध्दा आपण त्याबाबतीत ठोस कारवाई करीत असल्याचे दिसून येत नाही. सबंधित अधिका-याची चौकशी करण्यात येईल एवढेच आपण सांगत आहात. परंतु ही चौकशी केव्हा करणार आहात ? ही चौकशी किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे? चौकशीच्या अगोदर त्या अधिका-याला निलंबित करण्यात येणार आहे किंवा नाही ? ही चौकशी कोण करणार आहे ? यासबंधीचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करणे आवश्यक आहे

श्री.सिध्दराम म्हेत्रे :सभापती महोदया, सभागृहाच्या तीव्र भावना लक्षात घेऊन संबंधित अधिका-याला निलंबित केले जाईल

<u>लक्षवेधी क्रमांक 5 पुढे ढकलण्या बाबत</u>

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली पाचव्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती माननीय मंत्रिमहोदयांनी केली असून त्याला माननीय सभापतींनी मान्यता दिली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाज पत्रिकेवरील अनुक्रमांक 7 वर असलेल्या लक्षवेधी सुचनेसंबंधात...</u>

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : लक्षवेधी सूचना क्रमांक 7 ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, या लक्षवेधी सुचनेवर उत्तर देण्यासाठी आता येथे माननीय उद्योगमंत्री हे उपस्थित नाहीत. माननीय राज्यमंत्री जरूर येथे उपस्थित आहेत आणि ते या संबंधात उत्तर देऊ शकतात. परंतु हा फार किचकट असा विषय आहे. त्यामुळे मंत्री महोदय स्वत: उपस्थित असणे आवश्यक आहे. ... आताच बाहेर मला माननीय उद्योगमंत्री भेटले होते आणि ते स्वत: यावर उत्तर देण्यासाठी येणार असल्याचे मला म्हणाले आहेत. कारण या विषयासंबंधात कॅबिनेटचा निर्णय झालेला आहे परंतु त्याची अमलबजावणी मात्र अद्याप झालेली नाही असे हे गंभीर प्रकरण आहे. तरी माझी आपणास विनंती आहे की, आपण आता ही लक्षवेधी सूचना काही वेळासाठी पुढे ढकलावी, आणि यापुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घ्यावी. तोपर्यंत माननीय उद्योगमंत्री सभागृहात येतील आणि मग आपण ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ या.

तालिका सभापती : सभागृहाची याला मान्यता आहे का ?

काही सन्माननीय सदस्य : होय. आमची हरकत नाही.

तालिका सभापती : ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना थोडा वेळासाठी पुढे ढकलण्यात येत आहे. आता यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 8 चर्चेला घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ती मांडावी.

..... 3एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पेरीमल प्रा.आ.केंद्रातील (जि.गडचिरोली) दत्तक घेतलेल्या 5 वर्षीय बालकाचा कुपोषणाने झालेला मृत्यू.

मु.शी. : पेरीमल प्रा.आ.केंद्रातील (जि.गडचिरोली) दत्तक घेतलेल्या 5 वर्षीय बालकाचा कुपोषणाने झालेला मृत्यू यासंबंधी डॉ.दीपक सावंत, श्री. अनंत तरे, व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सभागृहाचे सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" दिनांक 22 नोव्हेंबर 2005 रोजी वा त्या सुमारास गडचिरोली जिल्ह्यातील पेरीमल प्राथमिक आरोग्य केंद्रातील दत्तक घेतलेल्या श्रेणी 3 च्या पिंट्या पोशन्ना कोसरे, वय 5 वर्षे या बालकाचा कुपोषणामुळे झालेला मृत्यू, सदर कुपोषित बालकांच्या मृत्यूची माहिती तेथील आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी दडवून ठेवणे, या मृत्यूची चौकशी करून त्यासंबंधी अहवाल देण्याचा जिल्हाधिकारी यांना पालक मंत्र्यांनी दिलेल्या सूचना, अशा प्रकारे कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू, ही बाब गंभीर असून कुपोषणमुळे होणारे बालमृत्यू रोखण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य बेपर्वाई, परिणामी राज्यातील व विशेषत: आदिवासी भागातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : **येथे सोबतचे** निवेदन छापावे)

..... 3एस 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा. सा.आरोग्य मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, कुपोषणासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. दिनांक 22 नोव्हेंबर 2005 ला विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील पेरीमेली या गावामध्ये कुपोषणाने एका बालकाचा मृत्यू झाला आणि ही माहिती तेथील संबंधित अधिकाऱ्यांनी आणि केंद्रावरील कर्मचाऱ्यांनी लपवून ठेवली अशी माहिती मी माझ्या या सुचनेमध्ये दिलेली आहे. वास्तविक पाहता, आपण पाहिले तर या बालकाचा मृत्यू 22.11.2005 रोजी झाला म्हणजे ते बालक त्यावेळी केवळ 5 वर्षे 5 महिन्यांचे होते. या बालकाची आणि त्याच्या आईची बॅक हिस्ट्री पाहिली तर आपल्याला दिसून येते की, त्या मातेचे हे 6 वे मूल होते आणि यापूर्वीची तिची केवळ दोनच मुले सध्या जीवंत आहेत. तर बाकीची तिची 4 मुले कशामुळे मृत्यू पावली याची माहिती आपल्याकडे आहे काय ? तसेच आपण या निवेदनात म्हटले आहे की, सदरहू मूल दत्तक-पालक योजनेनुसार श्रीमती एस.टी.गऊत्रे यांना दत्तक दिले होते. आपण मोठ्या घोषणा करून ही दत्तक-पालक योजना केली होती पण ही योजना फेल ठरली असल्याचे या एकंदर प्रकरणावरून दिसते आहे. तेव्हा या बालकाचे पालकत्व 2001पासून श्रीमती एस.टी.गऊत्रे यांचेकडे होते आणि 2005 मध्ये ते बालक कुपोषणाने मृत्यू पावले आहे. तेव्हा आपल्याला या बाबतीत नेमके काय म्हणावयाचे आहे ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी या बालकाबद्दल आणि त्याच्या मातेबद्दल जी माहिती सांगितली तरी खरी आहे. हे बालक त्या मातेचे सहावे मूल होते आणि तिची यापूर्वीची दोनच मुले सध्या जीवंत आहेत. तसेच या बालकाला आपल्या दत्तक-पालक योजनेनुसार तेथील स्त्री आरोग्य सहाय्यिका श्रीमती एस.टी.गऊत्रे यांनी दत्तक घेतले होते. मात्र या प्रकरणी माहिती लपवून ठेवल्याचे काही दिसत नाही. तसेच सदरहू बालकाच्या मातेची अगोदरच्या चार बालकांच्या बाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नसल्याने ती माहिती मी नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, हे बालक दत्तक दिले होते आणि तेथील आरोग्य सहाय्यिका जी होती तिनेच त्याचे पालकत्व स्वीकारले होते. तरी देखील या बालकाची योग्य प्रकारे निगा राखली गेली नाही असे दिसून येते आहे. तेव्हा या बालकाचा मृत्यू कशामुळे झाला, ते बालक ग्रेड 4चे होते का ?

.... 3एस 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या बालकाला थोडा ताप होता तसेच त्याला ब्रेथलेसनेस ब्रॉंकायटीस झालेला होता व म्हणून त्याला दवाखान्यामध्ये देखील आणले होते आणि वाटेतच त्याचा मृत्यू झालेला आहे. मात्र त्या बालकावर आरोग्य सेविकांचे लक्ष होते. त्याला न्यूमोनिया झाला होता.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, याचा अर्थ असा की, ते बालक ग्रेड 4 मध्ये होते आणि तसे असेल तर त्याचे रेग्युलरली मॉनेटरींग होत होते का ? कारण आपल्या नवसंजीवनी योजनेनुसार ग्रेड 4 च्या बालकांचा रोजच्या रोज सर्व्हे होणे आवश्यक आहे, तसे त्याचेबाबतीत होत होते का ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदया, ग्रेड 3 व ग्रेड 4 च्या बालकांचे डीएचओ कडून तसेच तेथील आरोग्य कर्मचाऱ्यांकडून मॉनेटरींग होत होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, तरी देखील ते बालक मेले हे दुर्दैव आहे. कुपोषणाच्या बाबतीत आपण मोठमोठ्या योजना येथे सांगितल्या आहेत. राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण अभियान वगैरे सगळे काही सांगितले आहे. परंतु या योजनांचा बोजवारा उडाला असल्याचे यावरून दिसून येते. आपण बालक दत्तक देता, पण दत्तक घेणारे त्या बालकांचे संगोपन नीट करू शकत नाहीत. ...

(यानंतर श्री. सरफरे ... 3टी 1 ..

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

याला अकाऊंटीबिलिटी नाही. म्हणून ही कुपोषणाची परिस्थिती आहे. त्यामुळे पाच वर्षामध्ये 6 वेळा लक्षवेधी सूचना उपस्थित केल्या, अनेकदा प्रश्न उपस्थित केले, अर्धा तास चर्चा उपस्थित केल्या असे एकूण 23 वेळा प्रश्न उपस्थित केले. माझा प्रश्न असा आहे की, जिजाऊ माता बाल पोषण मिशन आहार योजनेंतर्गत राज्यामध्ये किती बालमृत्यू टाळण्यासाठी आपण प्रयत्न केले. गेल्या वर्षीचे आकडे आणि या वर्षीचे आकडे यामध्ये फरक किती आहे?

डॉ. विमल मुंदडा : माझ्याकडे गडचिरोली जिल्हयातील गेल्या पाच वर्षातील बालमृत्यूची आकडेवारी आहे. त्यामध्ये नोव्हेंबर 2005 पर्यंत लाईफ बर्थ 10467 आहेत, त्यामध्ये बालकांचा आय.एम.आर. 0 ते 1 वर्षापर्यंत बघतो. त्यामध्ये 0 ते 7 दिवसातील 221 बालके आहेत. एकूण जीवंत बालके 10,667 आहेत. त्यापैकी 29 दिवसांपासून 1 वर्षाच्या आतील 112 बालके आहेत. अर्भक मृत्यूचे प्रमाण 438 आहे. 2004 आणि 2005 मधील एकंदर तुलना केली तर बालमृत्यू होण्यामागील कारणे अनेक आहेत. त्यामध्ये इकॉनॉमीक समस्या असेल, किंवा लवकर लग्न होणे, लवकर गर्भधारणा होणे ही कारणे आहेत. याकरिता पाच नवसंजीवनी प्रकल्पामधून आरोग्य पोषण मिशन स्थापन केले आहे. त्यांचेमार्फत आम्ही मोहीम राबवीत आहोत. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्हयामध्ये इंटीग्रेटेड मॅनेजमेंट ऑफ चाईल्ड ईल्डनेस हा उपक्रम राबवीत आहोत. आपण जर जन्मदर आणि मृत्यूदर पाहिला तर त्यामध्ये पेरिगेटेल आणि न्यूनेटेल अशाप्रकारचे डेथ फार मोठया प्रमाणात आहेत. ते प्रमाण 70 टक्के आहे. नॉर्मली जेवढे मृत्यू होतात त्यामध्ये सुध्दा आपल्याला प्रमाण कमी करावे लागेल. या मृत्यूदरामध्ये कमी वजनाच्या बालकांचा सुध्दा समावेश आहे. माननीय सदस्य डॉ. दीपक सांवंत साहेबांना याची पूर्ण माहिती आहे. मला असे सांगावयाचे आहे की, ही एकंदर परिस्थिती नियंत्रणात आणण्यामध्ये शासनाला यश आले आहे. आपल्या नवसंजीवनी प्रकल्पातील 15 जिल्हयामधील मागील आकडेवारी मी वाचत नाही. परंतु तरीही परसेंटेज काढायचे असेल तर तो दर 42 होता, आज 15 आदिवासी जिल्हयातील तो दर 39 आहे. आज इंटीग्रेटेड मॅनेजमेंट ऑफ चाईल्ड ईल्डनेसमध्ये एकीकडे माता मृत्यूचा दर कमी करणे, इंस्टिटयुशनल डिलिव्हरी वाढविणे, प्रत्येक दाई,एएनएम यांनी किमान 10 डिलिव्हरी व्यवस्थित केल्या पाहिजेत. दाईंनी सुध्दा त्याचे चांगल्या पध्दतीने मॉनिटरींग केले पाहिजे. म्हणजे गर्भवती स्त्रीपासून स्तनदा मातापर्यंत एकंदर काळजी घेणे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.नव संजीवनी योजना आणि माता-बालपोषण आहार योजनेचा कसा बोजवारा उडाला आहे त्याचे एक उदाहरण आपल्याला देतो. ती आपली आकडेवारी आहे, आपल्याकडे गरोदर मातांना मातृत्व योजना दिली जाते. यामध्ये आपण दिलेल्या मातांची संख्या पाहिली तर 6100 मातांना टप्प्यानुसार मातृत्व अनुदानाचा लाभ दिला आहे. आणि पुढे असेही म्हणता की, चौथ्या टप्प्यामध्ये मातृत्व योजनेचा लाभ मिळालेली एकही महिला नाही. असे गेल्या वर्षीच्या आकडेवारीमध्ये आपण म्हणत आहात. मी आपल्याला गडचिरोली जिल्हयाचे उदाहरण देतो. या योजनेसाठी 45 लाख 60 हजार रुपये इतका खर्च झाला आणि अनुदान 76 हजार रुपये उपलब्ध झाले. म्हणजे चौथ्या टप्प्यातील मातांच्या कुपोषणावर मात केली असे म्हणता, परंतु गरोदर स्त्रीयांना चौथ्या टप्प्यातील अनुदान द्यायला हवे होते तेच दिलेले नाही हे यावरुन सिध्द होते. म्हणून हे बालमृत्यू होत आहेत असा माझा दावा आहे. तेव्हा प्रमाणापेक्षा कमी अनुदान खर्च झाले आहे हे आपण मान्य करता काय? आणि आपण एवढया आत्मविश्वासाने सांगत आहात तर येत्या अधिवेशनामध्ये कुपोषणावर आपण एक श्वेतपत्रिका जाहीर करणार काय?

डॉ. विमल मुंदडा : कुपोषणावर मात करण्यासाठी सर्व डिपार्टमेंटच्या को-ऑर्डिनेशनने आपण योजना राबवित आहोत. परंतु आपण म्हणाल्याप्रमाणे चौथ्या टप्प्यातील मातृत्व अनुदान योजनेपासून लाभार्थ्यांना वंचित ठेवले गेले असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्यांवर आपण निश्चितपणे कारवाई करु. यामधून चांगले निर्माण होणे महत्वाचे आहे. महिला व बाल कल्याण विभाग, आरोग्य विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग असेल,...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा . . . .

सभापती महोदय, रोजगार हमी योजना असेल, म्हणजे सामाजिक समस्या एकीकडे आणि मेडिकल, क्लिनिकल कारणे एकीकडे. आपणही डॉक्टर आहात. आपल्याला जे-जे काही कार्यक्रम राबवावयाचे आहेत, माता पोषण आरोग्य मिशन आहे किंवा इन्टीग्रेटेड मॅनेजमेंट ऑफ चाईल्ड ईलनेस असेल यामध्ये निश्चितपणे येणाऱ्या काळामध्ये आपला अर्भक मृत्यू दर कमी होईल याची मी आपल्याला खात्री देऊ इच्छिते. तसेच पोषण आहाराच्या बाबतीत ज्या तक्रारी असतील त्याबाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि त्याबाबतीत त्यावर कारवाई केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, मी असा प्रश्न विचारला होता की, आपण श्वेतपत्रिका जाहीर करणार आहात का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, श्वेतपत्रिका जाहीर करण्याची आवश्यकता नाही. आपण पूर्णपणे याबाबतीत मॉनेटरींग करतो. दर महिन्याला रिपोर्ट येतो आणि आपल्याला सुध्दा याबाबतीत आरोग्य विभागाकडून रिपोर्टींग मिळू शकते आणि आजही आपला मंथली प्रोग्रसिव्ह रिपोर्ट आहे, तो सन्माननीय डॉक्टर सदस्यांना दिला जाईल असे मी सागू इच्छिते.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, लिखित उत्तर में यह लिखा है कि श्रीमती एस.टी. गऊत्रे, स्त्री आरोग्य सहायक ने 2001 से दत्तक पालक योजना के अन्तर्गत इस बालक को दत्तक लिया था. यह बालक मार्च 2002 से श्रेणी-3 में था. मैं यह जानना चाहती हूं कि यह बालक पहले कौनसी श्रेणी में था ? मैं यह भी जानना चाहती हूं कि दत्तक पालक योजना के अन्तर्गत जिस व्यक्ति ने बालक को दत्तक लिया है, उससे क्या अपेक्षा है और क्या वह सोशल अवेअरनैस का काम करता है, उसकी क्या ड्यूटी है ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदया, यासंदर्भात डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न विचारला होता आणि त्याला मी उत्तर दिलेले आहे. मॉनेटरींग करणे आणि दुसरीकडे सोशल अवेअरनेस करणे आणि जे पालक गरीब असतात, आर्थिकदृष्टया मागासलेले असतात, त्यांच्या पाल्यांना चांगल्या प्रकारचा आहार मिळाला पाहिजे आणि त्यांचे वजन वाढले पाहिजे आणि ते कोणत्याही इन्फेक्शनला बळी पडता कामा नयेत अशा प्रकारचे आपण मॉनेटरींग करतो.

श्रीमती फौजिया खान : फिर मॉनेटरिंग करने से क्या फायदा हुआ, यह जो योजना अमल में लायी जा रही है, उससे क्या फायदा हो रहा है और दत्तक पालक योजना के अन्तर्गत इस बालक को दत्तक लेने के बाद क्या फायदा हुआ है ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, लाभार्थींना निश्चितपणे फायदा होण्यासाठीच कोणतीही योजना असते आणि त्यासाठी आपण प्रयत्न करीत असतो. एखादी गोष्ट दुर्दैवाने निष्काळजीपणे होऊ शकते. पण या बालकाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा निग्लीजन्स झालेला नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, या लक्षवेधीच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अनेक मुद्यांबाबत प्रश्न विचारले आहेत. सन्माननीय मंत्री डॉ.विमल मुंदडा या अत्यंत तळमळीने उत्तर देत असतात. पण आम्हाला अशी अपेक्षा आहे की, या तळमळीच्या बरोबर प्रशासनानेही तसे केले काम केले पाहिजे. महाराष्ट्राला कुपोषणाचा प्रश्न लांच्छनास्पद आहे सातत्याने देशामध्ये आणि गल्लीबोळातील लोक प्रश्न विचारतात की, तुम्ही कुपोषण थांबविण्यासाठी प्रत्यक्षात नेमके कोणते धोरण राबविणार आहात ? कारण असे की, डॉ.अभय बंग यांच्या समितीचा अहवाल आपल्यासमोर आला. त्या अहवालात त्यांनी ज्या शिफारशी केल्या होत्या, त्या तुम्ही अमंलात आणल्यामुळे यामध्ये यश मिळत आहे असे तुम्हाला म्हणावयाचे असेल तर मग तुम्ही असे आश्वासन द्यावे की, याच्या अंमलबजावणीसाठी आम्ही आमचे धोरण जाहीर करु आणि त्यानुसार पुढच्या वर्षामध्ये मृत्यू दर अमुक प्रमाणात कमी होईल अशी आम्हाला अपेक्षा आहे. म्हणून सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी श्वेतपत्रिकेची मागणी केली आहे, त्यामध्ये वैयक्तिक अहंकाराचा प्रश्न नसून शासनाची राजकीय इच्छा शक्ती आणि सामाजिक प्रशासन व आर्थिक व्यवस्था या कुपोषित बालकांच्या पाठीमागे आहे हे समोर आणण्याच्या दृष्टीकोनातून आपण एक श्वेतपत्रिका जाहीर करावी. ज्यामध्ये शासनाचे धोरण स्पष्ट झालेले असेल. तशी ती जाहीर कराल का ? असा माझा प्रश्न आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, डॉ.अभय बंग यांचा पहिला आणि दुसरा असा जो अंतिम अहवाल होता, तर यामध्ये आपण ॲक्शन टेकन रिपोर्ट घेतलेला आहे. त्यात जे मुद्दे होते, त्याची अंमलबजावणी पूर्ण करीत आहोत. जिजाऊ राजमाता बाल आरोग्य पोषण मिशन केले आहे आणि ईन्टीग्रेटेड मॅनेजमेंट ऑफ चाईल्ड ईलनेस हा दुसरा टप्पा केलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा (पुढे सुरु...

आणि 0 ते 6 महिन्याची बालके 0 ते 1 वर्षामध्ये केलेले आहे. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छिते की, 0 ते 1 वर्षापर्यन्तच्या बालकांचे जगण्याचे प्रमाण 70 टक्के असते. कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला लो बर्थ वेट असेल याची काळजी घेण्यासाठी प्रत्येक ठिकाणी वार्म रुम असली पाहिजे. जिथे ग्रामीण रुग्णालये आहेत, त्या ठिकाणी नवजात अर्भकाची 15 दिवस काळजी घेण्यासाठी युनिट निर्माण केले जाईल. आपण जे मिशन करत आहोत, यामध्ये निश्चितपणे पुढच्या काळामध्ये बालमृत्यूचा दर कमी होऊ शकतो आणि राज्याचे धोरण म्हणून मी सांगू इच्छिते की, आरोग्य धोरण येणाऱ्या दोन-चार महिन्यामध्ये जाहीर करु त्यामध्ये राज्याच्या आरोग्य धोरणामध्ये निश्चितपणे अंतर्भाव होईल, हे मी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छिते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धोरण नको आहे. ज्यावेळेस एखाद्या विषयावर श्वेतपत्रिका निघते, त्यावेळी त्या श्वेतपत्रिकेमध्ये सांगोपांग विचार केला जातो. आपण सांगता की, कोणतीही माहिती लपवून ठेवायची नाही. आपल्याकडे कुपोषण आहे हे मान्य केलेले आहे. हिंदुस्थानात 47 टक्के कुपोषण आहे हे देखील जगजाहीर आहे. आता तुम्हाला महाराष्ट्रातील कुपोषण का लपवायचे आहे ? जी काही आकडेवारी असेल, जी काही प्राथमिक आरोग्य केंद्रे असतील, बाल रोग तज्ज्ञ आहेत त्यांच्यासंबंधीची सगळी माहिती पेपरवर आणावी. आपण कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेश न आणता श्वेतपत्रिका जाहीर करणार आहात काय ? असा माझा पुन्हा प्रश्न आहे.

डॉ.विमल मुंदडा : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्या आणि अन्य सन्माननीय सदस्यांच्या तशा भावना असतील. पण आपण हेच "आरोग्य धोरण" जाहीर केले आणि त्याची अंमलबजावणी करत असताना काही सूचना आल्या तर त्या सूचनेचा त्यामध्ये अंतर्भाव करु शकतो. जसे आपण महिला धोरण केले. त्यामधील काही गोष्टी या बंधनकारक आहेत. सर्व डॉक्टर सन्माननीय सदस्यांची एकत्रितपणे चर्चा करुन त्याप्रमाणे निश्चत "आरोग्य धोरण" येणाऱ्या तीन-चार महिन्यात जाहीर केले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, आपणही महिला आहात,तेव्हा या संबंधातील श्वेतपत्रिका काढण्यास त्यांना काय अडचण आहे ? "आरोग्य धोरण" वेगळे आणि "श्वेतपत्रिका" काढणे वेगळे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : जवळजवळ ते सारखेच आहे. आरोग्य धोरणही बंधनकारकच आहे.

डॉ.दीपक सावंत : नाही. धोरण हे धोरणच असते.

डॉ.विमल मुंदडा : ते बंधनकारकच असते.

तालिका सभापती : 'धोरण' हे फक्त कागदावरच नसते. 'धोरण'हे बंधनकारकच असते.

डॉ.दीपक सावंत : श्वेतपत्रिका काढा. म्हणजे सत्य बाहेर येईल. आपले अधिकारी काम करतात की नाही, हेही कळेल. आपण अधिकाऱ्यांना पाठीशी घालता काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, मला आपले संरक्षण पाहिजे. हे सगळयांनाच माहीत आहे की, हा सोशियो इकॉनॉमिक प्रश्न आहे. जसे आपण महिला धोरण करत असतांना दर तीन महिन्याला नवीन नवीन गोष्टींचा त्यामध्ये अंतर्भाव करु शकलो. तसे राज्याचे 'आरोग्य धोरण' जाहीर करु या आणि नंतर पुढच्या काही गोष्टी असतील, त्याची माहिती घेऊन त्यांचा त्यात समावेश करु. 'आरोग्य धोरणा'मध्ये सगळयाच गोष्टी येतील. कुपोषणाची बाब येते, महिलांच्या समस्या असतील त्याही त्यामध्ये येतील.

--

तालिका सभापती : अनुक्रमांक 7 वरील लक्षवेधी सूचना माननीय उद्योगमंत्री उपस्थित नसल्यामुळे पुढें ढकलण्यात आली होती. ती लक्षवेधी सूचना आता माननीय उद्योगमंत्री उपस्थित असल्याने, चर्चेला घेण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

SKK/ SBT/ MHM/

पृ. शी. : विदर्भ,मराठवाडयातील सामूहिक प्रोत्साहन योजनेचा कालावधी वाढविण्याबाबत.

मु. शी : विदर्भ,मराठवाड्यातील सामूहित प्रोत्साहन योजनेचा कालावधी वाढविण्याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,सागर मेघे, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सामूहिक प्रोत्साहन योजना सन 1993 पर्यन्त विदर्भ, मराठवाड्यामधील उद्योगांना प्रकल्प उभारणी कालावधी ही पात्रता प्रमाणपत्रासाठी मिळणाऱ्या कालावधी इतका देण्यात यावा अशी लेखी निवेदनाद्वारे विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनने शासनाकडे केलेली मागणी, उक्त मागणीच्या अनुषंगाने मंत्रीमंडळाच्या समितीने अनेकवेळा घेतलेला निर्णय, उक्त निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपावेतो प्रशासनाने न करणे, परिणामी विदर्भ, मराठवाड्यातील उद्योजकांवर होणारा परिणाम, विदर्भाच्या अनुशेषाची ही मागणी लक्षात घेता लोकप्रतिनिधींनी उक्त निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, विदर्भ आणि मराठवाड्यावर कसा अन्याय केला जातो, त्याचे हे एक उदाहरण आहे. विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये सन 1993 अंतर्गत सामूहिक प्रोत्साहन योजना आहे. जे प्रकल्प आहेत, त्याबाबतचा कालावधी 1988 च्या योजनेप्रमाणे लागू करावा, जेणेकरुन विदर्भ व मराठवाडा येथील उद्योगांना उभारण्याचा कालावधी दोन-तीन वर्षाचा न ठेवता योग्यता प्रमाणपत्राचा वापर करण्याकरिता दिलेला कालावधी द्यावा, अशाप्रकारची मागणी विदर्भ इंडस्टीज असोसिएशनने केलेली होती. या विषयावर महाराष्ट्र सरकारच्या कॅबिनेटमध्ये निर्णय झाला. त्यानंतर मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना जाहीर झाले की, "अशाप्रकारची सवलत जाहीर करण्यात आलेली आहे". पण त्यानंतर कॅबिनेटचा निर्णय होऊन देखील याबद्दलचे आदेश काढण्यात आले नाहीत. आम्ही चौकशी केल्यानंतर आमच्या असे लक्षात आले की, अर्थ विभागाने याला ऑब्जेक्शन घेतले. मला कळत नाही की, शेवटी कॅबिनेट मोठे आहे की,अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असलेली समिती मोठी आहे ? कॅबिनेटमध्ये अर्थमंत्री येतात. कॅबिनेट हे सुप्रीम आहे. कौन्सिल ऑफ मिनिस्टरचे कॅबिनेट असते. तेव्हा 18 सप्टेंबर 2000 रोजी जो कॅबिनेटचा निर्णय झालेला आहे, तो संपूर्ण महाराष्ट्राला लागू केला. माझी मंत्री महोदयांना एवढीच विनंती आहे की, ही मागणी विदर्भ आणि मराठवाड्यापुरती होती.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

तेव्हा ती महाराष्ट्रात लागू करण्यामध्ये अडचणी असतील तर विदर्भ आणि मराठवाडयापुरता हा कॅबिनेटचा निर्णय लागू करुन एक महिन्याच्या आत यासंबंधीचे आदेश निघतील काय? यात अडचण असेल तर विदर्भ-मराठवाडयाच्या अनुशेषातून शासनाने ते मान्य करावे. पण विदर्भातील उद्योगाच्या भरभराटीकरीता ते आवश्यक आहे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदया, विदर्भ आणि मराठवाडयावर अन्याय होतो असा या ठिकाणी उल्लेख झाला. मला या ठिकाणी मुद्दाम सांगितले पाहिजे की, उद्योग मंत्री आणि उद्योग राज्यमंत्री हे दोघेही मराठवाडयातील आहेत. आमच्या कारकिर्दीमध्ये किमान मराठवाडयावर आणि विदर्भावर अन्याय होणार नाही, याची दक्षता आम्ही दोघेही घेऊ. मुख्यमंत्रीसुध्दा त्याला समर्थन निश्चित देतील. त्यात शंका बाळगण्याचे काही कारण नाही. सेलटॅक्स इन्सेटिंव्हचा उल्लेख लक्षवेधी सूचनेमध्ये करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनची मागणी होती.हा विषय प्रामुख्याने सवलतीच्या कालावधीबाबतचा आहे. या पॅकेज स्कीम ऑफ इन्सेटिव्ह अंतर्गत 31-12-1999 ही अर्ज करण्याच्या बाबतीत अंतिम तारीख होती. त्या अंतर्गत पायोनरी युनिट आणि नॉन पायोनरी युनिट यांचा विचार करुन नॉन पायोनरी युनिटकरिता दोन वर्षाचा कालावधी आणि तीन वर्षाचा कालावधी पायोनरी युनिट करण्याबाबत होता. त्याच्या ऐवजी प्रकल्प उभारणीचा कालावधी हा पात्रता प्रमाणपत्राचा कालावधी समजण्यात यावा अशा प्रकारची मागणी सन्माननीय गडकरी साहेबांची होती. या बाबतीत मंत्रिमंडळाने पॉझिटिव्ह निर्णय घेतलेला आहे. परंतु त्याचबरोबर इतरही काही निर्णयाचा अंतर्भाव या निर्णयामध्ये आल्यामुळे याची व्याप्ती वाढलेली आहे हे मला मुद्दाम नमूद केले पाहिजे. व्याप्ती वाढल्यामुळे आणि काही आर्थिक अडचणीमुळे या संदर्भातील अंमलबजावणीस विलंब होत आहे ही वस्तुस्थिती आहे. पण या संदर्भात आपण सांगितल्याप्रमाणे तपासून घेऊन यातून काय मार्ग काढणे शक्य आहे ते पाहून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : खरे म्हणजे ही मागणी विदर्भ-मराठवाडयाकरिता होती. कॅबिनेट नोट विदर्भमराठवाडया करिता झाली. त्यामध्ये विषय घुसवून दिले. विदर्भ-मराठवाडयाला काही मिळाले नाही. सगळा विषय एक करुन टाकला. कॅबिनेटचा निर्णय झाला त्याचे आदेश निघत नाहीत. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आपण मराठवाडयाचे आहात. परंतु अर्थमंत्री .....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

मराठवाडयाचे नाहीत. मी कोणावर टीकाटिपण्णी करीत नाही. मी स्पष्ट प्रश्न विचारतो. विदर्भ-मराठवाडयापुरता अनुशेषातून पाहिजे तर निधी घ्यावा. पण याबाबतीत विदर्भ-मराठवाडयातील उद्योगांना प्रोत्साहन मिळावे म्हणून कॅबिनेटच्या निर्णयाप्रमाणे विदर्भ-मराठवाडयाकरिता पहिल्यांदा आदेश काढा आणि उर्वरित करिता हायपॉवर समितीला शिफारस करा. जर त्या हायपॉवर समितीने शिफारस मान्य केली तर त्यांनाही द्या. विदर्भ-मराठवाडा मागासलेला आहे.विदर्भ-मराठवाडयाकरिता ही कॅबिनेट होती. विदर्भ-मराठवाडयामध्ये अनुशेष आहे. या अनुशेषामध्ये उद्योग क्षेत्र देखील आहे . पण आमच्या एम.आय.डी.सी.मध्ये इंडस्ट्रिज येत नाहीत. नागपूरमधील सगळी एम.आय.डी.सी. पडित झालेली आहे.मुंबईच्याजवळ सवलती देता म्हणून रांजणगाव, पुणे, सिन्नर इकडे उद्योग येतात. चांगली गोष्ट आहे. त्यांना मी विरोध करीत नाही. पण जेवढया सवलत त्यांना देण्यात येतात तेवढयाच सवलती जर नागपूरला देण्यात येत असतील तर येथे कोण उद्योगपती येईल? एक तर येथे येण्यास कोणी तयार नाही. आणि जे आहेत त्यांच्याकरिता ज्या सवलती आहेत त्याही शासन देणार नसेल तर कसे होणार आणि म्हणून माझी विनंती आहे की, विदर्भ आणि मराठवाडा हे औद्योगिकदृष्टया मागासलेला भाग लक्षात घेता त्याला बॅकलॉगचा फायदा देऊन आपण या संबंधीचे आदेश एक महिन्याच्या आत काढाल काय? बाकीच्यांच्या बाबतीत हायपॉवर समितीची परवानगी घ्या आणि मग काढा. नोट फक्त विदर्भ आणि मराठवाडयाची होती. नंतर त्याला जी जोडाजोड झाली ती बरोबर नाही.

श्री.अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, आपल्याला कल्पना आहे की, पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टिव्हच्या बाबतीत ज्या ज्या वेळेस निधी कमी येतो त्या त्या वेळेस प्रथम प्राथम्य नो इंडस्ट्रिज डिस्ट्रीक्टला देतो. नंतर डी प्लसला देतो नंतर डी ला देतो अशा प्रकारे त्या निधीचे वाटप करण्यात येते. डी आणि डी प्लसच्या भागात इंडस्ट्रिज अधिक आकर्षित होण्याच्या दृष्टीकोनातून आपण हे झोनिंग केलेले आहे.त्यामुळे ज्यावेळेस पॅकेज स्कीमच्या अंतर्गत निधी उपलब्ध होईल त्यावेळेस तशा भागांना प्राथम्यक्रम देतो. निधी कमी असेल तर आपण त्या ऑर्डरमध्येच तो वितरीत करतो.

यानंतर श्री. खर्चे..

अशुद्धीत पत्र / मुद्रणासाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 7..... श्री. अशोक चव्हाण .....

त्याच पध्दतीने आपण जो उल्लेख केलेला आहे की हा निर्णय शासनाने घेतला आहे त्यामध्ये प्रथम मराठवाडा आणि विदर्भाचा त्यात अंतर्भाव होता तसेच अनुशेषाच्या अंतर्गत हे करता येत असेल तर हे करावे. याबाबत मी सांगू इच्छितो की, अनुशेषाबाबतचा प्रश्न हा अलाहिदा आहे. त्यातून निधी द्यावयाचा नसला तरी शासनाच्या उत्पन्नात त्यामुळे घट नक्कीच होणार आहे, त्यामध्ये आपल्याला एक्झम्शन द्यावे लागणार आहे अशा प्रकारचा निर्णय घ्यावा लागेल. म्हणून आपल्या म्हणण्याप्रमाणे अनुशेषाच्या अंतर्गत आपण सेल्सटॅक्स इन्सेन्टीव्ह द्यावयाचे ठरविले असून अनुशेषाच्या आधारे यासाठी निधी देता येईल की कसे याबाबतची सुध्दा तपासणी करण्यात येईल. सेल्सटॅक्स आता बंद झालेला आहे त्यामुळे आता व्हॅटच्या बाबतीत केंद्रशासनाने एम्पॉवर समिती नेमलेली आहे त्या समितीची परवानगी आपल्याला घ्यावी लागेल व नंतर त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, आज देखील आपल्याकडे एम्पॉवर समितीमध्ये पशुखाद्यावर 4 टक्के टॅक्स लावला परंतु राजस्थानने तो लावलेला नाही. एम्पॉवर कमिटी एक प्रिन्सिपल म्हणून आहे. जे कायदयाने होत नाही ते चर्चेने झालेले आहे. एम्पॉवर कमिटी असे म्हणत नाही की, गडचिरोलीला सवलती देऊ नका, आजच्या परिस्थितीत मराठवाडा व विदर्भामध्ये उद्योग नाहीत आणि मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये जास्त उद्योग आहेत म्हणून त्यांना सवलती देऊ नका. शेवटी हा आपल्या राज्याचा अधिकार आहे. तसेच ही एम्पॉवर कमिटी म्हणजे हुशारीने टाकलेले एक पिल्लू आहे, विदर्भ आणि मराठवाडयाला मिळू नये म्हणून झारीतील शुक्राचार्यांनी सोडलेले ते एक पिल्लू आहे. मंत्री महोदय हे मराठवाडयातीलच आहेत, त्यांना माझी विनंती आहे की, आपण या सापळयात अडकू नका, मराठवाडयाचे आपण भूमिपुत्र आहात म्हणून तूम्ही या अन्यायामध्ये सहभागी होऊ नका. अशा प्रकारे वैधानिकदृष्टया जाऊन या कमिटीची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. तसेच असा कुठलाही केंद्र शासनाचा कायदा नाही तर हे केवळ निर्णय घेता येऊ नये म्हणून टरकियामाईसिनची कॅपसुल आहे. या कमिटीची कधी बैठकच होत नाही. या ठिकाणी अर्थराज्यमंत्री देखील बसलेले आहेत. त्यांनी सांगावे की, या कमेटीची बैठक वर्षातून किती वेळा होते ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनिल देशमुख (अर्थ राज्यमंत्री) : (बसून) उद्याच या कमेटीची बैठक आहे.

श्री. नितीन गडकरी : उद्या या एम्पॉवर कमिटीची बैठक नाही तर महाराष्ट्रातील तसेच देशातील सर्व सेल्सटॅक्स कमिशनर्स आणि प्रधान सचिव हे कॉमन पॉलिसी ठरविण्यासाठी दिल्लीला एकत्र येत आहेत. कारण ही चर्चा माझ्यासमोरच झालेली आहे. या एम्पॉवर कमिटीमध्ये पश्चिम बंगालचे अर्थमंत्री अध्यक्ष आहेत, त्यांनी तरी या कमिटीचे ऐकून निर्णय घेतला काय ? कारण एम्पॉवर कमिटीला न विचारताच त्यांनी आपल्या राज्यातील चहा वरील व्हॅट कमी केला. म्हणून आपल्या राज्यासाठी अत्यंत हुशारीने टाकलेले हे एम्पॉवर कमिटीचे पिल्लू आहे. यामध्ये आपण अडकू नये, अशी माझी सूचना आहे. कॅबिनेटचा निर्णय हा मराठवाडा आणि विदर्भापुरताच आहे. कॅबिनेट इज सुप्रिम. भारतीय घटनेप्रमाणे आपल्या तीन लिस्ट्स आहेत, राज्यसूची, केंद्रीय सूची आणि कंकरन्स लिस्ट. आणि हा जो भाग आहे तो राज्यसूचीच्या अंतर्गत येतो. ज्यावेळी एम्पॉवर कमिटी तयार झाली त्यावेळी आमचेच सरकार दिल्लीत होते आणि जसवंत सिंग हे अर्थमंत्री होते. राज्यात युनिफॉर्म सेल्सटॅक्स असावा म्हणून घटनेप्रमाणे ही कमिटी तयार झाली आहे. म्युच्युअल कन्सेंट अँड कन्व्हीनिअन्ससाठी ही कमेटी नियुक्त केली आहे. माझी विनंती आहे की, हा एम्पॉवर कमिटीचा बागुलबूवा दूर ठेवावा कारण मराठवाडा व विदर्भात ही सवलत मिळू नये म्हणून हा प्रयत्न आहे. कॅबिनेटचा निर्णय सुप्रिम आहे. कॅबिनेटला असा निर्णय घेण्याचा अधिकार आहे व तो थांबविण्याचा अधिकार अर्थ विभागाला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, अर्थविभाग आणि ही कमिटी सुध्दा सुप्रिम नाही तर कॅबिनेट सुप्रिम आहे त्यामुळे कॅबिनेटच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे का? त्यामुळे कॅबिनेटच्य निर्णयाप्रमाणे आपण विदर्भ-मराठवाडयासाठी आदेश काढणार आहात काय? तसेच दुसरा मुद्दा मी आपल्याला सूचवितो, पाहिजे तर उर्वरित महाराष्ट्राकरिता हायपॉवर कमिटीकडे शिफारस करुन पाठवा. कॅबिनेटचा निर्णय हा सुप्रिम असून तो बंधनकारक आहे. कॅबिनेटचा निर्णय जर या कमिटीने रिजेक्ट केला तर भारतीय घटने प्रमाणे हायपॉवर कमिटी कॅबिनेटचा निर्णय रिजेक्ट करु शकते काय? यासंदर्भात आपण विधी विभागाचे लिगल ओपिनियन घ्या. कॅबिनेट सुप्रिम असल्यामुळे हाय पॉवर कमिटीचा प्रश्न उद्भवत नाही त्यामुळे विदर्भ-मराठवाडयाच्या संदर्भात सगळया कायदेशीर बाबी तपासून गरज असेल तर बॅकलॉग मधून यासंदर्भातील आदेश काढून विदर्भ-मराठवाडयाला आपण न्याय देणार आहात काय?

श्री. अशोक चव्हाण : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच स्पष्ट केले की, हा प्रश्न मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा आहे. मंत्रीमंडळाने असा निर्णय घेतला आहे की, "वरील निर्णयास राज्याच्या वित्तमंत्र्यांच्या शक्तीप्रदान समितीची पूर्व परवानगी घेण्यात यावी." ही हायपॉवर कमिटी नसून तर केंद्रशासनाने गठीत केलेली ही कमिटी आहे. ज्या ज्यावेळेस इन्सेंटीव्ह देण्याचे विषय येतात त्यावेळी वॅट आणि बदलेल्या परिस्थितीमध्ये त्यांची पूर्व परवानगी घ्यावी अशा प्रकारची कदाचित त्यामध्ये अपेक्षा असावी. ही बाब जी आहे ती कॅबिनेटच्या निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : हायपॉवर कमिटीचे जे पिल्लू सोडले आहे ते कॅबिनेटचे मिनीटस् कन्फर्म होण्याच्या अगोदरचे आहे की काय हे सुध्दा तपासून घ्या.

श्री. अशोक चव्हाण : महोदय, कॅबिनेटने घेतलेल्या निर्णयाचे मिनिटस् मध्ये जो उल्लेख आहे तोच उल्लेख मी या ठिकाणी आपल्याला वाचून दाखवितो. ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, कॅबिनेटने निर्णय घेतल्यानंतर हायपॉवर कमिटीकडे विषय जातो ही गोष्टच मुळात चुकीची आहे. कॅबिनेटने निर्णय घेण्याच्या अगोदर यामध्ये हायपॉवर कमिटीची संमती का घेतली नाही? एकदा कॅबिनेटने निर्णय घेतला तर तो विषय हायपॉवर कमिटीकडे जाण्याचा प्रश्न येतोच कोठे?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधात सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज होतो आहे ही गोष्ट कॅबिनेटने घेतलेल्या निर्णया नंतरची नसून या संदर्भात कॅबिनेटनेच हा निर्णय घेतलेला आहे की, वरील निर्णय राज्याच्यां वित्त मंत्र्यांच्या शक्तीप्रदान समितीच्या पूर्व परवानगीने घेण्यात यावा अशा प्रकारचा निर्णय कॅबिनेट मध्येच घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे या निर्णयाची अंमलबजावणी करीत असतांना विदर्भ आणि मराठवाडयाच्या बाबतीत जो अनुशेषांतर्गत अंमलबजावणी करणे शक्य आहे काय हे निश्चितपणे तपासले जाईल आणि शक्तीप्रदान कमिटीची परवानगी घेऊनच पुढची कार्यवाही केली जाईल.

तालिका सभापती : आता आपण लक्षवेधी सूचना क्र. 9 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, सहावी लक्षवेधी सूचना कधी घेण्यात येणार आहे?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा सांगू इच्छितो की, सहावी लक्षवेधी सूचना दोन तीन वेळेस पुकारली होती पण त्यावेळी सूचना देणा-यांपैकी कोणीही सन्माननीय सदस्य हजर नव्हते. त्यामुळे सहाजिक पुढील लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय सहाव्वी लक्षवेधी सूचना सर्वश्री. लक्ष्मण जगताप, जितेंद्र आव्हाड, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, जगन्नाथ शेवाळे,वसंतराव चव्हाण, प्रा. फोजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे या सदस्यांनी दिलेली आहे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा सांगू इच्छितो की, ज्यावेळी मी सहावी लक्षवेधी सूचना पुकारली होती तेव्हा लक्षवेधीच्या संबधीत सदस्य नसल्यामुळेच पुढील लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली होती.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदया, आपण अनेक लक्षवेधी पुकारल्या. आठवी लक्षवेधी सूचना पुकारली. त्याच्या आधी सहावी, सातवी लक्षवेधी सूचना पुकारली. सातवी लक्षवेधी पुकारली तेव्हा सुध्दा संबंधित सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते. म्हणून आठव्या लक्षवेधी सूचनेवर आधी चर्चा झाली. मग सन्माननीय सदस्य आल्यानंतर पुन्हा सातवी लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊन त्यावर चर्चा झाली. त्यामुळे विनाकारण सन्माननीय सदस्यांवर असे हेत्वारोप करणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे आणि श्रीमती फौजिया खान हे आता सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे "कोणी तरी सांगितले म्हणून सभागृहाच्या बाहेर गेले" असे बोलून चुकीचे रेकॉर्डवर आणणे बरोबर नाही.

तालिका सभापती : मी मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की, क्रमांक 6 ची लक्षवेधी सूचना पुकारली असता, त्यावर त्यावेळी ही लक्षवेधी सूचना देणाऱ्यांपैकी कोणीही ती उपस्थित केलेली नाही. म्हणून पुढील लक्षवेधी सूचना पुकारली आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : सर्वसाधारणपणे सन्माननीय सदस्यांची नावे पुकारण्याची प्रथा आहे. लक्षवेधी 1,2,3 असे पुकारत असल्यामुळे ती कोणाची आहे हे काही वेळा लक्षात येणे शक्य नसते.

तालिका सभापती : ती लक्षवेधी सूचना पुकारली तेव्हा संबंधित सन्माननीय सभासद सभागृहात उपस्थित नाहीत असे म्हटले होते. असो. आता ही लक्षवेधी सूचना चर्चेला घ्यायची आहे का ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदया, एकेका लक्षवेधी सूचनेवर 3-3 प्रश्न विचारावाचे असतात. शेवटी काम करण्याच्या पध्दतीलासुध्दा मर्यादा आहेत. एक लक्षवेधी दीड तास चालली आहे. लक्षवेधी दीड-दीड तास चालविण्याची पध्दत नाही. तेच तेच एक सारखे किती वेळा बोलायचे ?

तालिका सभापती : उपसभापती महोदयांनी पहिल्या लक्षवेधी सूचनेला अतिशय मोठे वेटेज दिले होते. त्यामुळे त्यावर जास्त वेळ चर्चा झाली. सन्माननीय सदस्यांचे समाधान होईपर्यंत त्यांनी प्रश्न विचारायला दिले आहेत. कोणत्या विषयावर किती वेटेज द्यायचे हा त्यांचा प्रश्न आहे. आपण त्यासंबंधी काही बोलू शकत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यावर हेत्त्वारोप करता येणार नाही. "तुम्हाला बाहेर जायला कोणी सांगितले" अशाप्रकारचे वाक्य येथे उच्चारण्यात आले आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य बसून बोलले असल्यामुळे ते रेकॉर्डवर येणार नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : मी सन्माननीय नामदार श्री.अनिल देशमुख यांच्या दालनात एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी गेली असताना लक्षवेधी पुकारण्यात आली आहे. लक्षवेधी न घेण्याची आपली इच्छा असेल तर माझा प्रश्न नाही. तसे जर नसते तर आम्ही इथे कशाला उपस्थित राहिली असतो?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचना क्रमांक 6 चर्चेला घ्यावयाची असल्यास, संबंधित विभागाचे मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. तेव्हा संबंधित मंत्रिमहोदय उपस्थित असतील आणि आपण सर्वजण मान्यता देत असाल तर लक्षवेधी सूचना क्रमांक 6 चर्चेला घेण्यास माझी हरकत नाही. परंतु मी लक्षवेधी सूचना क्रमांक 9 पुकारलेली आहे.

..3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला कर्ज मिळवून देणेबाबत.

मु.शी.: मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला कर्ज मिळवून देणेबाबत सर्वश्री मुझफ्फर हुसेन,संजय दत्त, श्रीमती सुधा जोशी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभाद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती.

"राज्यात अल्पसंख्यांक सामाजाच्या उन्नतीसाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्यांक समाजातील बेरोजगार युवकांना व्यवसायासाठी कर्जे उपलब्ध करून देण्यात येत असणे, या योजने अंतर्गत 2002 ते 2005 या कालावधीत राज्य शासनाकडून सुमारे 32 कोटी रुपये व केंद्र शासनाकडून राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाकून 23 कोटी रुपये असे एकूण 55 कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले असताना यापैकी फक्त 16 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आल्याचे आढळून येणे, प्रत्येक जिल्हयाकरिता 75 लाख रुपये वाटप करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात येऊनही तेवढे वाटप होत नसल्याचे आढळून येणे, दिनांक 21 जुलै 2005 रोजी लक्षवेधी सूचनेला दिलेल्या आश्वासनानुसार मार्च 2005 मध्ये 34 कोटी रुपये जमा असलेल्या रक्कमेचे सहा महिन्यात वाटप करण्याचे निश्चित करण्यात येऊनही अद्याप या रकमेचे वाटप करण्यात न येणे तसेच राज्य शासनामार्फत 20 कोटी ऐवजी 50 कोटीची हमी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ दिल्ली यांना देण्याबाबतची कार्यवाही अद्याप न होणे, यामुळे अल्पसंख्यांक बेरोजगार तरूणांमध्ये मोठया प्रमाणात बेकारी वाढत असल्याचे आढळून येणे, त्यामुळे अल्पसंख्यांक समाजात पसरलेले नाराजीचे वातावरण, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला केंद्र शासन व राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त संस्थेकडून अधिकाधिक र्ज मिळवून देण्याबाबत राज्य शासनाने करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदया, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या बेरोजगार युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या विविध योजना राबविण्यासाठी करण्यात आलेली आहे. या महामंडळाला साधारण 61.20 कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. जुलै अधिवेशनात यासंबंधीची लक्षवेधी आली होती. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, 34 कोटी रुपये महामंडळाकडे प्राप्त आहेत. येत्या सहा महिन्यामध्ये लाभार्थींना वितरित करण्यात येतील.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन.....

आज लक्षवेधी वरील जे निवेदन दिलेले आहे त्यावरुन असे स्पष्ट दिसून येते की, प्रत्येक जिल्ह्यासाठी 75 लाख रुपयांचे जे टारगेट आहे ते पूर्ण झालेले नाही. तसेच कोणत्याही प्रकारच्या लाभार्थ्यांना लोन वितरीत करण्यात आलेले नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, आपण 32 कोटी रुपये लाभार्थ्यांना वितरित करण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखणार आहात काय ? हे आर्थिक विकास महामंडळ ज्या दृष्टीकोनातून बनविण्यात आले आहे त्याचे गांभीर्य सरकारने घेतलेले दिसत नाही. याबाबत सरकारने कोणत्याही प्रकारचा ठोस कार्यक्रम घेतलेला दिसत नाही. जिल्हा रोजगार अधिकाऱ्याकडे हे अर्ज स्वीकारण्याचे अधिकार दिलेले आहेत. पण या अधिकाऱ्याकडून याबाबत कोणत्याही प्रकारचा प्रचार करण्यात येत नाही. माझा प्रश्न असा आहे की, आपण हा निधी किती दिवसांत देणार आहात ? तसेच जिल्हा रोजगार अधिकाऱ्यांना काही टारगेट ठरवून देणार आहात काय ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, जुलै महिन्यांपासून 596 लाभार्थ्यांना 3 कोटी 32 लाख रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर डिसेंबर अखेरपर्यंत परिवहन क्षेत्रातील 220 लाभार्थ्यांना 4 कोटी 75 लाख रुपये वितरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. याबाबतीत काहीच झालेले नाही असे म्हणणे योग्य नाही. मार्च अखेरपर्यंत 3 हजार अर्ज प्रलंबित होते. त्यापैकी 600 अर्ज मार्गी लावले आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रत्येकी 75 लाख रुपये याप्रमाणे 35 जिल्ह्यांसाठी 26 कोटी 25 लाख रुपयांचे टारगेट ठेवलेले आहे. येत्या तीन महिन्यांत प्रत्येक जिल्ह्यात 75 लाख रुपये वितरीत करण्यात येतील. जानेवारीपासून प्रत्येक जिल्ह्यामध्ये मेळावा भरवून त्या मेळाव्यामध्ये या योजनेची माहिती देण्यात येईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदया, किती बेरोजगार युवकांनी कर्जासाठी मागणी केलेली आहे ? त्यातील किती अर्ज मंजूर झाले ? अर्ज मंजूर करण्यात आलेल्यांना कर्ज दिले आहे काय ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मार्च अखेरपर्यंत 3 हजार अर्ज प्राप्त होते त्यापैकी 600 अर्ज निकाली काढले आहेत. उर्वरित अर्जांमध्ये काही त्रुटी होत्या. एकूण 3 कोटी 32 लाख रुपये मंजूर केलेले आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदया, अल्पसंख्याक समाज हा प्रगतीच्या मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उन्नती करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने हे महामंडळ स्थापन केलेले आहे. या महामंडळाला राज्य शासनाकडून 32 कोटी रुपये आणि केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाकडून 23 कोटी रुपये असे एकूण 55 कोटी रुपये मिळाले. दिनांक 21.7.2004 रोजी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन यांनी लक्षवेधीद्वारे हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी मंत्रिमहोदय श्री.सतीश चतुर्वेदी यांनी उत्तर दिले होते की, पुढील सहा महिन्यांत हे 32 कोटी रुपये वाटण्यात येतील. तसेच जिल्हा रोजगार अधिकारी याबाबत कोणताही प्रचार करीत नाही.. .....

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभागृहाची वेळ सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत होती. ती कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री.गायकवाड.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी :सभापती महोदया, या महामंडळाची लोकांना माहिती व्हावी यासाठी माननीय मंत्रिमहोदयांना मला असे सांगावयाचे आहे की..

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

डॉ.एन.पी.हिराणी : मी थोडक्यातच प्रश्न विचारत आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी जे मागच्या वेळी मान्य केले होते ते मी आपल्याला सांगत आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले होते की ,प्रत्येक जि-ल्हयात शिबिर घेण्यात येईल आणि या शिबिरामध्ये जे लाभधारक पुढे येतील त्यांना मदत करण्यात येईल. परंतु त्याप्रमाणे झालेले नाही. त्याचबरोबर शासन लाभधारकांना डायरेक्ट मदत देईल असे सुध्दा सांगण्यात आले होते.पंरतु त्याही बाबतीत फॉलोअप झाला नाही.लाभधारक पुढे येऊन त्यांना हा पैसा मिळावा यासाठी यासंदर्भात ज्या काही जाचक अटी आहेत त्या जाचक अटी दूर करण्यात आल्या पाहिजेत आपल्याकडे पैसा पडून आहे परंतु त्याचे वाटप होत नाही. या बाबतीत अनेक लोकांनी तक्रारी केल्या आहेत तेव्हा ज्या जाचक अटी आहेत. त्या अटी ताबडतोब बदलण्यात येतील असे देखील सांगण्यात आले होते परंतु त्याही बाबतीत काहीही झालेले नाही त्याचबरोबर नोंदणी शुल्क 2 टक्के लावण्यात आलेले आहे. हे नोंदणी शुल्क अर्धा टक्का केले पाहिजे.एका हाताने लोकांना मदत केली जाते आणि दुस-या हाताने ती परत घेण्यात येते त्यामुळे नोंदणी शल्क 2 टक्या ऐवजी अर्धा टक्का करावयास पाहिजे.माननीय मंत्री महोदयांनी या पूर्वी जी अभिवचने दिली होती ती जशीच्या तशी या निवेदनामध्ये पुन्हा देण्यात आलेली आहेत सहा महिन्यामध्ये शासनाने काहीही केलेले नाही. या काळात तोंडाला पाने पुसली गेली आहेत.प्रत्यक्षात काहीही निर्णय झालेले नाहीत.माननीय मंत्रिमहोदयानी सांगितले की फ्फक्त 4 ते 5 कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे अजूनही 34 कोटी रुपये शिल्लक आहेत. त्याचे वाटप का केले जात नाही ? हे पैसे लाभधारकांना का वाटण्यात येत नाहीत ? त्यांचे मेळावे का घेण्यात येत नाहीत ? अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करतो असे एका बाजूला म्हणावयाचे आणि दुस-या बाजूला त्यां च्यासाठी काहीही कार्यवाही होत नाही. 50कोटी रुपयांची हमी शासनाने द्यावी असे सांगण्यात आले होते परंतु शासनाने फक्त 30 कोटी रुपयांची हमी दिली आहे तेव्हा 50 कोटी रुपये हमी देण्याच्या बाबतीत सुध्दा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न करण्यात आला नाही.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी..

माझा असा प्रश्न आहे की, या सगळया चार पाच गोष्टीच्या बाबतीत टाईम बाऊन्ड कार्यक्रम या ठिकाणी माननीय मत्रीमहोदय जाहीर करतील काय आणि पुढच्या अधिवेशनामध्ये पुन्हा याबाबतीत हा प्रश्न उपस्थित करुन याच पध्दतीचे उत्तर देण्याचे टाळले जाईल काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, रेकॉर्ड क्लिअर होण्यासाठी मी दोन ती गोष्टींचा उल्लेख करतो. राज्य शासनाकडून 38 कोटी 20 लाख रुपये आणि केन्द्र सरकारकडून 23 कोटी रुपये असे दोन्ही मिळून 61 कोटी 20 लाख रुपये या महामंडळाला मिळालेले आहेत. लाभधारकांना पैशाचे वाटप करण्याच्या बाबतीत जे निकष ठरविण्यात आलेले आहेत.त्यामध्ये बदल करण्याची निश्चित आवश्यकता आहे.याचा विचार करुन ज्या काही जाचक अटी आहेत त्या पैकी जेथे योग्य असेल तेथील अटी शिथिल करण्याच्या बाबतीत डिसेंबर अखेरपर्यन्त निर्णय घेण्यात येईल.जानेवारीच्या पहिल्या आठवडयापासून आपण मेळावे आणि शिबिर घेऊ. त्यासंबंधीचा कार्यक्रम तयार करुन वर्तमानपत्रात त्याची प्रसिध्दी देऊ. शासनाने या महामंडळाला 20 कोटी रुपयांची गॅरन्टी दिली आहे.सध्या आपल्याकडे जो निधी उपलब्ध आहे त्याचे पूर्णपणे वाटप झालेले नाही.50 कोटी रुपयांची गॅरन्टी देण्याच्या बाबतीत फाईल वित्त विभागाकडे गेली आहे व त्यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याचे उत्तर देऊन त्याबाबतीत आपण फॉलोअप करु आणि 50 कोटी रुपयांची शासनाची गॅरन्टी पुढील एक दोन महिन्यात देऊ. तसेच हे पैसे मार्च अखेरपर्यन्त वाटप करण्याच्या बाबतीत पूर्णपणे प्रयत्न करु. केन्द्र सरकार कडून अधिक 30 कोटी रुपये एप्रिल नंतर मिळतील यासाठी देखील प्रयत्न करु .

डॉ.एन.पी.हिराणी : माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : मंत्री महोदयांनी सगळया मुद्दाची नोंद घेतलेली आहे.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रीकेसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, या ठिकाणी या अल्पसंख्यांक आयोगाकडे आजच्या तारखेला लाभार्थींना वाटपासाठी प्रत्यक्षात किती निधी उपलब्ध आहे ? आणि लाभार्थींचे अर्ज परिपूर्ण आहेत, त्यांची पडताळणी झालेली आहे आणि त्यांचे अर्ज मंजूर होऊ शकतात परंतु आपल्याकडे त्यांना वाटप करण्यासाठी निधी उपलब्ध नव्हता असे कधी झाले आहे का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : तसे काही घडलेले नाही.

डॉ. एम.ए.अजीज : सभापती महोदया, शासनाने असे प्रॉमिस दिले होते की, जिल्ह्याला 75 लाख रूपये देणार आहोत. त्या हिशोबाने एका वर्षामध्ये 1 कोटी रूपये होतात आणि 4 वर्षामध्ये कमीत कमी 25 कोटी रूपये होतात, तर इतके शासनाकडे असायला पाहिजे. जर त्यांचे वाटप झाले नाही तर ही रक्कम त्या महामंडळाकडे यायला पाहिजे होती ती का आली नाही ? दुसरे म्हणजे तुमच्याकडे पैसे नाहीत म्हणून किती अर्ज पेंडींग आहेत आणि आपल्याकडील रिकवरी कशी आहे ?

श्री. राण जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, महामंडळाकडे आता 37 कोटी रूपये उपलब्ध आहेत. 2000-02 पासून ही रक्कम मिळत गेलेली आहे. हा ब्रेकअप 75 लाख प्रत्येक जिल्ह्याला द्यायचे म्हटले आणि त्याप्रमाणे साधारणत: वर्कआऊट केलेले आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पूर्ण रकमेपैकी साधारणत: 24 कोटी रूपये मार्च मध्ये प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे ते वितरित करणे शक्य नव्हते. त्यामुळेच आता या संबंधातील नियम शिथिल करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्यानंतर रिकवरीच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, आपल्याकडील रिकवरी ही साधारणत: 48 टक्के आहे आणि इतर महामंडळांच्या तुलनेत ही चांगली आहे. तसेच यापुढे रिकवरीसाठी कमिशन बेसिसवर एजंट नेमण्याचाही आपण विचार करीत आहोत.

डॉ. एम.ए.अजीज : सभापती महोदया, रिकवरीसाठी आपण लाभार्थ्यांकडून पोस्ट डेटेड चेकस् घेता. दुसऱ्या कोठल्याही महामंडळामध्ये ही पद्धत नाही. तरीही आपली रिकवरी त्या मानाने चांगली होत नाही, हे आपले फेल्यूअरच आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, रेकॉर्डवर योग्य नोंद व्हावी यासाठी मी सांगू इच्छितो की, लाभार्थ्याने एकदा फॉर्म भरल्यानंतर ज्या काही अटी असतात त्याच्या अधीन राहून प्रकरण मंजूर केले जाते. अशा प्रकरणामध्ये रक्कम दिली नाही असे झालेले नाही. फार तर निकषामध्ये अर्जदार बसत नाही म्हणून अर्ज रिजेक्ट झालेले आहेत, आणि असेच जास्त झालेले आहे.

श्रीमती फौजिया खान : माननीय सभापति महोदया, माननीय मंत्री महोदय ने यहां पर बताया कि 3 हजार एप्लीकेंट्स में से सिर्फ 6 सौ एप्लीकेंट्स ही इलीजिबल हुए. मुझे लगता है कि इसका सीधा संबंध इस महामंडल के निकष है. इसलिए मुझे पूछना है कि महाराष्ट्र में चर्मकार उद्योग महामंडल या दूसरे जो महामंडल है उसके निकष तथा इस मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडल के निकष एक जैसे हैं या फर्क है. यदि फर्क है तो क्या इन निकषों को यूनिफार्म किया जाएगा ? क्योंकि लाभार्थी इलीजिबल न होने का मेन कारण यही है कि इस महामंडल के निकष काफी कठिन हैं. इस बारे में शासन का क्या कहना है ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे डिसेंबर अखेरपर्यंत हे निकष बदलण्यात येतील. बाकी महामंडळांमध्ये निकष काय आहेत त्याचा अभ्यास करून यातील जाचक अटी आपण शिथिल करू.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, आम्ही ज्या ज्या भागामध्ये पाहिले आहे, उदा. मुंबई, लातूर, उस्मानाबाद असेल, प्रत्येक जिल्ह्यामध्ये मुस्लिम महिलांकडून प्रचंड प्रमाणात योजनांची मागणी आहे. तेव्हा मुस्लिम महिला लाभधारकांसाठी आपल्या काही योजना आहेत का ? नसल्यास त्यांचे बचतगट तयार करून त्यांना जास्तीत जास्त मदत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आपण पावले उचलणार काय ?

(यानंतर श्री. सरफरे .....4डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याठिकाणी वेगवेगळया योजना आहेत, त्यामध्ये मुदत कर्ज योजना आहे, बिज भांडवल योजना आहे, शैक्षणिक कर्ज योजना आहे, व्यवसाय प्रशिक्षण येाजना आहे. या योजनांचा लाभ मुस्लिम महिला घेऊ शकतात. व्यवसाय प्रशिक्षण योजनेमध्ये एका सोलापूरच्या मुस्लिम महिलेला आवर्जून नवी मुंबईला बोलाविण्यात आले. तिने नवी मुंबई येथे फॅशन इंस्टिटयुटमध्ये कोर्स केला. तेव्हा सांगण्याचा हेतू असा की, महिला सुध्दा या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

डॉ. नीलम गोऱ्हे : मुस्लिम महिला बचत गटाला चालना देण्यासाठी आपली योजना आहे काय? आपण वैयक्तिक लाभार्थी कर्ज योजना जाहीर केली आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु बचत गटांना प्रमोट केले पाहिजे. त्यासाठी त्यांना व्यासपीठ उभे करुन दिले तर संबंधित योजनेच्या माध्यमातून त्या पुढे जाऊ शकतात.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्हयात वीज चोरी पकडण्यासाठी घालण्यात आलेल्या धाडी.

मु. शी : ठाणे जिल्हयात वीज चोरी पकडण्यासाठी घालण्यात आलेल्या धाडी यासंबंधी स-मा-न-नीय सदस्य सर्वश्री. संजय दत्त, रमेश निकोसे यां-नी दिलेली ल□वेधी सूच-ना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी आपल्या अ-नुमती-ने नि-यम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि□ महत्वाच्या बाबी□डे स-मा-न-नीय ऊर्जा मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां-नी नि-वेद-न □रावे, अशी वि-ंती □रतो.

"ठाणे व ठाणे जिल्हयातील कल्याण, उल्हासनगर व भिवंडी येथे दिनांक 14 नोव्हेंबर, 2005 रोजी वा त्या दरम्यान वीजचोरी पकडण्यासाठी घालण्यात आलेल्या धाडी, सदर धाडीत सुमारे 60 लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस येणे,राज्यात दिवसेंदिवस वीज चोरीचे वाढत असलेले प्रकार,यामुळे शासनाचे होत असलेले लाखो रुपयांचे नुकसान, वीज चोरी प्रकरणाला आळा घालण्यासाठी कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया. "

श्री.दिलीप वळसे पाटील (ऊर्जामंत्री) : सभापती महोदया, ल□वेधी सूच-नेसंबंधीच्या नि-वेद-नाच्या प्रती मा-न-नीय सदस्यां-ना आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते नि-वेद-न आपल्या अ-नुमती-ने सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : नि-वेद-न सभा□ृहाच्या पटलावर ठेव□यात आले आहे.

नि-वेद-न

(प्रेस : येथे सोबतचे नि-वेद-न छापावे.)

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आमच्या भागातील हा गंभीर प्रश्न आहे. एका बाजूला आठ-आठ तास लोड शेडींगमुळे जनता त्रस्त झाली आहे. दुसऱ्या बाजूला वीज चोरीचे प्रकार सर्रास उघडपणे सुरु आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या भागामध्ये ज्या धाडी टाकल्या आहेत त्यामध्ये वीज चोरीचे प्रकार सापडले आहेत त्याचे स्वरुप काय आहे? त्यामध्ये कारखाने किती, यंत्रमाग किती, व डोमेस्टीक किती? आणि ज्या विभागामध्ये मोठया प्रमाणात वीज चोरीची प्रकरणे आढळली तेथील कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई केली?

श्री. दिलीप वळसे पाटील : राज्य वीज मंडळामध्ये असलेले वीजेच्या गळतीचे व चोरीचे प्रमाण कमी करण्यासाठी वीज चोरी प्रतिबंधक कायदा विधानसभेने मंजूर केला. केंद्र सरकारने सुध्दा 2003 मध्ये केलेल्या कायद्यामध्ये या संदर्भातील तरतूद आहे. या अंतर्गत राज्यामध्ये काही विशेष फिरती पथके तयार केली. ठाणे, उल्हासनगर, भिवंडी, डोंबिवली, कल्याणच्या परिसरात 207 संचांची तपासणी केली. त्यामध्ये 140 केसेसमध्ये अनियमितता आढळून आली. आणि 96 केसेसमध्ये चोरी आढळून आली. 67 केसेसमध्ये फारसे काही आढळून आले नाही. यामध्ये जवळपास 52 लाख रुपयांची वीज चोरी आणि 19 लाख रुपयांची अनियमितता आढळून आली. असे मिळून 72 लाख रुपये इतक्या रकमेचे निर्धारण करण्यात आले. वीज चोरी प्रतिबंधक कायदा मंजूर करण्यात आला त्यावेळी वीज चोरी करतांना ग्राहकांबरोबर कर्मचारी सुध्दा त्यामध्ये सहभागी असेल तर त्याला सुध्दा शिक्षेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. या अंतर्गत राज्यात 336 अधिकारी वेगवेगळया प्रकरणामध्ये दोषी आढळून आले. त्यापैकी चौकशीअंती 103 अधिकारी निर्दोष आढळले. व डिसमिस केलेल्या अधिकाऱ्यांची संख्या 1 आहे. एका अधिकाऱ्याचे प्रमोशन थांबविण्यात आले. 54 लोकांची वेतनवाढ रोखण्यात आली व 2 लोकांना सस्पेंड करण्यात आले. 16 जणांकडून रिकव्हरी लोन वसूल केले, 69 लोकांना दंड लावला व 88 लोकांना वॉर्निंग दिली, 103 लोकांना रिलिज केले. त्यामध्ये कल्याण व ठाण्यामध्ये 18 कर्मचारी सापडले. त्यामध्ये सुध्दा काही लोकांना सस्पेंड करुन बाकीचे जे अन्य दोषी आहेत त्यांना चार्जशीट लावण्याचा प्रयत्न केला आहे. माननीय सदस्यांनी याठिकाणी माहिती मागितली आहे, त्यानुसार कॅटेगरीवाईज बायफरकेशन केले आहे. त्याबाबत प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुध्दा सांगितले आहे की, ही मोहीम कल्याण, डोंबिवली, भिवंडी पुरती मर्यादीत नाही तर संपूर्ण राज्यात सर्वत्र सुरु आहे. त्यामध्ये कल्याण, डोंबिवली परिसरामधील ब्रेकअप सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदया, भिवंडी आणि ठाणे परिसरात विजेची चोरी झाल्याचे प्रकार सापडल्यावर संबंधित अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्यात आले. मला माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर इ.ठिकाणी कोळसा वाहून आणला जातो आणि तेथे खाजगी ठेकेदार असतात, मोठे व्यापारी असतात आणि ते देखील विजेची चोरी करतात असे मला सांगण्यात आले आहे. याची माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, ही बाब या प्रश्नाशी संबंधित नाही. त्यासाठी वेगळया मार्गाने प्रश्न उपस्थित करावा लागेल. तसेच आज विजेच्या संबंधात अंतिम आठवडा प्रस्तावाच्या रुपाने चर्चा होणार आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी यासंबंधात माहिती द्यावी, मी त्यावर जरुर उत्तर देईन.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदया, जेव्हापासून माननीय मंत्री महोदयांकडे हा विभाग आला आहे, तेव्हापासून खरोखरच आमूलाग्र बदल झाल्याचे पहावयास मिळत आहे, त्याबद्दल मी मनापासून त्यांचे अभिनंदन करतो. परंतु विजेच्या चोरीच्या बाबतीत अधिकाऱ्यांना दोषी धरुन निलंबित केले जात असेल तर त्याची काही वेगळी कारणे असतील आणि त्यानुसार कारवाई केली असेल. पण खालच्या स्तरावर जे मीटर रीडर असतात, त्यांच्यामार्फतही विजेची चोरी मोठया प्रमाणात होत असते असा अनुभव आहे. मध्यंतरी मी एका इमारतीमध्ये गेलो होतो. ती पाच-सहा मजल्याची इमारत होती. तेथे 12 गाळेधारक होते आणि त्यांची इलेक्ट्रीकची बिले पाहिली, तेव्हा कमी बिल पाहून मला आश्चर्य वाटले. मी त्या सोसायटीच्या अध्यक्षांना विचारले, तेव्हा त्यांनी सांगितले की, आम्ही यासाठी मीटर रिडरला हाताशी धरले आहे. तो मीटरशी काय खेळ करतो हे माहिती नाही. पण आम्हाला कमी बिल येते आणि त्याबद्दल त्याला त्याचा हिस्सा द्यावा लागतो, मग आम्हाला त्रास होत नाही. तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, मीटर रीडरवर लक्ष ठेवण्यासाठी एम.एस.ई.बी.मध्ये काही व्यवस्था आहे का ? त्यानुसार त्यांच्यामार्फत होणारी चोरी उघडकीस आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, जो वीज पुरवठा केला जातो, त्याच्या मीटर रिडींग संबंधात दोन प्रथा मंडळात प्रचलित आहेत. एकतर कर्मचारी तेथे जाऊन मीटर रिडीं घेतो आणि दुसरे म्हणजे खाजगी एजन्सीला याचे काम दिले जाते. सन्माननीय सदस्यांनी जे

. . . .4 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

सांगितले, ती बाब मंडळाची पुनर्रचना झाल्यानंतर लक्षात आली आहे. मंडळाकडून सातत्याने अशी अडचण सांगितली जात होती की, आमच्याकडे पुरेसा वर्ग नाही म्हणून आम्ही खाजगी संस्थांना काम देतो. मग काही वेळेला मंडळाचे कर्मचारी किंवा खाजगी संस्थेचे लोक हे मीटर रिडींग घेण्यास गेल्यानंतर ग्राहकांशी संगनमत करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून यासंदर्भात राज्य शासनाने आणि वीज मंडळाने असा निर्णय घेतलेला आहे की, पुढच्या काळामध्ये मीटर रिडींगचे काम, पूर्वी कर्मचारी कमी असल्यामुळे दर महिन्याला मीटर रिडींग घेतले जात नव्हते आणि सहा महिने ॲव्हरेज बिल दिले जात होते आणि सातव्या महिन्यात योग्य बिल येत होते. म्हणून यापुढच्या काळात मीटर रिडींगचे काम एका महिन्यात मंडळाचा कर्मचारी करील आणि हेच काम राज्यातील आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांना देणार आहोत. या सर्व विद्यार्थ्यांना हे काम कम्पलसरी केले आहे असे नाही. तर जे विद्यार्थी शिकत आहेत आणि जे गरजू आहेत, त्यांना चार पैशाचे उत्पन्न मिळावे यासाठी एक महिना मंडळाचे कर्मचारी आणि दुसऱ्या महिन्यात आय. टी. आय.चे विद्यार्थी मीटर रिडींग घेण्यास गेल्यामुळे चेक ॲण्ड बॅलन्स राहील आणि ॲडजेस्टमेंट करुन बिल कमी करुन विजेची चोरी करण्याचे जे प्रमाण आहे ते काही अंशी कमी होऊ शकेल. या दृष्टीकोनातून राज्य शासन आणि वीज मंडळ पावले टाकत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आतापर्यंत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून वीज चोरीच्या संदर्भातील फार मोठी प्रकरणे सभागृहासमोर आली आहेत. या ठिकाणी कल्याण, उल्हानगर, भिवंडी येथे जवळजवळ वीज चोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, उल्हासनगरमध्ये वीज चोरीची किती प्रकरणे उघडकीस आली आहेत ? निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे यामध्ये जे अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

श्री.रामनाथ मोते (पुढे चालू...

पण ज्या एम.एस.ई.बी.च्या कर्मचाऱ्यानी एवढी मोठ्या प्रमाणात 60 लाखाची चोरी उघडकीस आणली, त्यांचे कौतुक करणार आहात काय, त्यांना प्रशस्तीपत्र देणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, वीज चोरीच्यासंदर्भात जे आकडे दिलेले आहेत, ते झोनचे आकडे आहेत. विभागा,विभागाचे आकडे नाहीत हे मी आधीच सांगितले. त्याबाबतचे बायफरकेशन पाहिजे असेल तर ते मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, वीज चोरी बोर्डातील अधिकाऱ्यांचा संगनमतीने होऊ शकते. अशा आणखी अनेक गोष्टी असू शकतात. पण अशावेळेला निश्चितपणे कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून, नागरिकांच्या माध्यमातून देखील अशी चोरी उघडकीस आणून दिली तर नागरिकांना देखील त्यामध्ये बक्षिस देण्याच्या संदर्भातील योजना वीज मंडळाने जाहीर केलेली आहे. कर्मचाऱ्यांची निश्चितच दखल घेतली जाते. त्यांचा सत्कार करत असतो, त्यांना काही ना काही इक्रीमेंटच्या स्वरुपामध्ये बक्षिसाच्या स्वरुपामध्ये लाभ देण्याबाबतस्थानिक पातळीवर चीफ इंजिनियर त्या संदर्भातील निर्णय घेतात.

(अनेक सन्माननीय सदस्य बोण्यासाठी हात वर करतात.)

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आता शेवटचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त विचारतील.

श्री.संजय दत्त : विजेच्या चोरीला खरोखरच आळा बसला तर या बचतीमुळे कायमची लोडशेडींग बंद होईल. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, यावर प्रभावी उपाययोजना म्हणून उच्च स्तरीय अधिकारी नेमून या भागातील चोरीच्या संदर्भात मॉनिटरींग कंट्रोलिंग बॉडी स्थापन करणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्यातील विजेची चोरी आणि सगळ्या व्यवस्था पहाण्याकरिता अतिशय वरिष्ठ दर्जाचे पोलीस अधिकारी हे डायरेक्टर व्हीजिलन्स म्हणून वीज मंडळामध्ये काम करीत असतात. मी यापूर्वीच सभागृहाला सांगितलेले आहे की, अशा प्रकारे चोऱ्या पकडण्यासाठी,चोरीच्या प्रकरणामध्ये सापडलेल्या लोकांवर ताबडतोबीने कारवाई करण्यासाठी राज्य सरकारने एक निर्णय घेतलेला होता. यामध्ये स्वतंत्र सहा पोलीस स्टेशन्स स्थापन करण्याची भूमिका मी सभागृहामध्ये मांडलेली होती. यावेळच्या पूरक मागण्या पाहिल्या तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

गृह खात्याच्या वतीने ही सहा पोलीस स्टेशन्स स्थापन करण्याच्या संदर्भामध्ये पूरक मागण्यांची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रकरणे निकालात काढण्यासाठी खास न्यायालये राज्यामध्ये स्थापन करतो आहोत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे हा जो परिसर आहे, त्या परिसरामध्ये मोठया प्रमाणावर विजेची चोरी आढळून येते. त्या परिसरामध्ये ॲटोमॅटिक रिडींगच्या माध्यमातून किंवा जगामध्ये आणखी अनेक पध्दती उपलब्ध आहेत. उदा. एखादा ग्राहक चोरी करायला लागला की, लगेच विटीलिटीला सिग्नल मिळतो. अशा प्रकारची ॲडव्हान्स सिस्टीम देखील जगामध्ये आहे. हळूहळू तेथपर्यन्त आपण जाणार आहोत. परंतु तरी देखील आज विजेचे शॉर्टेज असताना लोडशेडींगमुळे होणारी आंदोलने, असणारी अस्वस्थता यामुळे फायर फायटिंगचेच काम सुरु आहे. हळूहळू टप्प्याटप्प्याने यामध्ये सुधारणा करणे आणि विशिष्ट स्कॉड तयार करुन त्याच्या माध्यमातून या वीज चोरीला प्रभावीरित्या आळा घालणे, यासंबंधी निश्चितपणाने विचार करण्यात येईल, त्या दृष्टीकोनातून आपण काम करणार आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी हात वर करतात.)

तालिका सभापती : लक्षवेधी सूचनेवरील चर्चा जवळजवळ संपत आल्यानंतर सभागृहामध्ये सदस्य आतमध्ये येतात व प्रश्न विचारायला मागतात.या लक्षवेधी सुचनेवरील चर्चा संपत आलेली होती म्हणून मी 'शेवटचा प्रश्न',असे म्हटले होते.

श्री.अनंत तरे : आम्हाला बाहेर जायचा अधिकार नाही काय ?

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना सभागृहाबाहेर जाण्याचा आणि आत येण्याचा जरुर अधिकार आहे. पण लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपत आलेली असतांना...

श्री.अनंत तरे : हे बरोबर नाही.

तालिका सभापती : हे कसे बरोबर नाही ? लक्षवेधी सुचनेवरील चर्चा संपत आलेली असतांनी सदस्यांनी सभागृहामध्ये यायचे व आणि नव्याने प्रश्न विचारायचे व संपत आलेली चर्चा लक्षवेधी पुन्हा सुरु करायची हे योग्य नाही. तरीही आता मी प्रश्न विचारायला परवानगी देते.

श्री.प्रकाश शेंडगे : वीज चोरीच्यासंबंधात महत्वाची लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. मला मंत्री महोदयांना प्रश्न विचारायचा आहे की,कल्याण,उल्हासनगर, भिवंडी या ठिकाणी विजेच्या चोऱ्या यापूर्वी देखील उघडकीस आल्या त्यासंबंधीच्या चर्चा या सभागृहात

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे चालू....

झालेल्या आहेत. धनदांडग्यांच्या एरियामध्ये उदाहरणार्थ मुंबईतील नेपीएन्सी रोड, वाळकेश्वर,नरिमन पॉईन्ट हा जो भाग आहे. तेथील अतिश्रीमंत वस्तीमध्ये रहाणाऱ्या एरियामध्ये अशा काही चोरीच्या केसेस निदर्शनास आलेल्या आहेत काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, नेपीएन्सी रोड, वाळकेश्वर, नरिमन पॉईन्ट या विभागामध्ये वीज मंडळाच्या वतीने वीज पुरवठा करण्यात येत नाही तर टाटा आणि बेस्ट कंपन्यांमार्फत वीज पुरवठा केला जातो त्यामुळे तेथील या गोष्टी आपल्या निदर्शनास येण्याचा प्रश्न येत नाही.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मघाशी उत्तर दिले. गेल्या वर्षी अशाच प्रकारच्या वीज चोरीचा तारांकित प्रश्न होता. तो प्रश्न 25 मिनिटे चालला होता. त्यावर आपण सांगितले होते की, यासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन, स्वतंत्र न्यायालय करण्यात येतील. एक वर्षे होऊन गेले. याबाबतीत कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. आज सुध्दा वीज चोरी चालू आहे. भिवंडी, ठाणे, मुंब्रा येथे राजरोसपणे विद्युत चोरी चालू आहे. माझा प्रश्न असा आहे की, एका वर्षापूर्वी दिलेल्या आश्वासनाची एका वर्षात पूर्तता झाली नाही, तेव्हा त्याची पूर्तता कधी होईल याचे उत्तर द्यावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी आत्ताच दिलेले आहे. नागपूर अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांचे पुस्तक पाहिले तर गृह खात्याच्या मागण्यांच्या अंतर्गत वीज मंडळासाठी नवीन पोलीस स्टेशन स्थापन करण्यासाठी जी आर्थिक तरतुद करावयास पाहिजे ती सगळी तरतूद करण्यात आलेली आहे.(अडथळा) आवश्यकतेप्रमाणे जेथे पोलीस स्टेशन लागतील सगळया महाराष्ट्रभर प्रत्येक जिल्हयात पोलीस स्टेशन करणार नाही. सुरुवातीला 6 पोलीस स्टेशन्स करण्यात येतील. तसेच आवश्यकता लागली तर अन्य भागात पोलीस स्टेशन्स करण्यात येतील. फास्ट ट्रॅक्ट न्यायालये करावयाची आहेत. त्या संदर्भात विधी व न्याय विभागाकडे काही प्रश्न प्रलंबित आहेत. या साठी गरज पडली तर हायकोर्टापर्यंत जावे लागेल. आपण या बाबतीत जरुर पाठपुरावा करीत आहोत.

श्री. अनंत तरे : मुंब्रा, भिवंडी येथे विद्युत चोरी आहे . कल्याणमध्ये पोलीस स्टेशन करण्यात आले आहे. हे पोलीस स्टेशन कल्यणला कशासाठी करता? ठाणे भिवंडीची 600 कोटी रुपयाची थकबाकी आहे. मुंब्रा येथे 100 कोटी थकबाकी आहे. त्या ठिकाणी हे पोलीस स्टेशन करण्यात येत नाही. हे पोलीस स्टेशन कल्याणला आहे ते कशासाठी?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, झोन कार्यालय कल्याणला असल्यामुळे पोलीस स्टेशनसुध्दा कल्याणला ठेवण्यात आले आहे. जेणे करुन को-ऑर्डिनेशन व्यवस्थित करता येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "इंडो युरोपियन ब्रेव्हरीज या शीतपेयांचे उत्पादन करणा-या कंपनीत काम करणा-या कामगारांची व्यवस्थापन करीत असलेली पिळवणूक" या विषयावरील सर्वश्री सुरेश जेथलिया, दिवाकर रावते, विलास अवचट वि.प.स. यांनी दिनांक 7-4-2005 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे मा.सभापतींनी निर्देश दिल्याप्रमाणे अधिक महिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

तालिका सभापती :अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन कृपया छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृशी. : श्री. क्षेत्र माहूर येथे बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीत अनेक गैरसोयी असणे.

मु.शी. : श्री. क्षेत्र माहूर येथे बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीत अनेक गैरसोयी असणे.याबाबत डॉ. नीलम गो-हे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : : माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"श्रीक्षेत्र माहूर येथे सव्वादोन कोटी रुपये खर्चून आंधण्यात आलेली प्रशासकीय इमारत, सदर इमारतीमध्ये पाण्यासारखी प्राथमिक सुविधा व अन्य सुखसोईंचा असलेला अभाव, पाण्याअभावी येथे येणा-या शासकीय अधिकारी व प्रवाशांचे, पर्यटकांचे होत असलेले हाल, या परिसरात व सदर प्रशासकीय इमारतीत पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने हॉटेलही नाही. इतक्या गैरसोय असून सदर श्रीक्षेत्र माहूर चे महत्व लक्षात घेता या ठिकाणी पाण्याची व इतर सुविधा पुरविण्याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याबाबत शासनाला आदेश द्यावेत व तसेच निवेदन सभागृहामध्ये करण्यात यावे, ही विनंती. "

सभापती महोदया, नांदेड जिल्हयामध्ये श्रीक्षेत्र माहूर या ठिकाणी युती शासनाच्या काळामध्ये दि.26 जून,1999 ला किनवटचे विभाजन होऊन देवीच्या सोडतीन पीठांपैकी सर्वदूर म्हणून परिचित असेलेल्या या क्षेत्राला तालुक्याचा दर्जा देण्यात आला आणि प्रशासकीय इमारतीसाठी 1 कोटी 25 लाखाचा निधी मंजूर होऊन इमारत अस्तित्वात देखील आली. परंतु माहूरच्या या प्रशासकीय इमारतीमध्ये पाणी नसल्यामुळे रोज प्रत्येक कर्मचा-याला त्यासाठी 70 ते 80 रुपये स्वत:चे पैसे खर्च करावे लागतात, बाहेरगावाहून जे नागरिक येथे येतात त्यांचे देखील प्रचंड हाल होत आहेत. या कामासाठी उपविभागीय महसूल अधिकारी आणि तहसिलदार कार्यरत असले तरी ही संपूर्ण प्रशासकीय इमारतच खडकाळ भागावर उभी असल्यामुळे पाण्यासाठी नैसर्गिक

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे..

स्त्रोत नाही. या पाश्वभूमीवर प्रशासकीय इमारतीच्या मागील बाजूस पोखळी नावाचा प्राकृतिक जलस्त्रोत असून तेथून 700 फूट उंचीवर असणा-या या इमारतीमध्ये पाणी आणणे अत्यंत आवश्यक आहे. श्रीक्षेत्र माहूर येथील प्रशासकीय इमारतीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्या इमारतीला पिण्याच्या पाण्याची सोय करुन देऊन तेथील नागरिकांना न्याय मिळवून द्यावा अशा प्रकारची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

यानंतर श्री. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील शिक्षकांचे गट संमेलन बंद करणेबाबत.

मु.शी.: राज्यातील शिक्षकांचे गट संमेलन बंद करणेबाबत या विषयासंबंधी माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, राज्यातील शिक्षकांचे होणारे गट संमेलन (केंद्र संमेलन) करण्याची गरज नसतांना यातून होणाराशासनाचा आर्थिक खर्च व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळावे यासाठी हा उपक्रम बंद करावा अशी शिक्षकांची इच्छा आहे.

महोदय, ही पध्दत ब्रिटीशांच्या काळापासून सुरु करण्यात आलेली आहे. त्यावेळी जे सातवी फायनल पास होते त्यांच्यासाठी ही गट संमेलने होती. परंतु आता बारावी आणि डी.एड. शिक्षक असतात. सकाळी 10 वाजेपासून 5 वाजेपर्यंत हे संमेलन घेण्यात येते. त्यामुळे शिक्षकांच्या अध्यापनावर त्याचा परिणाम होतो, कारण अध्यापनाचे कार्य करुन हे काम त्यांना करावे लागते. त्या व्यतिरिक्त अनेक कामे शिक्षकांना करावी लागतात त्याची मोजदादच नाही. सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत त्यांना प्रशिक्षण तसेच विद्यार्थ्यांच्या एक्स्ट्रा शिकवण्या घ्याव्या लागतात. या गट संमेलनासाठी प्रतिदिन 15 रुपये प्रमाणे पैसे मिळतात आणि हा पैसा त्यांना मिळतोच असे नाही. राज्यात आज जवळपास 3 लाख प्राथमिक शिक्षकांची संख्या असून दररोज 45 लाख रुपये यासाठी शासनाचे खर्च होतात. हा कार्यक्रम बंद केला आणि हाच पैसा मुलांच्या शालेय साहित्य, प्रयोगशाळा तसेच व्यवसाय शिक्षण, कलादालन यासाठी दिला तर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचे व शिक्षकांचे समाजातील स्थान निश्चितपणे उंचावेल, गळतीचे प्रमाण कमी होण्यास देखील मदत होईल म्हणून ही 100 वर्षांची परंपरा थांबवावी अशी मी या निमित्ताने विनंती करते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कल्याण लोहमार्ग पोलीस ठाणे, कल्याण येथील वरिष्ठ निरिक्षकांचा अचानक कार्यभार काढून घेण्याबाबत.

मु.शी.: कल्याण लोहमार्ग पोलीस ठाणे, कल्याण येथील वरिष्ठ निरिक्षकांचा अचानक कार्यभार काढून घेण्याबाबत.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री रमेश निकोसे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री रमेश निकोसे (नामनियुक्त) : कल्याण लोहमार्ग पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नारायण राजगुरु यांना पूर्वकल्पना न देता दिनांक 3.9.2005 रोजी त्यांच्याकडून कार्यभार अचानकपणे काढून घेणे व अद्याप त्यांना कार्यभार देण्यात न येणे यासंबंधी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. गृह विभागाला माझी विनंती आहे की, यासंबंधीची तपासणी करावी व त्यांना पुर्ववत कामावर घ्यावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अकोला महापालिका कर्मचाऱ्यांची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम गहाण ठेवणे.

मु.शी.: अकोला महापालिका कर्मचाऱ्यांची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम गहाण ठेवणे या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदया, अकोला महानगरपालिकेतील एक भयंकर प्रकरण या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो. ते म्हणजे अकोला महापालिकेने आपल्या कर्मचाऱ्यांच्या भविष्याची ठेव म्हणजेच जी.पी.एफ. कोणतीही माहिती अथवा पूर्वसूचना न देता बँकेकडे गहाण ठेवली आहे. तसेच जुलैपासून आतापर्यंत कापलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम देखील संबंधित खात्यात जमा केलेली नाही. या प्रकरणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झालेला असून त्याची तक्रार कर्मचाऱ्यांनी कोतवाली पोलीस स्टेशन, अकोला येथे 29.10.2005 रोजी फौजदारी स्वरुपात नोंदविली आहे, तसेच संबंधितांवर खटला भरण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे, परंतु प्रशासनाने त्याची दखल अद्याप घेतलेली नाही. मी या निमित्ताने शासनाकडे याबाबतची तक्रार नोंदवित असून संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करीत आहे.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: खटाव मिलच्या कामगारांची देय असलेली रक्कम मिळणेबाबत.

मु.शी.: खटाव मिलच्या कामगारांची देय असलेली रक्कम मिळणेबाबत या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांची विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : "मुंबईतील भायखळा येथील खटाव मिलच्या कामगारांची देणी गेली आठ वर्षे प्रलंबित असून, नुकत्याच झालेल्या मंत्रालयातील बैठकीत खटाव मिल मालकाकडून जमिनीची किंमत 103 कोटी आहेत, म्हणून आम्हाला ही जमीन विकण्याची प्रथम परवानगी द्या त्यानंतर आम्ही कामगारांची देणी देऊ, अशी अट खटाव गिरणीच्या मालकाने घालून प्रत्येक बैठकीत फसव्या योजना मांडून शासनाची दिशाभूल करत रहाणे, शासनाने कडक धोरण न स्वीकारता तसेच खटाव मिलच्या कामगारांना त्यांची देणी मिळवून देण्याकरिता कोणताही प्रयत्न न करणे, त्यामुळे खटाव गिरणीच्या कामगारांचे व त्यांच्या कुटुंबियांचे जीवन उध्वस्त होण्याला गिरीणी मालक तसेच शासन जबाबदार असणे, यावर शासनाने ठोस कारवाई करण्याची आवश्यकता आहे."

सदर विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडू इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: खेरनगर, वांद्रे(पूर्व) येथील गृहनिर्माण संस्थांकडे होत असलेली अकृषिक कराची मागणी.

मु.शी.: खेरनगर, वांद्रे(पूर्व) येथील गृहनिर्माण संस्थांकडे होत असलेली अकृषिक कराची मागणी या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांची विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

मधुकर श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी खालील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे खेरनगर गृहनिर्माण वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना संदर्भ जा.क्र.मि.व्य.-5/मुम/584/2005 मिळकत व्यवस्थापक (5) यांचे कार्यालय यांच्यातर्फे अकृषिकर भरण्याविषयी 2003-2004 व 2004-2005 साठी एकून रु. 56,484 भरण्याविषयी नोटीस पाठविली आहे. वास्तविक ज्या जागेवर ही वसाहत उभी झाली आहे. तेथे पूर्वी खाडी होती आणि त्यात तिवराची झाडे होती. त्यात भराव टाकून ही जागा गृहनिर्माणासाठी मुंबई मंडळाने वापरली आहे आणि त्यावर 1954-1955 या वर्षापासून बांधकामाला सुरुवात झाली. प्रथम औद्योगिक कामगारांसाठी पाच इमारती उभ्या केल्या व त्यांचे वितरण केले. त्यानंतर क्रमाक्रमाने 1958 - 1959 पर्यंत अधिक 30 इमारती उभारण्यात आल्या आणि प्रत्येकी 225 चौ.फूटांचे गाळे औद्योगिक कामगारांना अर्ज मागवून वितरित करण्यात आले. गेली 50 वर्षाहून जास्त कालखंड लोटला, परंतु आता मागणी होत असलेला अकृषिक कर मंडळातर्फे मागितला गेला नाही. तसेच मुळातच खाडीमध्ये उभ्या केलेल्या या इमारतींबद्दल अकृषिक कर मागण्यांचा अधिकार मंडळास नाही.

तसेच मुंबई मंडळाने या इमारती 1980 सालापासून मालकी हक्काने गृहनिर्माण संस्थांना विकल्या आहेत. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या किंमतीनुसार रहिवाश्यांकडून इमारतीचे मूल्य

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

वसूल करण्यात आलेले आहे. त्याशिवाय अद्यापही सेवाकर, पाणीपट्टीचे पैस रहिवाश्यांकडून वसूल केले जातात. याचा अर्थ अभिहस्तांतरण झाले असले तरी म्हाडाने त्यांचा मालकी हक्क सोडलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. तरी या अकृषिक करची वसूली करण्याचे शासनाचे प्रयोजन काय आहे, याबाबतची भूमिका शासनाने स्पष्ट करावी.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : अध्यक्ष महाराज, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या, तत्कालीन मा. गृह राज्यमंत्री (ग्रामीण)यांचेविरुध्द उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरण या विषयावरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून द्यावा.

सभापती महोदय, हे जे प्रकरण आहे ते समितीकडे आलेले आहे. या विषयाच्या संदर्भात समितीच्या चार-पाच बैठकाही झालेल्या आहेत. परंतु ज्या सन्माननीय सदस्यांनी तक्रार केली होती त्यांच्याकडून जो खुलासा समितीने मागविला होता तो खुलासा आम्हाला मिळाला नाही त्याच बरोबर ज्यांच्या विरुध्द हक्कभंग होता ते त्यावेळेस या सदनाचे सदस्य होते परंतु आता ते खालच्या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात काही अडचणी आलेल्या आहेत. त्यामुळे मी मांडलेल्या प्रस्तावाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: देवदासी प्रथा (नाहीशी करणे) विधेयक.

L.C. BILL NO. XXV OF 2005.

(A BILL TO ;PROVIDE FOR A COMPREHENSIVE LAW TO ABOLISH THE PRACTICE OF DEDICATION OF WOMEN AS DEVDASIS TO HINDU DEITIES, IDOLS, OBJECTS OF WORSHIP, TEMPLES OR RELIGIOUS INSTITUTIONS, AND TO PROTECT THE WOMEN SO DEDICATED AGAINST EXPLOITATION, AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.धर्मारावबाबा आत्राम (सामाजिक न्याय मंत्री) : अध्यक्ष महाराज, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 25-हिंदू देवता, मूर्ती, पूजा करावयाच्या प्रतिमा, देवळे किंवा धार्मिक संस्था यांना देवदासी म्हणून स्त्रिया अपर्ण करण्याची प्रथा नाहीशी करण्यासाठी आणि अशाप्रकारे अर्पण करण्यात आलेल्या स्त्रियांचे शोषण होण्यापासून संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी सर्वसमावेशक कायदा करण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.धर्मारावबाबा आत्राम : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 25 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विनियोजन (अधिक खर्च) विधेयक.

L.A. BILL NO. LXXXVII OF 2005.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2006.)

श्री.दिलीप वळसे पाटील (ऊर्जा मंत्री) : महोदया, महाराष्ट्र विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 87 - दिनांक 31 मार्च 2006 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करते. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही)

तालिका सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 1997-98 च्या अतिरिक्त मागण्या.

तालिका सभापती : सन 1997-98 च्या अधिक खर्चाच्या मागण्या सभागृहासमोर आहेत. लोकलेखा समितीने छाननी करून मागण्या मांडण्याची शिफारस केली आहे. या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्याची जरुरी वाटत नाही. सभागृहाने मागण्या विचारात घेतल्या आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदया, सन 1997-98 या वर्षात अधिक झालेल्या खर्चाबाबत लोकलेखा समिती साक्ष घेऊन हा खर्च मान्य केलेला आहे. हा अधिकचा खर्च नियमित करण्यासाठी लोकलेखा समितीने एप्रिल 2005 मध्ये अहवाल दिला. त्यानुसार अधिक खर्चाच्या पुरवणी मागण्या मंजुरीसाठी सभागृहात सादर करण्यात आलेल्या आहेत. या अधिकच्या खर्चास विधानसभेने मंजुरी दिलेली आहे. तरी माझी सभागृहास विनंती आहे की, सन 1997-98 या वर्षातील 804.18 कोटी रुपयांच्या अधिकच्या झालेल्या खर्चास सभागृहाने मान्यता द्यावी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महाराष्ट्र विनियोजन विधेयक.

L.A. BILL NO. LXXXVIII OF 2005.

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 1998, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदया, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्र.88 - दिनांक 31 मार्च 1998 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित कामांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून त्या वर्षात त्या विवक्षित कामांवर जो अधिक खर्च करण्यात आला तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोजनास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहासमोर सादर करते. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व .3 अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

तालिका सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य तंत्र शिक्षण मंडळ विधेयक.

L.C. BILL NO. XXIV OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE BOARD OF TECHNICAL EDUCATION ACT, 1997.)

श्री.दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्र. 24 - महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, 1997 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम 1997, या अधिनियमांर्तगत आपण तंत्र शिक्षण संस्थांची नोंद करीत असतो. ज्यावेळेला एखादी संस्था बंद करावयाची असते त्यावेळेला संस्था बंद करण्यासंदर्भात शासनाकडे आणि मंडळाकडे अर्ज करावा लागतो. संस्था बंद करावयाची असेल तर अर्ज करण्याची शेवटची तारीख एक ऑगस्ट होती. ही तारीख आता आपण अलिकडे आणलेली आहे म्हणजे 30 एप्रिलपर्यंत केलेली आहे. बऱ्याच वेळा संस्था चालकांनी मध्येच शाळा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे नुकसान होत होते. म्हणून कलम 35 च्या उप कलम (2) मध्ये आपण सुधारणा करीत आहोत. या पूर्वीच्या काळामध्ये संस्था बंद करण्याचे आदेश मंडळाच्या माध्यमातून काढले जाते होते. या पुढच्या कालावधीत मंडळाच्या शिफारशीनुसार हे आदेश शासनाकडून काढले जातील. याच कायद्याच्या कलम 4 च्या उपकलमामध्ये सुधारणा सुचविलेली आहे. मंडळाचे लेखापरीक्षण करावयाचे असेल तर त्यासाठी ऑडीटर नेमण्याचा अधिकार राज्य सरकारला होता.परंतु बऱ्याच वेळा निर्णय न झाल्यामुळे अनेक वर्षे ऑडीट पेंडींग राहत होते. तेव्हा यापुढे ऑडीटर नेमण्याचा अधिकार आपण मंडळाला देत आहोत. तेव्हा माझी सभागृहाला विनंती आहे की, कलम 4 च्या उपकलमाला सुचविलेली सुधारणा सभागृहाने मंजूर करावी.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 3 विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री.दिलीप वळसे-पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 24 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून समत झाला

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 24 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी :कंत्राटी कामगार (विनियमन व उच्चाटन) (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XLI OF 2005.

(A BILL TO AMEND THE CONTRACT LABOUR (REGULATION AND ABOLITION) ACT, 1970, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA)

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 41 - कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, 1970, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 41- -कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, 1970, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो

महाराष्ट्र शासनाच्या 2001 च्या औद्योगिक धोरणाचा भाग म्हणून कंत्राटी कामगार नियम व अधिनियम 1970 मध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार आहारगृह बाग - बगिच्याची देखभाल, साफसफाई, सेवा सुरक्षा, कच्च्या मालाची , पक्क्या मालाची ने आण चढ उतार ही कामे कंत्राटी पध्दतीवर करु देण्याची मुभा असावी असे शासनाने या धोरणात सुचविले होते.

या औद्योगिक धोरणानुसार वरील अधिनियमात सुचविल्याप्रमाणे बदल करण्यासाठी केन्द्र शासनाची प्रशासकीय मान्यता मागविण्यासाठी केन्द्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता केन्द्र शासनाने त्यानुसार नोव्हेंबर 2001 मध्ये महाराष्ट्राने सुचविलेल्या सुधारणेस प्रशासकीय मंजुरी दिली असा मंत्रिमंडळाने दिनांक 24.11.2004 रोजी निर्णय घेतला आहे तथापि ही सुधारणा सरसकट सर्व कारखाने व आस्थापना यांना लागू न करता महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्रातील कारखाने व आस्थापना यांनाच फक्त या दुरुस्तीच्या कक्षेत आणावे असे ठरविण्यात आले..

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक..

मंत्रिमंडळाच्या मान्यते नंतर हे विधेयक विधीमंडळापुढे मांडले होते तथापि ते व्यपगत झाल्यामुळे पुन्हा नव्याने विधीमंडळापुढे विचारार्थ सादर करण्यता आले आहे या विधेयकास विधानसभेने मान्यता दिली आहे.

जागतिक उदारीकरणाच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या स्पर्धेमध्ये भारतीय उद्योगांना टिकून राहणे तग धरणे शक्य व्हावे म्हणून या उद्योगधंद्यांना विशेष सवलती देण्याचे शासनाने आयोजित केले आहे.

ही परिस्थिती लक्षात घेता वर नमूद केलेली कामे कायमची असली तरी महाराष्ट्रात येणा-या विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योगांना चालना देण्यासाठी अशी कामे नियमित समजली जाणार नाही त्यामुळे या क्षेत्रातील उद्योगांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.अशी सुधारणा या विधेयकात सुचविण्यात आली आहे तरी हे विधेयक विचारासाठी आणि मंजुरीसाठी मी सभागृहासमोर मांडत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया या मालकांच्या संघटनेने महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना तसेच देशाच्या पंतप्रधानांना एक पत्र पाठविले होते. त्यात त्यांनी लिहिले आहे की, या ज्या सर्व सेवा आहेत, उदा. कँटीन, बाग-बगीचा मेंटेनन्स, मालाची चढ-उतार करणे आदी कामे करणारे कर्मचारी, सुरक्षा रक्षक इ. या सगळ्यांना आपण वेतन देतो ते कंपनीतील सर्वसाधारण कामगारांप्रमाणे दिले जाऊ नये. त्यांच्यासाठी स्वतंत्र असा कायदा करावा आणि कंपनीतील सर्वसाधारण कामगार आणि हे कामगार यांच्या वेतनामध्ये फरक ठेवावा. अशा अनेक मागण्या त्यांनी त्या पत्रातून केलेल्या आहेत. सभापती महोदया, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या नावाखाली या देशामध्ये येणाऱ्या अनेक संकटांमधील हे पहिले संकट आहे. कारण आजपर्यंत कोठल्याही कंपनीमध्ये कँटीन असो, बाग-बगीचा मेंटेनन्स असो वा मालाची चढ-उतार करणारे कामगार असोत त्यांना कंपनीतील इतर कामगारांप्रमाणेच वेतन मिळत होते. त्यांची 25 वर्षे सेवा झाली तरी त्यांना कंपनीच्या कामगारांप्रमाणे वेतन दिले जात होते. परंतु आता आपण हे विधेयक आणल्यानंतर, कायद्यात याप्रमाणे सुधारणा केल्यानंतर तसे होणार नाही. आणि ही उपरोक्त कामे करणारे कामगार कंपनीचे कामगार म्हणून ओळखले जाणार नाहीत, त्याप्रमाणे त्यांना वेतनही मिळणार नाही. त्यामुळे या गरीबांची रोजीरोटी काढून घेण्यासाठी हे केले जात आहे. म्हणजे त्यांच्याकडून काम तेच आणि भरपूर करून घ्यायचे मात्र पगार त्यांना त्या मानाने कमी असणार आहे. सभापती महोदया, आता हे विधेयक येथे मंजूर झाले, या कायद्याची अमलबजावणी सुरू झाली की, ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे काम करणारे कामगार आहेत त्यांनाही कंपनीतून बाहेर काढले जाईल. स्वेच्छा निवृत्तीच्या नावाखाली जबरदस्तीची निवृत्ती योजना राबवून त्यांना बाहेर काढले जाईल. इतकेच नाही तर आताच्या आपल्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन देता, याप्रमाणे वेतन दिले जाईल. म्हणजेच एक प्रकारे आपण या कामगारांची पिळवणूक करण्यासाठीच परवानगी देत आहात. एकदा हे दुष्टचक्र सुरू झाल्यानंतर आपल्याकडे पूर्वी ब्रिटीश राजवटीमध्ये होते त्याप्रमाणे होईल. लेबर एक्स्प्लॉयटेशन ही जी संकल्पना आहे त्यासाठी आपण मालकांच्या हातामध्ये हे एक हत्यारच देत आहात हे आपण लक्षात घ्यावे. या विधेयकामध्ये आपण जी उद्देश्य व कारणे दिलेली आहेत ती पटण्याजोगी नाहीत. हे संपूर्ण विधेयक वाचल्यानंतर आपल्याही लक्षात येईल की, स्वस्त मजूर मिळविण्यासाठी आणि त्यांचेकडून जास्तीत जास्त काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ...

करून घेता यावे, त्यासाठी त्यांना कोणतेही वेळेचे बंधन ठरवून द्यायचे नाही, ओव्हर टाईम मिळणारनाही अशा पध्दतीने, हायर ॲण्ड फायर अशा पद्धतीने त्यांचेकडून काम करून घेतले जाईल. या आपल्या नव्या संकल्पनेतून या कामगारांना वागविण्याची पद्धत लक्षात घेता या मालकांच्या हाती आपण त्यांची मान पूर्णपणे देणार आहात. बरे भविष्यामध्ये त्यांना त्यासाठी दाद मागण्यासाठी देखील संधी राहणार नाही. लेबर कोर्टामध्ये गेले किंवा अन्य कोठे गेले तरी त्यांना कोणीही विचारणारसुद्धा नाही. त्यात वकिलांची फी आता इतकी वाढली आहे की, अगोदरच त्यांना मिळणाऱ्या तोकड्या वेतनामध्ये ते वकिलांमार्फत कोर्टात जाण्याचा पर्याय स्वीकारू शकतील की नाही, वकीलांची फी त्यांना परवडेल की नाही याबद्दल शंकाच आहे. इतक्या तोकड्या वेतनामुळे ते युनियनचे पैसे देखील देऊ शकणार नाही. अर्थात त्यांच्यासाठी युनियन देखील राहणार नाही आणि हळूहळू युनियन्सची दुकाने देखील यामुळे बंद होणार आहेत. यासाठी आम्ही माननीय पंतप्रधानांकडे एक शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो आणि त्यांना विनंती केली होती की, हे जे विधेयक आपण पार्लमेंटमध्ये आणू इच्छिता ते इतक्यात तरी आणू नका. कारण आज जगामध्ये जे वेजस्टँडर्ड आहे ते हाय आहे आणि आपल्याकडील वेजस्टँडर्ड हे अतिशय लो आहे. तेव्हा आपल्याकडे अतिशय नगण्य अशा वेतनामध्ये या कामगारांना जीवन जगावे लागणार आहे. थोडक्यात आपल्याकडील आणि परदेशातील वेतन स्टँडर्ड आणि इतर कोणत्याही बाबतीत तुलना होऊ शकत नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे ....4एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आणि या आधुनिक युगामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण आले आहे. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनची बैठक हाँगकाँगला चालू आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना सबसिडी द्यावी की देऊ नये यावर संघर्ष चालू आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांना सबसिडी देऊ नये अशाप्रकारची प्रगत राष्ट्रांची मागणी आहे. आणि अप्रगत असलेले प्रगतीच्या मार्गावर असलेल्या राष्ट्रांचे म्हणणे असे की, शेतकऱ्यांना सबसिडी दिली पाहिजे. असा दोघांमध्ये वैचारीक संघर्ष सुरु आहे. ते त्यांच्या पध्दतीने पहात आहेत आम्ही आमच्या पध्दतीने पहात आहोत. हा कायदा झाल्यानंतर कामगारांचे एक्सप्लॉयटेशन सुरु होईल असे मला मनापासून वाटते. अशाप्रकारे कामगारांची पिळवणूक करणाऱ्या मालक वर्गाच्या हातामध्ये हा कायदा आपण देऊ नये. कामगारांची पिळवणूक होणार नाही यासाठी आपण कोणती उपाय योजना करणार आहात याविषयी आपण आम्हाला माहिती द्यावी. खरे म्हणजे या विधेयकाला माझा स्वत:चा विरोध आहे, मला स्वत:ला हे पटत नाही. गेली 50 वर्षे मी या क्षेत्रामध्ये काम करीत आहे. हे मी स्वत: अनुभवले आहे, मी हे पाहिले आहे. आणि आम्ही जे करु इच्छितो ते यामध्ये दिसत नाही आणि म्हणून येणाऱ्या भविष्य काळामध्ये काय घडणार आहे? त्याची ही चाहूल आहे. म्हणून त्याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. शेकडो वर्षे कामगारांनी संघर्ष करुन, काही कामगारांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन, मोठे लढे देऊन आणि पोलीसांच्या गोळया, लाठया खाऊन त्यामधून देशामध्ये आणि आपल्या महाराष्ट्रामध्ये कामगार कायदे बनलेले आहेत. हे कायदे जर अशापध्दतीने बदलत गेले तर कामगाराची किंमत रहाणार नाही असे मला मनापासून वाटते. म्हणून मी माझी भूमिका स्पष्ट केली. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

15-12-2005 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)4N 2

DGS/ D/ SBT/ RJW/ MHM/ पूर्वी श्री.सुंबरे 18:00

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभपती महोदया, माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितलेली माहिती बऱ्याच अंशी खरी आहे. एकूणच उद्योगपतींचा उद्देश हा कामगारांना आपल्या नियंत्रणात ठेवण्याचा असतो. त्या अनुषंगाने आपल्याकडे असलेले उपहारगृहामध्ये काम करणारे कामगार, बागकाम करणारे कामगार, सुरक्षा रक्षक कामगार यांना कायम तात्पुरत्या स्वरुपामध्ये ठेवण्याची उद्योगपतींनी माननीय पंतप्रधान व माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. परंतु विशेष आर्थिक क्षेत्र ज्या ठिकाणी आहे ज्याठिक्राणी केंद्र सरकारने एक्साईजमध्ये, सेल्स टॅक्समध्ये, ऑक्ट्रॉयमध्ये वीजेमध्ये, पाण्यामध्ये विशेष सवलत देऊन जगाच्या एकूण बाजारपेठेमधील स्पर्धेमध्ये आपले उद्योगपती उतरावेत त्याकरीता ही बाब ठेवण्यात आली आहे. आपण शंका व्यक्त केली असली तरी या कामगारांना किमान वेतनापेक्षा कमी पगार मिळू शकणार नाही. काही ठिकाणी कामगारांना ओव्हरटाईम दुप्पट मिळत असेल, त्यासंबंधीचे जे अन्य कायदे आहेत व त्यातील तरतुदी या कंत्राटी कामगारांना, असंघटीत कामगारांना लागू आहेत,त्या तरतुदी त्या कामगारांना लागू रहाणार आहेत.. फक्त विशेष आर्थिक क्षेत्रापुरती ही बाब लागू रहाणार आहे. आणि म्हणून महाराष्ट्रामध्ये नवी मुंबई, नागपूरमध्ये अशाप्रकारचे एक-दोन एस.ई. झोन निर्माण होतील. आपण म्हटल्याप्रमाणे कामगार चळवळीतून हे कायदे निर्माण झाले ते पायदळी तुडविले गेले तर कामगार रस्त्यावर येतील.माननीय सदस्यांना सांगतो की, शासनाची भूमिका कामगारांना एकाकी सोडण्याची नाही. तेव्हा सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती : विधेय□ विचारात घे□यात आले आहे. आता विधेय□ □ीडश: विचारात घे□यात येईल.

□ीड 2 ते 3 विधेय□ाचे भा□ा झाले.

□ीड 1,संपू□ा शीर्ष□ व हेतुवाक्य विधेय□ाचे भा□ा झाले.

श्री.गणेश नाईक : महोदया, मी आपल्या अ□ुमती□ा स□ा 2005 चे वि.स.वि. क्र. 41 संमत □र□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश□ा मतास टा□ा□ा संमत झाला.

तालिका सभापती/उपसभापती : स□ा 2005 चे वि.स.वि. □मां□ 41 संमत झाले आहे.

--

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे.

मु.शी.: कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे या बाबत वित्त व नियोजन मंत्र्यांचा शासकीय ठराव.

श्री.जयंत पाटील (अर्थ व नियोजन मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 106 अन्वये माझा प्रस्ताव मांडतो.

"दिनांक 13 मार्च 1989 रोजी कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याविषयी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव मंजूर करुन तो केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्याचा पाठपुरावा करण्यात आला आहे. तथापि, केंद्र शासनाने आता दिनांक 5 ऑक्टोबर, 2005 च्या पत्रान्वये मानव विकास अहवाल-2002 व महाराष्ट्र विकास अहवाल यातील माहिती विधानमंडळ सभागृहाच्या निदर्शनास आणून याबाबत पुन्हा एकदा मत आजमाविण्याबाबत सूचित केले आहे. याबाबत दोन्ही सभागृहांची कोकण विभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी व शीघ्र गतीने विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आवश्यक असल्याची खात्री झाल्याने हा ठराव पुन्हा एकदा एकमताने मंजूर करण्यात येत आहे. त्यादृष्टीने अनुच्छेद 371(2) मध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केंद्र शासनाने करावी व अशी सुधारणा संसदेच्या दोन्ही सदनांच्या माननीय सदस्यांनी मंजूर करावी अशी विनंती विधान परिषद करीत आहे."

सभापती महोदया, परवाच्या प्रश्नोत्तराच्या वेळी या विषयावर सविस्तर चर्चा झालेली आहे आणि त्यावेळी असा ठराव आणण्याची गरजही मी सभागृहाला सांगितली होती.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : हरकतीचा मुद्दा कशासाठी आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा ठराव मांडण्यासाठीच माझी हरकत आहे. दि.13 मार्च 1989 रोजी विधानसभेमध्ये ठराव मांडण्यात आला होता.आता या ठिकाणी ज्याप्रमाणे माननीय अर्थमंत्री ठराव मांडत आहेत, त्याचप्रमाणे त्यावेळेस तत्कालीन उद्योग मंत्री माननीय श्री.रामराव आदिक हे सदनामध्ये ठराव मांडण्यासाठी आले असताना, त्यावेळी हरकत घेण्यात

. . . .4 ओ-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

आली होती आणि वैधानिक विकास मंडळाचा ठराव हा माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडला पाहिजे अशी मागणी त्यावेळी करण्यात आली होती. हा अतिशय महत्वाचा ठराव आहे. केंद्र शासनाकडे हा ठराव पाठवत असताना, त्यावेळेला हरकत घेतल्यानंतर त्यावेळचे मुख्यमंत्री माननीय श्री.शरद पवार हे सभागृहामध्ये आले. तेव्हाचे प्रोसीडींग माझ्याकडे आहे. त्यावेळी अशा प्रकारची हरकत सन्माननीय सदस्य श्री.दत्ता पाटील यांनीच घेतली होती आणि सन्माननीय सदस्य श्री.सुदाम देशमुख, सन्माननीय सदस्या श्रीमती मृणाल गोरे, सन्माननीय सदस्य श्री.केशवराव धोंडगे यांनी त्याला अनुमोदन दिले होते आणि त्यावेळच्या माननीय अध्यक्षांनी ते मान्य केले होते. या ठरावाचे एक गांभीर्य आहे. तेव्हा अशीच चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय उद्योग मंत्री श्री.रामराव आदिक हा ठराव मांडण्यासाठी गुलाबाचे फूल लावून सभागृहामध्ये आले होते. त्यावेळेला झालेल्या प्रोसीडींग मध्ये हे सर्व काही आहे. हा कोकणाच्या जिव्हाळयाचा आणि अस्मितेचा प्रश्न आहे. या दृष्टीकोनातून कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबतचा ठराव माननीय मुख्यमंत्र्यांनी मांडावा. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी गुलाबाचे फुलही लावलेले नाही. तेव्हा कोकणाबद्दल त्यांना किती आत्मियता आहे याबद्दल माझ्या मनात शंका आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, या राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी हा ठराव मांडावा आणि त्याप्रमाणे याची पूर्तता व्हावी.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची भावना पूर्णपणाने सर्वांनाच मान्य आहे. पण हा ठराव मूळ स्वरुपात 1989 साली ज्यावेळी मांडला, त्यावेळचे वृत्त त्यांनी या ठिकाणी सांगितले. त्यानंतर जे बदल झालेले आहेत, त्या स्थित्यंतराची माहिती सभागृहाला द्यावी आणि पुन्हा एकदा सभागृहाला ही बाब एकमताने मान्य आहे काय, याबाबत असेसमेंट घ्यावी, यासाठी हा ठराव आहे. या ठरावावर भाषणे अपेक्षित नाहीत, खालच्या सभागृहामध्येही फारशी कोणी भाषणे केलेली नाहीत .कोकणाचा बॅकलॉग हा आजही 1200 कोटी रुपयापर्यन्तचा आहे. आपण दांडेकर समितीच्या काळात काढलेला बॅकलॉग, इंडिकेटर समितीने काढलेला बॅकलॉग या नंतरही शिल्लक राहिलेला कोकणातील बॅकलॉग हा एकत्रित पाहिला तर हा भौतिक आणि फायनान्शियल अनुशेष आहे. याचा मानव विकास निर्देशांकाशी संबंध नाही. त्यामुळे हे दोन वेगवेगळे स्वतंत्र विषय आहेत. मानव विकास निर्देशांक शिक्षण, आरोग्य आणि दरडोई उत्पन्न या तीन गोष्टींनी तयार होतो. त्या दृष्टीने स्वतंत्र तरतूद शिक्षण, आरोग्य विभागासाठी करणे, हा एक वेगळा इश्यु ॲड्रेस करतो आहोत. पण केंद्र सरकारकडून आलेल्या पत्रातून त्यांचा असा समज झालेला दिसतो की, मानव विकासाचा निर्देशांक कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये चांगला आहे, त्यामुळे अशा वैधानिक विकास मंडळाची आवश्यकता नाही. तेव्हा कोकणात प्रगती जास्त झालेली आहे, असा अन्वयार्थ काढून केंद्र सरकारने आपल्याला पुन्हा सभागृहापुढे जावे, असे सांगितले. म्हणून आपल्या सभागृहापुढे माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनानुसार, मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या

श्री.मधुकर चव्हाण : त्यांच्यावतीने असे म्हणा. कारण शेवटी आपणच हे करणार आहात.

श्री.जयंत पाटील : बरोबर आहे. पण त्यांच्या मार्गदर्शनानुसार आणि राज्याच्या मंत्रिमंडळाने एकमताने मंजूर केलेल्या विषयाला अनुसरुन हा प्रस्ताव सभागृहासमोर मी मांडत आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांची याला अनुमती आहे. गुलाबाचे फूल न लावण्याचे कारण एकच आहे की, हा ठराव यापूर्वीही झालेला आहे. आपले म्हणणे केंद्र सरकारने मान्य केलेले नाही, याच्या आपल्याला वेदना आहेत. त्यामुळे गुलाबाचे फूल लावून हा ठराव मांडण्यासारखी ही परिस्थिती नाही, ती 1989 साली होती. म्हणून आपले म्हणणे त्यांनी मान्य करावे. आम्ही त्यांना हा ठराव करण्याची आवश्यकता नाही असे कळविलेले आहे. आमच्या सभागृहाला हे मान्यच आहे की, हे वैधानिक विकास मंडळ झाले पाहिजे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): त्यांना गुलाबाचे फूल देऊ या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.जयंत पाटील : हा ठराव घेऊन जाताना पाहिजे तर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटलांकडून.. चांगला बुके कोकणातून घेऊन जाईन आणि हे वैधानिक विकास मंडळ मान्य करावे हे मी केंद्राला सांगेन. म्हणून हा ठराव एक मताने सभागृहाने संमत करावा. यावर भाषण करण्याची आवश्यकता आहे, असे वाटत नाही. यासाठीच मी आपली अनुमती घेऊन अतिम आठवडा सुरु होण्यापूवी हा प्रस्ताव मांडला. सभापती महोदया, आपण अनुमती दिली. सभागृहाचे यावर एकमत आहे. सर्व सभासदांचे मन:पूर्वक आभार मानून, माझे मनोगत संपवितो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, सन्माननीय वित्त मंत्री यांनी राज्य शासनाच्या वतीने आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने या ठिकाणी कोकणाला स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ द्यावे, अशा प्रकारचा दुसऱ्यांदा प्रस्ताव ठेवला जात आहे. त्याला सभागृहाची कोणत्याही प्रकारची हरकत असता कामा नये. परंतु या सभागृहात 13 मार्च 1989 रोजी कोकणाला स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ देण्याचा निर्णय झाला. याबाबत दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा झाली. गेली जवळजवळ 14 वर्षे हे प्रकरण केंद्रकडे पडून राहिले. त्याबाबतचा पाठपुरावा झाला नाही. त्यामुळे या सर्व 13-14 वर्षामध्ये अन्य वैधानिक विकास मंडळाचा दांडेकर समितीच्या आढाव्यानंतर जो बॅकलॉग होता, त्याचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आणि 12 वर्षामध्ये कोकणावर काही प्रमाणात परिणाम झाला. कोकणाला अनुशेष दूर करण्यासाठी जो निधी मिळायला पाहिजे होता तो आम्हाला विशेष मिळू शकला नाही. ही सत्य घटना आहे. म्हणून मी सभागृहाच्या माध्यमातून वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करत असतांना त्यांना विनंती करतो की, आता हा संपूर्ण ठराव संमत झाल्यानंतर ताबडतोब त्याची कार्यवाही व्हायला पाहिजे. त्याचा आपण पाठपुरावा करुन हे वैधानिक विकास मंडळ खऱ्या अर्थाने अस्तित्वात यायला पाहिजे...

यानंतर कु.थोरात....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी..

आणि अनुशेषाचा निधी आहे तो संपूर्ण निधी या वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून कोकणला मिळाला पाहिजे ही खबरदारी शासनाने घ्यावी, एवढीच विनंती करतो आणि पुन्हा एकदा आपले अभिनंदन करतो.

श्री. मुधुकर चव्हाण : सभापती महोदय, आता पार्लमेंटचे सेशन चालू आहे. श्री. गुरुनाथ कुलकर्णींच्या मताशी मी सहमत आहे. हे अधिवेशन उद्या संपणार आहे. तेव्हा हे अधिवेशन संपल्यानंतर आठवडाभरामध्ये आपल्यालाही याची ग्रॅव्हिटी आणि आवश्यकता कळते. तर आपण त्वरित केंद्राकडे जाऊन आता लोकसभेचे जे अधिवेशन चालू आहे. याच अधिवेशनात हे वैधानिक विकास मंडळ संमत करुन घेण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी उद्या दिल्लीला चाललोच आहे; तेव्हा उद्याच हा प्रस्ताव तेथे देण्याची मी व्यवस्था करतो.

तालिका सभापती : मी देखील कोकणातील असल्यामुळे मी वित्त मंत्री महोदयांचे आणि शासनाचे या कोकण विकास महामंडळाच्या स्थापनेच्या संदर्भात जो ठराव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येत आहे त्याबद्दल अभिनंदन करते. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे सांगितलेले आहे त्या सगळया गोष्टीला माझा पाठिंबा आहे.

श्री. जयंत पाटील :सभापती महोदय, मी आपला आणि सभागृहाचा आभारी आहे. 14 वर्षाचा मोठा कालावधी झाला. प्रयत्नांची शिकस्त करुन या ठरावाला लवकरात लवकर मंजुरी आणण्यासाठी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याच्याशी प्रामाणिक राहून मी अशी कमिटमेंट दिली होती की, याच अधिवेशनात हा प्रस्ताव आणू. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या संदर्भातील अहवाल मागितलेला होता, त्याबाबतही मी दुसरी कमिटमेंट दिली होती. अर्थात तो अहवाल थोडा जूना आहे. पण त्या अहवालाच्या सीडी सन्माननीय सदस्यांना वितरित करण्याची व्यवस्था केलेली आहे. मी सन्माननीय सभापती महोदयांच्या मार्फत सभागृहाला सांगू इच्छितो की, कोकणचे वैद्यानिक विकास मंडळ अस्तित्वात येण्यासाठी राज्याचा नियोजन मंत्री म्हणून पूर्णपणाने प्रयत्नांची शिकस्त आम्ही करु, हा विश्वास या ठिकाणी देतो आणि सभागृहाने एक मताने हा प्रस्ताव मान्य केल्याबद्दल सर्वांचे आभार माणून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, श्री. गुरुनाथ कुलकर्णीसाहेबांनी सांगितल्या प्रमाणे जसे कोकणाला 15 वर्षे थांबावे लागले, तसे खानदेशला सुध्दा परत पंधरा वर्षे थांबावे लागू नये म्हणून खानदेशच्या सर्वच लोकप्रतिनिधींनी गेल्या चार-पाच वर्षापासून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळामध्ये ख-या अर्थाने पश्चिम महाराष्ट्राच्या बरोबर आम्ही आहोत. आणि त्या महामंडळामध्ये विशेष बॅकलॉग असेल तर तो फक्त खानदेश आणि कोकणचा आहे. आता आपण कोकणसाठीचा ठराव केला. माझी शासनाला विनंती आहे की, पुढच्या अधिवेशनामध्ये खानदेशच्या संदर्भातील ठराव सुध्दा करावा, अशी खानदेशातील जनतेच्या वतीने मी आपल्याला विनंती करतो.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी मांडलेल्या भावनांशी सभागृह पूर्ण सहमत आहे. कालच त्या विभागातील सर्व विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांनी माझ्याकडे एक-एक पत्र दिलेले आहे. मी त्यांना सांगितलेले आहे की, याची कार्यवाही मी सुरु करेन. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु झालेली आहे. लवकरच आम्ही मंत्रिमंडळापुढे जाऊ. या बाबतीतील सगळे निर्देशांक घेऊन मंत्रिमंडळापुढे जावे लागते. हा विषय 1989 सालचा आहे. पण हा विषय नव्याने मंत्रिमंडळापुढे नेऊन मंजूर करुन, लवकरच विधानासभेच्या आणि विधानपरिषदेच्या समोर येण्याची व्यवस्था करतो. नक्की पुढच्या अधिवेशनात हा प्रस्ताव मांडण्यात येईल. त्याचबरोबर राज्यातील दुष्काळी भागासाठी एक वैधानिक मंडळ असावे अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली आहे. त्यासाठी दोन वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याचे प्रस्ताव पुढच्या विधानसभेच्या अधिवेशनात, मुंबईला मांडण्यात येतील एवढाच विश्वास मी सभागृहाला देतो.

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्रक नाही

श्रीमती फौजीया खान : सभापति महोदया, कोकण के लिए स्वतंत्र वैधानिक विकास मंडल स्थापित करने के लिए आज यहां पर जो ठराव मंजूर किया जा रहा है, मैं उसका समर्थन करती हूं. मैं इसी संबंध में यह कहना चाहती हूं कि मराठवाड़ा के लिए भी स्वतंत्र वैधानिक विकास मंडल है फिर भी वहां का बॅकलॉग दूर नहीं हुआ है. इसलिए मराठवाड़ा के बॅकलॉग के बारे में अच्छी तरह से चर्चा हो सके, इस हेतु मैंने नियम 260 के अन्तर्गत एक प्रस्ताव दिया था लेकिन उसे मान्य नहीं किया गया. मराठवाड़ा के लिए वैधानिक विकास मंडल होने के बावजूद बॅकलॉग दूर नहीं हुआ है इसलिए इस बारे में चर्चा करने की जरुरत है. इसलिए मेरा अनुरोध है कि अगले अधिवेशन में मराठवाड़ा के बॅकलॉग के संबंध में एक अल्पकालीन चर्चा सदन में रखी जाए.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : यह अलग विषय है. वैसे भी मराठवाड़ा के बॅकलॉग के बारे में यहां इस सदन में चर्चा होती है.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : महोदया, या ठिकाणी वैधानिक विकास मंडळे ही मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी तयार केलेली आहेत आणि 13 मार्च, 1989 रोजी कोकणासाठी वैधानिक विकास मंडळे निर्माण करण्यासंबंधी दोन्ही सभागृहांचा ठराव झाला होता. त्यासंदर्भात पुन्हा 14 वर्षानंतर असा ठराव या ठिकाणी येत आहे. त्यामुळे किती पैसे दिले वगैरे यासंबंधी सन्माननीय सदस्या आपले विचार मांडत आहेत हे योग्य नाही.

श्री. जयंत पाटील : महोदया, अशा प्रकारे प्रथा सुरु होणे ही चुकीची गोष्ट आहे. या ठरावावर कुठल्याही प्रकारे वेगळी चर्चा करता येणार नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या काय बोलतात हे मला समजल्यानंतर मी त्यांना थांबविले आहे.

ठराव मतास टाकून संमत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXVII OF 2005.

A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY TENANCY AND AGRICULTURAL LANDS ACT, 1948.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : महोदया, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्र. 77 - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : महोदया, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्र. 77 - मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र शिंगणे ....

सभापती महोदया, कोकणामतील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतक-यांच्या दृष्टीने हे एक अतिशय महत्वाचे विधेयक आहे. अनेक वर्षापासून या भागामधील शेतकरी जमिनी कसत असून कूळ म्हणून त्यांचा हक्क प्रस्तापित होत नव्हता. वारंवार यासंदर्भात मागणी होऊन चर्चाही होत होती. लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून राज्य शासनाकडे सुध्दा या संदर्भात सातत्याने पाठपुरावा होत होता. अतिशय लहान असलेल्या शेतक-याला न्याय देण्याच्या दृष्टीने आपण या विधेयकात सुधारणा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 12 वर्षे शेती कसत असेलेल्या जमिनीवर कूळ लावावे म्हणून या करिता त्या गावाचे सरपंच, पोलीस पाटील, प्रतिष्ठित नगारीक व कसत असलेल्या शेतीच्या लगत असेलेल्या शेतक-याचे प्रमाणपत्र अशी सर्व प्रमाणपत्रे आवश्यक होते. सर्व प्रमाणपत्र मिळाले तरच त्या जमिनीवर कूळ लागत असे. परंतु या संदर्भात अनेक तक्रारी राज्यशासनाकडे आल्या होत्या. स्थानिक पातळीवर सरपंचाचा दाखला घ्यावयाचे म्हटले तर गावात अनेक पक्षाचे गट-तट असतात त्यामुळे अशा प्रकारचा दाखला मिळण्यास स्थानिक आणि राजकीय अडचण येत होती. तसेच पोलीस पाटील आणि प्रतिष्ठित नागरिकाचे प्रमाणपत्र मिळण्यात देखील अडचणी येत होत्या. त्यामुळे यामध्ये सुधारणा करुन गरीब शेतक-याला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून आपण हे विधेयक आणलेले आहे. या विधेयकाच्या माध्यमातून मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन कलम 4(2) पोट कलम (1) मध्ये आपण सुधारणा करीत आहोत. आता यामध्ये सुधारणा करुन ग्रामपंचायतीचा सरपंच, पोलीस पाटील किंवा प्रतिष्ठित नागरिक या पैकी एक तसेच कसत असलेल्या शेतीच्या लगत असलेल्या शेतक-याचे प्रमाणपत्र अशी दोनच प्रमाणपत्र कूळ सिध्द करण्यासाठी लागणार आहे. सभापती महोदय, कोकणातील शेतक-याच्या दृष्टीने समाधानकारक व आनंददायक अशी ही गोष्ट आहे. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, एक मताने या विधेयकाला पाठिंबा द्यावा.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन्माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे विधेयक आणले आहे त्याचे मी मनापासून स्वागत करतो व त्याच बरोबर शासनाचेही मनापासून स्वागत आणि अभिनंदन करतो. कसेल त्याची जमीन म्हणजेच कूळ कायदा होय. विशेषत: पूर्वी रत्नागिरी जिल्हयात या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु त्यावेळी या कायद्यामध्ये काही चूका राहिल्या होत्या. त्या चूका दुरुस्त करण्याचे काम कित्येक वर्षे रेंगाळत पडले होते. विशेषत: रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयात कुणबी समाज मोठया प्रमाणात शेती करीत असतो. कुणबी समाज हा पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. या दोन्ही जिल्हयाची परिस्थिती पाहिली तर खरा गरीब समाज कुठला असेल तर तो कुणबी समाज आहे. कित्येक वर्षापासून कुणबी समाज हा प्रामाणिकपणे शेती कसत होता असे असतांनाही या जमिनी त्याच्या नावावर होत नव्हत्या. त्यामुळे कित्येक वेळा आंदोलने आणि मोर्चेही काढण्यात आले होते. मला आठवते त्यावेळी मुंबईमध्ये बजेट सेशन चालू असतांना हे लोक मुंबईतील आझाद मैदानावर 40-50 हजाराच्या संख्येने आले होते. आज या लोकांची मागणी पूर्ण झालेली असल्यामुळे मला फार आनंद होत आहे. सभापती महोदया, या दोन्ही जिल्हयाच्या जनतेच्या वतीने मी आपले अभिनंदन करतो तसेच या विधेयकाला सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी एकमताने मंजूरी द्यावी अशी विनंती आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित) : सभापती महोदया, मी सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. बेदेखल कुळासाठी रत्नागिरीमध्ये जाऊन मी मार्चे काढले होते. कुणबी उच्चाधिकार समितीचे तत्कालीन अध्यक्ष श्री.शंकर म्हसकर यांनी शासनाला निवेदन दिले होते. या प्रश्नासाठी मी स्वत: लढलो, मोर्चे काढले, मंत्रिमहोदयांना भेटलो. आता शासनाने म्हसकर अहवालातील सूचना परिपूर्ण केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कुणबी समाज हा वंचित आहे. रत्नागिरीतील शेतकऱ्यांकडे एक एकरापेक्षा कमी जमीन आहे. रत्नागिरीतील कुणबी आणि दलित समाजाचे लोक जमीन असून देखील घर बांधू शकत नव्हते. पण आता शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. गेली 7-8 वर्षे मी प्रत्येक अधिवेशनामध्ये बेदखल कुळांच्या प्रश्नाबाबत आवाज उठविला होता. आज त्याला न्याय दिल्यामुळे मला आनंद होत आहे. रत्नागिरी, रायगड, पोलादपूर, या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील काही भागांमध्ये बेदखल कुळांचा प्रश्न शिल्लक होता. गेली कित्येक वर्षे शेतकरी आपल्या हक्कासाठी लढत होते. जमिनीची मालकी असूनही त्याचा त्याला फायदा होत नव्हता. परंतु, आता हा जो कायदा केला आहे, त्यातून त्याला फायदा होणार आहे. या कायद्यामुळे शेतकऱ्यांना मालकी हक्क प्रदान करण्यात आल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि आपली रजा घेतो.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1947 यात आणखी सुधारणा करण्याकरिता सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 77 आणले आहे. हे क्रांतिकारक विधेयक आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी 'कसेल त्याची जमीन' या कन्सेप्टप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांना आता मालकी हक्क प्राप्त होणार आहे असे सांगितले आहे. कोकणातील बेदखल कुळा संबंधी आर.पी.आय.चे तत्कालीन ज्येष्ठ नेते श्री.दादासाहेब गायकवाड यांनी भूमिहिनांसाठी सत्याग्रह केला होता. कोकणात विशेषत: रत्नागिरीमध्ये आमच्या कुळांना मालकी हक्क मिळणार आहे. शासनाने आता कायदा केल्यामुळे रत्नागिरी व कोकणातील आमच्या कुळांना मनस्वी आनंद होईल. कुणबी उच्चाधिकार समितीचे नेते श्री.म्हसकर यांनी मला व सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना त्यांच्या मागण्यांसंबंधीचे निवेदन दिले होते. आज नागपूरच्या अधिवेशनामध्ये हे क्रांतिकारक विधेयक आले आहे. यामुळे 12 वर्षापासून अधिक काळ ज्यांच्या ताब्यात जमीन असेल त्याला तिची मालकी मिळणार आहे. कुळांना अधिकार प्रदान करण्यासंबंधीचे हे विधेयक आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. या विधेयकामुळे महाराष्ट्राची प्रतिमा उंचावणार आहे. रत्नागिरीतील जो उपेक्षित व वंचित कुणबी व दलित समाज आहे त्याला याचा फायदा होणार आहे, म्हणून मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) विधेयक आणल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. या कुळवहिवाटमुळे बिहार आणि उत्तर भारतामध्ये खून पडत आहेत. हे विधेयक काही नवीन नाही. सन 2001 मध्ये काही अटी घालण्यात आल्या होत्या. मालक, सरपंच, पोलीस पाटील आणि ज्याच्या जमिनीला लागून असेलल्या जमिनीच्या लागवडदाराने आणि गावातील एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीने उक्त जमीन त्या व्यक्तीच्या कब्जात असल्याचे आणि त्या व्यक्तीकडून ती जमीन 12 वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी सातत्याने कसण्यात येत असल्याचे शपथपत्रावर कथन केल्यास त्यास कूळ म्हणून घोषित करण्यात येत होते पण ही अट व्यवहारात अशक्य असल्याचे दिसून आल्यानंतर ही अट शिथिल करण्यात आलेली आहे याबद्दल मी शासनास धन्यवाद देऊ इच्छितो. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अनेक माणसे स्वत:ही जमीन कसत नाही आणि दुसऱ्यालाही कसायला देत नाही. पूर्वी रत्नागिरीमध्ये नाचणी, तीळ, वरी आणि भात अशी वेगवेगळी पिके काढली जात होती. आता गरम मसाल्याचे पदार्थ सुध्दा होतात. या ठिकाणी अतिशय चांगले बील आणलेले आहे. ज्याच्याकडे जमीन आहे तो जमीन कसायला देत होता आणि स्वत: काही कष्ट न करता, एकही घाम न गाळता त्याचा उपभोग घेत होता. आपण हे अतिशय पुरोगामी पाऊल टाकलेले आहे. या विधेयकास भारतीय जनता पक्ष मनापासून पाठिंबा देत आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूरे करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) विधेयक आणल्याबद्दल मी प्रथम मंत्रीमहोदयांचे मनापासून अभिनंदन करतो. कोकणातील गोरगरीब जनतेचा हा प्रश्न आहे. गेली अनेक वर्षे ते स्वत: जमीन कसत असून देखील काही जाचक अटींमुळे त्यांना फायदा मिळत नव्हता. आता कुळवहिवाटातील जाचक अटी शिथिल करुन, त्यातील शर्ती कमी करुन जमीन कसणा-यांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक अतिशय चांगले विधयेक या ठिकाणी आणल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, कोकण विभागातील विशेषत: रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागात राहणारा जो कुणबी, धनगर समाज आहे त्यांना याचा लाभ मिळणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून माझे वडील श्री.शिवाजीराव शेंडगे यांचेकडे धनगर समाज बेदखल कुळाबाबत अशा प्रकारची मागणी करीत होता. मी स्वत: सावंतवाडी येथे जाऊन तत्कालीन महसूल मंत्री श्री.रामराजे निंबाळकर यांचेकडून यासंबंधी आश्वासन घेतले होते. आज येथे हे विधेयक आल्याबद्दल मला आनंद होत आहे. जवळपास 25 हजार हेक्टर जमीन बेदखल कुळामुळे अडकलेली आहे. जो कुणबी, धनगर, कोळी समाज आहे त्यांना याचा लाभ मिळणार आहे. हे एक अतिशय चांगले विधेयक आहे. आपण एक चांगला क्रांतिकारी निर्णय घेतल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

..4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी या ठिकाणी प्रथम शासनाचे अभिनंदन करतो. कारण गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांची ही मागणी होती ती या निमित्ताने पूर्ण झालेली आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांतील कुणबी, भंडारी किंवा अन्य समाज असेल त्यांचा हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायकराव मेटे....

सभापती महोदया, हा कायदा आणल्यामुळे संबंधित लोकांना जमिनीवर कर्ज घेता येईल किंवा अन्य काही गोष्टी करता येतील. त्यामुळे त्यांना चांगल्या प्रकारचे जीवन जगता येईल. या संदर्भात स्वर्गीय शामराव पेजे यांनी सतत मोर्चे काढले होते आणि लढे दिले होते . कुणबी समाजातील व्यक्तींना न्याय मिळावा म्हणून त्यांनी आपले आयुष्य वेचले होते. त्याचबरोबर श्री.मोहनराव पाटील यांनीसुध्दा उच्चाधिकार समिती नेमण्याचे काम केले होते त्यामुळे मसकरे समिती नेमण्यात आली होती आणि या समितीने चांगल्या प्रकारचे काम केले होते. त्यातूनच हे विधेयक आपल्यासमोर शासनाने मांडलेले आहे. या विधेयकामुळे कुणबी समाजातील व्यक्तींना न्याय मिळणार आहे. 50 वर्षानंतर का होईना परंतु या लोकांना न्याय देण्याकरता शासनाने हे विधयेक मांडले आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

डॉ.राजेन्द्र शिंगणे : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 77 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 77 संमत झाले आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : आता अर्ध्या तासासाठी मध्यंतर घ्यावयाचे काय ?

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदया, 15-20 मिनिटांसाठी मध्यंतर घेण्यात यावे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : ठीक आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि 7 वाजून 5 मिनिटांनी पुन्हा: भरेल.

(6.44 ते 7.05 पर्यन्त मध्यंतर)

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर ...)

सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी

पृ.शी. : राज्यात असलेला विजेचे तुटवडा व त्यामुळे होत असलेले 12 ते 14 तासांचे भारनियमन.

मु.शी. : राज्यात असलेला विजेचे तुटवडा व त्यामुळे होत असलेले 12 ते 14 तासांचे भारनियमन याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री अशोक मोडक, दीपक सावंत, मधुकर चव्हाण, अनिल परब, अरविंद सावंत यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो --

" आघाडी शासनाने सत्तेवर येण्यापूर्वी शेतकऱ्यांना मोफत वीजेचे आश्वासन देणे, सत्तेवर आल्यानंतर मात्र ते आश्वासन पूर्ण करण्याऐवजी उलट वीज बिलात वाढ करणे, आजच्या घडीला राज्याच्या ग्रामीण भागात 12 ते 14 तासाचे भारनियमन सुरु असणे, राज्यात दिवाळी पूर्वी 2300 ते 2500 मेगावॅट पर्यंत असलेली तूट नोव्हेंबर 2005 मध्ये 3500 मेगावॅट पर्यंत पोहोचणे, रब्बीच्या पिकांसाठी वीजेची आवश्यकता जास्त असतांनाच 12 ते 14 तासांचे भारनियमन सुरु असल्याने आणि शेतातील विहिरीत पाणी उपलब्ध असूनदेखील ते पीकांना देण्यासाठी कृषी पंप चालू नसल्यामुळे शेतातील उभी पिके जळून जाण्याच्या मार्गावर असणे, भारनियमनामुळे उद्योगधंद्यांवर अतिशय विपरित परिणाम होऊन ते बंद पडणे, त्यामुळे बेकारी वाढणे, कृषी पंपांना वीजजोडणी देण्याचे लाखाहून अधिक अर्ज प्रलंबित असणे, तर सक्तीच्या वीज बिल वसुलीसाठी 1 लाख वीज ग्राहकांच्या वीज जोडण्या तोडण्यात येणे, वीज बिल न भरल्यामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना तुरुगांत टाकणे, जादा आकाराच्या थकित वीज बिल वसूलीसाठी वीज मंडळाचे अधिकारी वीज ग्राहकांचा नाहक छळ करणे, वीज मंडळाच्या ट्रान्सफार्मर खरेदीत झालेल्या प्रचंड घोटाळयाची अनेक प्रकरणे उघडकीस येणे, जळालेले ट्रान्सफॉर्मर्स महिनोंमहिने दुरुस्त न करणे, नवीन वीज निर्मितीसाठी प्रभावी उपाययोजना न होणे, या सर्व बिकट परिस्थितीमुळे राज्यातील आम जनता

..... 4डब्ल्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

संतप्त होणे, वीज भारनियमनाच्या विरोधात शाळकरी विद्यार्थ्यांनीदेखील सहभाग घेऊन आपला असंतोष व्यक्त करणे आणि या सर्व परिस्थितीकडे शासन करीत असलेले दुर्लक्ष व या बाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदया, वीजेच्या संबंधीचा प्रस्ताव या सभागृहामध्ये काही आज नव्याने येतो आहे अशातील भाग नाही. आमचे दुर्दैव आहे की, आम्ही या सभागृहामध्ये आल्यापासून वर्षानुवर्षे प्रत्येक अधिवेशनामध्ये वीजेसंबंधीचा प्रस्ताव आम्हाला येथे आणावा लागतो आहे आणि त्यावर चर्चा करावी लागते पण त्या चर्चेतून आम्हाला झिरो रिझल्ट मिळतो. सभापती महोदया, हे आघाडीचे सरकार या राज्यामध्ये सत्तेवर येण्यापूर्वी झालेल्या निवडणुकीच्या काळात निवडणुकीपूर्वी या आघाडीने जनतेला आश्वासन दिले होते की, या राज्यात आघाडीचे सरकार सत्तेवर आले तर राज्यातील शेतकऱ्यांना आम्ही मोफत वीज देऊ, विजेच्या दरामध्ये आम्ही जनतेला सूट देऊ. अशा प्रकारची आश्वासन दिली इतकेच नव्हे तर निवडणुकीपूर्वी एक महिना अगोदर झिरो बिल केले. त्यामुळे शेतकऱ्यांना वाटले की, खरेच हे सरकार दिलेली आश्वासने पाळणारे सरकार आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ....4एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

निवडणुकीपूर्वी आपल्याला झीरो बिल येत होते. म्हणून राज्यातील जनतेने या सरकारला भरभरुन मते दिली. त्यामुळे हे सरकार सत्तेवर आले. महिना दोन महिन्याचा कालखंड गेला. आणि मग मोफत वीज देण्याबाबत आपसात एकमेकांविरुध्द निवेदने देण्याची प्रक्रिया सुरु झाली. या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी राज्य सरकारला सांगितले की, तुम्हाला मोफत वीज देता येणार नाही. या देशाचे कृषि मंत्री ज्यांना आपण या राज्याचा जाणता राजा म्हणतो त्या माननीय श्री. शरद पवार साहेबांनी राज्य सरकारला मोफत वीज ही न परवडणारी बाब आहे अशाप्रकारची सूचना केली. आणि म्हणून मोफत वीज देण्याचा प्रयत्न करु नका, तो तुम्ही थांबवा. हे सांगत असतांना ते सोयीस्कर विसरले की, त्यांच्या पक्षाचे सरकार राज्यामध्ये आहे. खरे म्हणजे पंजाब आणि आंध्र प्रदेशमध्ये शेतकऱ्यांना मोफत वीज देणे सुरु आहे. त्या ठिकाणी माननीय पंतप्रधानांची अडचण नाही, अडथळे येत नाहीत, त्याठिकाणी कृषि मंत्र्यांना अडथळे येत नाहीत. परंतु महाराष्ट्रामध्ये मात्र अशाप्रकारची मोफत वीज देणे परवडणारे नाही. जर तुम्ही आंध्र प्रदेशमधील,पंजाबमधील शेतकऱ्याला मोफत वीज देऊ शकता तर महाराष्ट्रातील शेतकऱ्याला मोफत वीज देण्याबाबत दिलेले आश्वासन सुध्दा आपण नीटपणे न पाळता ते आश्वासन दिल्यानंतर मोफत वीज देण्याचे बंद केले. त्याचप्रमाणे त्यांना पुरेसा वीज दर देता कां? वीजेचे बिल कमी न करता वर्षभराच्या वीजेच्या दरामध्ये वाढ करण्यात आली. त्यांना पुरेशी वीज दिली जात नाही, वीज बिलामध्ये वाढ करण्यात आली. आणि त्यामुळे ग्रामीण भागामधील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. सुरुवातीला राज्यामध्ये 4 तासाचे लोड शेडींग होते, त्यानंतर ते 6 तास करण्यात आले. आणि आपण येण्यापूर्वी ग्रामीण भागामध्ये 8 तास लोड शेडींग करण्यात आले. शहरी भागामध्ये सकाळी 2 तास व संध्याकाळी 2 तास असे 4 तास लोड शेडींग करण्यात आले. आणि ग्रामीण भागामध्ये सकाळी 4 तास व संध्याकाळी 4 तास असे 8 तास लोड शेडींग करण्यात आले. मी सांगितलेले भार नियमन हे अधिकृतपणे आहे. परंतु अनधिकृतपणे भार नियमन प्रचंड प्रमाणात आहे. ग्रामीण भागामध्ये तेथील शेतकऱ्याला कुणी वाली नाही. तेथील वीज मंडळाचे अधिकारी बेजबाबदारपणे वागत आहेत. त्या ठिकाणी लोड शेडींग हे 6 ते 8 तासापुरते न करता मन मानेल त्या पध्दतीने लोड शेडींग केले जात आहे आणि शेतकऱ्याला वीजेपासून वंचित केले जात आहे. हे लोड शेडींगचे प्रमाण दिवसें दिवस वाढत जात आहे. कालपरवा माझ्या जिल्हयातून मला फोन आला की, त्याठिकाणी आता 12 तासाचे लोड शेडींग सुरु झाले आहे. मी त्यांना सांगितले की, हे अधिवेशन संपू द्या, मग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

हे लोड शेडींग 16 तासावर जाईल. विदर्भामध्ये अधिवेशन आहे म्हणून हे लोड शेडींग 12 तासावर थांबले आहे. मी मागच्या पंधरवडयात मराठवाडयामध्ये होतो. नांदेड जिल्हयामध्ये फिरत असतांना त्या ठिकाणी मला एक शेतकरी भेटला. त्याने सांगितले की, साहेब ग्रामीण भागामध्ये अधिकृतरित्या 8 तासाचे लोड शेडींग आहे. कधी कधी हे वीज मंडळ लहरीपणाने वागत आहे. आता त्यांनी नवीन पध्दत सुरु केली आहे. आठवडयातून दोन तास झीरो लोड शेडींगच्या नावाखाली लोड शेडींग सुरु केले आहे.

(सभापतीस्थानी उपसभापती)

मला त्या शेतकऱ्यांनी सांगितले की, आठवडयातून दोन दिवस झीरो लोड शेडींग आहे. मला वाटले की, बरे झाले आठवडयातून 6 दिवस लोड शेडींग राहील. म्हणजे दोन दिवस लोड शेडींग रहाणार नाही. किमान 24 तास तरी त्या शेतकऱ्याला वीज मिळेल. परंतु झीरो लोड शेडींग म्हणजे 12, 14, 16 तास लोड शेडींग नाही. झीरो लोड शेडींगचा अर्थ दोन दिवस वीज नाही. अशाप्रकारचे नवीन फॅड या राज्यामध्ये वीज मंडळाने सुरु केले आहे. या राज्यामध्ये दिवाळीपूर्वी 2300 ते 2500 मेगावॅट वीजेचा तुटवडा भासत होता.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, खरे म्हणजे सुरुवातीला आपले राज्य दुसऱ्या राज्यांना वीज देणारे राज्य होते. पण आपल्याला दिवाळीमध्ये गुजराथ राज्याकडून 200 मे.वॅ.वीज घ्यावी लागली. आपण गुजराथ राज्याकडून वीज घेतली नसती तर या राज्यातील शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली असती. पण 200 मे.वॅ.वीज घेतल्यामुळे का होईना दिवाळीमध्ये शेतकऱ्यांना थोडीफार वीज मिळाली आणि दिवाळी झाल्यावर नोव्हेंबरमध्ये लोड शेडींग 3500 मे.वॅ.पर्यंत गेले आणि ते वाढतच आहे म्हणजे विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे पण विजेचा पुरवठा वाढत नाही असे सध्या चित्र आहे. राज्यात, ग्रामीण भागात यावर्षी बऱ्यापैकी पाऊस झाला आहे. बुलढाणा, जळगाव इ.भागात चांगला पाऊस झाला आहे आणि त्यामुळे नद्यांमध्ये, विहिरींमध्ये, तळयामध्ये, धरणामध्ये, लिफ्ट इरिगेशनला पाणी आहे. पण लोड शेडींगमुळे शेतकरी ते पाणी रब्बी पिकाला देऊ शकत नाही. ग्रामीण भागामध्ये भारनियमनामुळे अतिशय वाईट परिस्थिती आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, लोड शेडींगची वेळ ठरवा. सध्या लोड शेडींगची वेळ नाही, ते अनिश्चित आहे. मजूर कामासाठी शेतामध्ये जातात पण वीज नसल्यामुळे बागायतदार शेतकरी त्यांना काम देऊ शकत नाही. त्याला दिवसभर तसेच बसून रहावे लागते. लोड शेडींगमुळे रब्बीच्या पिकाला पाणी देता येत नाही अशी स्थिती झाली आहे. पिके जळून जात आहेत, कापसाच्या पिकाला, सोयाबीनच्या पिकाला, सूर्यफुलाच्या पिकाला पाणी देता येत नाही. विजेचे मशीन तासन्तास बंद आहे. वीज कधी येते आणि कधी जाते हे शेतकऱ्याला समजतही नाही. त्यामुळे रब्बीचे पीक येण्याची शक्यता कमी झाली आहे. जी पिकाच्या बाबतीत स्थिती आहे, तीच उद्योग आणि कारखान्यांच्या बाबतीत आहे. विदर्भात मोठया प्रमाणात उद्योगधंदे आणि कारखाने नाहीत. पण जे काही उद्योगधंदे आणि कारखाने आहेत ते सुध्दा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. कारण जर कारखान्यामध्ये 12-12 तास लोड शेडींग होऊ लागले तर कारखानदार आपल्या कामगारांना काम देऊ शकत नाही. त्यामुळे कारखाने बंद होत आहेत आणि दुसरीकडे बेकारांची संख्या वाढत आहे. एका बाजूला कारखाने बंद होत आहेत, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्यासाठी पुरशी वीज नाही अशी स्थिती असताना घरगुती ग्राहकांच्या बाबतीत काय बोलावयाचे ? याबाबतीत मी एक उदाहरण देऊ इच्छितासे की, चार दिवसापूर्वी जळगावच्या जवळ असलेले नशीराबाद येथे 52 तास वीज नव्हती. शेवटी जमाव रस्त्यावर आला आणि मोर्चा घेऊन कार्यालयाच्या ठिकाणी गेला

. . . .4 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

पण त्या लोकांची दाद घेण्यास तेथे कोणी अधिकारी हजर नव्हते. आज विद्यार्थ्यांची परिस्थितीही अशीच आहे. मुलांच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये सप्लीमेंटरी परीक्षा होत्या. पण अनेक भागामध्ये वीज नसल्यामुळे मुलांना नीट अभ्यास करता आला नाही. त्यामुळे त्यांच्या रिझल्टवरही परिणाम होणार आहे. म्हणजे या लोड शेडींगमुळे सर्व समाज जीवन प्रभावित होत आहे, आणि त्याची सरकार कोणत्याही प्रकारे दाद घेत नाही. एका बाजूला वीज नसताना, दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांची कनेक्शनसाठी मागणी वाढत आहे. कनेक्शनचे अर्ज पेंडींग आहेत. मागच्या वेळी मी बुलढाणा जिल्हयातील विजेचा प्रश्न उपस्थित केला होता आणि असे म्हटले होते की, तुम्ही बुलढाणा जिल्हयासाठी विशेष पॅकेज देणार आहात का ? लाखो शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत, पण आपण त्यांना कनेक्शन देऊ शकत नाही. शेतकऱ्यांच्या शेतात पीक येत नाही, कापूस खरेदी केंद्रे सुरु होत नाहीत, शेतकऱ्यांना कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून पैसे मिळत नाहीत. त्यामुळे शेतकरी विजेची बिले भरु शकत नाही. त्यामुळे विजेची कनेक्शन तोडली जातात. गेल्या वर्षभरामध्ये किती विजेची कनेक्शन तोडली ? तर एक लाख शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन तोडली आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

शेतकऱ्यांनी विजेचे बील भरले नाही तर त्याच्यावर कारवाई केली जाते. शेतकऱ्यांवर पोलीस स्टेशनमध्ये केसेस दाखल केलेल्या आहेत. शेतकऱ्यांना जेलमध्ये पाठविण्याचे काम तुम्ही केलेले आहे. विजेचे बील भरले नाही तर वीज मंडळ दंड आकारते. सभापती महोदय, किती दंड आकारावा, यालाही काही मर्यादा आहेत. मी उदाहरण सांगतो की, अकोळी गावातील श्री.मुजुमले नावाच्या शेतकऱ्याचे 2 हजार रुपयाचे विजेचे बील होते. त्याला दंडाची आकारणी करुन 4 हजार रुपयाचे बील भरण्यास सांगितले. ते बील तीन दिवसात भरले नाही तर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला जाईल अशा प्रकारची अधिकाऱ्यांकडून धमकी देण्यात आली. एका बाजूला शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करीत आहे, दुसऱ्या बाजूला वीज मंडळाचे अधिकारी अशा पध्दतीने बिलाची वसुली करत आहेत. अशा अवस्थेत शेतकऱ्याला धमकावून त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्यास वीज मंडळाचे अधिकारी जबाबदार आहेत, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दादागिरी किती करावी ? याचे एक उदाहरण सांगतो. अकोला येथे वीज मंडळाच्या मुख्य अभियंत्यांनी बैठक बोलाविली. त्या बैठकीमध्ये शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे, तेव्हा शेतकरी मोर्चे काढतात, निवेदने देण्यासाठी दालनात येतात. यामधून उद्या काही अनुचित प्रकार होऊ शकतो. शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ आले तर वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन त्यांना रोखले पाहिजे, असे सांगितले. हा सर्वात वाईट निर्णय घेतला गेलेला आहे. कोणतेही खासदार असतील, आमदार असतील त्यांना काही कामासाठी मुख्य अभियंत्यांकडे जायचे असेल, कार्यकारी अभियंत्यांकडे जायचे असेल तर त्यांच्या अपॉइन्मेंट शिवाय त्यांना भेटता येणार नाही, अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आमचा काही प्रोटोकॉल आहे की नाही ? एखाद्या आमदार, खासदारांना अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय त्यांच्याकडे जाता येणार नाही अशा पध्दतीचा निर्णय मुख्य अभियंत्यांनी घेतलेला आहे, तो योग्य नाही. आमदार, खासदारांना त्यांच्या पूर्वपरवानगी शिवाय भेटता येत नसेल तर लोकप्रतिनिधी म्हणून निश्चितपणे ग्रामीण भागातील लोक आवाज उठविल्याशिवाय रहाणार नाहीत. सभापती महोदय, जुलैच्या अधिवेशनामध्ये अशाच प्रकारची विजेवर चर्चा झाली. आम्ही सांगितले होते की, मिटर रिडींग बरोबर होत नाही. त्यावर मंत्री महोदयांनी "आमची माणसे कमी पडतात, त्यामुळे आता निर्णय घेतलेला आहे की, यासाठी आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांना मिटर रिडींगचे काम देणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु.....

आहोत", असे सांगितले. आजच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्येही आम्ही अशा प्रकारचा निर्णय घेत आहोत, असे त्यांनी सांगितले. या संबंधीचा निर्णय जुलै महिन्यामध्ये घेतला, असे सांगून पाच महिन्याचा कालावधी गेलेला आहे. नवे विजेचे प्रकल्प आणणार आहोत, जूनपर्यन्त परळी, पारस येथे जवळपास 500 मे.वॅ. वीज निर्मिती होईल, असेही सांगण्यात आले. आज काय परिस्थिती आहे ? एका बाजूला लोड शेडींग, विजेचा तुटवडा भासतो आहे आणि दुसऱ्या बाजूला 1 मे.वॅ.ही जास्तीची वीज निर्माण केलेली नाही. . राज्याचे मुख्य सचिव श्री.प्रेमकुमार यांनी स्टेटमेंट केलेले आहे की, पाच वर्षापर्यन्त लोडशेडींग रहाणार आहे, ते कदापि कमी होणार नाही. असे वक्तव्य मुख्य सचिवांनी केलेले आहे. लोडशेडींग असल्यामुळे कोणत्याही पध्दतीचे काम करता येणार नाही. मंत्री महोदय मागच्या अधिवेशनामध्ये बोललेले होते की, राज्यामध्ये आय.टी.आय.मध्ये 1 लाख विद्यार्थी आहेत, ते खातेसुध्दा माझ्याकडेच आहे.

यानंतर कु.थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ RJW/ 19:25

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, परवाच मी त्यासंदर्भात राज्याती सर्व आय.टी.आय. चे प्राचार्य आणि वीज मंडळाचे एक्झिक्यूटिव्ह इंजिनियर्स यांची बैठक बोलावलेली होती. वीज मंडळाचे कर्मचारी एक महिन्याचे मीटर रीडिंग घेतील आणि दुस-या महिन्याचे मीटर रिडींग आय.टी.आय. चे विद्यार्थी घेतील. सभापती महोदय, आपण हे जुलै महिन्यात सांगितले आहे. आता डिसेंबर महिना चालू आहे. अजून तो अंमलात आलेला नाही. एका बाजूला विजेची गळती सुरु आहे. दुस-या बाजूला विजेची चोरी सुरु आहे. विजेची चोरी असेल, विजेची गळती असेल सर्व भूर्दंड तुम्ही शेतक-याच्या माथी लावून शेतक-याला वेठीस धरण्याचे काम चालू आहे. कोणा उद्योगपतीला हात लावल्या जात नाही. आपण मागच्या वेळी कबूल कले हाते की, 100 टॉप टेन नांवे आमच्या जवळ आहेत. जे उद्योगपती आहेत जे विजेचे बिल देत नाहीत त्यांची वसुली सुध्दा याच पध्दतीने करणार आहोत. सभापती महोदय, कोणा उद्योपतीकडून वसुली केली? 200 कोटी रुपयाच्या बाबतीत आम्हाला या ठिकाणी नगरपालिकेची नांवे सांगितली.औरंगाबाद नगरपालिकेने 150 कोटी रुपये विजेचे बिल भरले नाही. अमुक नगरपालिकेने 150 कोटी रुपये भरले नाही. पण कोणा उद्योगपतीचे नांव तुम्ही आम्हाला सांगितले नाही. शंभर उद्योगपतींकडे वीज बिलाची बाकी आहे. त्यांना हे शासन हात लावत नाही. पण दोन हाजर रुपये बाकी असणा-या शेतक-यांचे विद्युत कनेक्शन शासन तोडते आणि त्याला जेलमध्ये टाकण्याची भाषा केली जाते. हेशेतक-याचे राज्य आहे? हे अन्नदात्या शेतक-यासाठी काम करणारे राज्य आहे? हे कष्टक-याचे राज्य आहे? अशा पध्दतीने शेतक-याला या विजेच्या माध्यमातून त्राही भगवान करुन या सरकारने सभापती महोदय, सोडलेले आहे. फक्त घोषणा होत आहेत मृगजळ दाखविले जात आहे. अमुक प्रकल्प सुरु करणर. आम्ही टाटाला सांगणार. आम्ही अमक्याला सांगणार. आम्ही बाहेरचे उद्योग आणणार आणि या ठिकाणी वीज निर्मिती करणार? पण एक मेगावॅट विजेची निर्मिती गेल्या वर्षेभरात झालेली नाही. ट्रान्सफॉर्मरची तीच अवस्था आहे. ग्रामीण भागातील ट्रान्सफॉर्मर जळतात. मागच्यावेळेला ट्रान्सफॉर्मर कां जळतात याबद्दल सांगितले की, त्याच्यावर लोड जास्त येतो. 100 कनेक्शन ट्रान्सफॉर्मर असेल तर त्याच्यावर 150 कनेक्शन होतात म्हणून ट्रान्सफॉर्मर जळतात. हे जळलेले ट्रान्सफॉर्मर ताबडतोब दुरुस्त करण्याचा आदेश दिलेला आहे. त्यावेळेला 10 दिवसाचा अवधी दिलेला होता. 10 दिवसात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

नवीन ट्रान्सफॉर्मर बसविल्या जाईल असे म्हटले होते. पण दोन-दोन महिने ट्रान्सफॉर्मर बसविले जात नाहीत. आणि त्या शेतक-याला वीज दिली जात नाही. ट्रान्सफॉर्मर मागायला शेतकरी गेले तर सांगितले जाते पहिल्यांदा विजेची बिल भरा. सभापती महोदय, त्या ट्रान्सफॉर्मवर 25 शेतकरी असले आणि त्यातील दोन शे्तक-यांनी विजेचे बिल भरले नाही आणि 2300 शेतक-यांनी विजेचे बिल भरलेले असले तरी त्या ठिक्राणी नवीन ट्रान्सफॉर्मर लावला जात नाही. अशा पध्दतीने शेतक-याची अडवणूक केली जाते. सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात मी प्रश्न उपस्थित केला होता. कोल्हापूरच्या एका कंपनीकडून हे ट्रान्सफॉर्मर खरेदी केले गेले होते. ट्रान्सफॉर्मर खरेदीमध्ये घोटाळा झाला होता. शासनाने त्यावेळी सांगितले होते की,फक्त त्याच ठिक्राणी नाही तर इतर अनेक ठिक्राणी असे घोटाळे झालेले आहेत. त्याची चौकशी आम्ही करणार आहोत. आणि या चौकशीत जे दोषी आढळतील त्यांना आम्ही शिक्षा देणार आहोत. किती लोकांना शिक्षा दिली? या ट्रान्सफॉर्मर खरेदीत जो घोटाळा झाला त्याची अजून चौकशी पूर्ण झालेली नाही. आणि कुठल्याही अधिका-याला शासन शिक्षा करु शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. घोटाळे प्रचंड आहेत. लाखो रुपयाचे विजेचे तार चोरीला जातात. त्याचा पत्ताच लागत नाही. त्याची कोणी दखलही घेण्यास तयार नाही, अशा प्रकारची स्थिती या राज्यात निर्माण झालेली आहे. आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खात आहे. अशा प्रकारे हे वीज मंडळ आणि वीज कंपनी या राज्यामध्ये चाललेली आहे. मी श्री. दिलीप वळसे-पाटील साहेबांना एवढेच सांगणार आहे की, आपण काहीही करा पण लोडशेडिंगच्या निश्चित वेळा ठरवा. किती तास लोकडशेडिंग करण्यात येणार आहे आणि किती तास करणार आहात ते आधी ठरवा. सभापती महोदय, सकाळी 5.00 ते 9.00 आणि संध्याकाळी 5.00 ते 9.00 कधी 7.00 ते 11.00 या वेळात लोडशेडिंग केले जाते. कामाच्या वेळेल लोडशेडिंग केले जाते आणि रात्री 11.00 वाजता तुम्हाला मुबलक वीज दिली जाईल, असे सांगितले जाते. या लोड शेडिंगच्या वेळा बदलल्या पाहिजेत. शेतक-याच्या कामाच्या तासात पुरेशी वीज मिळाली पाहिजे.लोडशेडिंग कमी केले पाहिजे. 12 ते 14 तास लोडशेडिंग करुन ग्रामीण भागातील माणसाला वेठीस धरलेले आहे.त्या ग्रामीण भागातील माणसाला या लोडशेडिंगमधून मुक्त करणार आहे की नाही हा आमचा सवाल आहे?

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

शेतकऱ्यांना मोफत वीज देऊ नका पण पुरेशा प्रमाणात विजेचा पुरवठा करा, मागेल त्याला विजेचे कनेक्शन्स द्या आणि एवढे जरी केले तरी मला वाटते शेतकऱ्याला काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल, यासाठीच ही आजची चर्चा उपस्थित केली आहे. आज राज्यात सर्वात जास्त मोठा प्रश्न भेडसावत असेल तर तो म्हणजे विजेच्या लोडशेडिंगचा. हे अधिवेशन सुरु झाले त्याच्या अगोदरच्याच दिवशी काटोल येथे माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख यांना त्यांच्याच मतदार संघातील दोन हजार मुलांनी लोडशेडिंग कमी करा म्हणून आग्रह धरला व त्यांची गाडी अडविली, एवढा असंतोष आज धुमसत आहे. त्यांच्याच मतदार संघातील लोक असल्यामुळे त्यांनी त्यांना समजावले. पण जर लोडशेडिंगचे प्रमाण कमी झाले नाही आणि वीज मंडळाच्या मुख्य अभियंत्यांनी लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार तसेच जिल्हा परिषदेच्या सदस्यांना अडविण्याचा प्रयत्न केला तर माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, याचे परिणाम चांगले होणार नाहीत. कारण जनतेच्या प्रतिनिधींना, जनतेच्याच समस्या घेऊन येत असतील आणि त्यांना अशा प्रकारची वागणूक मिळत असणार तर लोकप्रतिनिधी देखील चूप बसणार नाहीत. म्हणून पुढच्या काळात हे लोडशेडिंगचे प्रमाण कमी झाले नाही आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या तसेच लोडशेडिंगबाबत दखल घेतली नाही तर पुढचे दिवस तुमच्या सरकारसाठी चांगले नाहीत, हा इशारा या निमित्ताने मी देतो व माझे बोलणे संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते तसेच त्यांचे सहकारी यांनी नियम 259 अन्वये जो अंतिम आठवडा प्रस्ताव या ठिकाणी चर्चेसाठी आणला आहे त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर अनेक प्रश्न आणि अनेक समस्या या निमित्ताने मांडण्यात आलेल्या आहेत. आमच्या राज्यामध्ये एके काळी सरप्लस वीजनिर्मिती होत होती व इतर राज्यांना देखील आपण विजेचा पुरवठा करीत होतो. हा जो गौरव आपल्या राज्याला लाभले होते पण दुर्देवाने गेल्या काही वर्षांमध्ये विजेची जी तूट निर्माण झाली त्यामुळे वीज निर्मिती आणि विजेच्या पुरठयावर त्याचा परिणाम झाला, परिणामी विजेची टंचाई निर्माण झाली. ही विजेची निर्मिती व तूट निर्माण झाली त्यामुळे अनेक जीवघेण्या समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागत आहे. मग त्यात विद्यार्थी असो अथवा शेतकरी असोत तसेच कारखानदार असोत ही सर्वच क्षेत्रे विजेच्या तुटवडयामुळे प्रभावित झालेली आहेत. अलिकडे विजेच्या वापराचे प्रमाण सुध्दा वाढलेले दिसून येईल तसेच विजेची मागणीही वाढत आहे. पण विजेची गरज आणि निर्मिती यांचे व्यस्त प्रमाण असल्यामुळे मोठया प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. दिवाळीपूर्वी आपल्या राज्यात जवळपास 2500 मेगावॅटची तूट होती पण नोव्हेंबर, 2005 मध्ये ही तूट जवळपास 3500 मेगावॅट पर्यंत वाढलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विलास अवचट)

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

सभापती महोदय, मुंबई सोडली तर राज्यातील सर्व भागात मोठया प्रमाणात लोडशेडींग केले जात आहे. लोडशेडींगमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी तसेच कारखानदार मोठया प्रमाणात सफर झालेले आहेत. विजेमुळे मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, खान्देश, कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी व्याकुळ झालेला आहे. लोडशेडींगमुळे राज्यामध्ये मोठया प्रमाणात असंतोष पसरलेला आहे. अनेक ठिकाणी शेतक-यांनी, ग्रामस्थांनी वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चे नेले आहेत, दगडफेक केलेली आहे तसेच वीज मंडळाच्या अनेक अधिका-यांना मारहाण देखील झालेली आहे. लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांच्या गाडया अडविल्या जात असून मोठया प्रमाणात आंदोलने होत आहेत. लोडशेडींगमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झालेला आहे. खरे पाहिले तर रब्बीच्या काळात शेतक-यांना वीज पुरविणे आवश्यक असते परंतु याच काळात मोठया प्रमाणात लोडशेडींग केली जात आहे. त्यामुळे शेतक-याच्या शेतात पाणी असतांना देखील तो आपल्या पिकाला पाणी देऊ शकत नाही. शेतीला पाणी देऊ न शकल्यामुळे त्याच्या डोळया देखत आज शेतक-याची उभी पिके जळत आहेत. खरे म्हणजे संपूर्ण राज्यात लोडशेडींगचे टाईम टेबल वीज मंडळाने जाहीर केले पाहिजे. संपूर्ण राज्यातील लोडशेडींगचे टाईमटेबल जाहीर करुन पत्रक काढले पाहिजे की, अमुक अमुक तारखेला अमुक अमुक ते अमुक वाजेपर्यंत वीज दिली जाणार नाही यापेक्षा अमुक अमुक तारखेला अमुक अमुक ते अमुक वाजेपर्यंत वीज उपलब्ध करुन दिली जाईल असे पत्रक काढले पाहिजे. म्हणजे या या काळात वीज उपलबध राहणार नाही या पेक्षा या या काळात वीज उपलब्ध राहील असे पत्रक काढले पाहिजे. खरे म्हणजे आता लोडशेडींग या शब्दावरच आता लोड येत आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. पूर्वी पेक्षा आता शेतक-यांची विजेची मागणी वाढत चालली आहे. त्यामुळे शेतकरी वीज कनेक्शनसाठी मंडळाकडे पैसे भरतात परंतु वीज मंडळ या लोकांना वीजेचे कनेक्शन देत नसल्यामुळे नाईलाजाने शेतक-यांना आकडे टाकून वीज चोरी करावी लागत आहे. त्यामुळे ज्या शेतक-यांनी विजेच्या कनेक्शनची मागणी केलेली आहे अशा शेतक-यांना विजेचे कनेक्शन दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

पाहिजे. जसा राज्यात विजेच्या संदर्भात प्रश्न निर्माण झाले आहे तसाच प्रश्न ट्रान्सफॉर्मरच्या संदर्भातही झालेला आहे. ट्रान्सफॉर्मर बंद पडला तर वीज मंडळ हा ट्रान्सफॉर्मर लवकर रिपेअर करीत नाही किंवा बदलूनही देत नाही त्यामुळे वीज उपलब्ध असतांना देखील ग्रामीण भागात वीज मिळत नाही अशी परिस्थिती आहे. म्हणजे "आधीच मर्कट त्यात मद्य प्याला" असे म्हणण्याची वेळ आता आलेली आहे. ट्रान्सफॉर्मर लवकर रिपेअर होत नसल्यामुळे जनतेमध्ये मोठया प्रमाणात अजून असंतोष वाढतो. त्यामुळे ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करणे ही जी तांत्रिक बाब आहे तिच्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. आता तर मोठया प्रमाणात विजेच्या ओपन तारा सुध्दा चोरीला जात आहे तसेच वीज चोरीचे प्रमाण देखील वाढत जात आहे. अनेक मोठमोठे कारखानदार वीज चोरी करीत आहेत. अमरावतीच्या औद्योगिक क्षेत्रातील एका कारखानदाराने 95 लाख रुपयाची वीज चोरी केलेली आहे. एकटया अमरावती ओद्योगिक क्षेत्रातील एका कारखान्यात एवढया मोठया प्रमाणात चोरी होत असेल तर संपूर्ण महाराष्ट्र किती प्रमाणात चोरी होत असेल याचा विचारच केलेला बरा. आज विजेच्या चो-या का होत आहेत याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे. विजेची चोरी कोठे होत आहे हे वीज मंडळातील अधिका-यांन आणि कर्मचा-यांना माहिती असते परंतु ते या गोष्टीकडे लक्ष देत नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे, टंचाईमुळे, आर्थिक परिस्थितीमुळे डबघाईस येतो. त्याने 2-4 महिने वीज बिल भरले नाही तर वीज कापण्याची नोटीस त्याला पाठविण्यात येते. त्याच्या घरावर पोलीस अधिकारी पाठविण्याच्या गोष्टी केल्या जातात. एखादी महापालिका डिफॉल्टर असेल तर नोटीस देऊन कारवाई केली जाते. पण जे भांडवलदार आहेत, उद्योगपती आहेत, त्यांच्यावर विजेचे बिल थकित ठेवले म्हणून कारवाई केल्यासंबंधीची बातमी वर्तमानपत्रात येत नाही किंवा आज पर्यंत त्यांच्यावर कठोर कारवाई केल्याचे दिसून आलेले नाही, याकडे देखील मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. विजेचे मीटर कमी दाखविले जाते. वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांशी संगनमत करून असे प्रकार केले जात असल्यामुळे वीज मंडळाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे आता आय.टी.आय.च्या विद्यार्थ्यांना वीज मीटर रिडिंगचे काम देणार आहात. त्यामुळे वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीवर क्रॉस चेक ठेवला जाईल. यामुळे वीज चोरीवर काही प्रमाणात प्रतिबंध घालता येईल.

सभापती महोदय, एक गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अपारंपरिक स्त्रोताचा जास्तीतजास्त प्रचार आपल्या राज्यामध्ये कसा होईल, त्यास प्रोत्साहन कसे देता येईल हे पाहिले पाहिजे. सोलर ऊर्जेचा वापर करून विजेची तूट भरून काढण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. तसेच, अन्य पारंपरिक स्त्रोताचा अभ्यास करून वीज निर्मिती तयार करून विजेची तूट कशी भरून काढता येईल या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. एम.एस.इ.बी.चे त्रिभाजन झाले आहे. त्यामुळे आता वीज मंडळाच्या कारभारात पारदर्शकता आली पाहिजे, कार्यक्षमता आली पाहिजे, गतिमानता आली पाहिजे. असंतोषामुळे लोक अधिकाऱ्यांकडे जातात. तेव्हा लोकांशी तुसडेपणाने न वागता सामोपचाराने, सौजन्याने वागण्यासंबंधीच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या पाहिजेत. जेणेकरून भार नियमनामुळे परेशान झालेली जनता शांत होईल. लोकांचा राग कसा शांत होईल हे अधिकाऱ्यांनी पाहिले पाहिजे. सन्माननीय श्री.दिलीप वळसे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली ऊर्जा विभागाचे उत्कृष्ट काम सुरू आहे. ऊर्जा खात्याला त्यांच्या रुपाने एक सक्षम आणि कर्तृत्त्वान मंत्री लाभला आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे विजेच्या तुटवडयामध्ये आमूलाग्र बदल होईल. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

वीज टंचाईची परिस्थिती लवकरात लवकर सुधारेल व विजेपासून कोणालाही वंचित रहावे लागणार नाही असा मला विश्वास वाटतो. 'मागेल त्याला वीज मिळेल' अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 259 अन्वये अंतिम आठवड्याच्या माध्यमातून विजेच्या संदर्भात जी चर्चा उपस्थित केली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काल जे सुपात होते ते आज जात्यात आहेत आणि जे जात्यात होते ते सुपात आहेत. मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, आज राज्यामध्ये जे विजेचे संकट निर्माण झालेले आहे त्याला या सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जबाबदार आहेत. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तेव्हापासून 1994 पर्यंत राज्यात वीज सरप्लस होती. त्यामुळे राज्यात मोठमोठे उद्योगधंदे आले. 1960 ते 1994 या कालावधीपर्यंत आपल्याकडे वीज सरप्लस होती. त्यामुळे मुंबई, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक इत्यादी ठिकाणी उद्योगधंदे आले. देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे उद्योगक्षेत्रामध्ये पहिल्या क्रमांकावर होते. आपण आपल्या राज्यातील सरप्लस वीज गोवा, कर्नाटक आणि गुजरात राज्यांना देत होतो. नंतर अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली की, ज्यामुळे आपल्याला विजेचा तुटवड पडू लागला ? मी राजकारणावर बोलत नाही. या राज्यामध्ये दरवर्षी किमान 250 मेगावॅट वीज निर्माण व्हावी म्हणून एम.एस.ई.बी.ची स्थापना करण्यात आली. त्यासाठी दरवर्षी निधीची तरतूद करण्यात येत होती. नंतर राज्यात विजेच्या तुटवडा जाणवू लागला म्हणून एन्रॉन प्रकल्प सुरु करण्यात आला. त्यावेळी श्री.शरद पवार यांना दूषणे देण्यात आली. त्यांना हा प्रकल्प आपल्यासाठी आणलेला नाही वगैर वगैर वावड्या उठविण्यात आल्या होत्या. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुधाकरराव नाईक यांनी याचा एम.ओ.यु.केला होता. एन्रॉन प्रकल्प सुरु झाल्यामुळे आपले नुकसान होणार आहे. त्याला समुद्रात बुडविले पाहिजे असे वक्तव्य त्यावेळी केले गेले आणि त्यामुळे जी 748 मे.वॅ.वीज उपलब्ध होणार होती. ती उपलब्ध झाली नाही. याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे.नंतरच्या साडेचार वर्षात एन्रॉन प्रकल्प समुद्रात बुडविण्याचे काम करण्यात आले. त्या साडेचार वर्षात एक मेगावॅट वीज निर्माण झाली नाही. एन्रॉनच्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी पुढची पाच वर्षे लंडन, दिल्ली, मुंबई येथील कोर्ट कचेऱ्या, आरबिट्रेशन यामध्ये गेली. त्यामुळे पहिल्या साडेचार वर्षात एक मेगावॅट वीज निर्माण झाली नाही आणि नंतरच्या पाच वर्षात देखील एक मेगावॅट वीज निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी.....

झाली नाही. याला दोन्ही बाजूचे सदस्य जबाबदार आहेत. या विभागाचे मंत्री तरुण व तडफदार आहेत. यातून सर्व मार्ग काढल्यानंतर आता रत्नागिरी पॉवर गॅस कंपनी अस्तित्वात आलेली आहे. त्यामुळे मे पर्यंत राज्याला 748 मेगावॅट वीज उपलब्ध होणार आहे.

आज विजेचा तुटवडा असल्यामुळे उद्योजकांना वीज मिळू शकत नाही. शेतकरी अडचणीत आलेले आहेत. शेतकऱ्यांना पाणी असूनही विजेअभावी शेतीला पाणी देता येत नाही. त्यामुळे उत्पादन क्षमता कमी झालेली आहे हे सर्व आपल्याला मान्य करावे लागेल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

एमएसईबी चे बायफरकेशन 2003 मध्ये एनडीए सरकार असताना मान्य करण्यात आले. 2003 चा ॲक्ट मान्य होऊनही एमएसईबी चे जे बायफरकेशन व्हावयास हवे होते, ते झाले नाही. मी तंत्रज्ञान कामगार युनियनचा प्रमुख आहे. त्या ठिकाणी 70 हजार कामगार काम करीत आहेत. माननीय दिलीप वळसे पाटील यांनी त्या कामगारांना प्राधान्य देण्याचे काम केले आणि एमएसईबी चे बायफरकेशन केले. तंत्रज्ञान कामगारांच्या युनियनने पाठिंबा दिल्यामुळे व माननीय वळसे पाटील यांच्या प्रयत्नामुळे एमएसईबी चे विभाजन झाले आहे. या विभाजनाचा परिणाम काय झाला ? महोदय, एमएसईबी चे दर महिन्याला जे 850 कोटी रुपयाचे उत्पन्न होते त्यामध्ये वाढ होऊन, ते 1250 कोटी रुपयांपर्यंत पोहोचलेले आहे. मी आपल्याला ट्रेझरी बेंचचा सदस्य या नात्याने आश्वासन देतो की, माननीय दिलीप वळसे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली या एमएसईबी चा कारभार त्यांच्या हातामध्ये सुरक्षित आहे. त्यांच्या अखत्यारित असलेल्या एक्सलंट अधिकाऱ्यांमुळे मग ते मेहता असोत, जयंत कावळे असोत किंवा संजय भाटीया असोत या संपूर्ण टीमच्या माध्यमातून राज्यामध्ये ऊर्जेच्या संदर्भात अतिशय उत्कृष्ट प्रकारचे काम केले जात आहे. त्यासाठी माननीय मंत्री महोदयांबरोबरच या अधिकाऱ्यांचे सुध्दा अभिनंदन करावे लागेल.

एमएसईबी चे काम निधी दिल्यामुळेच योग्य होणार आहे. सन्माननीय फुंडकरसाहेबांनी सांगितले की, पारस येथील केंद्राला राज्य सरकारने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. एमएसईबी ला खऱ्या अर्थाने निधी देण्याची आवश्यकता आहे, कारण आज एमएसईबी ला नोकरांचा पगार देण्यामध्ये अडचण निर्माण होत आहे. म्हणून राज्य सरकारने जबाबदारी स्वीकारुन, पारस येथील वीजनिर्मिती केंद्राच्या 250 मेगावॅट वीजनिर्मितीसाठी आणि परळी येथील केंद्राच्या 250 मेगावॅट वीजनिर्मितीसाठी निधी देण्यासंदर्भात पाठिंबा दर्शविलेला आहे. ज्यावेळी हे सरकार पुढील निवडणुकीला सामोरे जाईल त्यावेळी हे राज्य 1994 मध्ये जसे विजेच्या बाबतीत सरप्लस होते तसे सरप्लस राहिल अशा प्रकारचा विश्वास मला आहे. कारण ऊर्जा क्षेत्रात कशा प्रकारे काम करावे याची पध्दत माननीय मंत्री महोदयांना माहीत आहे. त्यामुळे या विषयासंदर्भात खऱ्या अर्थाने कृती करण्याची क्षमता माननीय श्री.वळसे पाटील यांच्यामध्ये आहे आणि पूर्ण ताकदीनिशी ते काम करीत आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये युती सरकारच्या काळात भारनियमन होत नव्हते.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : मी सुध्दा आपणांस सांगू इच्छितो की, मे महिन्यापर्यंत आमच्या जिल्हयामध्ये भारनियमन होत नव्हते.

डॉ.दीपक सावंत : महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांचा जन्म ज्या देवगड तालुक्यात झालेला आहे त्या देवगड तालुक्यामध्ये पूर्वी दोन तास भारनियमन केले जात होते, परंतु गेल्या तीन महिन्यांपासून त्यामध्ये वाढ करण्यात आली आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी माहिती दिल्यावरुन मी सन्माननीय दिलीप वळसे पाटील यांना सांगू इच्छितो की, माझ्या गावाकडे व तालुक्याकडे लक्ष देऊन होणारे भारनियमन दूर करा. महोदय, या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढावयाचा असेल तर आपल्या सर्वांनाच पावले उचलावी लागणार आहेत. ही जबाबदारी केवळ राज्य सरकारचीच आहे असे समजून चालणार नाही. सत्ताधारी पक्षासह विरोधी पक्षाची सुध्दा ती जबाबदारी आहे. कारण हा राज्याचा विषय आहे. राज्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून हा प्रश्न सोडविणे ही केवळ राज्यकर्ते, एमएसईबी किंवा ऊर्जा मंत्रालयाची जबाबदारी नाही. हा सभागृहाच्या एकमताचा प्रश्न आहे. त्यामुळे या बिकट प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावे एवढी विनंती करतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद |

नंतर श्री.गायकवाड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये या ठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावरील चर्चेत भाग घेण्या करता मी उभा आहे.गेल्या कित्येक वर्षात एकही अधिवेशन असे झालेले नाही की, ज्या अधिवेशनात विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झालेली नाही.गेल्या काही अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी केलेली भाषणे मी वाचली आहेत. विजेच्या बाबतीत माझ्या एक गोष्ट लक्षात आलेली आहे की, महाराष्ट्रावर आलेले विजेचे संकट हे रोजचे मरण झालेले आहे. वीज मंडळ दररोज मरत आहे आणि जनता रडत आहे अशी स्थिती आहे." रोज मरे त्याला कोण रडे " अशी स्थिती विजेच्या बाबतीत निर्माण झालेली आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये पोडतिडकीने प्रश्न मांडतात परंतु शासनातर्फे त्याला गोलगोल उत्तरे देण्यात येतात. त्यामुळे पुढच्या अधिवेशनामध्ये पुन्हा तेच प्रश्न विचारले जातात. माननीय मंत्री महोदयांनी दिलेली सर्व भाषणे मी वाचली असून माझ्या असे लक्षात आले आहे की ,या पूर्वी जी भाषणे मंत्रिमहोदयांनी केली होती तीच नंतर पुन्हा केली आहेत. त्यात काहीही बदल झालेला नाही. फक्त तारीख बदलण्यात आलेली आहे.गेल्या काही वर्षा पासून राज्य सरकारकडून विजेच्या बाबतीत काय काय प्रयत्न करण्यात आलेले आहेत याबाबतीत फक्त वारंवार सांगण्यात येते,जे काही लिहून देण्यात येते तेच पुन्हा पुन्हा सांगण्यात येते त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केला जात नाही.महाराष्ट्र राज्य हे औद्योगिक दृष्टया प्रगतीवर आहे अशी टिमकी वाजवली जाते. औद्योगिक दृष्टया प्रगती पथावर असलेले राज्य उर्जा निर्मितीच्या बाबतीत मात्र देशाच्या पातळीवर 12 व्या क्रमांकावर आहे. याचा अर्थ असा की, असे राज्य औद्योगिक दृष्टया पहिल्या क्रमांकावर राहू शकत नाही.या ठिकाणी असत्य माहिती दिली जात आहे.आंध्र प्रदेश, तामिळनाडू, गुजराथ या सारखी जी लहान राज्ये आहेत ती सुध्दा विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेली आहेत. एक काळ असा होता की, ही राज्ये आपल्याकडून वीज घेत होती परंतु आता त्यांची विजेच्या बाबतीतील परिस्थिती चांगली झाली आहे आणि आपली परिस्थिती मात्र खराब झालेली आहे एकही मेगॅवॅट वीज निर्मिती आपण करु शकलो नाही.प्रत्येक वेळी सरकारच्या वतीने आणि उर्जा खात्याच्या वतीने आमच्या समोर प्लॅन ठेवण्यात येतो की पुढील पाच वर्षात अमुक होणार आहे तमुक होणार आहे परंतु प्रत्यक्षात त्याप्रमाणे काहीही होत नाही भार नियमन कमी करण्याच्या बाबतीत काय उपाययोजना केली आहे याची चर्चा नेहमीच होत असते परंतु प्रत्यक्षात उपायोजना न केल्यामुळे पुढील अधिवेशनात तीच चर्चा उपस्थित करण्यात येते

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल परब..

प्रत्यक्षात भार नियमन कमी करण्याच्या बाबतीत काहीही प्रयत्न केले जात नाहीत गेल्या अनेक वर्षात महाराष्ट्र शासनाने उर्जा निर्मिर्तीच्या बाबतीत जे प्रयत्न केले होते त्यामध्ये एकाही मेगॅवॅट ची वाढ झालेली नाही. आम्ही फक्त साडेचार वर्षे सत्तेवर होते तुमच्या पक्षाचे सरकार अनेक वर्षापासून होते. तेव्हा तुम्ही काय काम केले आणि आम्ही काय काम केले याची तुलना करण्यासाठी मी येथे उभा राहिलेलो नाही. मला फक्त एवढेच म्हणावयाचे आहे की, उर्जा निर्मिती करण्याकरता जे काही प्रयत्न करावयास पाहिजे ते प्रयत्न झालेले नाहीत. उर्जा निर्मितीसाठी शासनाची जी इच्छा शक्ती पाहिजे ती इच्छाशक्ती असल्याचे दिसून येत नाही.अनेक तास भार नियमन केले जात असल्यामुळे जनता रस्त्यावर येऊन आंदोलने करु लागली आहे,.तोडफोड करु लागली आहेत. वीज मंडळाच्या कार्यालयात घुसून तोडफोड करु लागली आहेत. आज शेतकरी मोठया प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. त्या आत्महत्येची कारणे अनेक आहेत. त्यापैकी विजेचा तुटवडा हे सुध्दा एक कारण आहे. तेव्हा त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.विकासाच्या बाबतीत वीज ही अत्यंत महत्वाची आहे .वीजे शिवाय देशाची प्रगती होऊ शकणार नाही हे सर्वानाच माहीत आहे. एनरॉन पुन्हा आणण्यात येणार असून त्यासंबंधीची बातमी आम्ही वर्तमानपत्रातून नेहमीच वाचत असतो. एनरॉनला पुन्हा आणण्यात येणार आहे आणि 2 रुपये 30 पैसे या दराने वीज मिळणार आहे असे सांगण्यात येत असले तरी जनतेच्या डोळयात धूळ फेक केली जात आहे असे मला सांगावयाचे आहे. याचे कारण असे की इंधनाचा एका बॅरलचा दर 60 डॉलर आहे. तसेच हा दर पुढील सहा महिन्यात कमी होण्याची शक्यता नाही.इंधनाची किंमत 4 रुपये 50 पैसे हा दर राहणार आहे आणि त्यावर पी.एल.आय.73 टक्के इतका असला तर तो आयडल समजला जातो. तेव्हा हा दर 90 टक्के जरी धरला तरी कोणत्याही परिस्थिती 5 रुपये 50 पैसे ते 6 रुपये या पेक्षा विजेचा दर कमी येऊ शकणार नाही.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रिका नाही

श्री. अनिल परब .....

मग किती कर्ज तुम्ही महाराष्ट्राच्या डोक्यावर या निमित्ताने लादणार आहात ? कोण घेणार आहे याची सबसिडी ? केंद्र सरकार की, महाराष्ट्र सरकार ? जीइसी घेणार आहे की, आणखी कोणी घेणार आहे ? तुम्ही हे सर्व महाराष्ट्राच्या जनतेवर थोपणार आहात. महागडी वीज आम्ही घेऊ म्हणून आपण सांगता आहात, पण आपल्याला ती महागडी वीज घ्यावीच लागेल. परंतु जनता हे केव्हापर्यंत सहन करू शकणार आहे ? वीज स्वस्त देण्यासाठी काय प्रयत्न होणार आहेत ? सभापती महोदया, आता सध्या आम्ही वर्तमानपत्रांतून बातम्या वाचतो आहोत. एन्रॉन पुन्हा येणार आहे, त्यातील विदेशी कंपन्यांचे भाग भांडवल परत दिले आहे. जीइसीचे 700 कोटी, बॅक्टेलचे 730 कोटी रूपये परत दिले आहेत आणि रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर नावाची देशी कंपनी चालू करणार आहे. पण विदेशी कंपन्यांना आपण हे जे पैसे परत दिले आहेत, त्यांचे भाग भांडवल परत दिले आहेत तर मग महाराष्ट्र शासनाची जी त्यामध्ये गुंतवणूक होती, इक्विटीचे पैसे होते, ते साधारणत: 600 कोटी रूपये ते आणि त्यावरील गेल्या कित्येक वर्षातील व्याज ते पुन्हा 600 ते 700 कोटी होतात, आजपर्यंत परत का घेतले नाही ? त्यांच्या जवळचा पैसा बाकी असतानाही, त्यांच्याकडे पैसा असतानाही, आणखी 20 टक्के इक्विटी महाराष्ट्र सरकार रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर कंपनीमध्ये टाकणार आहे काय ? महाराष्ट्रातील जनतेचे हे जे पैसे आहेत ते आपण वीज कारभारासाठी वापरणार आहात. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता कर्जाच्या खाईमध्ये लोटली गेली आहे वा जाणार आहे. त्यामध्ये अनेक अशा प्रकारचे भूर्दंड जनतेला सोसावे लागणार आहेत. दुसरे असे की, या कंपनीच्या काही क्रिमिनल केसेस पेंडींग होत्या, त्या सगळ्या पाठीमागे घेतल्या गेल्या. त्या केसेसचा लोकांवर डायरेक्ट परिणाम होणार होता. मग त्या कोणत्या कारणाने मागे घेतल्या ? त्यासाठी आपण सभागृहाला अगोदर विश्वासात का घेतले नाही ? तेव्हा या ज्या सगळ्या केसेस आपण मागे घेतल्या आहेत त्याबद्दलचा देखील खुलासा येथे व्हायला पाहिजे. यामध्ये एक गोष्ट आपण चांगली केली आणि ती म्हणजे लवादाची ज्युरिस्डिक्शन बदलली. ही ज्युरिस्डिक्शन बदलून ती मुंबईमध्ये आणली. त्यामुळे आता वकिलांच्या नावाखाली तज्ज्ञ लोकांना लंडनमध्ये जायला मिळणार नाही. तेव्हा महाराष्ट्राचे हे पैसे पुन्हा महाराष्ट्र शासनाकडे आले पाहिजेत अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. सभापती महोदय, एन्रॉनचे पुनरूज्जीवन करणार आहे, रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर कंपनी सुरू होणार आहे, हे सर्व ठीक आहे. पण महाराष्ट्रातील बेरोजगार मुलांचे काय होणार ? तेथील

..... 5एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल परब .....

स्थानिक बेरोजगार तरूणांच्या बाबतीत आपले धोरण काय आहे ? यु.पी., बिहार, आंध्र प्रदेश येथून सगळीकडून भरती केली जात आहे. बाहेरून आणून नोकरीमध्ये ठेवले जाते आहे. परंतु रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील स्थानिक मुलांना नोकरी दिली जात नाही. सभापती महोदया, जे सगळेच्या सगळे लोक भरती केले जात आहेत त्यांची यादी आपण एकदा सभागृहामध्ये ठेवा म्हणजे मग किती लोक बाहेरून आणले गेले ते आपल्याला समजून येईल. येथील स्थानिक लोकांना, तरूणांना या नोकऱ्यांपासून वंचित ठेवून बाहेरच्या लोकांची भरती करण्याचे चालले आहे. हे सगळे होत असताना लक्षात येते की, हा प्रकल्प करताना, त्यामध्ये कोणतेही राजकार न आणता जनतेच्या हितासाठी कमीत कमी पैशामध्ये येथील जनतेला वीज मिळेल हे आपण पाहिले पाहिजे. परंतु विधीमंडळाच्या अधिवेशनाच्या तोंडावर आमच्या डोळ्यासमोर अशा प्रकारच्या बातम्या आणि आकडेवारी दिली जाते आणि नंतर मधून हळून रस्ता काढायचा आणि पुन्हा पुढील अधिवेशनामध्ये नव्या विषयावर चर्चा करण्यासाठी बसायचे असेच होत आले आहे आणि पुढेही होणार आहे. सभापती महोदया, माननीय मुख्यमंत्र्यांनी गेल्या काही महिन्यापूर्वी टाटा, रिलायन्स इ. मोठमोठ्या कंपन्यांशी सामंजस्य करार केला म्हणून आम्हाला बातम्यांतून कळले. त्यामुळे जवळ जवळ 1400 मे.वॅ. वीज महाराष्ट्रात आणली जाईल असेही सांगितले गेले आणि हे करार केले गेले. पण मग या करारांचे काय झाले ?

(यानंतर श्री. सरफरे ... 5आय 1

अशुधारित प्रत / परिशुद्धीपूर्वी नाही

ॲड. अनिल परब...

कोणते इन्फ्रास्ट्रक्चर दिले गेले, किती जमीन संपादित केली? याबाबत आपल्या सभागृहातील माननीय सदस्यांना या राज्यातील जनतेला काहीही माहिती नाही. एक प्रकल्प उभा रहाण्यासाठी कमीत कमी 5 वर्षे लागतात. आता माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, पुढील निवडणुकीच्या वेळी आम्ही दुसऱ्या राज्यांना वीज देऊ. आज आपण 2006 सालच्या तोंडावर आलो आहोत. 2009 मध्ये पुढील निवडणुका येतील त्यावेळी तुमच्या प्रयत्नाने जरी आपली गरज भागली तर मी तुम्हाला धन्यवाद देईन. मंत्रीमहोदयांनी मघाशी सांगितले आहे की, सद्याची परिस्थिती आहे तशीच राहील. आणि 2010 साली कमीत कमी साडे सात हजार मेगावॅटचे शॉर्टेज येणार आहे. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी म्हणतात की, आम्ही दुसऱ्या राज्याला वीज देऊ. तुम्ही ही वीज कोठून तयार करणार आहात, कशी तयार करणार आहात, तुमचे प्रकल्प काय आहेत? तुमच्याकडे आज जेवढे प्रोजेक्ट आहेत त्यामध्ये तयार होणाऱ्या वीजेचे कॅलक्युलेशन करा. किती हजार मेगॉवॅट वीज तयार होते? दिवसागणिक वीजेची वाढती मागणी आपण कशा पध्दतीने भागविणार आहात? 2006 मध्ये 250 मेगावॅटचे परळी व पारस येथील दोन प्रोजेक्ट तयार होणार आहेत. त्यांची परिस्थिती काय आहे? हे प्रोजेक्ट आज कुठपर्यंत पोहोचले आहेत? महाराष्ट्र सरकारने सामंजस्य करार केला. त्यामध्ये म्हटले आहे की, आम्ही ट्रान्समिशन करु, त्यांचे पोल लाऊ. त्यासाठी आपण इन्फ्रास्ट्रक्चरची काय व्यवस्था केली आहे? कोणतीही माहिती नसतांना पेपरमध्ये आलेल्या बातम्या वाचायच्या आणि 2010 साली आम्हाला एवढी वीज मिळेल असे सांगून एकेक दिवस पुढे ढकलायचे अशा प्रकारचे वातावरण आहे. यामुळे महाराष्ट्रातील जनता त्रस्त झाली आहे, दिवसागणिक जास्त त्रस्त होत आहे. कदाचित एक दिवस याचा स्फोट होईल आणि त्यामध्ये हे शासन जळून खाक झाल्याशिवाय रहाणार नाही. 2010 साली बाहेरच्या जनतेला वीज देण्याचे आपण विसरुन जा. परंतु आपली वीजेची मागणी आपण पूर्ण करु शकू एवढा विश्वास तुम्ही आम्हाला द्यावा. मुंबईचे आज पिक लोड 1800 मेगावॅट आहे. आपली जेमतेम आज गरज भागत आहे. या मधील तज्ज्ञांनी जाहीरपणे खाजगीत सांगितले की, एक दिवस या भार नियमनामध्ये मुंबई देखील बुडणार आहे. मुंबई ही या देशाची आर्थिक राजधानी आहे. तुमचे हे मंडळ किती सक्षम आहे? तुम्ही आम्हाला आश्वासन द्या की, पुढील पाच वर्षात मुंबईमध्ये भार नियमन होणार नाही. आज मुंबईत असलेल्या भांडूप, मुलुंडमध्ये भारनियमन चालू आहे. ठाण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

परिस्थिती वाईट आहे. भार नियमनामुळे मुंबईमधील औद्योगिक क्षेत्र दिवसें दिवस खालसा होत चालले आहे. महाराष्ट्रातील सर्व फॅक्टऱ्या आज तामिळनाडू, गुजरात, मध्यप्रदेशमध्ये स्थलांतरीत होत आहेत. बाकीच्या सर्व सुविधांबरोबर वीज ही देखील प्रमुख सुविधा आहे, ती औद्योगिक क्षेत्राला नियमितपणे पुरविली गेली पाहिजे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे या संदर्भात एम.आय.डी.सी.बरोबर नुकताच करार झाला. या करारानुसार 74 टक्के शेअर्स प्रायव्हेट पार्टीकडे आणि 24 टक्के शेअर्स एम.आय.डी.सी. कडे राहणार आहेत. आणि ते लिमिटेड क्षेत्रासाठी प्रोजेक्ट तयार करीत आहेत. त्यातून एम.आय.डी.सी. ला वीज दिली जाणार आहे. आपले जे चांगले, नियमितपणे पैसे भरणारे गिऱ्हाईक आहे त्यांना हे काम न देता प्रायव्हेट पार्टीच्या हातामध्ये देऊन टाकायचे, ज्यांची वीज निर्माण करण्याची ताकद नाही, जे त्यासाठी पैसे भरु शकत नाही त्यांच्याकडे आपण हे काम दिले आहे. दुसरीकडे वीजेची थकबाकी बॅलन्सशीटमध्ये दाखवायची आणि वीजमंडळ सतत लॉसमध्ये दाखवायचे. त्याचबरोबर सतत चांगले पैसे भरणाऱ्या यंत्रणेकडून वीजेचे कनेक्शन काढून घ्यायचे अशा प्रकारचा प्रयत्न वीज मंडळाचा चालला आहे. त्यामुळे हे वीज मंडळ फायद्यामध्ये येण्याऐवजी ते लॉसमध्ये चालले आहे. आणि दिवसें दिवस त्यांचा हा खड्डा वाढत चालला आहे. तो कधीही कमी होणारा नाही. अे.पी.डी.आर.पीच्या बाबतीत जी योजना होती त्याचा फायदा महाराष्ट्र सरकारने किती घेतला? बिल्कुल घेतला नाही. तामिळनाडू, आंध्र प्रदेश, गुजरात ही राज्ये केंद्र सरकारकडून 1200 कोटी रुपये घेऊन येऊ शकतात. मग आमचे महाराष्ट्र सरकार कां आणीत नाही. आपले अधिकारी दिल्लीत कमी पडतात कां?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.अनिल परब . . . .

आपण दिल्लीमध्ये कमी पडत आहोत. तेथे आपला प्लॅन सबमिट केला गेला नाही. त्यामुळे आपल्याकडे हा पैसा येऊ शकला नाही. वीज मंडळाचे त्रिभाजन करताना घोषणा केली होती की, आम्हाला जागतिक बँकेचा पैसा मिळणार आहे. तो पैसा कुठे आहे ? किती पैसे आले आहेत ? आपण जर हे पैसे आणण्यासाठी अकार्यक्षम असू आणि ते पैसे आणले नाहीत तर कोणत्या जोरावर बोलत आहोत की, चांगले प्रोजेक्ट तयार करु, पैसे आणू. केंद्र शासनामध्ये आमचे सरकार नाही. केंद्रामध्ये आता आपलेच सरकार आहे आणि आपल्याच सरकारकडून तुम्ही पैसे घेऊन येऊ शकला नाहीत तर आता याबाबतीत तुमच्याकडे सांगावयास दुसरे कारणही नाही की, केंद्र सरकार राज्य शासनाला मदत करीत नाही. केंद्र शासनही तुमचे आणि राज्य शासनही तुमचेच आहे. पैसे आणण्यामध्ये अडचण नाही अशा वेळी तुम्ही याबाबतीत रिलीफ मिळवू शकला नाहीत तर यापेक्षा दुसरे दुर्दैव कोणते आहे? आज उरणचा प्लॅन्ट बंद आहे. 37 पीएलएफचा प्लॅन्ट चालू होता. ओ.एन.जी.सी. गॅस देत नाही. पण तुमच्याकडे प्रोजेक्ट कुठे आहेत ? हा प्लॅन्ट कोल गॅसवर ट्रान्सफर केला पाहिजे. यासाठी दुसरा पर्याय शोधला पाहिजे. पण कोणतेही पर्याय शोधण्यामध्ये हे सरकार अपयशी ठरलेले आहे. विजेच्या चोरीच्या बाबतीत सांगावयाचे तर 40 टक्के गळती आहे. "गळती" हे नाव गोंडस असले तरी आपण जर त्याच्या पाठिमागे गेलो तर त्याचे खरे कारण विजेची चोरी आहे. याचे बिल कोणाच्या डोक्यावर ? तर जो सर्वसामान्य माणूस आहे, शेतकरी आहे, प्रामाणिक माणूस आहे, त्याच्यावर याचा भूर्दंड बसतो. फ्युएल ॲडजेस्टमेंट चार्जेस मध्ये एवढया मोठया प्रमाणात घोटाळे आहेत की, ते जर एकदा बाहेर काढावयाचे म्हटले तर पूर्ण अधिवेशनाच्या कालावधीतील कमीत कमी आठ दिवस यावरच बोलावे लागेल. या मंडळाचे घोटाळे बाहेर काढावयाचे तर बऱ्याच गोष्टी सांगता येतील. पण तो आजचा विषय नाही. मी या सर्व गोष्टींचा बारकाईने अभ्यास केला आहे म्हणून मी जबाबदारीने बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, सन्माननीय मंत्री महोदयांनी या विभागाचा कारभार हातात घेतल्यानंतर आपले उत्पन्न 800 कोटी रुपये होते, ते आता 1200 कोटी झाले आहे. तुमच्याबाबत असे बोलले की, तुम्ही अतिशय कार्यक्षम मंत्री आहात. अशा वेळी हे उत्पन्न 1200 कोटी वरुन 2200 कोटीपर्यंत जाऊ शकते. तुम्ही या वीज मंडळाच्या कारभारातील घोटाळे बाहेर काढले, विजेच्या चोऱ्या पकडल्या, येथील आर्थिक घोटाळे, गैरव्यवहार उघडकीस आणले तर 1200 कोटीवरुन 1400 कोटीपर्यंत नाही तर 2200 कोटीपर्यंत जाण्यास वेळ लागणार नाही.म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल परब . . . .

माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण यामध्ये बारकाईने लक्ष द्यावे. दर ठरवावयाचे म्हटले तरी एम.ई.आर.सी.ते ठरवून देत नाही. मध्यंतरी आम्ही वीज मंडळावर मोर्चा नेला होता. चर्चगेट ते बांद्रा पर्यंत वेगळे दर आहेत. याबाबतीत आम्ही जेव्हा वीज कंपनीला सांगतो, तेव्हा आम्हाला सांगितले जाते की, आम्ही याबाबतीत काही करु शकत नाही. तुम्ही एम.ई.आर.सी.बरोबर बोलावे. एम.ई.आर.सी.चे जे प्रतिनिधी आहेत, त्यामध्ये एकही लोकप्रतिनिधी नाही. त्या ठिकाणी लोकप्रतिनिधी का असू नये ? त्यामध्ये बाकी सगळे प्रतिनिधी आहेत. मी अनिल परब म्हणून तेथे जाऊ शकतो, माझा वकील तेथे जाऊ शकतो. लोकप्रतिनिधी हा एक प्रकारे लोकांचा वकीलच आहे. आमचे काम म्हणजे लोकांची वकीली घेऊन बोलणे. म्हणून एम.ई.आर.सी.मध्ये लोकप्रतिनिधी देखील असावेत, अशी मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे. या ठिकाणी विजेच्या प्रस्तावाच्या निमित्ताने चर्चा सुरु असताना बरेचसे विषय येथे मांडण्यात आले आहेत. वीज मंडळाच्या कारभाराच्या बाबतीत प्रत्येक वेळी असे म्हटले जाते की, असे नाही, हे नाही, ते नाही. पण या विषयाच्या संदर्भातील पूर्वीची भाषणे वाचली. तर त्या भाषणांमध्ये काही बदल नाही. तेच प्रस्ताव, प्रत्येक वेळी तशीच भाषणे आणि पाच वर्षात काय करणार आहोत, दहा वर्षात काय करणार आहोत ? पण आजपर्यंत काय केले ? आजपर्यंतच्या आमच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात इतकी वीज निर्माण झाली असे गेल्या पाच वर्षात कधी सांगितले गेलेले नाही आणि पुढच्या पाच वर्षात होईल की नाही याबद्दल देखील मी साशंक आहे. आज या प्रस्तावाच्या निमित्ताने विजेच्या कारभाराच्या बाबतीत हीच अपेक्षा करतो की, माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत बारकाईने अभ्यास करुन, गळती थांबवून सामान्य लोकांना भारनियमनापासून मुक्त करा.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनाची नाही

श्री.अनिल परब (पुढें सुरु...

तसेच आज विद्यार्थी, कामगार हे भारनियमनामुळे त्रस्त झालेले आहेत, त्यांना मुक्त करावे, अशाप्रकारची विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्रीमती कांता नलावडे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय आज या ठिकाणी 59 अन्वये विजेच्यासंबंधात अल्पकालीन चर्चा अंतिम आठवडा प्रस्तावाद्वारे उपस्थित केलेली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी विजेच्या विषयावर सविस्तर अशा प्रकारे विवेचन करुन प्रकाश टाकलेला आहे. कोणत्याही राज्याचा विकास ज्या घटकावर अवलंबून आहे, त्यामध्ये वीज हा प्रमुख घटक आहे. सभापती महोदय, एन्रॉनचा जो घोळ चाललेला आहे, तो मी 1991 पासून पहाते आहे. त्या प्रकल्पावर आपण विसंबून राहिलेलो आहोत. एन्रॉन प्रकल्प येणार आणि त्याच्या माध्यमातून वीज निर्मिती होणार, इतर राज्यांनाही वीज देणार,असे सांगितले गेले होते. यामुळे वीज निर्मितीमध्ये शासनाने अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे लक्षात येते. खरे म्हणजे या खात्याचे मंत्री माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याबद्दल व्यक्तीश: माझ्या मनात आदर आहे. परंतु ते ज्या खात्याचा कारभार करतात, त्या खात्याची कार्यपध्दती समाधानकारक दिसत नाही. त्यांचे त्यावर नियंत्रण असायला पाहिजे, ते असल्याचे दिसत नाही. शेतकऱ्यांचे वीजपंप आज बंद आहेत. हजारो रुपयाच्या घरामध्ये लोकांना विजेची बिले येतात. सन्माननीय मंत्री हे छान भाषण करतात, छान बोलतात, त्यांच्या भाषणामध्ये कोणत्याही गोष्टी रिपीट होत नाहीत. परंतु 'बोलाची कढी आणि बोलाचाच भात', असे त्यांनी केलेल्या भाषावरुन वाटते. त्यांच्याकडे हे खाते आल्यापासून ते इतर राज्यांकडे विजेसाठी हात पसरावयास लागलेले आहेत की काय ? असे वाटते. आपल्याकडे काही वर्षापूर्वी सरप्लस वीज होती. पण आज इतर राज्यांकडे आणि केंद्राकडे मागणी करावी लागते, असे आपण पहातो. हजारो ट्रान्स्फॉमर्स जुने झालेले आहेत, ते बदलले जात नाहीत. ट्रान्स्फॉर्मर जुने असल्यामुळे ते मोठ्या प्रमाणात जळतात. याचे कारण विजेची चोरी होय. यावर कोठे तरी नियंत्रण आणणार आहात काय ? याचा विचार केला पाहिजे. आज ग्रामीण भागामध्ये 12-12 तास लोडशेडींग चालू आहे. शेतकऱ्यांना वीज मिळत नाही. ट्रान्स्फॉर्मर नादुरुस्त झाले तर त्याबाबत काही उपाययोजनासुध्दा केली जात नाही. विजेच्या प्रश्नावर पूर्णपणे सरकारला अपयश आलेले आहे. 1999 पासून हे सरकार सत्तेवर आलेले आहे. त्यांनी पाच वर्षे भार नियमनाचे काम केलेले आहे. मुख्य सचिवांनी जाहीर केलेले आहे की,काही वर्षे लोकशेडींग रहाणार आहे. युतीच्या काळामध्ये भारनियमन नव्हते. आता ऐन उन्हाळयामध्ये 12-12 तास भार नियमन करावे लागत आहे. हे आपल्या सारख्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु....

राज्याचा उत्कर्ष आणि विकास करणाऱ्या राज्याला शोभादायक नाही. एक गोष्ट सांगाविशी वाटते की, धुळ्याचे महापौर श्री.करणकाळ यांनी आरोप केलेला आहे की, ऊर्जा मंत्र्यांनी त्यांच्या आंबेगावच्या घरामध्ये इन्व्हर्टर बसविलेला आहे. आणि धुळ्याच्या आमदारांनी आपल्या घरी एक्सप्रेस फिडरने 24 तास लाईट आणलेला आहे. ग्रामीण भागामध्ये मी ज्यावेळेला प्रवास करते तेव्हा लक्षात येते की,.....

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे..

तेथे लाईट नसतो. लाईट कधी येणार ? तर रात्री 11.30 वाजता. जाते कधी? पहाटे सकाळी 6.00 ते 6.30 वाजता. मग त्या लाईटचा उपयोग काय? मी पंधरा दिवसापूर्वी लोणंदवरुन सातारला चालले होते. लोणंदपासून दोन कि.मी.अंतरावर एक बाई बेशुध्द पडली असे मला वाटले म्हणून गाडी थांबवून तिला तिची विचारपूस केली तिला पाणी दिले आणि तुला कुठे जायचे आहे असे विचारले.तेव्हा तिने सांगितले की, माझे गाव एक कि.मी. अंतराव आहे. मला तेथे जावयाचे आहे. त्यावेळेला मी विचारले की, तू कुठे गेली होतीस? तेव्हा तिने सांगितले की,मी तेथे लाईटचे बिल भरायला गेले होते. त्यानंतर त्या बाईने असेही सांगितले की, माझ्या घरात दुसरे कोणी नाही. मी एकटीच आहे. माझ्या घरात एकच टयुबलाईट आहे. तीही रात्री 11.30 लाईट येतो. सकाळी 6.00 वाजता जाते. टयूब बंद असते परंतु प्रत्येक महिन्याला पाचशे रुपये बिल येते. मी रोजाने काम करते पैसे साठवून हे बिल भरायला मी गेले होते. हे वीज बिल भरले नाही तर वीज कनेक्शन तोडून टाकू असे त्यांनी सांगितले आहे. दुष्काळामुळे विहिरीमध्ये पाणी नव्हते म्हणून विजेचे मोटर बंद तरी सुध्दा शेतक-यांना वीज बिल येते. आता पाऊस खूप झाला आहे पण लोडशेडींग आहे तरीही बिल येते. केंद्रा कडून वीज मिळविण्याच्या संदर्भात राज्य शासन अजून आपली जबाबदारी पूर्णपणे कां पार पाडत नाही, अशी शंका मनात येते. एनडीएचे सरकार होते तेव्हा अरोप केला जायचा की, यांच्या कडून निकृष्ट दर्जाचा काळसा पुरवला जातो. मग आता तरी उत्कृष्ट दर्जाचा कोळसा मिळतो कां? हे विचारावेसे वाटते.आज महाराष्ट्रात दरडोई 581 युनिटची गरज आहे. 30 के.व्ही. चे सबस्टेशन बिघडले तर संपूर्ण एक विभाग अंधारात जातो. अशा सब स्टेशन्सवर 5 के.व्ही.चा संच स्टॅण्डबाय म्हणून कां ठेवत नाही ? चंद्रपूर, कोराडी आणि नाशिक मिळून चार वीज निर्मितीचे संच पूर्णपणे बंद आहेत. अपारंपारिक ऊर्जा मिळविण्याच्या सोर्समध्ये सोलर सिस्टिम असेल किंवा वळन ऊर्जा प्रकल्प असेल, वीज निर्मिती करण्यासाठी या मार्गाचा वापर शासन कां करीत नाही ? वीज चोरांवर कडक कारवाई केली पाहिजे. मांढर देवीची दुर्घटना घडली त्यामध्ये हे एक कारण आहे. त्या ठिकाणी असलेल्या सगळया दुकानांना चोरीची वीज दिली गेली होती. आणि त्यातील एक वायर लोंबत होती. फक्त हे एक कारण आहे. त्या घटनेमागे तेच कारण आहे असे मला म्हणावयाचे नाही. परंतु ते उदाहरण मला या ठिकाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

द्यावेसे वाटते. जुन्या प्रॉजेक्टचे आधुनिकीकरण कां करण्यात येत नाही? त्याचे आधुनिकीकरण केले तर वीज निर्मिती अजून होऊ शकते. मागच्या वर्षी हिवाळी अधिवेशनात विजेवर चर्चा झाली होती आणि माननीय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनीच उत्तर दिले होते. त्यामध्ये असा उल्लेख केला होता की,"उरणच्या प्रकल्पाद्वारे 450 मे.वॅ. वीज निर्मिती आपल्याला वाढवायची आहे. त्याच्या बरोबरीने 1 हजार मे.वॅ. वीज निर्मितीचा प्रकल्प उरणला करावयाचा आहे. आवश्यकता असेल तर वीज मंडळाच्या रिस्ट्रक्चरिंगमध्ये गॅसबेस निर्मितीसाठी स्वतंत्र कंपनी करुन प्रायव्हेट सेक्टर किंवा जॉइंट व्हेन्चर पार्टनरशीपच्या माध्यमातून 1400 मे.वॅ. चा प्रकल्प मार्गी लावण्याचे नियोजन आम्ही केलेले आहे." ते नियोजन कुठे आहे? असे विचारावेसे वाटते. त्यानंतर पुढे असे म्हटले होते की, "ज्याप्रमाणे टाटा आणि बीएसइएसमुळे मुंबई हायलाईट झाली त्याप्रमाणे या उरणच्या प्रकल्पामुळे नवी मुंबईसुध्दा हायलाईट करण्याच्या संदर्भातील पुढचा विचार आम्ही करीत आहोत." परंतु एक वर्षे झाले तरी आम्हाला यात प्रगती आढळून आलेली नाही. त्याचबरोबर त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "ही पाईप लाईन पुण्या जवळील तळेगाव-दाभाडे येथून जाते. त्या ठिकाणी एमआयडीसीची जागा पडलेली आहे. एमआयडीसी बरोबर आमचे बोलणे झालेले आहे.

यानंतर श्री. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे .....

पुण्याजवळ आम्ही 1 हजार मेगावॅटचा गॅसबेस प्रोजेक्ट करु शकलो तर त्या गॅसबेस प्रोजेक्टला पुण्याशी लिंक-अप करुन पुण्याचे एक आयलंट करता येईल. एकदा पुण्याचा भाग अलग झाला, नव्या मुंबईचा भाग अलग झाला की, नाशिकच्या एकलहरे वीज केंद्रावरुन आपण नाशिक आयलंड करु शकू, परळी वीज केंद्रावरुन औरंगाबाद आयलंड करु शकू आणि कोराडीवरुन नागपूर शहर आयलंड करु शकू, असा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे आपण माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगितले होते. त्या प्रस्तावाबाबत काय झाले, तो अजूनही विचाराधीनच आहे की कार्यान्वित झाला याचा खुलासा झाला पाहिजे. नागपूरमध्ये मोठया प्रमाणावर लोडशेडिंग आहे आणि ज्यावेळी सदनात चर्चा झाली त्यावेळी आपण सांगितले होते की, नागपूर परिसरासाठी आम्ही कॉल ब्लॅक मागविणार आहोत, ते आपण मागविले काय आणि आज विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक तसेच समाजातील प्रत्येक घटक या लोडशेडिंगमुळे वैतागून गेले आहेत आणि आज तरी आपण पाहतो की, सन 1993 पासून या राज्यात एकही मोठा प्रकल्प झालेला नाही. मॅनपॉवर कमी होत चालले आहे आणि प्रत्येक ठिकाणी वीजेवर सर्व कामे चालतात त्यामुळे विजेची जास्त आवश्यकता आहे, मात्र वीजनिर्मिती करु शकत नाही. आपल्या राज्याला हे शोभादायक नाही त्यामुळे या ठिकाणी मला सांगावेसे वाटते की, आम्ही प्रत्येक अधिवेशनात अशाच प्रकारे चर्चा करीत राहणार काय ? आणि तीच तीच उत्तरे मंत्री महोदय देणार आहेत काय ? त्यातून काही निष्पन्न होणार की नाही ? याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी कृपया करावा. अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्रीमती फौजिया खान यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान (नामनियुक्त): सभापति महोदय, लोडशेडिंग एक ऐसी समस्या है जिसके परिणामों की बजाए कारणों पर चर्चा होने की जरुरत है, ऐसा मुझे लगता है. लोडशेडिंग की समस्या के लिए कौन जिम्मेदार है, यह पूछना यानी मरीज क्यों मरा है,उसके बारे में कब्रस्तान में जाकर बहस करने जैसा है. पूरे राज्य में जो लोडशेडिंग का संकट आया है, उसका कारण बिजली की मांग की तुलना में बिजली निर्माण न होना यह जरुर है लेकिन इसके अलावा कुछ ऐसे भी कारण है जो गंभीर होने के बावजूद उन पर मात की जा सकती है. बिजली निर्माण के लिए युध्द स्तर पर काम हो रहा है. मैं इस सिलसिले में आपसे यह कहना चाहती हूं कि बिजली मंडल का कार्यभार एक ऐसे सक्षम नेतृत्व के पास दिया गया है, जो एक दृष्टिकोण रखते हैं, जो पास्ट, प्रेजेन्ट और फ्यूचर की पॉलिसी को रखने की क्षमता रखते हैं और बिजली समस्या को अच्छी तरह से टॅकल करने की क्षमता रखते हैं. मैं बिजली विभाग के माननीय मंत्री जी श्री दिलीप पाटील जी की बात कर रही हूं. माननीय सदस्य श्री गुरुनाथ कुलकर्णी ने इस बात को यहां अच्छी तरह बताया है. क्योंकि पास्ट में क्या करना था, प्रेजेन्ट को किस तरह से टॅकल करना है और फ्यूचर में किस तरह से लॉंग टर्म प्लानिंग करने की जरुरत है, यह काम अच्छी तरह से हो रहा है. इसलिए मुझे विश्वास है कि वर्ष 2010 तक महाराष्ट्र बिजली के क्षेत्र में सरप्लस राज्य हो जाएगा, क्योंकि लॉग टर्म के साथ साथ शॉर्ट टर्म में बिजली की समस्या को टॅकल करने का काम भी हो रहा है. लेकिन हम तो आज को देखते हैं कि आज क्या समस्या है और उस समस्या को कैसे टॅकल कर सकते हैं. हमारे राज्य में बिजली की लीकेज 35 प्रतिशत है और बिजली की चोरी 16 प्रतिशत है. इसका सीधा अर्थ यह है कि हमारे पास जो बिजली है उसमें से 50 प्रतिशत बिजली वेस्ट हो रही है. राज्य में आज बिजली की मांग 15 हजार मेगावॅट है और उपलब्ध बिजली 11049 मेगावॅट है. इसका मतलब यह है कि एक तरफ एक तिहाई बिजली हमें कम पड़ रही है तो दूसरी तरफ बिजली वेस्ट हो रही है. चूंकि विद्यमान परिस्थिति में हमारा राज्य बिजली निर्माण की स्थिति में नहीं है, तो कम कम से कम लीकेज और चोरी कम करने पर हमें ध्यान केन्द्रित करना चाहिए, ऐसा मैं समझती हूं.

सभापति महोदय, खेती के पंप के लिए राज्य में 12 प्रतिशत बिजली का उपयोग किया जाता है. उद्योग के लिए और स्थानिक स्वराज्य संस्थाओं द्वारा जो वाटर सप्लाय स्कीम और अन्य

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

योजनाएं चलाई जाती है, उसके लिए बड़े पैमाने पर बिजली का उपयोग किया जाता है. उद्योग में बिजली चोरी का प्रमाण बहुत बड़ी मात्रा में है और दूसरी ओर स्थानिक स्वराज्य संस्थाओं की तरफ से की जानी वाली वसूली भी अत्यल्प है. ऐसी स्थिति में बिजली की समस्या का बढ़ जाना स्वाभाविक है. जहां तक बिजली चोरी का मसला है तो इस मसले के लिए कुछ हद तक शासन भी जिम्मेदार है. जहां शेती पंप के लिए 12 प्रतिशत बिजली का उपयोग किया जा रहा है वहां लगभग इतनी ही बिजली चोरी हो रही है. बिजली चोरी का एक कारण यह भी है कि, राज्य में पिछले कई सालों से विद्युत पंप के लिए कनेक्शन नहीं दिया गया है. उदाहरण के तौर पर मैं परभणी के बारे में बताना चाहूंगी कि परभणी में 1991 से कोटेशन नहीं दिए गए हैं. वहां पेंडिंग कोटेशन करीब 7 हजार है. यह आंकड़ा सिर्फ एक जिले का है. पूरे राज्य में इसी तरह की स्थिति है. बरसात न होने की वजह से किसान भी क्या करें, इसलिए आंकड़ा लगाकर बिजली लेकर पानी लेने का काम शुरु कर दिया है. हम उन किसानों को दोष नहीं दे सकते हैं, क्योंकि पेट तो भरना है. इसलिए बिजली की चोरी और ज्यादा बढ़ गई है. अत: मैं इस संबंध में निवेदन करना चाहती हूं कि पहले जिस प्रकार से टेम्परारी तौर पर बिजली का कनेक्शन देने की योजना थी ताकि किसानों को रबी सीजन में फसल पैदा करने में कोई दिक्कत न हो और किसानों का फायदा हो सके, तो यह टेम्परारी कनेक्शन देने की योजना फिर से चालू की जाए. इस योजना को चालू करने के बाद सरकार को रेवेन्यू भी मिल सकेगा. वैसे भी बिजली की चोरी हो रही है. इसलिए इस योजना से रेवेन्यू तो मिल सकेगा और केलकुलेशन भी किया जा सकेगा कि कितनी बिजली चोरी हो रही है.

सभापति महोदय, मैं यह सुझाव देना चाहती हूं कि कापर से बने हुए ट्रांसफॉर्मर का उपयोग किया जाना चाहिए. ऐसा पता चला है कि अल्यूमिनियम से बने ट्रांसफॉर्मर से बिजली का नुकसान होता है. 10 से 12 प्रतिशत बिजली का नुकसान इस तरह से हो रहा है. इसलिए कापर से बने ट्रांसफॉर्मर का उपयोग करने के बारे में विचार करें. दूसरी बात यह है कि अगर कॅपेसीटर अच्छी तरह से काम कर रहे है तो 20 प्रतिशत लोड कम हो सकता है और वोल्टेज भी मेन्टेन रहता है. लेकिन इस बारे में भी कोई उपाय करने में उदासीनता दिखाई देती है. परभणी में वर्ष 2000 में कॅपेसीटर लगाए गए थे, इनमें से 50 प्रतिशत से अधिक कॅपेसीटर आज बंद है.

इसके बाद श्री दत्त

अशोधित प्रत / अशोधित नहीं

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

मॉयनर रिपेयर न होने के कारण हमें इतना बड़ा नुकसान उठाना पड़ रहा है. यदि ये मॉयनर रिपेयर हम करा दें तो 20 प्रतिशत बिजली की बढ़ोतरी हमारे यहां पर हो सकती है. करीब एक डेढ़ करोड़ रुपए खर्च करके हमने ये कॅपिसिटर बिठाए हैं. यदि 5-6 लाख रुपए खर्च करके हम उनका मेंटेनेंस कर दें तो मैं समझती हूं कि करीब 20 प्रतिशत लोड शेडिंग हम कम कर सकते हैं. सभापति महोदय, घरेलू बिजली चोरी का मामला भी काफी गंभीर है. लेकिन यह गंभीर मसला बिजली मीटर बाहर बैठा कर हल किया जा सकता है. उससे यह समस्या हल हो सकती है. बिजली की लीकेज और चोरी को रोकने के लिए जो सुझाव मैंने दिया हैं, मैं मानती हूं कि इस काम के लिए वन टाइम इन्वेस्टमेंट जरुरी है. लेकिन वन टाइम इन्वेस्टमेंट करके यदि हमको फायदा हो सकता है तो वन टाइम इन्वेस्टमेंट के बारे में हमें सोचना चाहिए. इसके अलावा सहूलियत दर पर जो बिजली आज हम किसानों को देते हैं उसकी वजह से 12 सौ करोड़ रुपए का बोझ शासन पर पड़ता है. मैं बोलना चाहती हूं कि अगर यह सहूलियत एक साल के लिए बंद कर दी जाये तो यह पैसा भी बच सकता है. यह पैसा हम बिजली की लीकेज रोकने और मेंटेनेंस के लिख खर्च कर सकते हैं और ऐसा करने से करीब 30 प्रतिशत बिजली की चोरी और दूसरे नुकसान से हम बच सकते हैं. आज हमारी अतिरिक्त बिजली की जरुरत 33 प्रतिशत की है तथा अधिक बिजली बनाने में हम असमर्थ हैं. इसलिए मुझे लगता है कि अल्टीमेट सोलुशन यही है कि बिजली के नुकसान को हम रोकें.

सभापति महोदय, शहरी विभाग में अगर हम कुछ शॉर्ट टर्म या टॅम्परेरी उपाय ढूंढने की कोशिश करते हैं तो उसका उपाय यही है कि हम छोटे-छोटे प्लांट लगाएं. उसका खर्च भी कम आएगा और लोड शेडिंग के टाइम पर टॅम्परेरी बिजली सप्लाय हम इन छोटे प्लांट से कर सकते हैं. इस बारे में शासन को विचार करना चाहिए. इससे 2-3 घंटे बिजली की सप्लाई की जा सकती है. बिजली उत्पादन के क्षेत्र में हमें इससे काफी फायदा हो सकता है. करीब 14 सौ मेगावाट बिजली का उत्पादन हम इसके द्वारा कर सकते हैं. इस बारे में सरकार को सोचना चाहिए.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

सभापति महोदय, एक और बात महत्वपूर्ण है और वह यह कि हम सब माननीय सदस्य जो यहां पर मौजूद हैं, हम सभी का काम है कि हम एक दूसरे को दोष देने के बजाय, हम इस क्षेत्र में अपने सुझाव और मदद दें. क्योंकि हर व्यक्ति एक वाट यदि बिजली का अनावश्यक उपयोग टाले तो उससे हर दिन करीब 13 सौ मेगावाट बिजली की बचत हो सकती है. शासन इस दिशा में पूरी इच्छा शक्ति से काम कर रहा है. बिजली की बचत के बारे में समाज प्रबोधन भी सही ढंग से होना चाहिए. ऐसा करने से भार नियमन की समस्या पर मात की जा सकती है. इस विषय को राजनीतिक विषय बनाने के बजाय, इस बारे में विवेकपूर्ण और अभ्यासपूर्ण दृष्टि से हमें देखना चाहिए. यदि हम सब इस दृष्टि से सोचेंगे तो इस समस्या से हम अपने महाराष्ट्र को उबार सकते हैं, इस समस्या से हम बाहर निकल सकते हैं. इस समस्या से बाहर आना, यह हम सब की कलेक्टिव रिस्पॉन्सिबिलिटी है. मैं ऐसा मानती हूं कि यह समस्या हम सब को अपनी समस्या माननी चाहिए.

मानानीय सभापति महोदय, आज ही मेरे नाम से एक अर्धा तास चर्चा भी है, क्योंकि वह विषय भी बिजली से संबंधित है इसलिए मैं उस अर्धा तास चर्चा में भाग न लेकर इसी समय अपने विचार यहां रखना चाहती हूं मैं परभणी के बारे में कहना चाहूंगी.

श्री नितीन गडकरी : नहीं नहीं, यह विषय परभणी का नहीं है. यह विषय तो पूरे महाराष्ट्र का है. इसलिए आप अर्धा तास चर्चा पर कैसे बोल सकती हैं ?.

प्रा. फौजिया खान : ठीक है. सभापति महोदय, मैं एक जनरल बात कहना चाहूंगी कि अ, ब, क, और ड इन चार कॅटगिरी के अंदर राज्य को बांटा गया है. जहां पर बिजली चोरी कम है और ट्रांसमीशन लॉस कम है उस जगह को ए कॅटगिरी में रखा गया है और जहां पर यह लॉस ज्यादा है उस जगह को डी कॅटगिरी में रखा गया है और शासन का इस बारे में यह धोरण है कि ऐसी जगहों पर लोड शेडिंग भी ज्यादा और विकास के काम में भी उसे पीछे रखेंगे....

(इसके बाद श्री तालेवार के पास)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान.....

सभापति महोदय, परभणी जिले में 48 प्रतिशत विद्युत चोरी तथा बड़े पैमाने पर विद्युत के नुकसान के कारण परभणी जिले को लोड शेडिंग के संदर्भ में "डी" केटेगरी में रखा गया है. मैं एक मुद्दा यहां रखना चाहती हूं कि "डी" केटेगरी में रखने का एक कारण एरिअर्स है.परभणी जिले की तरफ 75 करोड़ रुपये के एरिअर्स है. 75 कोटी के एरिअर्स में से काल्पनिक बकाया 35 करोड़ रुपये है. यानी 50 प्रतिशत फिक्टिशियस एरिअर्स है. इस फिक्टिशियस एरिअर्स को जब केलकुलेट किया जाता है तो एक एक बिल देखना पड़ता होता है. तो इतने सारे बिलों को देखने में कितना अधिक समय लगेगा इसका अंदाजा आप लगा सकते हैं. इसलिए इस संबंध में मेरा यह सुझाव है कि इसके लिए ड्राईव्ह लेना चाहिए. क्योंकि आप एक तरफ बिजली भी दे रहे हैं और बिल भी आ रहा है. लेकिन असल में लोग बिजली का उपयोग नहीं कर रहे हैं. इसलिए इस समस्या को हल करने की जरुरत है.आय.टी.आय. के विद्यार्थियों के द्वारा मीटर रीडिंग का काम किया जा रहा है. मेरा यह सुझाव है कि आय.टी.आय. के 20-25 विद्यार्थियों का एक ग्रूप बनाकर उनको यह ड्राईव्ह का काम सौंपा जाए तो यह समस्या हल हो सकती है.

मैं अंत में यह कहना चाहूंगी कि परभणी में जो लोड शेडिंग हो रही है, उसके कारण वहां के लोगों पर अन्याय हो रहा है. चूंकि इसमें वहां के लोगों का दोष नहीं है. इसलिए परभणी के लोगों के साथ न्याय होना चाहिए,यह कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.धन्यवाद.

.....

इसके बाद श्री गडकरी का भाषण.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. त्यामुळे मी येथे थोडक्यात मुद्दे मांडणार आहे. खरे म्हणजे या विषयावर दोन-तीन वेळा चर्चा झालेली आहे आणि मंत्रीमहोदयांचे उत्तरा दाखल भाषण आपण ऐकलेले आहे. चर्चेमध्ये आम्ही मुद्दे मांडले त्याची उत्तरे मंत्रीमहोदयांनी दिली. आम्ही बोललो आणि त्यांनी उत्तरे दिली यापलिकडे फार काही निष्पन्न झाले नाही. आज महाराष्ट्रामध्ये जवळपास साडेचार हजार मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. नुकताच मी लोकमत या वर्तमानपत्रात एक लेख वाचला. त्यामध्ये असे म्हटले होते की, सहा वर्षामध्ये 0.11टक्के जनरेशन वाढलेले आहे. दरवर्षी विजेची मागणी वाढली आहे, पण जनरेशन काही वाढलेले नाही. जनरेशन वाढविण्याच्या बाबतीत इरादापत्र मागविले. त्या इरादापत्राचे काय झाले ? लॅंड ॲक्वीझिशनचे काय झाले ? पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट झाले काय ? इन्व्हॉर्यमेंट क्लीअरन्स मिळाले का ? त्यांना कोळशाचे ॲलॉमेंटचे झाले का ? अनेक महत्वाचे प्रश्न येथेच अडकून पडले आहेत. खरे म्हणजे जनरेशनकरिता सरकारचे पैसे गुंतविण्याची आवश्यकता नाही. सरकारने ठरविले तर मोठ्या प्रमाणावर भारतीय आणि विदेशी गुंतवणूक येऊ शकते आणि स्पर्धा झाली तर कमीत कमी पैशामध्ये वीज मिळू शकते. याबाबत डिसिजन मेकींग प्रोसेस लक्षात घेता सहा वर्षात फार काही मोठ्या प्रमाणात प्रगती साधता आलेली नाही. ट्रान्समिशन लॉसेस 13 टक्के आहे म्हणजे 2600 कोटी रुपये जातात, विजेची चोरी 16 टक्के आहे म्हणजे 3200 कोटी रुपये जातात. फक्त एक ते दीड टक्का विजेची चोरी कमी झाली असेल. शेतकऱ्यांच्या कृषि पंपाकरिता 10 टक्के वीज म्हणजे जवळपास 2000 कोटी रुपयांची वीज देतो. पण तरीही आपण सगळे खापर शेतकऱ्यांच्या नावावर फोडतो. प्रत्यक्षात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा कारभार ज्या प्रकारे सुरु आहे त्यामुळे मला वाटते की, ट्रान्समिशन अकाऊंटबिली नसेल आणि चोरी थांबत नसेल तर यासाठी नवीन उपायांचा शोध घेतला पाहिजे. कर्मचाऱ्यांनी तयार केलेल्या सोसायट्या किंवा त्यांच्या कंपन्या यानांच जर आपण विजेच्या एका पॉईंटवर वसुली करायला म्हणजे ट्रान्समिशनच्या नंतर त्यांनी वसूल करावी अशी योजना सुरु केली तर त्यास विरोध होणार नाही आणि अकाऊंटीबिलीटी राहील. परंतु या ठिकाणी दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, कोणत्याही प्रकारची अकाऊटीबिलीटी नाही. जे हायड्रो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

इलेक्ट्रीक प्रोजेक्टस आहे त्याचे वन आणि पर्यावरण विभागाकडून क्लिअरन्स करुन घ्यावे जेणेकरुन महाराष्ट्रामध्ये त्या प्रोजेक्टसची जी ताकद आहे त्यामुळे 2500 मेगावॅट वीज वाढविता येईल. मेळघाट परिसरात 800 मेगावॅट वीज जनरेट करता येऊ शकेल. पण वन व पर्यावरण कायद्यामुळे प्रकल्प अडचणीत सापडलेले आहेत. को-जनरेशनच्या बाबतीत एक नवीन धोरण त्या विभागाचे मंत्री श्री.विनय कोरे यांनी जाहीर केलेले आहे. ते यशस्वी झाले तर महाराष्ट्रात विजेची भर होऊ शकते. मी न्युक्लिअर पॉवर बद्दल बोललो होतो. आज अमेरिकेमध्ये पॉवरचा स्त्रोत हा न्युक्लिअर पॉवर आहे. .म्हणून आपल्या देशामध्ये एम.एस.ई.बी.ने न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन बरोबर सहकार्य करुन वीज निर्माण केली पाहिजे कारण आपल्या राज्यात युरेनियम,थेरीयम, हेवी वॉटर याची उपलब्धता आहे. त्यामुळे पुणे, सातारा विशेषत: पश्चिम महाराष्ट्र याठिकाणी आपण न्यूक्लिअर पॉवर मधून वीज निर्माण केली तर आपले ट्रान्समिशन लॉसेस कमी होतील. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि इलेक्ट्रीक रेग्युलेटेड कमिशनच्या अधिकाऱ्यांना आपण चर्चा ऐकायला बोलवावे. ती क्वॉसी ज्युडिशिअल ऑथॉरिटी आहे. ते स्वत:ला ऑटॉनॉमस समजतात. पण येथे शिव्या खाण्याची वेळ आली की त्या तुम्हाला खाव्या लागतात आणि निर्णय घेण्याची वेळ आली की, तुम्हाला त्यांच्या दरवाजात उभे रहावे लागते. अशाप्रकारची ही विसंगती आहे. विजेच्या प्रश्नावर भरपूर घोळ आहे. दोन दिवसांपूर्वी चिटणीस पार्क येथे श्री.दत्ता मेघे यांनी एक कार्यक्रम ठेवला होता. मी आणि उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील एका कार्यक्रमाच्या निमित्ताने एकाच स्टेजवर होतो. जेव्हा उपमुख्यमंत्री बोलण्यासाठी उभे राहिले तेव्हा लोक विजेचे लोडशेडींगबद्दल बोला असे म्हणू लागले.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती कांता नलावडे)

श्री.नितीन गडकरी....

ते गेल्यानंतर माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आले, लोकांनी पुन्हा तेच म्हणणे सुरु केले. सन्माननीय वळसे-पाटील तुम्ही महाराष्ट्रात कोठेही गेलात तरी लोक काही ऐकावयास तयार नाहीत. त्यांचा संताप अनावर झालेला आहे. तुम्ही खरोखरच कल्पक आहात. तुमच्या कल्पनेची दाद द्यावयास हवी. कारण तुम्ही जेव्हा लाईटची गरज नसते तेव्हा व्होल्टेज वाढविता आणि जेव्हा खऱ्या अर्थाने लाईटची गरज असते तेव्हा मात्र व्होल्टेज घालविता. महोदय, मध्यरात्री 12.00 वाजल्यानंतर माननीय वळसे-पाटील व्होल्टेज वाढवितात. रात्री 12.00 नंतर व्होल्टेज वाढवून काय उपयोग आहे ? रात्रौ 10-11 वाजेपर्यंत खऱ्या अर्थाने विजेची गरज असते, परंतु नेमकी त्याचवेळी वीज नसते. यामागे सन्माननीय वळसे-पाटीलसाहेब तुमचे काय धोरण आहे ? हे मला समजत नाही. आज राज्यात कोठेही गेले तरी 16-16 तास भारनियमन केले जात असल्याचे चित्र आहे. जनरेशनच्या बाबतीत मला सातत्याने वाटत होते की, तुम्ही या संदर्भात काही तरी करुन दाखवाल. परंतु दुर्दैवाने तुमच्या हाताला यश आले नाही. जनरेशनच्या बाबतीत उत्तर देतेवेळी परळी, पारस, कोराडी, एन्रॉन, भुसावळ या निरनिराळया ठिकाणी आम्ही अमुक करणार, तमुक करणार आहोत एवढेच तुम्ही सांगणार आहात हे मला चांगले माहीत आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे हे ज्यावेळी ऊर्जा मंत्री होते तेव्हापासून वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांचे मी प्रवचन ऐकत आहे. विजेचा तुटवडा कमी होईल असे केवळ अधिकाऱ्यांनी लिहून दिल्यामुळे तुम्ही त्यावर विश्वास ठेऊ नका. तुम्ही त्या अधिकाऱ्यांच्या केवळ सांगण्यावर विश्वास ठेवला, परंतु त्यांना "टाईम बाऊंड प्रोग्राम" दिला नाही. त्यामुळे ही वीज नेमकी केव्हा येईल याचा भरवसा नसल्यामुळे महाराष्ट्रातील गावागावात वाईट परिस्थिती निर्माण झालेली आहे.

माननीय दिलीप वळसे-पाटील तुमच्या सरकारच्या जनरेटर, कन्व्हर्टर आणि हेल्मेट या तीन उपलब्धी आहेत. या तीन विभागात तुमच्या आघाडीने अभूतपूर्व आणि क्रांतिकारी असे काम केले आहे. त्या तिन्ही उपलब्धींना धंदा मिळवून दिला आहे. काय पॉलिसी आखली आहे तुम्ही ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

या तीन क्षेत्रातील लोकांना आपण मालामाल करुन टाकले. परंतु सामान्य माणसाचे काय दु:ख आहे याचा कधी आपण विचार केला काय ? नवीन वीज पंपाच्या कनेक्शनसाठी माणूस त्रस्त होतो आहे. ज्याच्याकडे विहीर आहे त्या विहिरीला पाणी आहे परंतु वीज नसल्यामुळे त्यांचे पंप बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे त्या शेतकऱ्यांना ऊस, भाजीपाला लावता येत नाही. विकास करावयाचा असेल तर शेती आणि उद्योग याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. उद्योग उभारावयाचे असतील तर वीज, रस्ते, पाणी आणि दळणवळण या गोष्टी उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. शेती विकास करावयाचा झाल्यास त्यासाठी पाणी आणि वीजेच गरज असते.

सभापती महोदय, हे सरकार गुजरातचे मुख्यमंत्री माननीय श्री.नरेंद्र मोदी यांचेवर केवळ टीका करीत असते. परंतु त्याच गुजरात सरकारने मात्र जनरेशन कॅपॅसिटी वाढविली आहे. राजीव गांधी फाऊंडेशनने तर गुजरात सरकारचे कौतुक केले आहे. माननीय श्री.मोदींनी गुजरात राज्याला सर्वच क्षेत्रात पुढे आणले आहे. परंतु त्याच माननीय श्री.मोदीसाहेबांची आपण हेटाळणी केली. आज महाराष्ट्रातील उद्योग गुजरातकडे जात आहे. महाराष्ट्रातील तरुण रोजगाराला मुकत चालला आहे. वीज नसल्यामुळे कारखाने उघडले जात नाहीत. त्यामुळे आपण वीजनिर्मितीसाठी ठोस असा "टाईम बाऊंड प्रोग्राम" देणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, यानंतर आपण उत्तर देणार असलात तरी आपले उत्तराचे भाषण ऐकण्यासाठी मी थांबणार नाही. कारण याच विजेच्या संदर्भातील चार विषयांवरील आपले भाषण मी यापूर्वी ऐकलेले आहे. ज्या भाषणामध्ये उक्ती व कृती यांचा मेळ असतो तेव्हाच भाषणातील विचार ऐकण्यात खरी मजा असते. मला तुमच्याकडून जी अपेक्षा होती, ती अपेक्षा आपण पूर्ण केलेली नाही. मी तुम्हाला सिरिअस समजत होतो. तुम्ही या विजेच्या बाबतीत काहीतरी कराल असे वाटत होते. परंतु जनरेशन, डिस्ट्रीब्युशन आणि ट्रान्समिशन या तिन्हीबाबतीत आपण ठोस निर्णय घेतला नाही. चांगले काम करणाऱ्यांनी लोककांडाचा विचार करावयाचा नसतो. जे मंत्री अधिकाऱ्यांकडे पाहून बोलतात ते काहीच कामाचे नाहीत आणि जे मंत्री अधिकाऱ्यांकडे न बघता निर्णय घेतात तेच कामाचे असतात या मताचा मी आहे.

नंतर श्री.गायकवाड....

अशुद्धीत्र मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ..

अधिकारी मंत्रिमहोदयांना नेहमीच चुकीची माहिती देतात आणि गोत्यात आणतात आणि वयाची.58 वर्षे झाल्या नंतर अधिकारी निवृत्त होतात. मी अनेक एम.एस.ई.बी.चे टेकनिकल डायरेक्टर्स पाहिले आहेत.ते वीज मंडळामध्ये काम करण्यासाठी येतात काही दिवस काम करतात आणि निघून जातात.काही अधिकारी निवृत्त झाल्यानंतर बाहेरच्या कंपन्यामध्ये सल्लागार म्हणून काम करीत असतात. काही अधिकारी टाटा सारख्या चांगल्या कंपन्यामध्ये मोठया पदावर काम करण्यासाठी गेले आहेत.काही अधिकारी मात्र या ठिकाणी काम करीत आहेत. परंतु त्यांचा परफॉर्मन्स मात्र फारसा चांगला नाही.ते अधिकारी फक्त चर्चा करतात ,.फाईल तयार करतात, मंत्रालयात फाईल पाठवितात. त्यानंतर उर्जा सेक्रेटरीं बरोबर बैठक घेतात, सबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करतात, एखादा प्रस्ताव . कॅबिनेटसमोर प्रस्ताव पाठविणे, कॅबिनेटसमोर प्रस्ताव पाठविल्यानंतर त्यांनी पुन्हा तो प्रस्ताव परत पाठविणे. किंवा कॅबिनेटसमोर प्रस्ताव गेला की वित्त विभागाने फाईल अडवून ठेवणे यामध्येच ती फाईल फिरत राहते. जनरेशनच्या बाबतीत मात्र काहीही प्रगती होत नाही. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील,समृध्द आणि संपन्न राज्याने कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी सरकारच्या सौजन्याने या राज्याचा पहिला नंबर केव्हाच मागे टाकला असून आता हे राज्य सहाव्या नंबरवर आलेले आहे.खालच्या सभागृहातील एक सन्माननीय सदस्य येथे कंदील घेऊन आले होते असे मी ऐकले आहे.वास्तविक आपल्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदय दिसल्यानंतर त्यांना कंदीलच दाखवला पाहिजे. लोड शेडीगचे परिणाम काय होत असतात याची कल्पना मुंबईत राहणा-या लोकांना नाही.मुंबईमध्ये लोडशेडीग नाही. या ठिकाणी टाटा आणि रिलायन्स कंपनीची वीज मिळते. इतर जिल्हयामध्ये मात्र 16 तास लोड शेडीग आहे. माझ्यासाठी मी एक जनरेटर विकत घेतला आहे.खेडयापाडयात आपण गेलो तर तेथे याही पेक्षा वाईट स्थिती आहे.तेथे 18 तास लोडशेडीग आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेन्द्र कवाडे बसलेले आहेत त्यांना आपण याबाबतीत विचारावे.भंडारा चन्द्रपूर गडचिरोली या भागात किती तास लोड शेडीग आहे याची माहिती त्यांच्याकडून आपण घ्यावी.या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव देशमुख उपस्थित आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या लातूर जिल्हयामध्ये किती तास लोड शेडीग आहे याची माहिती मत्री महोदयांना द्यावी .त्याचबरोबर या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी उपस्थित आहेत त्यांच्या कोकणामध्ये किती तास लोड

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेडीग आहे याची माहिती त्यांनी मंत्री महोदयांना द्यावी.विजेच्या बाबतीत आज परिस्थिती फार गंभीर बनलेली आहे.महाराष्ट्राचे, महाराष्ट्रातील विद्यार्थ्याचे, युवकाचे आणि बेरोजगाराचे भविष्य माननीय मंत्री श्री.दिलीपराव वळसे पाटील यांच्या सौजन्यामुळे बरबाद झालेले आहे.त्यांच्या शिक्षणामध्ये, करिअरमध्ये रोजगारामध्ये तुम्ही त्यांना लंबे केलेले आहे. आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्याची अनेक कारणे आहेत.परंतु त्या कारणामध्ये तुम्ही सुध्दा हातभार लावला आहे आणि महाराष्ट्रालाग्र एका संकटाच्या ठिकाणी नेऊन ठेवले.तीन वर्षापूर्वी आम्ही शासनाला वारंवार सांगितले होते की, विजेचे जनरेशन सुरु करण्यात यावे. मी आपल्याला असे सुध्दा सांगितले होते की महाराष्ट्रामध्ये 5 हजार मेगॅवॅटस वीज जास्त निर्माण करा .ही वीज विकल्यामुळे त्यातून उत्पन्न आपल्याला मिळू शकेल असे मी तीन वर्षा पूर्वी आपल्याला सागितल्याचे मला चांगले आठवत आहे. कोळशाचे ब्लॉक्स वीज मंडळाला मिळवता येऊ शकतील.त्यासाठी जॉईन्ट व्हेन्चर केले असते तर अधिक कोळसा मिळवता आला असता. तसेच कोळश्याचे ब्लॉक्ससुध्दा मिळाले असते.कोल वॉशरीजच्या बाबतीत आपण मागे सांगितले होते.त्यासबंधीचे टेन्डर बोलावून आता नऊ महिने झालेले आहेत ते टेन्डर अजूनही उघडले नाहीत.तसेच वॉशिग कोलच्या बाबतीत निर्णय सुध्दा घेतलेला नाही.या सगळया परिस्थितीमध्ये आणि परिवर्तनाच्या स्थितीमध्ये शासनाची जी निर्णय प्रक्रिया आहे ती गतीशील नाही त्यामुळे पुढील काळात राज्यामध्ये अंधारच राहणार आहे. या वर्षी 16 तास लोड शेडीग आहे परंतु पुढच्या वर्षी 18 तास लोड शेडीग होईल. त्यानतरच्या काळात तर 24 तासापैकी फक्त दोन तीन तास वीज राहील.इतर वेळी मात्र आम्ही सगळेजण कंदील घेऊन फिरु.मंत्रीमहोदयांना मी सांगतो की, आपण जर राहिला तर पुढच्या वेळी महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे आणि विधानसभेचे पुढच्या अधिवेशनाचे जेव्हा सत्र राहील तेव्हा तुम्हाला असे आदेश काढावे लागतील की प्रत्येक आमदारांनी आपल्या बरोबर टॉर्च किंवा कंदील आणावेत कारण विधान भवनातील लाईट कधीही जातील. त्यामुळे आम्ही या ठिकाणी जेव्हा चर्चा करीत बसू तेव्हा बॅटरीवर माईक चालेल आणि माननीय मंत्री महोदय श्री.दिलीप वळसे पाटील आमच्याजवळील बॅटरीच्या लुकलुकत्या प्रकाशात भाषण देतील आणि आमच्या हातात कंदील आणि बॅटरी असल्यामुळे अधिका-यांना आम्ही सांगू की आता सगळीकडे अंधार असल्यामुळे आमच्या हातात कंदील आहे तेव्हा तुम्ही आमच्या बरोबर चला. नाही तर कोठे तरी अंधारात पडाल. अशा प्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना सांगून आम्ही गाडीत बसून निघून जाऊ.तो काळ तुम्ही आमच्या समोर पुढच्या वेळी आणणार आहात. तुमच्या कार्यकर्तृत्वावर माझा विश्वास आहे .पण ही परिस्थिती बदलण्यासाठी तुम्ही काहीही प्रयत्न केलेले नाहीत.जनरेशन किती वाढले आहे यावरुन तुमचे प्रयत्न आम्हाला दिसून येतील.एनरॉनचा घोळ संपत आला असून ते सुरु होईल असे सांगण्यात येते. परंतु हा प्रकल्प केव्हा चालू होईल हे माहीत नाही. मी तीन साडे तीन वर्षापूर्वी विरोधी पक्षात असतांनासुध्दा माननीय मंत्री महोदयांना व्यक्तिश: भेटून सांगितले होते. त्याचबरोबर माननीय मंत्री श्री.जयंतराव पाटील यांना व्यक्तिश: भेटून सांगितले होते.की, आपण राजकारण बाजूला ठेवून एनरॉनच्या बाबतीत निगोशिएट करा आणि एनरॉनचा प्रकल्प सुरु करावा. कारण महाराष्ट्र आज फार संकटात सापडलेला आहे परंतु त्याप्रमाणे प्रत्यक्षात काहीही केलेले नाही.सगळया गोष्टी परत येऊ शकतात. परंतु गेलेला काळ परत आणता येत नाही.तुमच्याकडे असलेली संपत्ती गेली तर पुन्हा मिळवता येईल. एखादी गोष्ट गमावली असेल तर ती पुन्हा मिळवता येईल. घर,बंगला गमावला असेल तर पैसे मिळवून या गोष्टी पुन्हा मिळवता येतील. स्मृती गेली असेल तर औषधोपचार करुन ती सुध्दा मिळवता येईल

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

परंतु गेलेला काळ मात्र केव्हाही परत येत नाही आणि महाराष्ट्राला अंध:कारात टाकून पुढील 5-6 वर्षांचा काळ आहे त्यामध्ये महाराष्ट्रातील औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील प्रगतीचा एंड हा एक प्रकारे तुम्ही बंद केलेला आहे. मी आपले गेली तीन वर्षे ऐकले आहे. मी असे कधीही बोलत नाही, आणि तुमच्या बोलण्यावर माझा बराच विश्वास होता पण तो दरवर्षी कमी कमी होत गेला आणि या वर्षी तर उरला सुरला सगळा विश्वास उडाला आहे. तुम्ही येथे काय भाषण देणार आहात हे मला माहीत आहे. त्यामुळे तुमच्या भाषणाचा आणि प्रत्यक्ष कृतीचा जो काही विचार मी केला त्यामध्ये मला काहीच आढळले नाही. मला एकदा वाटले की, आज या विषयावर येथे बोलावे की बोलू नये. आज मला खरोखरी या विषयावर बोलण्याचा अतिशय कंटाळा आला होता. सभापती महोदया, आज एक गोष्ट मी पक्की करीन की, आज मी या सभागृहात या विषयावर मी बोलतो आहे पण पुढील वर्षी येणाऱ्या कोणत्याही अधिवेशनामध्ये मी या विषयावर या सभागृहामध्ये बोलणार नाही. कारण बोलून काही उपयोग नाही. नुसता शब्दच्छल करून आणि भाषणे ऐकून काही उपयोग नाही. त्यातून काहीही प्रगती आणि विकास होत नाही आणि कोठलीही गोष्ट सुधारण्याच्या पलिकडे जाते आहे. पण आज मात्र मला वाटले की, या विषयावर येथे बोलावे. कारण मला वाटले की, एकदा हेही सांगितले पाहिजे. आपण ज्या माणसावर विश्वास ठेवला, ज्याच्याकडून आपल्याला अपेक्षा होत्या, त्यातील राजकारण सोडून द्या, मला व्यक्तीगत तुमच्याबद्दल वाटत होतं की, तुम्ही यातून काही तरी मार्ग काढाल. पण आजची त्याची भयानक अवस्था बघून तुमच्यावरचा उरला सुरला विश्वास देखील उडाला आहे. म्हणून मी तुमचे उत्तर ऐकण्यास येथे थांबणार नाही. वास्तविक ही प्रथा आहे की, तुमचे, मंत्र्यांचे, उत्तर ऐकले पाहिजे. आपण आपल्या भाषणातून माझ्यावर टीका केली तरी हरकत नाही. पण आज माझ्या एका व्यक्ति/गत मित्राने माझी जी निराशा केलेली आहे, ज्याच्याकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या त्याने निराशा केली आहे, त्याच्या निषेधार्थ आज मी तुमचे भाषण ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही. तेव्हा मी कमीत कमी आता परमेश्वराजवळच प्रार्थना करतो की, तुम्हाला परमेश्वराने सुबुद्धी द्यावी आणि महाराष्ट्रातील या लोड शेडींग मधून काही मार्ग काढावा. कारण आता माझा तुमच्यावरील विश्वासही उडाला आहे आणि जेव्हा सगळ्यांवरील विश्वास माणसाचा उडतो तेव्हा तो देव तरी मदतीला धावेल असे त्याला वाटते व

.....5एस 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

म्हणून तो त्यालाच गाऱ्हाणे घालतो. त्याप्रमाणे मी त्याला विनंती करतो की, त्याने तुम्हाला सुबुद्धी द्यावी. काही घडले तर करा, नाही तर लाथा खायचे काम तुम्हाला-आम्हाला मिळून लोकांमध्ये करावे लागणार आहे. त्याला काही ईलाज नाही. धन्यवाद.

****

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदया, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महात्मा गांधीनी सांगितले होते की, ग्रामविकास झाला पाहिजे आणि पं. नेहरूंनी सांगितले की, औद्योगिक क्रांती झाली पाहिजे. त्या दिशेने आपण वाटचाल तर करून राहिलो होतो. पण आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, मागील वर्षी 2500 मे.वॅ. वीजेची गरज आपल्याला होती पण आज आमची वीजेची गरज 3500 मे.वॅ. वर जाऊन पोहोचली आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर महाराष्ट्राचे चित्र भयानक आणि भेसूर असे निर्माण होईल. मला वाटते गेल्या 10 वर्षात काय झाले आणि काय झाले नाही याकडे दुर्लक्ष करावे. पण अशी वेळ आलेली आहे की, शेतकऱ्यांच्या पंपांना वीज नाही. लोड शेडींग फार वाढून गेले आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी त्याचा फार त्रास होतो. ग्रामीण भागामध्ये तर कहर झालेला आहे आणि आता शेतामध्ये जो गहू आहे त्याच्यासाठी देखील पाणी नाही कारण वीज पंप चालू नाही. त्यामुळे तेही पीक जाईल. या अगोदर निसर्गाच्या लहरीपणामुळे आमच्या महाराष्ट्रात फारच जास्त पाऊस झाला, सारी पिके वाहून गेली. सोयाबिन झालेले नाहीत, पराटी झाली नाही. अशा परिस्थितीत भंडारामध्ये अतिवृष्टी मुळे तेथील धान वाहून गेले. पण तरीही असे वाटत होते की, आमचे ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील हे काही तरी करतील आणि अजूनही आमचा त्यांचेवर विश्वास आहे की, ते निश्चितच यामध्ये काही तरी करतील. आता शेतकऱ्यांचा मेळावा झाला त्यामध्ये केंद्रीय राज्यमंत्री, अपारंपारिक ऊर्जा मंत्री श्री. विलास मुत्तेमवार यांनी सांगितले की, अपारंपारिक ऊर्जेचे फार मोठे प्रकल्प आणण्याच्यामार्गावर आम्ही आहोत. तेव्हा या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, आपण त्यांच्याशी संपर्क साधून त्यांचेबरोबर एखाद दोन बैठका लावून लौकरात लौकर या बाबतीत काय करता येईल ते पहावे. तसेच सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी जाहीर केले की, ऊसाच्या चिपाडापासून साखर कारखान्यांनी स्वत: वीज निर्माण करावी, आज त्याचीही मोठी गरज आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे ....5टी 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

सभापती महोदया, या चर्चेमध्ये सन्माननीय आमदारांनी अनेक मुद्दे मांडले असल्यामुळे तेच मुद्दे पुन्हा मांडण्याची मला आवश्यकता वाटत नाही. म्हणून मी आपणास विनंती करतो की, महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात वीजेची चोरी होत आहे. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर याठिकाणी मोठे ठेकेदार कोळसा वाहून नेतात. तो कोळसा वाहून नेणारी जी मशिनरी आहे त्यांचे फार मोठे चॅनेल आहे. आज भिवंडी व ठाण्यामध्ये मोठया प्रमाणात वीजेची चोरी होत आहे. ही चोरी पकडण्यासाठी वीज मंडळाकडून जी कारवाई केली जाते ती अतिशय कमी दर्जाची आहे असे मला वाटते. ही औद्योगिक क्रांती झाल्याशिवाय महाराष्ट्र वाचू शकणार नाही, तो खड्डयामध्ये जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून विधानसभा आणि विधान परिषदेतील सर्व आमदारांचे चॅलेज माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी स्वीकारावे. आणि सांगावे की, आम्ही केंद्र सरकारकडून वीज घेऊ, इतर राज्यांकडून वीज घेऊ. आणि पुढील अधिवेशनापर्यंत राज्यातील लोड शेडींग कमी करु. असे भक्कमपणे, ठामपणे आम्हाला सांगावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये वीज मंडळाच्या ठरावावर चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये अनेक माननीय सदस्यांनी सविस्तर मुद्दे उपस्थित केले आहेत. खरे तर गेल्या 15 दिवसापासून आपण नागपूर शहरामध्ये असल्यामुळे आपल्याला अंधार काय आहे हे माहीत नाही. आणि हे अधिवेशन संपल्यानंतर नेहमीप्रमाणे लोड शेडींग सुरु होणार आहे. आणि त्याची तीव्रता आम्हाला जाणवणार आहे. मी या प्रसंगी मंत्रिमहोदयांना विनंती करण्यासाठी उभा आहे. आज ग्रामीण भागामध्ये 12 ते 14 तास वीजेचे लोड शेडींग चालू आहे. खरे तर हे अधिवेशन शेतकऱ्यांच्या आत्महत्तेवर जास्त गाजले आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्त्या करण्यामागील कारणांचा आपण शोध घेतला तर आज त्यांच्याजवळ दुसरा कोणताही मार्ग शिल्लक नाही. त्याच्याकडे पाणी भरपूर आहे, परंतु वीजेअभावी तो आपल्या शेतीला पाणी देऊ शकत नाही. आज ग्रामीण भागात दोन दिवस झीरो लोड शेडींग आहे. मागील अधिवेशनामध्ये देखील यावर चर्चा झाली त्यावेळी सांगण्यात आले होते की, यामध्ये सुधारणा केली पाहिजे. आज ग्रामीण भागामध्ये इंजिनिअर, लाईनमन हे त्यांना नेमून देण्यात आलेल्या स्पॉटच्या ठिकाणी उपस्थित नसतात. त्यामुळे त्याठिकाणी बसविलेले ट्रॉन्सफॉर्मर जळतात. आणि जळलेले ट्रॉन्सफॉर्मर एकेक महिना बसविले जात नाहीत.महिनाभर ट्रान्सफॉर्मर न बसविल्यामुळे ग्रामीण भागतील जनतेचा उद्रेक होतो. आणि त्यामुळे आपल्या कार्यालयावर मोर्चा नेऊन कार्यालयाची तोडफोड केली जाते, अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासण्याचे प्रकार होतात. तेव्हा यामागील खरे कारण म्हणजे आपल्या अधिकाऱ्यांचा दोष आहे. शेतकरी त्रस्त झाला आहे, त्याच्या कापसाच्या पिकावर लाल्या रोग पडला. त्याचे पिक कमी येण्याचे कारण म्हणजे त्या पिकाला शेवटचे पाणी दिले पाहिजे ते वीज नसल्यामुळे दिले जाऊ शकत नाही. आज ज्वारी, हरभरा या रब्बीच्या पिकाला पाण्याची आवश्यकता असते. सकाळी 7 वाजल्यापासून रात्री 7 वाजेपर्यंत दिवसभर वीज नसल्यामुळे आणि रात्रीच्या वेळी मेंटेनन्सकरिता लाईट बंद ठेवली जात असल्यामुळे ग्रामीण भागामध्ये भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया . . . .

मी ग्रामीण भागात रहात असल्यामुळे मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे.सध्या आपण सिंगल फेजचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याची ग्रामीण भागामध्ये ताबडतोब अंमलबजावणी झाली तर ग्रामीण भागात जो अंधार झाला आहे, तेथे थोडासा प्रकाश मिळू शकेल. दुसरा प्रश्न शेतीसंबंधात आहे. यासाठी आपल्याला विनंती राहील की, या ठिकाणी विजेच्या चोरीला आळा बसविणे गरजेचे आहे. बऱ्याच ठिकाणी जास्त लोडमुळे ट्रान्सफॉर्मर फेल होतात आणि त्यानंतर एकेक महिना नवीन ट्रान्सफॉर्मर बसविले जात नाहीत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी अडचणीत आला आहे. दुसरे म्हणजे जो व्यापारी वर्ग आहे, जे छोटे-छोटे व्यापारी आहेत, त्यांच्या उद्योग धंद्यावरही परिणाम झालेला आहे. जिनिंग-प्रेसिंगच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. एकाधिकार योजनेमध्ये कोणी कापूस देत नाही आणि आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेशमधून लोक कापूस खरेदीसाठी येथे येतात. पण सध्या येथील जिनिंग-प्रेसिंग बंद असल्यामुळे आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेशमधील लोक कापूस खरेंदी करीत नाही. या ठिकाणी लोड शेडींगमुळे वीज उपलब्ध होत नसल्याने कारखानदारी बंद पडली आहे. म्हणून यामध्ये काही ना काही ठोस निर्णय होऊन आपल्याला लोड शेडींगमधून कसे बाहेर पडता येईल यासाठी काही चांगल्या उपाययोजना कराव्यात एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

. . . .5यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने वीज प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी जी चर्चा घडवून आणली आहे, त्याबद्दल मी सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला नाही. परंतु ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला, त्यांनी अतिशय मनापासून, जबाबदारीने, सभापती महोदया, आपल्यासहित, सगळयांनी वीज मंडळाकडून आणि ऊर्जा विभागाकडून निश्चित कार्यक्रमाची अपेक्षा केलेली आहे, मी आपल्या सर्वांचे मनापासून आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी आपले विचार येथे मांडले. माणसाच्या जीवनात अनेक दु:खे असतात. पण त्यामध्ये अपेक्षाभंगाचे दु:ख सर्वात तीव्र असते. त्यांनी माझ्याकडून काही अपेक्षा केलेल्या होत्या आणि त्या अपेक्षा मी पूर्ण करु शकलो नाही म्हणून त्यांच्या मनात एक मित्र म्हणून दु:ख असणे स्वाभाविक आहे. मी त्याबद्दल त्यांना दोष देणार नाही. परंतु आपल्याला सर्वांना आठवत असेल की, या राज्यामध्ये 1995 ते 1999 पर्यंत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेचे सरकार होते. 1999 नंतर मधल्या टर्ममध्ये या राज्यात आम्ही काम करीत होतो. त्यानंतर निवडणुका झाल्यावर पुन्हा एकदा जनतेने आम्हाला संधी दिली म्हणून राज्यात दुसऱ्या वेळी आमचे सरकार आले. विजेच्या प्रश्नाकडे पहात असताना, या देशामध्ये जेव्हा एन.डी.ए.चे सरकार होते, तेव्हा ऊर्जा मंत्री म्हणून किंवा एक आमदार म्हणून मागच्या टर्ममध्ये कधीही माझ्याकडून केंद्र शासन महाराष्ट्र शासनाची अडवणूक करीत आहे अशी भूमिका घेतली गेलेली नाही. तुम्ही माझे अशा प्रकारचे एखादे तरी स्टेटमेंट वर्तमानपत्रात आल्याचे दाखवून द्यावे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

सन्माननीय श्री.राम नाईक, श्री.अनंत गिते हे केंद्रामध्ये मंत्री होते. त्यांच्याही काही मर्यादा होत्या, तशाच राज्याच्याही मर्यादा आहेत. त्या मर्यादा समजून घेऊन राजकारण करण्याची भूमिका माझ्यासारख्याकडून केली गेली. आज राज्यामध्ये वीज कमी आहे. लोड शेडींग करावे लागते. 4 हजार मे.वॅ. विजेचा तुटवडा जाणवतो. गेल्या 11 वर्षामध्ये एकसुध्दा मे.वॅ वीज राज्यात निर्माण झालेली नाही. हे मी अनेकवेळा सभागृहात आणि सभागृहाबाहेरही सांगितलेले आहे. 11 वर्षातील 5 वर्षे तुमचे सरकार होते, त्यानंतर पाच वर्षे आमचे सरकार आले, त्यानंतर निवडणुका झाल्यानंतर एक वर्षे झाले आमचे सरकार निवडून आले. परंतु एकही मे.वॅ.वीज निर्माण झाली नाही. यामध्ये गावे वाढली की नाही, घरे वाढली की नाही, विजेचा वापर वाढला की नाही ? शहरे वाढली, गावे वाढली, विजेचा वापर वाढला, कृषी पंप वाढले, उद्योग वाढले. परंतु वीज निर्माण झाली नाही. हा दोष खात्याचा मंत्री म्हणून जरुर माझ्याकडे जात असेल किंवा सरकारकडे जात असेल. परंतु या क्षेत्रातील मर्यादासुध्दा आपण सगळ्यांनी समजून घेतल्या पाहिजेत. आज विजेच्याबाबतीत देशामध्ये काय परिस्थिती आहे ? आज भारत देशामध्ये 1 लाख मे.वॅ. विजेचा तुटवडा आहे. त्यापैकी महाराष्ट्र राज्याचा वाटा 4 हजार मे.वॅ.च्या आसपास आहे. सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी या संबंधाने गुजरातच्या मोदी सरकारने चांगले काम केले, त्यांचे अभिनंदन केले पाहिजे असे सांगितले. त्यांचे जरुर अभिनंदन करु. मागच्या आठवड्यात कामकाज संपल्यानंतर मी गुजरातमध्ये गेलो. तेथील ऊर्जामंत्र्यांना भेटून त्यांच्याशी चर्चा केली. महाराष्ट्रामध्ये विजेची टंचाई आहे, तेव्हा तुम्ही तुमच्या राज्यात काय करता असे त्यांना विचारले. त्यांनी सांगितले की, सगळे फिडर सेपरेट केलेले आहेत. शेतीचे सगळे पंप एका फिडरवर आणलेले आहेत, गावातील ग्राहक एका फिडरवर आणलेले आहेत. हे गेल्या तीन वर्षामध्ये काम केले असल्याचे सांगण्यात आले. त्यांना नवीन वीज निर्माण करता आलेली नाही. आज गुजरातमध्येसुध्दा 400 मे.वॅ.च्या आसपास लोडशेडींग होते. त्यांनी गुजरातमधील शेतकऱ्यांना देखील 8 तासापेक्षा जास्त वीज द्यायची नाही, असा निर्णय केलेला आहे. मी सरकारला दोष देणार नाही. त्यांच्याही मर्यादा आहेत. आज नवीन प्रकल्प सुरु करायचा म्हटला तर त्यामध्ये गेस्टेशन पिरिअड असेल. तसेच पर्यावरणाचा क्लिरन्स, फायनान्शिअल टायअप या सर्व गोष्टी येतात. मशिनरीची ऑर्डर दिलेली आहे. चार वर्षानंतर विजेच्या क्षेत्रातील एखादा प्रकल्प हातामध्ये घेण्याचा विचार आपण करतो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु.....

त्यावेळेला त्यामधील टेक्निकल, फायनान्शियल, इंधनाच्या संबंधातील अडचणी असतात. पर्यावरणाच्या संबंधातील प्रश्न सोडवत असताना, अनेक वेळेला कोळसा मिळवायचा असेल तर अडचणी येतात. आज गॅस कोठेच नाही. जगामध्ये देखील गॅसच्या संबंधात अडचण निर्माण झालेली आहे. परवाच केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय ऊर्जा सचिव कतारला गेले होते. एवढया वरच्या लेवलवरुन प्रयत्न केला गेला. त्यांनाही काही मर्यादा आहेत. जागतिक पातळीवरील गॅसचा भाव 6 डॉलर, 8 डॉलर, 9 डॉलर, 10 डॉलरपर्यन्त जाऊ शकतों. अशा प्रकारची परिस्थिती गॅसच्या संबंधात आहे. मला येथे रडगाणे सांगायचे नाही. I am not a confused person. मी फक्त भाषण करत नाही. माझ्याजवळ संपूर्ण राज्याच्या वीज क्षेत्राची योजना तयार आहे...

यानंतर कु.थोरात....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

ती योजना मी सभागृहामध्ये मांडली, ती योजना मी बाहेर मांडली. जेथे जेथे अडचणी आल्या तेथे तेथे त्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या संदर्भातील प्रयत्न केलेला आहे. आपल्या राज्यामध्ये पावसाळयामध्ये नोव्हेंबर महिन्यापर्यंत साधारणपणे 12,000 मेगॅवॅटच्या आसपास विजेची मागणी असते. आपणच सांगितले अतिवृष्टी झाली. आपल्याला सगळयांना माहीत आहे की, मुंबईत अतिवृष्टी झाली. पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. मराठवाडयात अतिवृष्टी झाली. विदर्भात अतिवृष्टी झाली. आज महाराष्ट्रात कुठेही गेलात तर पाण्याचे साठेच्या साठे आपल्याला बघायला मिळतात. साहजिकपणाने शेतक-यांना असे वाटते की, पाणी आहे तर मला पीक घेता आले पाहिजे, त्यासाठी मला वीज मिळाली पाहिजे. मागच्या महिन्यात ज्यावेळेला आपण मोठया प्रमाणात झिरो लोडशेडिंगला सामोरे गेलो त्यावेळेला महाराष्ट्राची मागणी कधीही पोहचली नव्हती इतक्या अत्युच्च 15000 मेगॅवॅटपर्यंत जाऊन पोहचली होती. एका बाजूला मागणी वाढली आणि दुस-या बाजूला चंद्रपूरचे दोन सेट, नाशिकचा एक सेट, केंद्र सरकारचा एन.टी.पी.सी.चा कोरबाचा एक सेट आणि तारापूरचा एक सेट बंद पडला आणि आपल्याला नेमकी जेवढी वीज उपलब्ध व्हायला पाहिजे होती तेवढी वीज उपलब्ध झाली नाही. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला झिरो लोडशेडिंग मोठया प्रमाणात करावयाला लागले. आपण जी भूमिका मांडली त्याप्रमाणे काही गावांमध्ये लोकांना तासन्तास हाल सहन करावे लागले, ही वस्तुस्थिती आहे. ही परिस्थिती एका रात्रीत निर्माण झालेली नाही. ती परिस्थिती सेनाभाजपने निर्माण केली की, कॉन्ग्रेस-राष्ट्रवादीने निर्माण केली या बद्दल मी कोणाला दोष देणार नाही. पण 11 वर्षामध्ये या राज्यामध्ये वीज निर्माण झाली नाही, हे कटू सत्य असेल, तर मग त्याचे कारण काहीही असेल. मग दाभोळची येणारी वीज हे एक कारण असेल. आपल्याही राज्यामध्ये या वीजनिर्मती क्षेत्रात गुंतवणूक झाली नाही, याबद्दल मी कधी बोललो नाही आणि या पुढच्या कालावधीमध्ये सुध्दा बोलणार नाही. पण या क्षेत्रातील आपल्या ज्या सगळया मर्यादा आहेत. त्यामध्ये गॅसची मर्यादा आजही आहे. युती शासनाचे राज्य होते तेव्हाही गॅस मिळत नव्हता. आज आपली क्षमता असतांना सुध्दा उरणची 850-852 मेगावॅटची विद्युत निर्माण करण्याची कॅपॅसिटी असली तरी सुध्दा 400 ते 450 च्या वर कधी वीज निर्माण करु शकत नाही. केंद्राच्या ग्रीडमधून त्या ठिकाणी सप्लाय होतो. सगळया बाजूने अडचणी आलेल्या असतांना हे भार नियमन कमी करण्यासाठी काही प्रयत्न केले की नाही? होय, शासनाने प्रयत्न केले. मी आपल्याला सांगतो,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

दोन्ही बाजूने आपल्याला बोलून चालणार नाही. एका बाजूला राज्यामध्ये वीज पाहिजे की नको या संदर्भात चर्चा करु या आणि दुस-या बाजूला वीज मंडळ आणि राज्य सरकारने महागडया दराने वीज खरेदी केल्यामुळे राज्य सरकारचे आणि वीज मंडळाचे कंबरडे मोडेल काय? याची पण आपण चर्चा करु या. कुठल्या मार्गाने नक्की जायचे हे या सभागृहाने एकदा सांगितले पाहिजे. एक तर आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करावा किंवा दुस-या बाजूने आम्हाला वीज देण्याचा प्रयत्न करावा. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गुजरातमध्ये कावास आणि गांधार नावाचे वीज निर्मिती करणारे यूनिट आहे. तेथे 500 मेगावॅट वीज निर्माण होऊ शकते. त्याच्यामध्ये महाराष्ट्राचा आणि गुजरातचा वाटा आहे. गुजरात 400 मेगावॅटचे लोडशेडिंग त्यांच्या राज्यामध्ये करते पण कावास-गांधार येथील वीज निर्मिती केंद्राकडून एक युनिट सुध्दा वीज ते घेत नाहीत. ते कां घेत नाहीत ? कारण जवळपास साडे सात रुपये प्रति युनिट इतका त्या ठिकाणी दर पडतो. त्या ठिकाणी नाफ्थ्यावर वीज निर्माण केली जाते. या राज्यातील आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेतल्या नंतर राज्य मंत्रिमंडळाकडे आम्ही हा विषय नेला. राज्य मंत्रिमंडळाने या संबंधीचा निर्णय असा घेतला की, भलेही महाग वीज मिळणार असेल, ती सात रुपये पर युनिट या दराने खरेदी करावी लागणार असेल अथवा साडे सात रुपये पर युनिटन या दराने खरेदी करावी लागणार असेल, ती वीज खरेदी करावी. त्यासाठी वीज मंडळाला जर काही नुकसान सहन करावे लागणार असेल तर ते नुकसान राज्याच्या तिजोरीतून भरुन द्यायला शासन तयार आहे. अशा प्रकारचा मंत्री मंडळाचा निर्णय झाला. कावासची वीज विकत घेणे आपल्याला महाग पडणार आहे. तरीही या वीज खरेदीच्या पोटी त्या वीज कंपनीला दर महिन्याला जवळपास 100 कोटी रुपये पुढचे तीन महिने देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

यानंतर श्री. खर्चे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

विजेची चोरी पकडण्याचा प्रयत्न केला की नाही यासंदर्भात देखील विचारणा करण्यात आली. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, वीज मंडळाची पुनर्रचना झाल्यानंतर साधारणत: चारच महिन्यात 20 हजार चोरीची प्रकरणे पकडण्याचा प्रयत्न केला. एका बाजूला दुसरे कार्यक्रम हातामध्ये घेतले त्याच वेळी सिंगल फेजिंगचाही कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे व त्यासाठी राज्याच्या तिजोरीतून 500 कोटी रुपये वीज मंडळाला देण्याचे ठरविले. वीज मंडळाला हे 500 कोटी रुपयाचे कर्ज काढण्याबाबत सांगितले आणि त्यापोटी आपल्या मार्चच्या बजेटमध्ये वीज मंडळाला 100 कोटी रुपये आपण दिलेले आहेत. तसेच फिडर सेप्रेशनचा कार्यक्रम देखील आपल्या शासनाने हातामध्ये घेतला असून या राज्यात दोन वर्षात ज्याप्रमाणे गुजरातने जे काम केले त्याच धर्तीवर आपण देखील ॲग्रीकल्चर आणि इंडस्ट्रीअल क्षेत्रासाठी हा कार्यक्रम घेतला आहे व त्याची बऱ्यापैकी आपल्याला मदत मिळणार आहे. वीज बचतीच्या संदर्भात देखील काही कार्यक्रम आपण हातात घेतले आहेत. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी अशी भूमिका घेतली की, वीज टंचाईसारख्या अडचणीत आपले राज्य असतांना लोकांमध्ये जागृती कराण्याचा कार्यक्रम देखील शासनाने हाती घेतला पाहिजे. परंतु मी असे सांगू इच्छितो की, याच भागाचे उदाहरण म्हणून सांगावयाचे झाले तर दररोज सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्य जात असतील त्यांना सकाळी 7.30 वाजेपर्यंत सुध्दा सरकारी कार्यालयांसमोर सर्व दिवे जळत असल्याचे दिसून येईल. या संदर्भात लोकप्रतिनिधी म्हणून आपणही का दखल घेत नाही ? शासकीय अधिकारी का दखल घेऊ शकत नाही ? अशा प्रकारे आपण समजून घेण्याचा हा प्रश्न आहे. कारण आज संपूर्ण राज्य विजेच्या संकटात असतांना, विजेची नव्याने निर्मिती नसतांना अशा अडचणी आपल्या सर्वांच्या लक्षात येत नसतील तर निश्चितपणे प्रयत्न सर्वांनीच करायला पाहिजे. डिझेल संचाच्या माध्यमातून आज राज्याची जी कॅपॅसिटी आहे ती सुध्दा वापरली जात नाही.

तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे) : नामदार मंत्री महोदयांनी जरा थांबावे. माननीय कामगार मंत्र्यांना एक प्रस्ताव मांडावयाचा आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कामगार संघांना मान्यता देण्याबाबत.

मु.शी.: सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 78-महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा, विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती.

तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे) : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवती.

सचिव : महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम 129 व 198 (2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश दिला आहे.

सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 78-महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2005 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 17 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : अध्यक्ष महाराज, दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 78-महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2005 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 17 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : अध्यक्ष महाराज, विधानसभेने नियुक्त करावयाच्या प्रस्तावित संयुक्त समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सन 2005 चे विधानसभा विधेयक क्र. 78-महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, 2005 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 17 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे आणि या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत :-

श्री. जितेंद्र आव्हाड, वि.व.स.

श्री. रामदास तडस, वि.व.स.

श्री. संजय दत्त, वि.व.स.

श्री. अनंत तरे, वि.व.स.

श्री. प्रकाश शेंडगे, वि.व.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यात असलेला विजेचे तुटवडा व त्यामुळे होत असलेले 12 ते 14 तासांचे भारनियमन.

मु.शी. : राज्यात असलेला विजेचे तुटवडा व त्यामुळे होत असलेले 12 ते 14 तासांचे भारनियमन याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री अशोक मोडक, दीपक सावंत, मधुकर चव्हाण, अनिल परब, अरविंद सावंत यांचा प्रस्ताव.

चर्चा पुढे सुरु....

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महादया, मी सांगत होतो की, राज्यातील मोठया उद्योजकांकडे जे जनरेटर सेटस् आहेत त्यातून 600 मेगावॅट वीज तयार होऊ शकते. अनेक उद्योजकांकडे जनरेटर सेट आहेत परंतु ते जनरेटर सेल चालवत नाही. कारण जनरेटरव वीज तयार केली तर ती वीज एक युनिटला दहा रुपये या दराने पडत असते. वीज मंडळाची वीज चार रुपये प्रती युनिटने पडत असल्यामुळे अधिकचे सहा रुपये घालण्यास ते तयार नाहीत. परंतु या कारखानदारांनी आपले जनरेटर सेट चालू करुन निर्माण होणारी वीज स्वत:च्या कारखान्यासाठी जरी वापरली तरी सुध्दा लोडशेडींगच्या प्रमाणावर त्याचा परिणाम पडू शकेल. राज्यात वीज कमी असल्यामुळे कारखानदारांकडे जे जनरेटर सेट आहेत ते चालू करुन त्याचे बर्डन सुध्दा स्वत:वर उचलण्याची तयारी केलेली आहे. कृषी पंपाच्या संदर्भात 1.70 लाख पेडपेंडींग कनेक्शन्स आहेत. यामध्ये 94 हजारचा टेस्ट रिपोर्ट आलेला आहे. नोव्हेंबर महिन्यापर्यंत इश्यू केलेल्या कनेक्शनची संख्या 42 हजार असून कनेक्शन द्यायची संख्या 1.27 लक्ष आहे. यामध्ये टोटल उद्दिष्ट आपण एक लाखाचे ठेवलेले आहे. आजच्या स्थितीत जास्तीची वीज तयार होत नाही असे असतांना एक कनेक्शन द्यावयाचे झाले तर वीज मंडळाला प्रत्येक कनेक्शन मागे 52 हजार रुपये खर्च येतो. एका बाजूला अधिकची वीज तयार होत नाही दुस-या बाजूला ट्रान्समिशन लाईन्स वाढणार नाही तर तिस-या बाजूला सबस्टेशन तयार होणार नाही अशा वेळेस अजून नवीन कनेक्शन्स दिली तर त्याचा लोड ट्रान्सफॉर्मवर येईल व पर्यायाने ट्रान्सफॉर्मर्स जळतील व त्यामुळे आता जी वीज मिळते त्या पेक्षाही कमी वीज मिळू शकेल. यावर पुन्हा चर्चा सुरु होईल. डार्क वॉटर सेटच्या संदर्भात महाराष्ट्रात एक नवीन प्रश्न निर्माण झालेला आहे. गुजरातचे ऊर्जामंत्री श्री. सौरभभाई पटेल यांची मुंबईमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

30 तारखेला भेट ठेवलेली आहे. विजेच्या संदर्भात गुजरात आणि महाराष्ट्र शासन एकत्र प्रयत्न करणार आहोत. गुजरातच्या ऊर्जामंत्र्यांनी सांगितले की, आम्ही आमच्या शेतक-यांना 8 तास वीज उपलब्ध करुन देतो याच्या पाठीमागे विजेचे शॉर्टेज हें एकमेव कारण नाही तर पृथ्वीच्या पोटातील पाणी किती उपसावयाचे याच्या संदर्भातील काहीना काही विचार आज राज्यांनी करावयास पाहिजे त्यामुळे आपल्या राज्याने जाणीवपूर्वक ही भूमिका घेतली आहे की, शेतक-याला जेवढी वीज पाहिजे तेवढी वीज आम्ही देऊ. आपण आपल्या शेतक-यांना 12 तास वीज उपलब्ध करुन देत असते. मधल्या काळात आपल्याकडे वीजेची टंचाई आली होती परंतु आता गेल्या चार दिवसापासून झीरो लोडशेडींग किंवा एचव्ही करावे लागले नाही. एखाद्या परिसरात स्थानिक पातळीवर फॉल्ट निर्माण झाल्यामुळे वीज मिळू शकली नसेल. अनेक वर्षापासून ट्रान्समिशन लाईन्समध्ये गुंतवणूक झालेली नाही आणि डिस्ट्रीब्यूशमध्ये सुध्दा गुंतवणूक झालेली नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी उपसभापती)

श्री.दिलीप वळसे पाटील...

त्याचा परिणाम सगळयांना सहन करावा लागत आहे. सरकारने भार उचलेला नाही, गुंतवणूक केलेली नाही लोकशाही आघाडीचे सरकार आल्यानंतर वीज निर्मिती क्षेत्रात काम केले नाही असे आरोप करण्यात आले. मी आपणास सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांची सभागृहामध्ये एक भाषा असते आणि बाहेर भाषा वेगळी असते. एका बाजूला वीज मोफत द्या असे सांगावयाचे व दुसऱ्या बाजूला वीज क्षेत्रात गुंतवणूक केली नाही असे म्हणावयाचे हे बरोबर नाही. लोकशाही आघाडी सरकार आल्यापासून 788 कोटी रुपये वीज बिलापोटी दिलेले आहेत. सन 2001-2002 मध्ये 493 कोटी रुपये, सन 2002-2003 मध्ये 833 कोटी रुपये, सन 2003-2004 मध्ये 945 कोटी, सन 2004-2005 मध्ये 2833 कोटी एवढी मोठी रक्कम राज्याच्या तिजोरीमधून वीज मंडळाला दिली आहे. एवढी मोठी रक्कम दिल्यानंतर एक नया पैसा राज्य सरकारने अनुदान म्हणून प्रकल्प उभारण्यासाठी दिला नाही. याचे कारण आपण कापूस, कांदा, लोकरी मावा आणि मोफत विजेला प्राधान्य दिले होते. त्यामुळेच पायाभूत सुविधेमध्ये गुंतवणूक करता आली नाही. मी आपल्याला गेल्या दहा वर्षाचे बजेट काढून पहा असे नम्रतापूर्वक सांगत आहे. लोकशाही आघाडी सरकार सत्तेवर येण्यापूर्वीचे पाच वर्षांचे बजेटमध्ये पहा. त्या बजेटमध्ये वीज निर्मितीसाठी एक रुपयांची देखील गुंतवणूक केली नव्हती. साधा प्लॅन देखील केला नव्हता. त्याचे परिणाम आज आपल्याला भोगावे लागत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : परळी आणि पारस हे दोन प्रकल्प युती शासनाच्या काळातील आहेत. हे प्रकल्प प्लॅनमुळेच झाले.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, मागच्या काळामध्ये वीज निर्मितीसाठी एक रुपयाही दिला नाही. आम्ही फक्त 5-6 हजार कोटी रुपये मोफत विजेच्या पोटी वीज मंडळाला, शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने वीज उपलब्ध करून देण्यासाठी दिले आहेत. एमइआरसीने 5 H.P.साठी 2100 रुपये विजेचा दर ठरविला. परंतु, शासनाने शेतकऱ्यांकडून 700 रुपये घेऊन उर्वरित 1400 रुपये राज्याच्या तिजोरीतून दिले आहेत. गेल्या 6 वर्षामध्ये विजेचे भाव एमइआरसीने वाढविले आहेत. पण त्याचे बर्डन राज्य सरकारने स्वत:वर घेतले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील...

असे जरी असले तरी राज्य सरकारला वीज निर्मितीसाठी बऱ्या पैकी निधीची तरतूद करावयाची आहे. मोफत विजेपोटी 713 कोटी आणि 897 कोटी असे मिळून 1610 कोटी पहिल्या वर्षी राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या विजेच्या बिलापोटी वीज मंडळाला दिलेले आहेत.

सभापती महोदय, काल मी काही मागण्या सभागृहासमोर मांडल्या. या वर्षाच्या अर्थसंकल्पामधून जिल्हास्तरीय योजने अंतर्गत 887 कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी उपलब्ध झाले आहेत. राज्यस्तरीय योजनेसाठी 653 कोटी, दाभोळसाठी 495 कोटींचे पेमेंट केले आहे. तसेच 189 कोटी रुपये परळी-पारससाठी होते. पूर्वी बोर्डामध्ये ठराव झाला की सांगितले जात असे की, तुम्हाला 132 के.व्ही.चे सबस्टेशन मंजूर झाले.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

बोर्डामध्ये ठराव झाला की, आमदारांना सांगायचे की, तुमचे 220 के.व्ही.चे सबस्टेशन मंजूर झाले. पण बोर्डाच्या ठरावाला राज्याचा पाठिंबा नसायचा. त्यासाठी बोर्डाला पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन किंवा अन्य ठिकाणांहून कर्ज काढावे लागत असे. तत्कालीन ऊर्जा मंत्र्याच्या हस्ते काही ठिकाणी भूमिपूजन झाले पण अजूनपर्यंत त्या कामास अद्यापपर्यंत सुरुवात झालेली नाही. कारण त्यासाठी पैसे लिंकेज करता आलेले नाहीत. मंडळाचे उत्पन्न 900 कोटी रुपये आहे तर खर्च 1200 ते 1300 रुपये आहे. काही जण चुकीचे वागत असतील त्यामुळे खर्च जास्त होत असेल, काही लोक अफरातफर करीत असतील त्यामुळे खर्च वाढत असेल. यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आपल्याला पावले टाकावी लागणार होती. आमचे सरकार आल्यानंतर आम्ही या क्षेत्रामध्ये काही महत्वाची पावले टाकली. पहिले महत्वाचे पाऊल म्हणजे राज्य सरकाने वीज मंडळाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. केंद्रात आपल्या पक्षाच्या सरकारने 2003 मध्ये इलेक्ट्रीसिटी कायदा केला. हा कायदा केल्यानंतर विजेच्या क्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने काम करुन दाखवावयाचे असेल तर वीज मंडळाची पुनर्रचना केली पाहिजे ही भूमिका आम्ही घेतली. वीज मंडळामध्ये एखादा निर्णय घ्यावयाचा असेल तर त्या ठिकाणी असलेल्या दीड लाख कर्मचारी आणि 50 युनियन्सबरोबर चर्चा करावी लागते. या सभागृहाचे एक सन्माननीय सदस्य श्री.अरुण मेहता आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांनी तांत्रिक कामगार युनियन पुन्हा जीवंत करण्याचा प्रयत्न केला होता. आज त्या युनियनचे नेतृत्व श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचेकडे आहे. ज्यावेळी आम्ही राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी अनेक युनियनचा विरोध असताना सुध्दा तांत्रिक कामगार युनियन, सबॉर्डीनेट इंजिनियर्स असोसिएशन युनियन आणि बाकीच्या सर्व युनियन्स आमच्या पठिशी भक्कमपणे उभ्या राहिल्या. मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, इतर राज्यांमध्ये अशी पुनर्रचना झाल्यानंतर त्या ठिकाणी 50-50 दिवस संप झाला होता. पण महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांनी मदत करण्याची भूमिका घेतली आणि आपल्याकडे एक दिवसही संप झाला नाही. कारण त्यांना यामध्ये खऱ्या अर्थाने काही दुरुस्ती करावयाची होती. काही लोक चुकीचे वागत असतील, राजकारणात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

लोक चुकीचे वागतात पण त्यामुळे सर्व राजकारणी बदनाम होतात. शिक्षण क्षेत्रात काही लोक चुकीचे वागतात त्यामुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्र बदनाम होते. सगळ्याच क्षेत्रामध्ये थोडे लोक चुकीचे वागतात आणि मग बाकीच्या सर्वांना बदनाम व्हावे लागते. आज मंडळामध्ये चांगले काम करणारे कर्मचारी असताना काही कर्मचारी योग्य पध्दतीने वागत नाहीत त्यामुळे सर्वांना मनस्ताप सहन करावा लागतो. आपण वीज मंडळाची पुनर्रचना केलेली आहे. या वीज मंडळाच्या माध्यमातून आपण होल्डींग कंपनी , जनरेशन कंपनी, ट्रान्समिशन कंपनी आणि डिस्ट्रीब्युशन कंपनी अशा चार कंपन्या केलेल्या आहेत. मंत्रिमंडळाने डिस्ट्रीब्युशन मध्ये एक कंपनी करुन थांबायचे नाही असासुध्दा निर्णय घेतला. गुजरात राज्याने या संदर्भात जवळपास सात कंपन्या केलेल्या आहेत. आपल्याला चांगली सेवा द्यावयाची असेल, कर्मचाऱ्यांकडून कार्यक्षमतेने काम करुन घ्यावयाचे असेल तर डिस्ट्रीब्युशन कंपनीमध्ये छोटे छोटे युनिट करण्याची वेळ आली तर याबाबत मंत्रिमंडळाने अगोदरच निर्णय घेतलेला आहे. त्याचे अंतिम स्वरुप मंत्रिमंडळाला समोर ठेवून त्याची अंमलबजावणी आता करायची की सहा महिन्यानंतर एक वर्षानंतर करावयाची यांच्या संदर्भातील निर्णय जरुर आपण घेऊ.

दुसरा महत्वाचा मुद्दा मला या ठिकाणी मांडावयाचा आहे तो असा की, मा.श्री.शरद पवार हे राज्यांचे मुख्यमंत्री असताना ते वीज निर्मितीसाठी दरवर्षी राज्याच्या बजेटमधून 500 कोटी रुपयांची तरतूद करायचे. ते प्रथम विजेसाठी पैसे बाजुला ठेवायचे नंतर बाकीच्या क्षेत्राला पैशाचे वाटप करायचे. पण माननीय श्री.पवारसाहेब केंद्रात गेले आणि नंतर विजेच्या क्षेत्रात जी गुंतवणूक व्हावयास पाहिजे ती गुंतवणूक आपण करु शकलो नाही. तुमच्या काळातसुध्दा विजेसाठी तरतदू झाली नाही त्याचे कारण तुम्हालाही वाटत होते की, दाभोळ प्रकल्प उभा राहील. त्यावेळी काहीही चर्चा झाली असेल, आम्ही विरोधी पक्ष असताना त्यावर खूप बोललो होतो. आज पुन्हा त्यावर बोलून मला वेळ घ्यायचा नाही. मला आपली मदत पाहिजे. आमची भूमिका आपल्या सर्वांसमोर मांडायची आहे. एन्रॉन आला काय, सुरु झाला काय, बंद झाला काय ! कोणीतरी येथे म्हणाले की बंद का पडला ? आज मी त्यावर भाष्य करु इच्छित नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

सतत महागडया दराने एन्रॉनची वीज खरेदी करावी लागली असती आणि यामुळे कदाचित महाराष्ट्राचे कंबरडे मोडून गेले असते. परंतु सुदैवाने एन्रॉन कंपनी परागंदा झाली आणि मग या दाभोळ पॉवर कंपनीमध्ये आता जीई-बेकटेल आणि महाराष्ट्र सरकार हे राहिले आहे. महाराष्ट्र सरकारच्या विरोधात अरबीट्रेशन केले गेले. तुमचे सरकार केंद्रात असताना सुध्दा मी राज्याचा ऊर्जा मंत्री होतो. त्यावेळी राज्यातील जनता 3 हजार मेगावॅटच्या टंचाईमध्ये होरपळत होती. दुसऱ्या बाजूला कोकणातील दाभोळच्या 2400 मेगावॅटचा प्रकल्प आयडल पडलेला होता म्हणून यातून मार्ग काढण्यासाठी विनंती केली गेली. तुमच्या केंद्र सरकारने प्रयत्न केले नाहीत असे नाही, परंतु त्यांनी प्रयत्न करुनही फारसा उपयोग झाला नाही. त्यानंतर माननीय मनमोहन सिंग यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी चार मंत्र्यांची माननीय श्री.प्रणव मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नियुक्त केली. त्यामध्ये केंद्रीय मंत्री श्री.शरद पवारांचा सुध्दा समावेश होता. केंद्रामध्ये माननीय मंत्री व कॅबिनेट सचिव यांनी वर्षभर दर शुक्रवारी दिल्लीमध्ये समितीच्या बैठका घेतल्या. दाभोळ प्रकल्पाच्या पुर्नजीवनासाठी काय करावे ? या बाबतचा निर्णय केंद्रीय पातळीवर झाला. याबाबत केंद्र आणि राज्य सरकारने जो निर्णय घेतला त्या संदर्भात आपल्या अधिकाऱ्यांनी दिवस-रात्र काम केले. आज आरबीट्रेशन तुमच्या-माझ्या विरोधात गेले असते तर राज्याला विजेचे तर सोडून द्या, पण पूर्वीच्या लोकांनी केलेल्या कामाचे 28 हजार कोटी रुपये आरबीट्रेशनपोटी द्यावे लागले असते. आज एमएसईबी ची पुनर्रचना केली म्हणजे काय केले ? महोदय, एमएसईबी ची पुनर्रचना केल्यामुळे राज्यावरील 28 हजार कोटी रुपयांची लायबिलिटी गेलेली आहे. तो परदेशी कंपनीच्या मालकीचा प्रकल्प होता. आता हा प्रकल्प 100 टक्के भारत सरकारच्या मालकीचा झाला. 18 हजार कोटी रुपये त्या प्रकल्पाची किंमत होती, परंतु ती आता कमीकमी करीत आणली आहे. आपण विचारले त्यातील इक्विटी कुठे गेली ? देशातील आणि जगातील जेवढे गुंतवणूकदार होते त्यांनी काहीना काही झळ त्यामध्ये सोसायचे ठरविले. सगळयांनी झळ सोसल्यानंतर 18 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पाची किंमत ठरविण्यासाठी एमईआरसी च्या समोर जावे लागेल, तेव्हा प्रोजेक्टची किंमत, त्यातून मिळणारे उत्पन्न, त्यावर होणारा खर्च या सर्वांचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

विचार करुन, प्रकल्पाची किंमत कमीत कमी आणण्यापर्यंतचा पर्याय आपल्यासमोर होता. या सर्व गोष्टींचा विचार झाल्यानंतरच त्या प्रकल्पाची किंमत कमी करता आली आहे. आता त्या नवीन प्रकल्पाचे नाव "रत्नागिरी गॅस अँड पॉवर कंपनी" असे ठेवले आहे. त्यामध्ये एनटीपीसी ची 28.3 टक्के, गॅस ऑथॅरिटी ऑफ इंडियाची 28.3 टक्के, इंडियन इन्व्हेस्टर्सची 28.3 आणि राज्य सरकारची 15 टक्के भागीदारी आहे.

ॲड.अनिल परब : आपण इतर सर्व परदेशी कंपन्यांची इक्विटी परत केली आहे. मग महाराष्ट्राची जी इक्विटी आहे ती आपण रत्नागिरी गॅस अँड पॉवर कंपनीमध्ये शिफ्ट करणार आहात की, त्यासाठी वेगळी इक्विटी देणार आहात ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : महोदय, सर्वांचीच इक्विटी परत केली असे नाही. आपण केवळ दोन कंपन्यांचे पैसे दिले आहेत. महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीतून या इक्विटीपोटी एकही पैसा दिला गेला नाही. केंद्र सरकारने पुढाकार घेतल्यामुळे, केंद्र सरकारच्या गुंतवणूकदार कंपन्यांनी कर्ज काढून इक्विटीची रक्कम दिलेली आहे. दाभोळ प्रकल्पातून महाराष्ट्राने जी वीज खरेदी केली होती त्यापोटी महाराष्ट्र सरकारच्या वतीने 495 कोटी रुपये एन्रॉनला विजेच्या बिलापोटी देणे लागत होते. त्यांनी अट घातली की, 495 कोटी रुपये दिले तरच आम्ही ॲग्रीमेंटसाठी बसू नाही तर बसणार नाही. म्हणून ती रक्कम अदा करण्यात आलेली आहे. आपली वेगळी इक्विटी होती ती आपण फोर्गो केली. या 495 कोटी रुपयांच्या बदल्यात पूर्वीच्या प्रकल्पामध्ये महाराष्ट्र शासनाचा 15 टक्क्याचा वाटा होता. या नवीन प्रकल्पामध्ये सुध्दा महाराष्ट्राला 15 टक्केची इक्विटी मिळाली आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, पूर्वीच्या प्रकल्पामध्ये फक्त पॉवरमध्ये आपला शेअर होता रि-गॅसीफिकेशनच्या प्लॅंटमध्ये महाराष्ट्राला काहीही मिळणार नव्हते. परंतु आम्ही त्यामध्ये नवीन सुधारणा केली. त्यानुसार महाराष्ट्राला विजेमध्ये सुध्दा पैसे मिळणार आहेत. दाभोळच्या टर्मिनलवरुन येणारा गॅस किंवा दाभोळची जेटी किंवा त्यातून येणारे उत्पन्न केवळ दाभोळसाठीच वापरले जाणार नाही.

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.गायकवाड....

श्री.दिलीप वळसे - पाटील ..

त्याच्यामधून बाकीच्या ठिकाणीसुध्दा गॅस दिला जाईल आणि त्यामुळे ॲडिशनल सोर्स ऑफ इनकम राज्य सरकारला होणार आहे. या बाबतीत ज्या काही वाटाघाटी झाल्या होत्या त्यावेळी आपण सुप्रीम कोर्टात गेलो होतो. सुप्रीम कोर्टाने त्या वाटाघाटीला मान्यता दिली त्यामुळे हा प्रकल्प आता टेक ऑफ घेण्याच्या स्थितीत आहे. आपल्या मनामध्ये काही शंका आहेत आणि आजही गॅसची टंचाई आहे हे मला देखील माहीत आहे. परंतु त्या बाबतीत केन्द्र सरकार प्रयत्न करीत आहे.मी परवा दाभोळ येथे जाऊन आलो होतो आणि दाभोळच्या प्रकल्पाचे काम ज्या पध्दतीने सुरु आहे ते काम मी पाहिलेले आहे . त्या कामाचे प्लॅनिग एन.टी.पी.सी.ने केलेले आहे त्याचे कारण असे की सुरुवातीची दोन वर्षे हा प्रकल्प एन.टी.पी.सी. चालविणार आहे महाराष्ट्राने त्यातील मेजर शेअर खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.मी परवा गुजराथ मध्ये गेलो होतो तेव्हा तेथील उर्जा मंत्र्यांनी मला असे सागितले की दाभोळ मधील विजेचा काही ना काही वाटा तुम्ही आम्हाला देण्याचा प्रयत्न करा. परंतु आपण त्यांना कमिट केलेले असल्यामुळे गुजराथला वीज देता येणार नाही. या विजेचा दर काय पडेल आणि गॅसचा दर काय राहील यापेक्षा महाराष्ट्राला जेव्हा वीज हवी असते तेव्हा दरा पेक्षा सुध्दा वीज मिळणे हे महत्वाचे आहे. तेव्हा मी सभागृहाला सांगू इच्छितो की, दाभोळच्या पहिल्या टप्यातील 700 मेगॅवॅटस वीज व रत्नागिरी पॉवर कंपनीची वीज 15 मे 2006 पासून महाराष्ट्राला मिळेल अशा प्रकारचे प्लॅनिग त्यांनी केलेले आहे. गेल्या अकरा वर्षा नतरचा हा पहिला 700 मेगॅवॅटसचा प्रकल्प असून त्यामुळे महाराष्ट्राच्या विजेच्या कॅपेसिटीमध्ये भर पडणार आहे. दुसरा 1400 मेगॅवॅटसचा एक प्रकल्प असून त्या बाबतीत त्यांनी जे प्लॅनिग केलेले आहे त्यानुसार डिसेंबर 2006 पर्यन्त वीज मिळणार आहे आणि एनरॉनची जी उरलेली वीज आहे ती वीज धरुन जवळपास 2200 ते 2400 मेगॅवॅटसची वीज वर्षभराच्या काळात महाराष्ट्राला उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. वीज निर्मितीच्या बाबतीत आपण काही प्रयत्न केला आहे की नाही ?असा प्रश्न विचारला जातो. वीज निर्मितीच्या प्रकल्पाचे प्लॅन कोणी केले हा महत्वाचा प्रश्न नाही.मंत्रिमंडळामध्ये त्याबाबतीत निर्णय घेतला गेला हे महत्वाचे आहे मी उर्जा मत्री झाल्यानंतर परळी आणि पारस येथे वीज निर्मिर्तीचा प्रकल्प करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर घेऊन गेलो आणि मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्र्यांनी तसेच मंत्रिमंडळाने त्याला मान्यता दिली .परळी येथे 250 मेगॅवॅटस आणि पारसला 250 मेगॅवॅटस वीज निर्मिती प्रकल्प सुरु करण्याचे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्ही ठरविले होते. परंतु राज्य सरकार त्यासाठी पैसे देऊ शकले नाही. या प्रकल्पासाठी राज्य सरकारने 20 टक्याची इक्विटी कधी दिली ? आपणं् काल ज्या पूरक मागण्या मान्य केल्या होत्या त्यामध्ये या साठीची तरतूद करण्यात आली होती.परंतु तोपर्यन्त शासन काही थाaबले नाही. हे पैसे मिळविण्यासाठी आम्ही बाजारात गेलो आणि तेथून यासाठी लागणारे पैसे उभे केले होते.परळी आणि पारस येथील प्रकल्प तीन वर्षात आम्हाला पूर्ण करावयाचे आहेत. मी सभागृहाला या ठिकाणी मोठया अभिमानाने सांगू इच्छितो ,की मी परवाच्या दिवशी परळी येथे गेलो होतो.माझ्याबरोबर मी श्री.गोपीनाथ मुंडे यांनासुध्दा घेऊन गेलो होतो.परळीचा प्रकल्प महाराष्ट्राला 250 मेगॅवॅटस वीज देईल याबद्दल माझ्या मनात आता काही शंका राहिलेली नाही. परळी येथील प्रकल्पाचे काम ज्या गतीने सुरु आहे त्याप्रमाणे मार्च एप्रिल महिन्यामध्ये महाराष्ट्राला परळीच्या प्रकल्पातून 250 मेगॅवॅटस वीज निश्चितपणे उपलब्ध होणार आहे. पारसचा प्रकल्प विदर्भामध्ये आहे.या प्रकल्पाला भेट देण्यासाठी मी 26-27 तारखेला जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी माझ्याबरोबर यावे.मी अमरावतीला जाणार आहे तेव्हा आपल्यालासुध्दा हा प्रकल्प पाहण्यासाठी मी घेऊन जाईन..पारस प्रकल्पाच्या बाबतीत आमचा असा प्रयत्न आहे की, या प्रकल्पातून 250 मेगॅवॅटसची वीज जून महिन्यापर्यन्त निर्माण करण्याच्या बाबतीत डेड लाईन देण्यात आलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचा माझ्यावरील विश्वास कमी झाला असेल. मित्रावरील प्रेमा पोटी कदाचित तसे झाले असेल. आपला एक मित्र चांगले काम करीत आहे असे असतांनासुध्दा योग्य प्रकारची बातमी त्यांच्यापर्यन्त गेलेली नसेल असे मला वाटते. घाटघर येथे आपण एक नवीन प्रकल्प सुरु केलेला आहे. घाटघर प्रकल्पातून 250 मेगॅवॅटस वीज सप्टेंबर 2006 पर्यन्त महाराष्ट्राला मिळणार आहे. मी आज पाच दहा वर्षानंतर काय होणार आहे यासंबंधीचे बोलणार नाही. विंध्याचल मधून आपल्याला 197 मेगॅवॅटस विजेचा वाटा डिसेंबर 2006 ला मिळणार आहे.तारापूर प्रकल्पातील तीन नंबरचा जो प्रकल्प आहे त्यातून 326 मेगॅवॅटसची वीज डिसेंबर 2006 मध्ये मिळणार आहे. पुढील सहा महिन्यामध्ये परळी आणि पारस येथील वीज निर्मिती केन्द्रातून 500 मेगॅवॅटस् , दाभोळ वीज निर्मिती केन्द्रातून 700 मेगॅवॅटस अशी एकूण 1200 मेगॅवॅटस वीज आपल्याला मिळणार आहे आणि त्यानंतरच्या सहा महिन्यामध्ये आपण जे प्लॅनिग केलेले आहे त्यानुसार जी वीज मिळणार आहे ती विचारात घेता पुढील वर्षभरात एकूण 3 हजार 400 मेगॅवॅटस वीज महाराष्ट्राला मिळणार आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु आज विजेच्या बाबतीत परिस्थिती अवघड आहे त्यामुळे माझ्यावर कोणी विश्वास ठेवणार की नाही हे माहीत नाही. सभागृह सुध्दा माझ्यावर विश्वास ठेवील की नाही हे माहीत नाही. राज्यातील जनता विजेच्या बाबतीत अडचणीत आलेली आहे.आमचे कर्मचारी जीवाच्या आकांताने काम करीत आहेत.त्यातील काही लोक कदाचित चुकीने वागत असतीलही परंतु बाकीचे लोक जीवाच्या आकांताने काम करीत असतांनासुध्दा त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबियांवर व कार्यालयावर हल्ले केले जात आहेत.लोकांच्या सहनशीलतेचा अंत झालेला आहे 12 - 14 तास वीज नसल्यामुळे गृहिणी,विद्यार्थी, शेंतकरी , उद्योजक यांच्या भावनांचा बांध आता फुटलेला असेल तर त्यांना दोष देता येणार नाही परंतु या मध्ये आपण सगळया लोकप्रतिनिधींनी मिळून वीज बचतीसाठी आपण काही करु शकतो काय ?.या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वळसे-पाटील ...

आज मी राज्याचा ऊर्जामंत्री म्हणून जनतेला वीज वाचवा म्हणून सांगू लागलो तर लोक म्हणतील की, आम्हाला तुम्ही शहाणपणा शिकवू नका, तुम्ही वीज का निर्माण करीत नाही. पण हे सरकारचे एकट्याचेच काम आहे अशातील भाग नाही. हे कोणा एकट्याचे काम नाही, हे आपणा सगळ्यांचे काम आहे आणि सगळ्यांनी मिळूनच ते आपल्याला करावयाचे आहे. ही गोष्ट खरी आहे की, मी मागील वेळेस उरण, तळेगाव आणि खापरखेड्याच्या प्रकल्पासंबंधात बोललो होतो. उरणच्या प्रकल्पासंबंधात केंद्रामध्ये आपले सरकार असल्यापासून मी केंद्र सरकारच्या पाठीमागे होतो. त्याबाबतीत माझी अपेक्षा म्हणा वा कल्पना म्हणा, अशी होती की, दहेजपासून पाईप लाईन टाकून ती उरणपर्यंत आणायची आणि ती पाईप लाईन उद्या तीन वर्षामध्ये तेथे येणार असेल तर त्या तीन वर्षामध्ये मी देखील माझ्या कल्पनेने तेथे काही प्लॅनिंग केलेले आहे. उरणला 1040 आणि तळेगावला 1400 मे.वॅ. असे दोन प्रकल्पांचे नियोजन मी तेथे केलेले होते. पण आज-उद्या गॅसच्या संदर्भात त्यामध्ये अडचणी येणार असतील, गॅस आपल्याला विलंबाने मिळणार असेल तर मधल्या काळामध्ये आम्ही असा निर्णय घेतला जो आजपर्यंत कोणीही घेतलेला नाही. आजपर्यंत आम्ही कोल कंपन्यांकडून कोळसा घेत होतो. परंतु आता आम्ही सरळ कोळशाची खाणच घेण्याचा विचार केला आहे. त्यादृष्टीने आम्ही म्हणजे राज्य सरकारने नवीन जनरेट झालेल्या कंपनीच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांची आम्हाला त्यासाठी मदत झाली. माननीय मुख्यमंत्री महोदय देखील दोन वेळेस तेव्हा माझ्याबरोबर आले. आज आम्ही केंद्र सरकारला पटवू शकलो आणि त्यामुळे आज या विदर्भामध्ये असणारी टाकळी, जेना-बेलोरा ही जी कोळशाची खाण आहे ती महाराष्ट्राच्या वीज कंपनीला देण्याच्या संदर्भातील निर्णय हा केंद्र सरकारकडे अंतिम अवस्थेमध्ये असून ती खाण आपल्याला मिळणार आहे. ज्याच्या आधारे आपण खापरखेड्याच्या एक्स्पांशनचे काम, जेथे आपल्याला 500 मे.वॅ. वीज निर्मिती करावयाची आहे, ते आपण करू शकणार आहोत. त्याचे सारे प्लॅनिंग आम्ही आता तयार केलेले आहे. ...

उपसभापती : मंत्री महोदय, आपण कृपया खाली बसावे. माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी विनंती करतो की, आजच्या अर्धा तास चर्चा आपण उद्या सकाळी खास बैठक घेऊन घ्यायच्या का?

.... 5डी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अर्धा तास चर्चेच्या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांची जी अर्धा तास चर्चा होती त्यांनी ती याच चर्चेमध्ये उरकून घेतली आहे. त्यामुळे ती कमी होईल.

उपसभापती : मंत्री महोदयांना उत्तरासाठी आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मला अजून 20 मिनिटे तरी लागतील.

श्री. जयंत प्र. पाटील : अध्यक्ष महाराज, उद्या सकाळी खास बैठक घेऊन आजच्या अर्धा तास चर्चा घेतल्या तरी आमची हरकत नाही.

उपसभापती : आजची ही चर्चा संपण्यास दहा, साडेदहा तरी वाजतील. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, आजच्या अर्धा तास चर्चा आपण उद्या सकाळी 10 वाजता विशेष बैठक घेऊन करू. कारण आपण सगळे आज सकाळी 10 वाजल्यापासून येथे बसलो आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

उपसभापती : उद्या सकाळी खास बैठक घेऊन, सकाळी 10 वाजता आजच्या अर्धा तास चर्चा घेण्यात येतील हे मी आता जाहीर करतो. आता माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे भाषण पुढे सुरू करावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आता आपल्याला ही खाण तर मिळालीच पण ओरिसामध्ये मच्छाकाटा नावाची जी खाण आहे ती घेण्याच्या दृष्टीने एकट्या महाराष्ट्र सरकारने नाही तर गुजरात सरकार बरोबर संयुक्तरित्या केंद्र सरकारकडे आपण आग्रह धरला आणि ही खाण महाराष्ट्र आणि गुजरात .. मग त्या राज्यांमध्ये कोठल्या पक्षाचे सरकार आहे याला महत्त्व नाही., पण प्रश्न जेवढा या महाराष्ट्रामध्ये गंभीर आहे तेवढाच तो गुजरातमध्ये देखील आहे म्हणूनच दोन्ही राज्य सरकारांनी एकत्रित होऊन जर कॅपटीव मायनिंग आपल्याला करता आले आणि त्यातून कोळसा काढता आला तर तो काढून उद्या 10-20 वर्षा नंतर आपल्याला जे नवीन एक्स्पांशन करावयाचे आहे, ज्याचा उल्लेख मी केला आहे त्यासाठी उपयोगी पडणार आहे. आज 250-250 मे.वॅ.चा परळी आणि पारसचा एक्स्पांशनचा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मी आता लगेच पुढील तयारीला लागलो आहे. म्हणजे परळीला आणि पारसला आणखी एक एक 250 मे.वॅ.चा प्रकल्प घ्यायचा. कारण आता कोळसा आपल्याला डायरेक्ट उपलब्ध झाला आहे आणि दोन वर्षांनी

..... 6डी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याची मुबलक उपलब्धता होणार आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून लिंकेज मिळालेले आहे., तेव्हा वीज निर्मिती क्षेत्रामध्ये आपण थांबायचे नाही. राज्याच्या मंत्रिमंडळाने देखील आता हा निर्णय केलेला आहे की, आता येथून पुढे बाकीचे प्रश्न काहीही असले तरी दरवर्षी या राज्याच्या बजेटमध्ये वीज निर्मितीच्या कामासाठी जवळपास 500 कोटी रूपयांची तरतूद करायची. हा कॉन्शीअस डिसिजन आपण आता घेतलेला आहे. यासाठी आम्ही शॉर्ट टर्ममध्ये प्रयत्न केलेले आहेत आणि लॉंग टर्ममध्येही आता आम्ही प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. सभापती महोदय, हैड्रोच्या संदर्भात या ठिकाणी बोलले गेले.. खरे तर हा विषय पाटबंधारे विभागाकडे येतो... त्यांनी यासाठी 300 मे.वॅ. करिता टेंडर्स खाजगीकरणाच्या माध्यमातून काढलेली आहेत.

सभापती महोदय, अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामध्ये महाराष्ट्रात 7730 मे.वॅ.चे पोटेंशिअल आहे. आज त्यामध्ये 697 मे.वॅ.वीज निर्माण झालेली आहे. तरीही मी आपल्याला सांगतो की, या अपारंपारिक ऊजा विभागाचे मंत्री माननीय श्री. विनय कोरे यांनी यासाठी केलेला कार्यक्रम आपण जरूर पहावा. यासाठी एकंदर 418 कोटी रूपये उभे करावयाचे होते. त्यासाठी आपण मार्चच्या बजेटमध्ये 4 पैशाचा ग्रीन सेस लावला होता आणि त्यातून जमा झालेले 100 कोटी रूपये अपारंपारिक ऊर्जा विभागाकडे वर्ग केले. आणखी 100 कोटी रूपये आपण त्यात उभे करणार आहोत. शिवाय 200 कोटी रूपये फंडस् मॅनेजर कडून उभे करणार आहोत. अशा प्रकारे एकूण 2400 कोटी रूपयांचा अपारंपारिक ऊर्जेचा कार्यक्रम अपारंपारिक ऊर्जा विभागाकडून या राज्यामध्ये करण्याचा निर्णय त्यांनी आता घेतलला आहे हे मी आपल्याला येथे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आपण वेगवेगळ्या कंपन्यांबरोबर जे सामंजस्य करार केलेले होते ....

(यानंतर श्री. सरफरे 6इ 1

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

आपण त्यावेळचे माझे सभागृहातील भाषण काढून वाचले तर मी त्यावेळी हेच सांगितले होते की, सामंजस्य कराराचे धोरण घेऊन आलो आहे. तो करार केल्यानंतर त्यामध्ये पहिले सहा महिने डी.पी.आर. तयार करावा लागे, डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करावा लागेल. त्यामध्ये रीलायन्स, टाटा, सेंट्रल इंडिया पॉवर कंपनी, इस्पात, जी.एम.आर., एस्सार, स्पेक्ट्रम, जिंदाल या आठ कंपन्यांनी 12 हजार 500 मेगावॅटचे सामंजस्य करार केले होते. त्यामध्ये जी.एम.आर. आणि एस्सार या कंपन्या सोडल्या तर बाकीच्या सर्व कंपन्यांनी सहा महिन्याच्या आत डी.पी.आर. तयार करुन राज्य सरकारकडे सादर केला आहे. त्याच्या दुसऱ्या टप्पामध्ये त्यांनी पुढील सहा महिन्यामध्ये फायनान्शिअल क्लोजर करणे, मशिनरीची ऑर्डर देणे आणि त्यानंतर प्रोजेक्ट टेक ऑपसाठी जाणे यासाठी त्यांना जमीन पाहिजे. केंद्र सरकारकडून एन्व्हायरलमेंटची मदत पाहिजे, कोल लिंकेज पाहिजे, इंपोर्टेड गॅस आणि कोळसा आणायचा असेल तर त्यासाठी केंद्र सरकारबरोबर टाईप प्लॅन केला पाहिजे. मी त्यावेळी सांगितले होते की , 12 हजार मे.वॅ.चे प्रकल्प येतील असे नाही. 6 हजार मे.वे.च्या पुढील प्रकल्प जरी आले तरी त्यामधून मी 3 हजार मेगावॅटची वीज घेईन. राज्याच्या वीज निर्मितीच्या माध्यमातून 3 हजार, आयपीपी प्रोजेक्टच्या माध्यमातून 3 हजार, आणि केंद्र सरकारबरोबर टाईप असलेल्या प्रोजेक्टच्या माध्यमातून 3 हजार अशा 9 ते 10 हजार मेगावॅट वीजेची चर्चा केली. त्यावेळी मी दाभोळची चर्चा केली नव्हती. दाभोळच्या प्रकल्पाची सोडवणूक ही महाराष्ट्राच्या दृष्टीने वरदान ठरल्याशिवाय रहाणार नाही. लोक आज अशी टीका करतात की आज जे भार नियमन केले जात आहे, ते कदाचित एन्रॉन प्रकल्पाचे समर्थन करण्यासाठी केले जाते की काय अशाप्रकारची टीका त्यामध्ये होते. परंतु त्यामध्ये केंद्र सरकारने पुढाकार घेतला आहे. आणि आज आपण त्यामधून टीएनटी लॉसेस कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या चार महिन्यामध्ये वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी थेप्टच्या माध्यमातून वसूल केलेली रक्कम जवळपास 1649 रुपये आहे. त्यामध्ये काही थकबाकीची रक्कम, वीज चोरीची रककम आहे. यामुळे दर महिन्याला मंडळाचे उत्पन दीडशे कोटींनी वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. आज कोळसा, ऑईल, ट्रान्सफॉर्मर यामध्ये मंडळ स्वत:च्या पायावर उभे राहू इच्छित आहे. वीजेची गळती 2002 ला 38 टक्के होती, 2003 ला 38.59 होती होती, 2004 ला 38.20 टक्के होती, 2005 ला 35.28 टक्के होती, आणि यावर्षीच्या नोव्हेंबर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

महिन्यापर्यंत 34.86 टक्केपर्यंत आली आहे. आपण 26 टक्क्यापर्यंत खाली जाण्याचे टारगेट केले आहे. ते समोर ठेवूनच आपण काम करीत आहोत. दुसरा विषय असा की, बऱ्याच वेळा वीज असतांनाही लोड शेडींग कां करावे लागते? मध्यप्रदेशातून येणारी वीज आणि विदर्भातून तयार होणारी वीज मिळून 6 हजार मे.वॅट वीज तयार होते. त्यापैकी विदर्भामध्ये 3 हजार मे.वॅ. वीज वापरली जाते आणि 3 हजार मे.वॅ. वीज तिकडे धेऊन जावी लागते. मग ती चंद्रपूरहून परळीला न्यावी लागते किवा बाभळेश्वरला तरी न्यावी लागते. या ट्रान्समिशन लाईन्समध्ये अनेक वर्षे गुंतवणूक केली नाही. आज बाहेरुन वीज खरेदी करुन आणायची म्हटली तरी आणण्यांची क्षमता राहिली नाही. या क्षेंत्रामध्ये सुध्दा गुंतवणूक करायला पाहिजे होती. म्हणून आपण ही ट्रान्समिशन कंपनी तयार केली आहे. त्या ट्रान्समिशन कंपनीने 4 हजार 941 कोटी रुपयांचा कार्यक्रम घेतला आहे. आणि पुढील 5 वर्षाचा जो कार्यक्रम घेतला आहे, त्यामध्ये 220 के.वी.ची 32 सबस्टेशन, 132 के.वी.ची 142 सबस्टेशन, 110 के.वी.चे 4 सबस्टेशन यामधून 3400 एम.वी. इतकी वाहून नेण्याची क्षमता त्यामध्ये तयार होईल. म्हणून आपण क्षमता वाढ करणे हातामध्ये घेतले आहे. एक्झिस्टींग 249 उपकेंद्रामध्ये ट्रान्समिशन कंपनीच्या वतीने क्षमता वाढीचा कार्यक्रम आपण हातामध्ये घेतला आहे. त्यामध्ये ट्रान्समिशन कंपनीच्या वतीने 10 हजार 375 एम.वी.ची वीज तयार करण्याचे काम आहे. त्यामध्ये ट्रान्सफॉर्मरचे अपग्रेडेशन करणे, लाईनचे अपग्रेडेशन करणे, लाईन्स टाकणे ही कामे करावयाची आहेत. आणि ही कामे केली नाहीतर तुम्ही कितीही वीज निर्माण केली तरी ती वीज एका बाजूने दुसऱ्या बाजूला नेता येणार नाही. आज पश्चिम महाराष्ट्रामध्ये लोड सेंटर आहे, परंतु पश्चिम महाराष्ट्रामध्ये आम्ही वीज तयार केली नाहीतर ईकडची वीज ईकडच्या माणसाला वापरता यायची नाही व तिकडच्याही माणसाला वापरता यायची नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ग्रीड जर इम्बॅलन्स झाला तर सर्व राज्यच अंधारात जाते आणि आपल्याला त्याचा फटका वारंवार बसतो आणि आपण त्या ठिकाणी दोष मात्र एखाद-दुसऱ्या माणसाला देतो. कारण हा प्रश्न मुळात इतक्या बारकाईने समजून घेण्याच्या बाबतीत प्रयत्न व्हावयास पाहिजे होता तो होत नाही. माझ्या सारख्याला थोडासा जास्त वेळ असल्यामुळे याबाबतीत मी थोडा वेळ देऊन यातील बारकावे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. मी सभागृहालाही ते दाखविण्यास तयार आहे. म्हणजे त्या-त्या गावतील सब स्टेशन कोणत्या तारखेला केलेले आहे ? वगैरे. यामध्ये राजकीय निर्णय नाही. तर टेक्निकली एखाद्या गावात काही कमी पडत असेल तर तेथेच द्यावयाचे. मग या तालुक्याला 132 दिले म्हणून दुसऱ्या तालुक्यालाही तेवढेच द्या, हा राष्ट्रवादी काँग्रेसचा आहे म्हणून याला द्या किंवा तो काँग्रेसचा आहे म्हणून त्याला द्या अशी यामध्ये भूमिका नाही. तर टेक्निकली सिस्टीम साऊंड करण्याच्या दृष्टीकोनातून आपण यामध्ये प्रयत्न करीत आहोत. आमची जी डिस्कॉम कंपनी आहे, या कंपनीच्या माध्यमातून आपण पुढच्या पाच वर्षात नवीन सब स्टेशन्स् उभी करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. यामध्ये 33 के.व्ही.ची 784 सब स्टेशन, 22 के.व्ही.ची 1395 सब स्टेशन आणि जो कपॅसिटी ॲडीशनचा कार्यक्रम आहे, त्याच्या माध्यमातून 2564 एम.व्ही.एवढा लोड अपग्रेडेशन करणार आहोत आणि यामध्ये, या वर्षामध्ये 33 के.व्ही.ची 149 सब स्टेशनचा कार्यक्रम आहे. माझे भाषण रेकॉर्डवर रहाणार आहे. पुढच्या वेळीही या चर्चेच्या वेळेला मी उत्तर देणार आहे. याचे जे प्लॅनिंग केलेले आहे, त्याचे जे फायनान्शिअल स्टेटमेंट टाईप केलेले आहे, त्याची मला सर्व माहिती आहे. यावर्षी आपण 22 के.व्ही.ची 319 सब स्टेशन करणार आहोत आणि 651 एम.व्ही.कपॅसिटी वाढविण्याचे काम डिस्ट्रीब्युशन कंपनीच्या माध्यमातून करणार आहोत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, ट्रान्समिशन कंपनी आणि डिस्ट्रीब्युशन कंपनी, या दोन कंपन्यांच्या वतीने उद्याच्या पाच वर्षात 19077 एम.व्ही कपॅसिटी बिल्टअप करण्याचे काम या राज्यात आपण करणार आहोत. आपण हे काम केले नाही आणि विजेची कितीही निर्मिती केली तरी महाराष्ट्रातील लोकांना वीज देता येणार नाही. महाराष्ट्राच्या दृष्टीने दुसरी एक महत्वाची घटना घडलेली आहे. आजपर्यंत आपण आपल्याला एवढे सक्षम समजत होतो की, पॉवर ग्रीडसारख्या केंद्र शासनाच्या युनिटला आपण आपल्या राज्यात प्रवेश करु दिला नाही. आज ईस्ट मध्ये सरप्लस पॉवर आहे. ईस्टमधून वेस्टमध्ये पॉवर यावयाची असेल तर ईस्टमधून

. . . .6 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

वेस्टला जी लाईन जोडावयास पाहिजे, ती लाईन जोडण्याच्या संदर्भात, आता आपले पाच राज्यांचे जे वेस्टर्न ग्रीड झालेले आहे, त्या संदर्भामध्ये मी पी.जी.एस.सी.आय.एल.च्या चेअरमनना बोलविले होते, त्यांच्याबरोबर चर्चा केली. आपल्याला त्यांनी प्रेझेंटेशन दिले आहे. ईस्ट कडून वेस्टला जी लाईन जोडावयाची आहे, त्यासाठी त्यांनी सुध्दा 4 हजार कोटी रुपयांचा कार्यक्रम तयार केलेला आहे. नुसताच कार्यक्रम केला नाही तर दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रामध्ये त्यांचे टेंडर सुध्दा प्रसिध्द झालेले आहे. म्हणजे ही लाईन जोडली तर त्यामधून निश्चित प्रकारे आपल्याला पुढे जाता येईल. ट्रान्सफॉर्मरच्या संदर्भात कार्यक्रम निश्चित करुन आम्ही पुढे जात आहोत. सर्व सन्माननीय सदस्य सांगतात की, ट्रान्सफॉर्मर मिळत नाहीत. ही गोष्ट खरी आहे. ट्रान्सफॉर्मर जळाला की तो बदलून देण्याचे काम वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी करावयाचे असते. आजपर्यंत राज्याच्या वीज मंडळामध्ये जी ट्रान्सफॉर्मरची खरेदी केली जात असे, त्याची जी पध्दत होती, त्यामध्ये समजा एखाद्या कंपनीला ऑर्डर दिल्यानंतर त्यातील एक किंवा दोन ट्रान्सफॉर्मर तपासून घ्यावयाचे आणि बाकीचा लॉट जसाच्या तसा काढला जात असे. त्यामुळे काही कंपन्यांकडून राज्य शासनाला आणि वीज मंडळाला नुकसान करण्याचा प्रयत्न सातत्याने झालेला आहे. या बाबतीत कोल्हापूरच्या एका इंजिनिअरने ही बाब वीज मंडळाच्या लक्षात आणून दिली. त्यावेळी मी सभागृहाला असे आश्वासन दिले होते की, आम्ही या बाबतीत चौक्शी करु. मी आपल्याला सांगू इच्छितो की, याची डायरेक्टर व्हिजीलन्स्च्या माध्यमातून चौकशी झाली आहे आणि त्याचा रिपोर्ट माझ्या हातात आहे. एकदा डायरेक्टरकडून रिपोर्ट मिळाल्यानंतर यामध्ये ज्या कंपन्या दोषी सापडल्या आहेत, त्यांच्या संदर्भात काय ॲक्शन घेतली पाहिजे यासंदर्भात मंडळाच्या कार्यकारी संचालकांनी दिलेली ऑर्डर माझ्या हातात आहे. त्याचबरोबर ज्या कंपन्यांनी महाराष्ट्र शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्यांना काळया यादीमध्ये टाकणे, तसेच यामध्ये दोषी असलेले सात अधिकारी मग त्यामध्ये एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर पासून चीफ इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर पर्यंतच्या सगळया अधिकाऱ्यांविरुध्द जी कारवाई करावयास पाहिजे त्यासंबंधात प्रोसेस सुरु आहे. मी सभागृहासमोर त्यांची नावे देण्यासही तयार आहे. जे चुकीचे वागतील त्या कोणालाही सोडणार नाही.शेवटी हा राज्याचा प्रश्न आहे आणि या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरु केला आहे. मध्यंतरी ट्रान्सफॉर्मर येण्यास थोडा उशीर लागला, कारण ट्रान्सफॉर्मरचा आलेला सर्वच्या सर्व लॉट इंजिनिअरनी तपासून घेतला

. . . .6एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

पाहिजे असे त्यांच्यावर बंधन घातलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, नोव्हेंबर मध्ये 710 ट्रान्सफॉर्मर आलेले आहेत, डिसेंबरमध्ये 1535 ट्रान्सफॉर्मर येणार आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे चालू...

जानेवारीमध्ये 3505, फेब्रुवारीमध्ये 3500, मार्चमध्ये 3500, एप्रिलमध्ये 3500, मेमध्ये 3650, जूनमध्ये 1805, जुलैमध्ये 1050 आणि ऑगस्टमध्ये 740 एवढी नवीन ट्रान्स्फॉर्मरची ऑर्डर दिलेली आहे. यासाठी पैशाची अडचण नाही. आपण एका बाजूला उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करतो,तसेच दुसऱ्या बाजूला हे ट्रान्स्फॉर्मर कमी पडतील अशी भूमिका रहाणार नाही, असा प्रयत्न करतो. काही सन्माननीय सदस्यांनी भूमिका मांडली की, एका बाजूला डार्क वॉटरशेडची अडचण आहे. तिथे आता वीज मंडळाने कनेक्शन देण्यास सुरुवात केली. दुसऱ्या बाजूला पाणी आहे, शेतकरी त्या ठिकाणी तात्पुरते विजेचे कनेक्शन मागत आहेत. मी आज येथे घोषणा करत नाही, तर या संदर्भात आपणास माहिती देतो की, शेतकऱ्यांना आवश्यक ती तात्पुरती वीज कनेक्शन देण्याच्या संदर्भात वीज मंडळाच्या माध्यमातून दिनांक 6-12-2005 रोजी निर्देश निर्गमित झालेले आहेत. 10 हॉ.पावर मोटारीसाठी कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त 1 वर्षाच्या कालावधीकरिता 30 मिटरपर्यन्त फ्री, बाकीची त्यांच्याकडून अनामत रक्कम हजार, 3 हॉ.पा.ला एक हजार रुपये, 5 हॉ.पा.ला 1700 रुपये, साडे सात हॉ.पावरला 1500 रुपये, 10 हॉ.पावरला 3300 रुपये अशी अनामत रक्कम घेऊन तात्पुरत्या स्वरुपाची कनेक्शन शेतकऱ्यांना देण्याच्या संदर्भतील निर्णय वीज मंडळाने घेतलेला आहे. नुसते शेतकरीच नाही तर मळणी यंत्राच्या संदर्भात लोकांची मागणी होती. त्यांनी अनधिकृत कनेक्शन घेतले की त्यांना अधिकारी पकडत होते आणि त्यांच्यावर कारवाई करत होते. आता मळणी यंत्राला देखील काही ना काही चार्ज आकारुन,तात्पुरती कनेक्शन्स् देण्याचा निर्णय राज्याच्या वीज मंडळाच्या माध्यमातून घेतलेला आहे. वीज निर्मितीचा सगळा प्लॅन मी सांगत नाही. परंतु माझी खात्री आहे की, वीज निर्मितीमध्ये पुढील काही वर्षामध्ये निश्चितपणे या राज्याला स्वावलंबन करण्याच्या दृष्टीकोनातून आपण प्रयत्न करु. काही महत्वाच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या. मोठे विषय मांडत असतांना लहान विषय कोणी मांडले नाहीत. पण आज वाड्या-वस्त्यांच्या विद्युतीकरणाचा देखील प्रश्न आहे. आपण राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरणाखाली जवळपास 388 कोटी रुपयाची योजना केंद्र सरकारकडे पाठविलेली आहे. वीज मंडळाचा प्रयत्न रहाणार आहे की, या योजनेअंतर्गत निश्चितपणे उद्याच्या काही दिवसामध्ये तेथे आम्ही वीज घेऊन जाणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब अे.पी.डी.पी.च्या संदर्भात बोलले. मी सांगू इच्छितो की, या संदर्भातील 1100 कोटीचा प्रस्ताव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

त्यांच्याकडे पाठविलेला आहे. आतापर्यन्त 550 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. मला हे मान्य आहे की, अे.पी.डी.पी.मध्ये जेवढी वीज मंडळाने गती घ्यायला पाहिजे होती ती घेतली नाही. यामध्ये प्रामुख्याने मीटर बदलण्याचाच कार्यक्रम आहे, सिस्टीम इम्प्रुव्हमेंटचाही काही कार्यक्रम आहे. 550 कोटी रुपये आतापर्यन्त खर्च झालेले आहेत. वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांना परवाच या संबंधामध्ये सूचना दिलेल्या आहेत. मला आता कोणत्याही परिस्थितीमध्ये सगळा कार्यक्रम मार्च महिन्यापर्यन्त पूर्ण करुन दाखविला पाहिजे. आज सिंगल फेजिंगच्या दृष्टीने 10 हजार गावे हातामध्ये घेतलेली आहेत. आजच्या तारखेपर्यन्त 4,500 पेक्षा जास्त गावांमध्ये सिंगल फेजिंग केलेले आहे. उरलेली 6 हजार गावे आणि आणखी काही कोटा वाढवायला मी सांगितलेले आहे. 6 हजार गावे महिन्या-दोन महिन्याच्या कालावधीमधे आपण पूर्ण करणार आहोत. शेवटी विजेच्याबाबतीत आपली परिस्थितीच अडचणीची आहे. निदान 6 महिने का होईना सिंगल फेजिंग करण्याशिवाय दुसरा कोणता पर्याय रहात नाही. त्याच्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न निश्चितपणे करु. ही अडचणीची परिस्थिती लक्षात घेऊन,जे खाजगी पॉवर ट्रेडर आहेत त्यांनी, वीज निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी दर वाढविण्याचे देखील काम केलेले आहे. परवा पाचही राज्यातील वेस्टन ट्रेडर्सबरोबर बैठक बोलाविली होती. हे विजेचे दर कॉम्पिटेटिव्ह कसे राहतील, वीज स्वस्त कशी मिळेल, या संदर्भातही आपण प्रयत्न केला. पारदर्शकतेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता. सभागृहाला सांगू इच्छितो की, कालपर्यन्त काय झाले असेल याची मला माहिती नाही. वीज मंडळामधील या पुढील सगळी टेंडर "ई टेंडरींग"च्या माध्यमातून स्वीकारायला सुरुवात केलेली आहे. कोणालाही त्यामध्ये स्पर्श करता येणार नाही. कोणालाही भेटता येणार नाही. टेंडर हे आपण घरामध्येच बसून वीज मंडळाच्या या वेबसाईटवर टेंडर पाठवू शकता. मी सांगू इच्छितो की, मिठाचे टेंडरसाठी देखील ही पध्दती अवलंबिलेली आहे. मिठाचे टेंडर इंटरनेटच्या माध्यमातून 11 जणांनी भरलेले आहे. यामुळे देखील वीज मंडळामध्ये बचत झाली. अशा प्रकारे वीज मंडळाच्या कारभारामध्ये आपण पारदर्शकता आणीत आहोत. मुंबईच्या विजेच्या संबंधात काळजी करण्याचे कारण नाही. आज मुंबईमध्ये लोडशेडींग नाही. त्यांची मागणी सुध्दा 2 हजारच्या आसपास आहे आणि निर्मितीही 2 हजाराच्या आसपास आहे. मुंबईची विजेची मागणी वाढली. कदाचित वीज मंडळाने वीज निर्माण केली नसेल...

यानंतर कु.थोरात...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

पण रिलासन्सला, बेस्टला आणि टाटालासुध्दा मुंबईमध्ये नवीन वीज निर्माण करता आली नाही. टाटा कंपनी असेल किंवा रिलायन्स कंपनी असेल ज्यावेळेला ओपन ॲक्सेस सगळयांना मिळालेले आहे त्यावेळेला त्यांनी सुध्दा 2000-2000, 4000-4000 मेगावॅटच्या प्रकल्पाच्या संदर्भात पूर्वीच्या काळात काय झाले असेल ते झाले असेल पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे जे सामंजस्य करार केलेले आहेत. सामंजस्य कराराचा अर्थ काय? आता 2003 च्या नवीन कायद्या प्रमाणे वीज निर्मितीचा प्रकल्प काढायला सरकारची परवानगी लागत नाही.. सांमजस्य प्रकार एवढयाचसाठी आहे की, तुम्ही जर वीज निर्मिती प्रकल्प काढणार असाल तर आम्ही तुम्हाला काही मदत करु इच्छितो. गरज त्यांची पण आहे आणि गरज राज्याची पण आहे. देशामध्ये एक लाख मे.वॅ.विजेचे शॉर्टेज असतांना एका राज्यातून दुस-या राज्यात पूर्वी वीज नेता येत नव्हती आता ती नेण्याची सोय झालेली असतांना खाजगी कंपन्या त्याच्यामध्ये जाणार नाहीत असे काही मानायचे कारण नाही. एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून जे प्रॉजेक्ट उभे राहतात त्याच्या संदर्भात या ठिकाणी चिंता व्यक्त करण्यात आली. मी आपल्याला सांगतो की, आपण त्या बाबतीत काही काळजी करु नका. या राज्यामध्ये वीज सरप्लस होईल आणि मग चांगले ग्राहक एम.आय.डी.सी.कडे जातील. गोरगरीब लोकांनाच फक्त आपल्याला वीज सप्लाय करावा लागेल. त्यामुळे ही काळजी करण्याचे काही कारण नाही. शेवटी आपली सुध्दा मागणी वाढणार आहे. या राज्यामध्ये ज्या पध्दतीने गुंतवणूक येत आहे ती गुंतवणूक आणण्याच्या दृष्टीकोनातून शासन प्रयत्न करीत आहे. बाकीच्या सगळया गोष्टी मी आधीच बोललो आहे. उद्योग क्षेत्राच्या थकबाकीच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. त्या थकबाकीमध्ये इंडस्ट्रीजची थकबाकी फार मोठया प्रमाणात नाही. आता वेळ नाही, अन्यथा मी सगळी आकडवारी सभागृहाला वाचून दाखविली असती. मात्र कृषिपंप आणि शासनाच्या वेगवेगळया स्वायत्त संस्था, मग महानगरपालिका असेल, नगरपालिका असेल, पाणीपुरवठा असेल, स्ट्रीट लाईट असेल त्यांचीच थकबाकी मोठया प्रमाणात आहे. एम.ओ.आर.सी. ने स्टॅण्डर्ड ऑफ परफॉर्मन्सचे सूत्र लागू केलेले आहे. एखाद्याने कम्प्लेंट दिल्यानंतर किती मिनिटात त्याला सर्व्हिस दिली पाहिजे याचे बंधन एम.ओ.आर.सी.ने सगळया वीज कंपन्यावर घातलेले आहे. त्या प्रमाणे झाले नाही तर त्याबाबतीत आर्थिक दंडाची तरतूद सुध्दा केलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

माझी सभागृहाला एकच विनंती रहील की, एम.आी.आर.सी.समोर कुठल्याही वीज कंपनीचा प्रस्ताव जातो त्यावेळेला उद्योग क्षेत्रातील लोक तेथे हजर असतात. आता सगळया लोक प्रतिनिधींना एक करावे लागेल की, आपले शेतकरी असतील, आपला झोपडपट्टीतील माणूस असेल, खेडयातील माणूस असेल. आता आम्हाला आमचे गट बनवावे लागतील आणि आमच्या त्या गटांना एम.आी.आर.सी.समोर जाऊन आपले प्रतिनिधीत्व करावे लागेल. त्याच्यामध्ये लोक प्रतिनिधीना घेता येत नाही. कारण हा केंद्र सरकारचा कायदा आहे. त्यामुळे लोक प्रतिनिधींनी त्या ठिकाणी जाऊन भूमिका मांडावयाची म्हटले तर तेथे कोणी थांबू देत नाहीत. त्यामध्ये तीन सदस्य आहेत. एक चेअरमन आणि दोन सदस्य आहेत. त्यांना गाईडलाईन देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. त्याच्यामध्ये कपॅसिटर आणि बाकीच्या सगळया गोष्टी या कार्यक्रमाचा भाग असल्या तरी, आता खूप जास्त वेळ झाला असल्यामुळे मी अधिक बोलू इच्छित नाही. पण मी राज्यातील जनतेला विश्वास देऊ इच्छितो की, तीन वर्षे झाले हे काम करायला आपण सुरुवात केली आहे. चार ते साडे चार वर्षानंतर आपल्याला रिझल्ट मिळणार आहेत. मी पाच वर्षाचे बोलत नाही. मी आता एक वर्षावर आलो आहे. सहा महिन्यावर आलो आहे असे म्हणण्यापेक्षा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये सुध्दा आपल्याला जे सोसावे लागेल ते सोसण्याची सुध्दा आपली तयारी आहे की, नाही. कदाचित लोक टीका करतील. टीका केली तर आम्ही अजिबात घाबरुन जाणारे नाही. कारण समर्थपणाने संपूर्ण राज्याचे मंत्रिमंडळ माझ्यापाठीमागे आहे. केंद्र सरकार समर्थपणे पुढे उभे आहे. महाराष्ट्राची अडचण ही देशाची अडचण समजून त्यामध्ये मदत करण्याची भूमिका ज्यावेळी केंद्र सरकारने घेतेली आहे, त्यावेळेला आज अडचणीची परिसिथती असली तरी उद्याच्या काळात ही अडचणीची परिस्थती दुरुस्त करण्याचा प्रयत्न करु. परंतु तोपर्यंत जे सहन करावे लागेल ते सहन करण्याची माझ्या सारख्याची जरुर तयारी राहील. मी श्री.गडकरी साहेबांना एवढेच विचारु इच्छितो. ते या ठिकाणी काही गोष्टी बोलले. पण मी रागावून आणि चिडून सांगणार नाही. त्यांनी सांगितले की, को-जनरेशनचे प्रकल्प केले पाहिजे. आपण 300 मेगावॅटचे करार केले. त्यानंतर श्री. गडकरी- साहेबांनी सुध्दा साखर कारखाना काढला आणि त्या साखर कारखान्याच्या माध्यमातून को-जनरेशनचा प्रॉजेक्ट करतो असे त्यांनी आज या सभागृहात सांगितले

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

असते आणि आज या सभागृहात एवढे सांगितले असते की, श्री. दिलीप वळसे-पाटील तुम्हाला काही करता आले नाही. मी या ठिकाणी माझ्या साखर कारखान्याच्या माध्यमातून 25 मेगावॅट, 50 मेगावॅट वीज गेल्या दोन वर्षात निर्माण दाखविली तर त्यांनी या राज्यासाठी चांगले काम केल्याचा आंनद झाला असता. ते मंत्री असतांना त्यांनी खूप चांगली कामे केली. मग ती रस्त्याच्या क्षेत्रातील कामे असतील, बाकीच्या क्षेत्रातील कामे असतील. उद्या श्री. दिलीप वळसे-पाटलांच्या साखर कारखान्याच्या माध्यमातून 6 मेगावॅट वीज उद्याच्या मार्च महिन्यात निर्माण होणार आहे. तेव्हा श्री. गडकरी साहेबांनी किंवा राज्यातील सगळया साखर कारखानदारांनी या को-जनरेशनच्या क्षेत्रात लक्ष घातले तर .....

श्री. खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

परंतु त्याचा दोष मी त्यांना देणार नाही पण सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी एक मित्रत्वाच्या नात्याने माझ्याकडून जास्त अपेक्षा करण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांना मी सांगू इच्छितो की, वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांना एक टाईम बाऊंड कार्यक्रम देऊन त्यानुसार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येतील, एवढेच मी या निमित्ताने सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

उपसभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

यानंतर मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, सभागृहाचे शुक्रवार, दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजीचे कामकाज पुढीलप्रमाणे असेल :--

1. सकाळी 10.00 ते 10.30 अर्धा-तास चर्चा.

2. सकाळी 11.00 वाजता नियमित बैठक. प्रश्नोत्तरे व इतर कामकाज.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन शुक्रवार, दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 10 वाजून 16 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 16 डिसेंबर, 2005 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही